खरा तो एकचि धर्म

लेखक : सदरुद्दीन इस्लाही
अनुवादक : प्रा. अब्दुल रेहमान शेख

अनुक्रमणिका

प्रस्तावना

या पुस्तकांत इस्लामच्या मौलिक तत्वांची तोंडओळख देण्यात आलेली आहे. दीर्घ काळापासूनची अशी मागणी सतत येत होती. म्हणून लेखकाने पुढील गोष्टी डोळ्यासमोर ठेवूनच या ग्रंथाची निर्मिती केली आहे. हा ग्रंथ फार काही तपशीलात जात नाही की अतिविद्वत्तापूर्ण सुध्दा नाही. एखाद्या बाबीवर जास्त महत्व देत नाही आणि इतरबाबींकडे दुर्लक्ष सुध्दा करीत नाही. हे संकलन कार्य अत्यंत साधे, सोपे आणि सरळ असे इस्लामचे वर्णन आहे. अत्यंत सुलभतेने इस्लामच्या मौलिकतत्वांना या ग्रंथात वर्णन केले आहे. जेणेकरून इस्लाम धर्माचे गुणवैशिष्टयें, आदर्श तसेच धर्माची मौलिक शिकवण वाचकांपुढे ठेवून इस्लामची पूर्ण जीवनपध्दती, इस्लामची शिस्तबध्दता आणि इस्लामची कार्यप्रणाली इ. बाबींचा गांभिर्यपूर्वक विचार करून वाचकाने श्रध्दाशीलतेकडे यावे. ह्याच जाणिवेतून हा ग्रंथ आज वाचकांना सादर केला जात आहे. मला पूर्ण आत्मविश्वास आहे की या ग्रंथाद्वारे ध्येयप्राप्ती होणारच आहे. मी ह्यासाठी प्रमाणिक प्रयत्न केला आहे की जे लोक मुस्लिम तर आहे परंतु त्यांना इस्लाम धर्माचे खरे ज्ञान नाही त्यांच्यासाठी हा ग्रंथ इस्लामला खऱ्या रूपात जाणून घेण्यासाठी वरदान ठरणार आहे. हे सर्व अल्लाहच्या कृपेनेच होणार आहे. जर या ध्येय प्राप्तीसाठी काही कमतरता राहिली असेल तर ती पूर्ण माझीच आहे, माझ्याच अपूर्ण ज्ञानामुळे आणि बुध्दीमत्तेमुळेच मी पूर्ण न्याय देवू शकलो नाही असे म्हणावे लागेल.

या ग्रंथात वाचकांपुढे तपशील आणि सारांश दोन्ही येणार आहेत. मी प्रत्येक विषयाच्या गरजेनुसार असे केले आहे. ज्यांच्या बद्दलजास्त चर्चा झालेली आहे आणि जे विषय सर्वश्रुत आहेत अशा बाबींवर मी जास्त काही खोलात शिरलो नाही. ज्या बांबीकडे अद्याप हवेतसे लक्ष देण्यात आलेले नाही अशा विषयांचाच मी या ग्रंथात उहापोह केला आहे. अशा विषयांबद्दल वाचकांना अपूर्ण ज्ञान फक्त आहे असे नव्हे तर त्या विषयी त्यांच्याकडे चुकीची माहिती आहे. त्यांना चूकीची माहिती दिल्यामुळे असे विषय त्यांच्यापुढे खऱ्या स्वरुपात अद्याप आलेलेच नाहीत. म्हणून अशा विषयांवर येथे सविस्तर चर्चा घडून आणली गेली आहे. मी अल्लाहजवळ प्रार्थना करतो आणि वाचकांनीसुध्दा मनापासून ही प्रार्थना करावी की या ग्रंथाद्वारे वर उल्लेखित उद्देश प्राप्त व्हावा. लोकांसाठी हा ग्रंथ खऱ्या अर्थाने इस्लामला समजून उमजून घेण्याचं साधन बनावं, तसेच या क्षुद्र लेखकासाठी हा ग्रंथ परलोकात सहाय्यक ठरावा. (आमीन-तथास्तु)

प्रकरण पहिले

इस्लामचा परिचय
अर्थ आणि स्वरूप

इस्लामचे मौलिक स्वरूप

अरेबिक भाषेमध्ये 'इस्लाम'चा शब्दश: अर्थ होतो आज्ञाधारकता. परंतु जेव्हा धार्मिक रूपात या शब्दाचा वापर केला जातो तेव्हा त्याचा अर्थ होतो एकमेव अल्लाहचीच आज्ञाधारकता! अशा प्रकारे 'मुस्लिम' तोच जो अल्लाहची आज्ञाधारकता स्वीकारतो आणि त्याची अवज्ञा मुळीच करीत नाही.

इस्लामची मौलिकता

हे आपणास ज्ञात आहे की इस्लाम धर्मचे आदेश दोन प्रकारचे आहेत. एक अनिवार्य (मौलिक) आदेश आणि दुसरे ऐच्छिक आदेश

अनिवार्य आदेश हे मूळत: नैसर्गिक स्वरुपाचे आणि टाळता न येण्यासारखे आहेत. एखाद्याला ह्या आदेशांचा भंग करता येत नाही, प्रत्येक सजीव अथवा निर्जीव निर्मितीला या आदेशांसमोर आपली मान तुकवावीच लागते. या आदेशांच्या विरोधात जाण्याचा अथवा त्यांना अमान्य करण्याचा हक्क जन्मत:च या निर्मितीकडून हिरावून घेतला जातो. उदाहरणार्थ सूर्याला ठराविक वेळेतच उदयास्त करण्याचा आदेश आहे. त्याला पृथ्वीपासून ठराविक अंतरावर राहूनच प्रकाश आणि उष्णता देण्याचा आदेश आहे. सूर्याला ह्या आदेशांचे तंतोतंत पालन करावेच लागते. सूर्य या आदेशांचे उल्लंघन करण्याचा अधिकार बाळगत नाही. तसेच हवा सजीवांना प्राणवायु पुरविण्याचे काम करीतच असते. याच प्रकारे पाण्याला तहाणलेल्यांची तहाण शमविण्याचा, अग्नीला जाळण्याचा, मनुष्याला त्याच्या जीभेने बोलण्याचा, कानाने ऐकण्याचा आणि नाकाने स्वास घेण्याचा आदेश देण्यात आलेला आहे. यांच्यापैकी प्रत्येक ह्या आदेशांचे तंतोतंत पालन करीत आहे. अशा प्रकारचे हे अनिवार्य असे मौलिक आदेश आहेत. सामान्यत: त्यांना नैसर्गिक नियम म्हणून संबोधले जाते.

अल्लाहचे दुसऱ्या प्रकारचे आदेश असे आहेत, की आपण त्यांचे पालन करण्यास बांधिल नाही. कारण ह्या आदेशात नैसर्गिकत: काही अनिवार्यता अल्लाहने ठेवलेली नाही. त्यामुळे अशा आदेशांना ऐच्छिक स्वरूपाचे आदेश असे म्हटले जाते. आपणास हे

आदेश पाळण्याचा अथवा टाळण्याचा अधिकार आणि स्वातंत्र्य असते. उदाहरणार्थ– मनुष्याने एकच एक ईश्वराची भक्ती, उपासना आणि पूजाअर्चना करावयाची आहे. परंतु तो असे करण्यास अथवा न करण्यास स्वतंत्र आहे. एकेश्वरत्व अथवा अनेकेश्वरत्व या दोघांपैकी कुणाचेही तो पालन करेल. एक ईश्वराऐवजी अनेकानेक अशा हजारो लाखो ईश्वरांची तो उपासना त्या एका समवेत करेल अथवा नास्तिक बनून राहील. कारण या आदेशांमध्ये अनिवार्यता नाही, अशा आदेशांना 'शरियत' अशे म्हणून संबोधले जाते.

दोन्ही प्रकारचे आदेश हे समान्यत: पवित्र असे धार्मिक आदेश आहेत. अल्लाहची आज्ञाधारकता म्हणजेच इस्लाम आहे. म्हणून या दोन्ही प्रकारच्या आदेशांचे पालन करणे म्हणजेच इस्लाम आहे हे अगदी स्पष्ट आहे.

या सृष्टीत सजीव आणि निर्जीवांपैकी कोणीही नाही जो आपल्या निर्माणकर्त्याच्या आधीन नाही. सर्व त्याचे आधीन आहेत. मनुष्य त्याच्या आधीन आहे. जिन्न त्याच्या आधीन आहेत. सर्व त्याच्या आदेशाचे पालन करणारे आहेत.

इस्लाम तथा मुस्लिम फक्त माणसासाठीच नाही तर इस्लाम आणि मुस्लिमाने संपूर्ण विश्व व्यापून टाकले आहे. म्हणून इस्लाम एका विशिष्ट प्रकारच्या निर्मितीचाच धर्म नाही तर तो सर्वांचा असा वैश्विक धर्म आहे. म्हणजेच इस्लाम अशा वस्तूंचा (जडवस्तूंचा) सुध्दा धर्म आहे ज्यांना इच्छा, भावना आणि बुध्दीविवेकांपासून दूर ठेवण्यात आले आहे आणि ते फक्त भौतिक नियमांना बांधील आहेत. अशा निर्मिती त्या भौतिक नियमांना तंतोतंत पाळतात म्हणून त्या सर्व खरे मुस्लिम आहेत. सूर्य हा मुस्लिम आहे कारण तो घालून दिलेल्या नियमांचे आणि आदेशांचे तंतोतंत आणि काटेकोरपणे पालन करतो. तो भ्रमण करतो, उष्णता निर्माण करतो, प्रकाश देतो आणि उदयास्त नियमित होतो. चंद्र आणि तारे मुस्लिम आहेत कारण ते त्यांना घालुन दिलेल्या नियमांचे कधीच उल्लंघन करीत नाहीत. हवा मुस्लिम आहे कारण ती वाहते, ढगांना गोळा करते, झाडाझुडपांना वाढवते आणि सजीवांना जीवन देते आपल्याला दिलेल्या आदेशांचे पालन करूनच! पाणी मुस्लिम आहे कारण पाणी जमिनीला सुपीक बनवते, पीक वाढविण्यास मदत करते, तहान शमवते आणि जेव्हा गरम केले जाते तेव्हा बाष्फ बनते कारण हे कर्तव्य घालून दिलेले आहे त्यांच्या निर्माणकर्त्याने त्याच्या आज्ञापालनासाठीच!

अशा प्रकारे हे विवादित आहे की अशा वस्तूंचा ज्यांना आशा, आकांक्षा आणि बुध्दीविवेक आणि स्वातंत्र्य बहाल करण्यात आलेले नाही त्या सर्वांचा धर्म इस्लाम आहे आणि ते सर्व मुस्लिम आहेत. हे सत्य फक्त बुध्दीविवेकावर अथवा सिध्दांतावरच आधारित नाही तर ह्याचे मूळ हे कुरआनच्या खालील संकेतवचनात दडून बसलेले आहे.

"वास्तविक पाहता आकाश व पृथ्वीमध्ये जे जे काही आहे ते आपणहून किंवा अपरिहार्यपणे अल्लाहला समर्पित झाले आहेत." (३:८३)

वरील कुरआनोक्तीनुसार हे सिध्द होते, की सर्व गोष्टी ज्या स्वर्गात आणि पृथ्वीवर आहेत त्या सर्व अल्लाहच्या आधीन आहेत आणि त्या सर्वांचा धर्म हा इस्लाम आहे. शिवाय त्या माणसांच्या आणि अदृश्य योनि (जिन्न) च्यापैकी जे या सत्यधर्माचा (इस्लाम) विरोध करतात, ते अल्लाहचे द्रोही आहेत.

खालील कुरआनोक्ती वरील संदर्भाला वेगळ्या शब्दांत वर्णन करीत आहे.

"तुम्ही पहात नाही की जे काही आकाशात आहे आणि जे पृथ्वीवर आहे तसेच सूर्य, चंद्र, तारे, पर्वत आणि वृक्ष व जनावरे आणि बहुतेक लोक देखील अल्लाह समोर नतमस्तक होत आहेत." (२२:१८)

वरील संकेत वचनं या गोष्टीला स्पष्ट करीत आहेत की एक दोन प्रकारच्या निर्मितीच फक्त अल्लाहची भक्ती आणि उपासना करीत आहेत असे नाही तर सर्व सृष्टी, आकाश, पृथ्वी, चंद्र, सूर्य, तारे, ग्रह, हवा, पाणी, झाडे, झुडपे, पशुपक्षी आणि मानव व जिन्न (योनि) इ. सर्व निर्मिती कणापासून ते सूर्यापर्यंत, लहान मोठी सजीव निर्जीव, विवेकी, अविवेकी असे सर्व अल्लाहचीच भक्ती, उपासना करीत आहेत आणि ते सर्व अल्लाहचेच दास म्हणजे "मुस्लिम" आहेत. ह्या आज्ञाधारकतेचा अगदी योग्य अर्थ हा आहे. ही सकल सृष्टी अल्लाहच्या आदेशाचे तंतोतंत पालन करणारी आणि फक्त अल्लाहचीच निष्ठावंत आहे आणि चराचर सृष्टीची ही आज्ञाधारकता अल्लाहच्या आस्तित्वाचे आणि त्याच्या गुणवैशिष्ट्यांचा सबळ पुरावा आहे.

वरील संकेत वचनावरून हे सत्य अगदी स्पष्ट होते की सृष्टीतील ह्या चराचर निर्मितींचा ज्यांना इच्छा आकांक्षा आणि अधिकारापासून वंचित ठेवले आहे, अशा सर्वांचाच धर्म हा इस्लाम आहे. परंतु त्यांना भौतिक अशा आदेशांनी बांधलेले आहे की जे नैसर्गिक आणि जन्मजात आहेत. हे आदेश वैकल्पिक स्वरुपाचे मूळीच नाहीत म्हणून अशा सर्व निर्मितीस जन्मजात मुस्लिम म्हणून संबोधले जाते.

ऐच्छिक तथा पारिभाषिक इस्लाम

आता आपण अशा निर्मितीबद्दल विचार करु या की ज्यांना निर्माणकर्त्याने (अल्लाहने) आवडीचे आणि इच्छा आकांक्षाचे स्वातंत्र्य बहाल केले आहे. त्यांची जडणघडण अशा पध्दतीची आहे की काही बाबतीत ते लाचार आहेत जशी वरील प्रकारची निर्मिती लाचार आहे. परंतु काही बाबतीत या प्रकारची निर्मिती लाचार नाही.

अशा बाबतीत त्यांना विचार, आचार आणि निवडीचे स्वातंत्र्य आहे, हा त्यांचा जन्मसिध्द हक्कच आहे. उदाहरणार्थ, काही धार्मिक (ईश्वरी) आदेश आहेत ज्यामुळे मनुष्य आपल्या डोळ्यांनी पाहतो, कानांनी ऐकतो आणि जिव्हेने बोलतो. परंतु दुसरे काही ईशआदेश असे आहेत की ज्यामुळे मनुष्य काही गोष्टींना पाहू, ऐकू आणि बोलू शकतो आणि इतर काही गोष्टींना नाही. पहिल्या आदेशांचे (ईश्वरी) मनुष्याला पालन करावेच लागते, परंतु दुसऱ्या प्रकारच्या ईशआदेशाबद्दल मनुष्यावर सक्ती अथवा बळजबरी नाही. या दुसऱ्या प्रकारच्या आदेशांचे तो पालन करील अथवा करणार नाही हे त्याच्या आवडीनिवडीवर अल्लाहने सोडून दिले आहे. मनुष्य हे आदेश पालन करण्यासाठी अथवा त्याला नकार देण्यासाठी पूर्ण स्वतंत्र आहे. भौतिक नियमानुसार तथा नैसर्गिक नियमाने मनुष्य हा आज्ञाधारक आहे हे त्याच्या जन्मजात (मूळ) इस्लामचे उदाहरण आहे. दुसऱ्या प्रकारात जेथे मनुष्याला आपला अधिकार वापरण्याचे स्वातंत्र्य आहे, ईशआदेशांचे पालन करणे तेथे ऐच्छिक ठरविले आहे. म्हणजेच येथे या प्रकारात, ''ऐच्छिक इस्लाम'' आहे. परंतु जेथे धर्माचा संबंध आहे, तेथे जन्मजात अथवा ऐच्छिक हा शब्द प्रयोग केला जात नाही. ईशआदेश (दिव्य प्रकटन) तथा इस्लाम हाच शब्दप्रयोग उपयोगात आणला जातो, कारण अगदी स्पष्ट आहे की चराचर सृष्टीसाठी (निर्मिती) या दोन्ही प्रकारचे ईशआदेशांना ते बांधील आहेत. नैसर्गिक तथा भौतिक नियमांना (आदेशांना) आज्ञापालनाबाबत कमी लेखले जाते. ऐच्छिक इस्लाम म्हणजेच ऐच्छिक ईशआदेशांना येथे कार्यान्वित करणे हा खरा प्रश्न आहे. म्हणून आजकाल दोन्ही शब्दावलींचा म्हणजेच 'जन्मजात इस्लाम' आणि 'इस्लाम' यांना ऐच्छिक ईशआदेशांसाठी सर्रास वापरले जात आहे.

अशा परिस्थितीत 'मुस्लिम' हा शब्द त्यांच्यासाठी वापरला जाऊ नये जे ईशआदेशांचे तथा दिव्यप्रकटनांचे पालन करीत नाहीत. म्हणून अशा स्थितीत ते जरी नैसर्गिक तथा भौतिक नियमांचे पालन करतील तर ते जन्मजात मुस्लिम म्हणूनच संबोधले जातील. त्यांच्यामध्ये ऐच्छिक इस्लामसाठी स्थान नसल्या कारणाने मौलिक (मूळ) इस्लाम हा निरर्थक ठरतो. खऱ्या इस्लामला अशा स्थितीमध्ये काहीच स्थान उरत नाही. धार्मिक दृष्टीने त्या मनुष्याला मुस्लिम असे म्हटले जाते जो पुढे जाऊन नैसर्गिक इस्लामला पार करून स्वत:ला स्वेच्छेने ऐच्छिक ईशआदेशांच्या (दिव्यप्रकटन) हवाली करतो. खऱ्या इस्लामला आपल्या जीवनात कार्यान्वित करण्याची ही सुरूवात आहे.

इस्लाम आणि मनुष्य

वर नमुद केल्याप्रमाणे ज्यांना ज्यांना अल्लाहने इच्छा आकांक्षा आणि निवडीचे

स्वातंत्र्य दिलेले आहे त्या निर्मितींपैकी मनुष्यसुध्दा एक आहे. तो फक्त त्यापैकी एक नाही तर त्यांच्यापैकी एक वैशिष्ट्यपूर्ण अशी निर्मिती आहे. म्हणूनच मनुष्याला अल्लाहने दिव्य प्रकटन तथा दिव्य आदेश देऊन मार्गदर्शन केले आहे. दिव्य कुरआननुसार जेव्हा प्रथम मानवाला पृथ्वीवर अल्लाहने पाठविले त्यावेळी अल्लाहने आदेश दिला,

''नंतर जर माझ्याकडून तुमच्याकडे काही मार्गदर्शन लाभले तर जे माझ्या मार्गदर्शनाचे अनुसरण करतील तर त्यांना न कोणते भय असेल न ते कधी शोक करतील. आणि जे लोक हे नाकारतील आणि आमच्या वचनांना खोटे ठरवतील तेच नरकाग्नीमध्ये पडतील आणि तिथेच सदैव खितपत राहतील.'' (२:३८-३९)

या आदेशांना दिव्य प्रकटन (मार्गदर्शन) अवतरित करण्यासाठी अट 'जरतर'च्या भाषेत घातली आहे. खरे पाहता ती अट नाही, परंतु ती एक अप्रतिम अशी वर्णनशैली आहे आदेश देण्याची! वरील संकेतवचनाचा गर्भितार्थ हा आहे की माझे दिव्य प्रकटन तुमच्याकडे यासाठी येत आहेत की तुम्ही त्यानुसार आचरण करावे.

खालील कुरआनोक्तीमध्ये हेच अधिक प्रभावीपणे स्पष्ट केले आहे,

''आणि कोणताही लोकसमुदाय (राष्ट्र) असा होवून गेला नाही ज्यात कोणी सावध करणारा आला नाही.'' (३५:२४)

वरील दोन्ही संकेतवचनांद्वारे हे निर्विवाद स्पष्ट होते की मनुष्याचे पृथ्वीवरील जीवन आणि दिव्यप्रकटन हे दोन्ही एक साथ आलेले आहेत आणि हे जग कधीही धर्मविरहित आणि ईशआदेशविरहित नव्हते. आणि एकही असा लोकसमूह (राष्ट्र) पृथ्वीवर नाही की ज्यास दिव्यप्रकटन (मार्गदर्शन) न देता ज्ञानाविरहित ठेवण्यात आले आहे. मनुष्य हा इच्छा-आकांक्षा आणि बुध्दीविवेक ठेवणारा तसेच निवड करण्याची योग्यता असणारा आहे, त्यामुळे त्याला ईशमार्गदर्शनाची गरज आहे. दिव्य प्रकटन आणि ईशधर्म (इस्लाम) मनुष्यासाठी स्वाभाविक आहे.

सर्वांचा धर्म एक

दिव्य प्रकटन तथा ईशआदेश निर्मितीकाळापासून मनुष्याजवळ अल्लाहने अवतरित केले आहेत. अल्लाहच्या आदेशाचे पालन करणे म्हणजे अल्लाहची आज्ञाधारकता स्वीकारणे होय. म्हणून निर्मितीकाळापासून (प्रारंभापासून) आलेले धर्म दुसरे तिसरे काही नसून इस्लाम आहे आणि त्या धर्मांचे अनुयायी मुस्लिम आहेत. परिणामत: दिव्य कुरआन पूर्ण एकवाक्यतेने, बुध्दीविवेकाने आणि पुराव्यानिशी निर्णय देत आहे. प्रेषित इब्राहीम (अ) यांच्याविषयी कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"इब्राहीम (अ.) यहुदीही नव्हता की ख्रिस्तीदेखील नव्हता किंबहुना तो तर एक एकचित्त मुस्लिम होता आणि तो कदापि अनेकेश्वरवाद्यांपैकी नव्हता." *(३:६७)*

कुरआनमध्ये एकेठिकाणी पुराव्यानिशी स्पष्टोक्ती आहे,

"जेव्हा पालनकर्त्याने त्याला सांगितले, "स्वत:ला समर्पित कर." तेव्हा तो त्वरित म्हणाला. "मी तर साऱ्या सृष्टीच्या पालनकर्त्याला समर्पित झालो आहे!" आणि अशाच प्रकारचे आचरण करण्याचा आदेश इब्राहीमने आपल्या मुलाबाळांना दिला होता. आणि तोच आदेश याकूबनेही आपल्या संततीला दिला होता. त्याने म्हटले की, "माझ्या मुलांनो, अल्लाहने तुमच्यासाठी हा धर्म पसंत केला आहे तेव्हा मरेपर्यंत अल्लाहला समर्पित होऊन राहा." *(२:१३१-१३२)*

अशाच प्रकारची स्पष्टीकरणे कुरआनने लुत (अ), मुसा (अ), सुलैमान (अ), ईसा (अ) आणि इतर अनेक प्रेषितांबद्दल दिलेली आहेत आणि स्पष्ट उल्लेख आहे की हे सर्व प्रेषित आणि त्यांचे अनुयायी मुस्लिम होते आणि त्या सर्वांचा धर्म इस्लाम होता.

मुळचा धर्म इस्लाम

वर उल्लेख केलेल्या स्पष्टीकरणामुळे हे अगदी स्पष्ट आहे की आता नावाबद्दल आणि ईशधर्माबद्दल अर्थ लावण्यासाठी दुमत होऊच शकत नाही. प्रत्येक ईशधर्म मग तो कुरआनप्रणित असो (शरियतनुसार) अथवा तौरेतनुसार किंवा आदम (अ) चा धर्म असो की नूह (अ) चा, किंवा इब्राहीम (अ) आणि ईसा (अ) यांच्यावर अवतरित झालेले ईशमार्गदर्शन असोत, प्रत्येकाच्या धर्माचे नाव इस्लाम होते आणि त्यांचे अनुयायी मुस्लिम होते. कारण या सर्वांचे मूलभूत स्रोत आणि वास्तवत: ईशमार्गदर्शन (शरियत) होते. हे दिव्य प्रकटन (ईशमार्गदर्शन व आदेश) हेच इस्लाम आहे आणि त्यांचे अनुयायी मुस्लिम! परंतु प्रत्यक्षमात्र वेगळेच काही घडले. हे अगदी विपरीत आहे. दिव्य कुरआनच्या विशेष अशा परिभाषेत इस्लाम हे त्या धर्माचे नाव आहे जे आदरणीय अंतिम प्रेषित मुहम्मद (स) यांच्यावर अवतरित झाले आहे. म्हणून 'मुस्लिम' हे नावसुध्दा प्रेषित मुहम्मद (स) यांच्या अनुयायींनाच देण्यात आले. जेव्हा कुरआन 'अल् इस्लाम' म्हणून उल्लेख करतो त्या वेळी सामान्यत: अर्थ अभिप्रेत नसून फक्त एक धर्म आणि त्याचे दिव्य अवतरणच अभिप्रेत आहेत. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"आज रोजी मी तुमचा धर्म तुमच्याकरिता परिपूर्ण केला आहे आणि आपली कृपा तुम्हावर परिपूर्ण केली आहे. आणि तुमच्यासाठी इस्लाम तुमचा धर्म म्हणून संमत केला आहे." *(५:३)*

“अल्लाहजवळ धर्म केवळ इस्लामच आहे.” *(३:१९)*

या संकेतवचनांत ‘अल इस्लाम’ हा शब्द फक्त एकच धर्म दर्शवितो आणि तो म्हणजें कुरआन आणि प्रेषित मुहम्मद (स) द्वारा अवतरित झालेला इस्लाम होय.

‘मुस्लिम’ या शब्दांबद्दल तर अगदी स्पष्ट आदेश आहे,

“अल्लाहने पूर्वीसुध्दा तुमचे नाव मुस्लिम ठेवले होते आणि या (कुरआनात) मध्येसुध्दा (तुमचे असेच नाव आहे).” *(२२:७८)*

या शब्दांचा अर्थ अगदी स्पष्ट आहे. वरील संकेत वचनांनुसार खात्रीलायक अगदी ठामपणे हे सत्य मांडले आहे की ज्यांनी ज्यांनी प्रेषितांवर विश्वास ठेवला, मग ते कोणतेही प्रेषित असोत, ते सर्व मुस्लिम आहेत. तथापि हा मान त्याच श्रध्दावंतासाठी आहे ज्यांनी मूलभूत धर्म इस्लाम वर श्रध्दा ठेवली व जे आचरणाने मुस्लिम आहेत, हेच लोक मुस्लिम आहेत. आदरणीय प्रेषित मुहम्मद (स) यांच्या अनुयायांव्यतिरिक्त कोणत्याच समुदायाला मुस्लिम म्हटले जात नाही. जरी एखाद्या लोकसमुदायाला ‘मुस्लिम’ हे नाव दिले तरी “तुम्हाला मुस्लिम नाव बहाल केले गेले आहे” या म्हणण्याला काहीच अर्थ उरत नाही. सर्व श्रध्दाशील लोक मुस्लिम होते. तेव्हा त्यांपैकी एखाद्या समाजाला मुस्लिम नावाने ओळखण्याची गरज भासत नव्हती. म्हणून जरी कुरआन एखाद्या लोकसमुदायाला मुस्लिम म्हणून संबोधन करतो त्या वेळी त्या शब्दाचा खरा आशय अभिप्रेत असतो. आपण म्हणू या की इस्लाम त्यांचे गुणवैशिष्ट्य होते आणि नाव अथवा शीर्षक नव्हते.

दूहीची कारणे

एकमेव ईश्वर– अल्लाहने इतर प्रेषितांद्वारे तोच धर्म इस्लाम अवतरित केला जो त्याने प्रेषित मुहम्मद (स) यांच्यावर अवतरित केला आहे, मग ही मतभिन्नता का? त्या इतर सर्व प्रेषितांचे अनुयायीसुध्दा तितकेच आज्ञाधारक होते जितके प्रेषित मुहम्मद (स) यांचे अनुयायी आज्ञाधारक आहेत. मग फक्त प्रेषित मुहम्मद (स) यांच्या अनुयायींना मुस्लिम का म्हटले जाते? सर्व धर्म (पूर्वीचे) इस्लाम होते आणि त्या सर्वांचे अनुयायी मुस्लिम होते, मग त्या धर्मांना इस्लाम आणि त्यांच्या अनुयायींना ‘मुस्लिम’ म्हणून का ओळखले जात नाही? हे काही कारणांशिवाय घडलेले नाही. हे नामकरण हे सर्वमान्य आणि अत्यावश्यक अशा वैश्विक लोकप्रिय नियमाद्वारे घडले. ते असे की ज्यांच्यामध्ये एकसारखी गुणवैशिष्ट्ये आढळली तर त्यांना विशिष्ट नावाने संबोधले जाते आणि त्यांचे नाव त्यांच्या गुणानुसार ठेवले जाते. दुसरा कुणी त्या नावाने ओळखला जाऊ लागला तर

त्याच्यामध्ये ती गुणवैशिष्ट्ये पूर्णरूपात आढळू लागतात. इतर कुणात ती कमी प्रमाणात असतील तरी तो त्याच एका नावाने ओळखला जातो. ज्याचा गुणदर्जा वैशिष्टपूर्ण होतो त्याप्रमाणे त्यास ओळखले जाते. अशा गुणवैशिष्ट्यांमुळे ते नावारूपाला येतात. अशा स्थितीत तो सूर्यासमान असतो आणि इतर त्याच्यापुढे फिक्या ताऱ्यासारखे असतात. उदाहरणार्थ, खरेपणा, सत्यता हे माणसाची गुणवैशिष्ट्ये आहेत. परंतु ''सत्यवचनी'' हे नाव आदरणीय अबू बकर (र) यांना बहाल करण्यात आले आहे. याचा अर्थ असा मुळीच होत नाही की ते एकटेच सत्यवचनी खरे होते आणि प्रेषित मुहम्मद (स) यांचे इतर सहकारी सत्यवचनी नव्हते, असा अर्थ मुळीच नाही. त्यांच्या पैकी तर काहीजण अशे होते ज्यांच्याविषयी प्रेषित मुहम्मद (स) यांनी असे उद्‌गार काढले होते की जर प्रेषित्व माझ्यावर संपले नसते तर हे प्रेषित झाले असते. म्हणजेच मुहम्मद (स) यांच्या सहकाऱ्यांपैकी एखाद दुसरा नव्हे तर सर्व सहकारी सत्यवचनी होते. अशा स्थितीत हा एक खास सन्मान म्हणून ''सत्यवचनी'' हा किताब माननीय अबुबकर (र) यांना बहाल करण्यात आला होता. ते या गुणवैशिष्ट्यात आदर्श होते. हे आपणास इतिहासात आणि प्रेषिताच्या पवित्र जीवनी आणि हदीस वचनातून कळून येते.

आदरणीय प्रेषित मुहम्मद (स) यांच्याद्वारे अवतरित धर्म आणि इतर प्रेषितांद्वारे अवतरित धर्म यांचा विचार वरील तत्त्वानुसार होणे आवश्यक आहे. खऱ्या अर्थाने मुहम्मद (स) आणि इतर प्रेषितांचा धर्म एकच म्हणजे इस्लाम होता. पूर्वीचे सर्व धर्म इस्लामसारखेच होते. परंतु प्रेषित मुहम्मद (स) जे अंतिम प्रेषित आहेत त्यांच्याद्वारे कुरआनच्या रूपात अवतरित झालेला धर्मच फक्त 'इस्लाम'चे नाव धारण करण्यास पात्र आहे. कारण इस्लामच्या गुणवैशिष्ट्यांत फक्त हाच धर्म पूर्णतः उतरतो आणि तोच एकमेव अप्रतिम असा इस्लामी गुणवैष्ट्यपूर्ण इतर धर्मांपेक्षा गुणश्रेष्ठ आहे. इतर धर्मांपेक्षा तो या गुणात वरचढ आहे. इस्लामव्यतिरिक्त इतर सर्व धर्मांची आदेश नियमावली संक्षिप्त आणि मर्यादित स्वरुपाची आहे, त्यामुळे हे धर्म एखाद्या छोट्या लोकसमूहासाठीच मर्यादित काळासाठी होते. परंतु इस्लामबद्दल असे नाही. इस्लाम धर्माची आदेश नियमावली ही सर्वसमावेशक अशी वैश्विक स्वरुपाची आहे. इस्लाम समस्त मानवतेला आवाहन करतो आणि कार्यकाल हा अमर्याद आहे. हा धर्म संपूर्ण विश्वाचा धर्म आहे. याचा मूलभूत स्वभाव हा निसर्गनियमांशी आणि मानवी स्वभावाशी सुसंगत आहे. त्या धर्माची शिकवण ही एक परिपूर्ण जीवनप्रणाली घडवून आणते. ईशदेणगीला या धर्माच्या (इस्लाम) रूपाने पूर्णत्व प्राप्त झाले आहे. आणि परिपूर्ण मार्गदर्शन जे आदम (अ) यांच्या काळापासून सुरू होते त्यास इस्लामच्या रूपानेच पूर्णत्व

प्राप्त झाले आहे. म्हणूनच हे अति उचित आहे की 'इस्लाम' हे नाव त्याच धर्माचे असावे जो परिपूर्ण, वैश्विक असा शेवटचा धर्म आहे.

याच कारणामुळे आदरणीय प्रेषित मुहम्मद (स) यांच्या अनुयायींना 'मुस्लिम' हे नाव आणि किताब देण्यात आला होता. मुस्लिम चारित्र्यांत ते इतरांपेक्षा अतिश्रेष्ठ होते. ते त्या धर्माचे ध्वजवाहक होते जो सर्व समावेशकता, उदारता आणि वैश्विकता या गुणात अद्वितीय आहे. त्यांना पुनरुत्थानाच्या दिवसापर्यंत अल्लाहचा हा संदेश (इस्लाम) प्रत्येक लोकसमूहापर्यंत आणि राष्ट्राराष्ट्रांत प्रसारित, प्रचारित करण्याची जबाबदारी सुपूर्द केली गेली. त्यांना इस्लामचे साक्षीदार म्हणून जगात नियुक्त करण्यात आले. त्यांना एका क्षणाचीसुध्दा सवड दिली गेली नाही की जोपर्यंत हा सत्यधर्म जगाच्या कानाकोपऱ्यात प्रसारित होत नाही.

इतर कोणत्याच लोकसमूहाला (राष्ट्राला) ही कठीणतम जबाबदारी देण्यात आलेली नाही. म्हणूनच हा लोकसमूह ''सर्वश्रेष्ठ लोकसमूह'' म्हणून संबोधला जातो आणि मुस्लिम नावसुध्दा त्यांच्यासाठीच आरक्षित केले आहे.

हा तपशील स्पष्ट करीत आहे की जरी समस्त सृष्टी मूलतः मुस्लिम, असली तरी आणि असे सर्व लोक जे ईशधर्माचे पालन करतात ते 'मुस्लिम' आहेत आणि प्रत्येक धर्म जो अल्लाहने अवतरित केला तो इस्लाम होता, जोपर्यंत इस्लाम आणि मुस्लिम शब्द वापरात होता. आता इस्लाम म्हणजे प्रेषित मुहम्मद (स) यांच्यावर अवतरित झालेला धर्म आणि मुस्लिम त्या धर्माच्या अनुयायींना म्हटले जाते.

प्रकरण दुसरे

श्रध्दाशीलतेची मूलतत्त्वे (ईमान)

इस्लामची शिकवण तत्त्वत: आणि व्यावहारिकत: एक दुसऱ्यापासून कमीजास्त महत्त्वाची आहे. त्यांच्यामध्ये नैसर्गिक क्रमवारी आहे. काही शिकवणी पायाच्या दगडाप्रमाणे मूलभूत महत्त्वाच्या आहेत तर काही भिंती आणि खांब यासारखी आहेत. त्या शिकवणींपैकी काही छतासारखी महत्त्वाच्या तर काही सुशोभिकरण साहित्यासारख्या आहेत. म्हणून अचूकपणे इस्लाम धर्माला जाणून घ्यावयाचे असेल तर इस्लामच्या शिकवणींचा अभ्यास अशा क्रमानेच करणे क्रमपात्र ठरते. म्हणून आपण इस्लामच्या मूलभूत शिकवणींचा येथे प्रथम विचार करु या. धार्मिक शब्दावलीमध्ये यास ''श्रध्दाशीलता'' (ईमान) असे म्हणतात.

श्रध्देला धर्माचा मूलाधार समजण्याबद्दल कुणाचे दुमत नाही. श्रध्दाशीलता म्हणजे धर्माची मूलतत्त्वे आहेत आणि इतर सर्व धर्माचरण आहेत. नंतरचे हे अगोदरच्या (मूलतत्त्वांचे) व्यावहारिकरूप म्हणजे एक प्रकारचा दाखला आहे. धर्माचरण एक वृक्ष आहे आणि श्रध्दाशीलता बीज आहे. जसे वृक्षाचे अस्तित्व बीजविरहित असूच शकत नाही, त्याचप्रमाणे धर्माचरण श्रध्दाशीलते विरहीत अशक्य आहे. म्हणून जोपर्यंत श्रध्दाशीलतेचे बीजारोपण मनात चांगल्या प्रकारे होत नाही तोपर्यंत इस्लामचे धर्माचरण अशक्य आहे. कुरआनोक्ती आहे,

''सदाचार हा आहे की जे अल्लाहवर आणि अंतिम-दिनावर श्रध्दा ठेवतात (ईमान धारण करतात), तसेच सर्व दूतांवर, सर्व ग्रंथांवर आणि सर्व प्रेषितांवर श्रध्दा ठेवतात.'' (२:१७७)

वरील कुरआनोक्तीवरून हा निष्कर्ष निघतो की श्रध्दा-शीलतेविना सदाचार व धर्मनिष्ठा अशक्य आहे. इस्लामची मूलतत्वे पाच आहेत. त्यांचा उल्लेख वरील संकेतवचनात आला आहे. तसेच इतर वेगवेगळ्या कुरआनोक्ती मध्ये सुध्दा उल्लेख आहेत. ही श्रध्देची पाच मूलतत्वें खालील प्रमाणे आहेत.

१) अल्लाहवर श्रध्दा-ईमान

२) कयामत दिवसावर श्रध्दा-ईमान

३) सर्व प्रेषितांवर श्रध्दा-ईमान

४) सर्व ईशग्रंथ व अवतरणावर श्रध्दा-ईमान आणि

५) सर्व दूतांवर श्रध्दाईमान

आदरणीय प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यानुसार आणखी एक सहावे मूलतत्त्व श्रध्देचे आहे आणि ते म्हणजे नशीब होय. एकदा जिब्रईल (अ.) यांनी प्रेषित मुहम्मद (स.) यांना विचारले की नशीब काय आहे? त्यावर प्रेषितांनी उत्तर दिले,

"तुम्ही तुमची प्रगाढ श्रध्दा अल्लाहवर, त्याच्या दूतांवर, त्याच्या ग्रंथांवर, त्याच्या प्रेषितांवर आणि कयामतच्या दिवसावर ठेवता तशीच प्रगाढ श्रध्दा तुम्ही तुमचे भलेबुरे करण्याच्या ईश्वरी निर्णयावर ठेवा." *(मुस्लिम - श्रध्दा)*

याचा अर्थ असा होत नाही की या विषयावर कुरआन आणि हदीस या दोहोंमध्ये मतभेद आहेत. हे फक्त स्पष्टीकरण आणि अचूकपणा स्पष्ट करण्यासाठी आहे. खरे तर नशीबावर श्रध्दा ठेवणे हा अल्लाहवर श्रध्दा ठेवण्याचा एक भाग आहे. म्हणून दिव्य कुरआनने श्रध्देबद्दलच्या सहाव्या मूलतत्त्वाचा स्वतंत्र असा उल्लेख केलेला नाही. आवश्यकतेनुसार या मूलतत्त्वाचा प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या परंपरेत (हदीस) उल्लेख आलेला आहे. नव्हे त्याची निकड स्पष्टीकरणासाठी आवश्यक होती. कारण नशीबावर श्रध्दा ठेवणे हे अल्लाहच्या इतर विशेष गुणांवर विश्वास ठेवण्यासारखेच महत्त्वाचे आहे.

वर उल्लेखित सहा श्रध्देची मूलतत्त्वे इस्लामी व्यवस्थेचा मूलाधार आहेत. त्यांच्यामुळेच इस्लामी व्यवस्थेला साकारले गेले आहे.

इस्लामच्या या मूलतत्त्वांचा अभ्यास सूचित करतो की ते समान दर्जाचे नाहीत तर त्यांचा दर्जा एकमेकांपासून भिन्न आहे. काही मूलतत्त्वे इतरांपेक्षा अधिक महत्त्वाची आहेत. या मूलतत्त्वांची आपण क्रमवारी लावली तर सुरवातीचे तीन मूलतत्त्वे ही सर्वाधिक महत्त्वाची आहेत आणि इतर बाकीची तीन तत्त्वे तार्किकदृष्ट्या अगोदरच्या तीन तत्त्वांपासून तयार झालेली आहेत. जर आपण सुरवातीची तीन तत्त्वे म्हणजे अल्लाह (एकेश्वरत्व) वर श्रध्दा, कयामतच्या दिवसावर (पारलौकिक जीवनावर) श्रध्दा आणि सर्व प्रेषितांवर श्रध्दा (प्रेषित्व) यांना पूर्णपणे जाणून घेतले तर इस्लामची पूर्ण परिस्थिती समजून घेण्यास अगदी सोपे होणार आहे. आणि इस्लामी व्यवस्था पूर्णरुपेण डोळ्यांपुढे साकार होईल यात शंका नाही.

"अल्लाहवर श्रध्दा"

अल्लाहवर श्रध्दा ठेवण्याचा अर्थ-

(१) अल्लाहवर श्रध्दा ठेवणे म्हणजे त्याच्या अस्तित्वावर श्रध्दा ठेवणे.

(२) दिव्य कुरआनने नमूद केलेले आणि प्रेषित (स.) यांनी स्पष्ट केलेले सर्व

ईश गुणविशेषांची साक्ष देणे.

(३) अल्लाहच्या प्रभुत्वावर विश्वास ठेवणे.

(४) अल्लाहच्या सर्व अधिकारांचा स्वीकार आणि अल्लाहच्या गुणविशेषांना अर्थहीन सिध्द करणाऱ्या कृत्यांचा अथवा विचारांचा अस्वीकार करणे.

(५) आपण वरील प्रथम अटीचा विचार केला तर ती स्वयम्‌सिध्द आहे आणि स्पष्टिकरणाची आणखी काही आवश्यकता नाही. एखादा मनुष्य अल्लाहवर विश्वास (श्रध्दा) ठेवूच शकत नाही जोवर तो अल्लाहच्या अस्तित्वाला मान्य करीत नाही.

बाकी तीन अटींना समजण्यासाठी स्पष्टिकरणाची आवश्यकता आहे. म्हणून सविस्तर चर्चा ह्या तीन्ही अटीं बद्दल होणे आवश्यक आहे. ह्या संदर्भानुसार अल्लाहच्या विशेष गुणाविषयी आणि त्यांच्या परिणामा विषयी उल्लेख करणे आवश्यक आहे. अल्लाहच्या विशेष गुणांची स्थितीही एकसारखी नाही. जे गुणविशेष मौलिक महत्त्वाचे आहेत ते अल्प प्रमाणात आणि एकरूप असे आहेत. अल्लाहची इतर सर्व गुणवैशिष्ट्ये त्यांचाच एक भाग आहे आणि तार्किक परिणाम आहे. आमच्या दृष्टीने जर आवश्यक ती सविस्तर माहिती या मौलिक गुणवैशिष्ट्यांबद्दल दिली तर इतर गुणवैशिष्ट्यांवर चर्चा करण्याची गरज पडणार नाही. ''अल्लाहची ती कोणती गुणवैशिष्ट्ये आपणास अल्लाहवर विश्वास ठेवण्यासाठी अपेक्षित आहेत?'' आपण या प्रश्नाचे उत्तर दिले तर पूर्ण स्थिती स्पष्ट होणार आहे. हे लक्षात घेता आपण अल्लाहची काही मौलिक गुणवैशिष्ट्ये आणि त्यांच्या परिणामांवर येथे सविस्तर चर्चा करू या.

खालीलप्रमाणे काही मौलिक व अधिक महत्त्वाची अल्लाहची गुणवैशिष्ट्ये आहेत–

(१) तो अनादि अनंत असा ईश्वर आहे. तो शाश्वत, सततचा आणि स्वयंभू आहे. त्याला कोणी निर्माण केले नाही तो स्वयम्‌निर्मित आहे.

(२) तो सर्वांचा निर्माता आहे. म्हणजे त्याने सर्व गोष्टींना निर्माण करून त्यांना शून्यातून अस्तित्व बहाल केले आहे.

(३) तोच पालनकर्ता स्वामी आहे. तोच सर्वांना उपजीविका देतो आणि प्रत्येकांची गरज भागविणारा तोच आहे.

(४) तोच प्रभु, सम्राट आणि सर्वांचा शासक आहे. सर्व काही त्याचेच आहे आणि सर्व त्याची स्तुती करणारे आहेत.

(५) तोच ज्ञानी आहे. त्यालाच सर्व गोष्टींचे ज्ञान आहे. तो प्रत्येक कृती आणि हालचालींना जाणून आहे. काय घडलेले आहे, काय घडत आहे आणि काय घडणार आहे

हे सर्व (भूत, वर्तमान, भविष्य) त्याच्या ज्ञानकक्षेत आहे. त्याच्या दृष्टीक्षेपाबाहेर काहीही नाही.

(६) तोच सर्वज्ञानी आहे. त्याची प्रत्येक कृती ही ज्ञानपूर्ण, हेतुपूर्वक आणि निर्णायक अशी असते. कोणतीही कृती ज्ञानाविना, हेतुविना आणि निर्णयहीन अशी मुळीच असू शकत नाही.

(७) तो प्रभुत्वशाली, सर्वशक्तिमान आहे. काहीही करणे त्याच्या शक्तीपलीकडचे नाही. त्याची अशी कोणतीच इच्छा नाही ज्याची इच्छापूर्ती होत नाही. सर्वकाही करणारा तोच आहे.

(८) तो न्यायप्रिय आहे, त्याची प्रत्येक कृती न्यायावर आधारित आणि स्पष्ट असते. अल्लाहचे दिव्य प्रकटन अथवा धार्मिक आज्ञा सर्व न्यायावर आधारित आहेत. त्याचे सर्व निर्णय न्यायसंगत आहेत.

(९) अल्लाह स्वयंभू आहे. तो लोकांना त्यांच्या कृत्यानिशी मोबदला देतो. तो त्यांना त्यांच्या दुष्कृत्यांबद्दल शिक्षा देतो आणि सदाचाराबद्दल उपकृत करतो.

(१०) तोच एकमात्र पूजनिय आहे. तोच एकमात्र भक्ती आणि उपासना करण्यास पात्र आहे. तोच स्पष्ट पाहतो की आपण त्याची भक्ती, उपासना आणि पूजा-अर्चा करतो, त्याच्या पुढे आपण नतमस्तक होतो आणि त्याच्या पुढेच आपण मदतीची याचना करतो.

(११) अल्लाह एकमेव आहे. त्याच्या गुणवैशिष्ट्यांत कोणीही त्याचा सहाय्यक अथवा भागीदार नाही अथवा त्याचा स्पर्धक नाही. तो फक्त चिरंजीवी आणि शाश्वत नाही तर तो निर्माता, पालनकर्ता, शासनकर्ता व नियंता आहे. प्रभुत्वसंपन्न आणि न्यायप्रिय आहे, तोच एकमात्र पूजनीय आहे प्रभुत्वसंपन्न आहे. तोच एकमात्र ज्ञानी आहे आणि तोच एकमात्र फक्त स्वयंभू आहे.

वर उल्लेखित अल्लाहच्या काही गुणवैशिष्ट्यांपैकी, शेवटी ज्या एकमेवतेच्या गुणवैशिष्ट्याचा (एकमात्र फक्त) उल्लेख आहे तो एक अत्यंत महत्त्वाचा आणि विशेष मौलिक गुण आहे. ज्याप्रमाणे इस्लामची मूलतत्त्वे इस्लाम धर्माचा आत्मा आहे त्याचप्रमाणे एकमेव अल्लाहवर प्रगाढ श्रध्दा (एकेश्वरत्व) हा इस्लामच्या मूलतत्त्वांचा (श्रध्देचा करारनामा) आत्मा आहे. आपण जर एकेश्वरत्वाच्या या गुणवैशिष्ट्याचा गांभीर्यपूर्वक अभ्यास केला तर कळून येते की एकेश्वरत्व हा अल्लाहच्या सर्व गुणवैशिष्ट्यांचा कळस (सर्वश्रेष्ठ गुण) आहे. म्हणून अल्लाहचा हा एकमेव गुण

(एकेश्वरत्व) इतर सर्व गुणांचे प्रतिनिधित्व करतो आणि इतर गुणवैशिष्ट्यांना सहाय्यक ठरतो. जो पूर्ण गांभीर्याने, विचारपूर्वक आणि ठामपणे सांगतो की एकमेव अल्लाहच फक्त पूजनीय आहे, तर तो वस्तुतः अल्लाहच्या सर्व इतर गुणवैशिष्ट्यांवर ठाम विश्वास ठेवून असतो. आपण जर या वैशिष्टयपूर्ण आणि सर्वसमावेशक अशा एकेश्वरत्वाच्या गुणवैशिष्ट्याला विचारात घेऊन पाहिले तर इतर गुणवैशिष्ट्यांचे महत्त्व आणि परिणामांचा स्वतंत्र अभ्यास करण्याची गरज भासत नाही. म्हणून एकेश्वरत्वाच्या गुणवैशिष्ट्यांच्या परिणामांची प्रथमतः चर्चा होणे आवश्यक आहे. दिव्य कुरआन आणि प्रेषित मुहम्मद (स) यांच्या कथनानुसार एकेश्वरत्वाच्या परिणामाचा आणि संबंधाचा सविस्तर उल्लेख आलेला आहे.

(१) अल्लाहशिवाय इतर कोणीही नाही जो स्वयम्‌निर्मित आहे. इतर सर्व त्याची निर्मिती आहे आणि अल्लाहनेच सर्वांना निर्माण केले आहे.

''अल्लाह प्रत्येक वस्तूचा निर्माता आहे.'' (३९:६२)

सर्व काही त्याचेच आहे आणि सर्व त्याचेच आधीन आहेत. सर्व त्या अल्लाहचेच गरजवंत (मुहताज) आहेत.

''प्रत्येक वस्तूचा सृजनकर्ता केवळ अल्लाह आहे आणि तो एकमेव आहे, सर्वांवर प्रभुत्वसंपन्न! (१३:१६)

सृष्टीतील प्रत्येक वस्तूला स्वतःचे असे गुणवैशिष्ट्य नाही. जे काही गुण त्यांच्यामध्ये आहेत ते सर्व अल्लाहने बहाल केलेले आहेत आणि ते गुण अल्लाह इच्छिल तोपर्यंत त्यांच्यामध्ये राहू शकतील. सर्व काही अल्लाहवर अवलंबून आहे.

(२) मूलतः अल्लाह इतर सर्वांपेक्षा वेगळा आहे आणि त्याच्यासारखा इतर कोणीही नाही.

''सृष्टीतील कोणतीही वस्तू त्याच्या सदृश्य नाही.'' (४२:११)

तो कल्पनेपलीकडचा आहे. अल्लाहची कल्पना अथवा तुलना होऊच शकत नाही. कोणत्याही अतिमहान अस्तित्वाची अल्लाहशी तुलना होऊच शकत नाही.

''अल्लाहसाठी सर्वांत उच्च विशेषणे आहेत, तोच तर सर्वांवर प्रभुत्वसंपन्न आणि बुध्दिमत्तेत परिपूर्ण आहे.'' (१६:६०)

अल्लाह कुणाचाच पिता नाही की कुणी त्याचा पुत्र नाही.

''न त्याची कुणी संतती आहे आणि न तो कोणाची संतती'' (११२:३)

त्याने स्वतःला इतरांमध्ये सामावून घेतलेले नाही किंवा इतरांनी त्याच्यामध्ये (अल्लाहच्या अधिकारांत) शिरकाव केलेला नाही.

(३) स्तुती फक्त अल्लाहसाठीच आहे. अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करण्यासाठी प्रत्येकाने काळजी घेतली पाहिजे. मनुष्याच्या प्रत्येक कृतीचे अंतिम ध्येय आणि उद्दिष्ट अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करणे हेच असणे आवश्यक आहे. फक्त आणि फक्त हेच त्याचे जीवनध्येय असणे आवश्यक आहे.

(४) सर्व कृती आणि हालचाली या दृष्य स्वरुपात अथवा वास्तविक स्वरुपात उपासनेचा आभास अथवा साम्य आढळत असेल तर ते फक्त अल्लाहसाठीच आहे. फक्त त्याच्यासाठीच मनुष्य उपासनेत त्याच्यापुढे नतमस्तक होतो. शपथ त्याच्या नावानेच घेतली जाऊ शकते. प्रार्थना त्याच्यासाठीच असते. अदृष्य सहाय्य करणारा तोच एकमेव आहे. तोच फक्त अदृष्य मदतीसाठीच्या याचनेला पात्र आहे.

(५) सर्व उपासनेसाठीच्या भावना आणि इच्छा फक्त अल्लाहसाठीच आहेत. त्याच्याकडेच आशेने रुजू होणे आवश्यक आहे. फक्त त्याचीच भीती बाळगली पाहिजे. खरे प्रेम अल्लाहसाठीच असणे आवश्यक आहे.

(६) अल्लाह या सृष्टीचा प्रभु सम्राट आहे. हे जग सृष्टीचा एक लहानसा तुकडा आहे. फक्त अल्लाहच एकमेव आज्ञा देणारा, अंकित करणारा आणि माफ करणारा आहे. फक्त तोच खरा कायदा करणारा आहे. तोच मनुष्याला त्याच्या जीवनात पात्रता बहाल करणारा, त्याच्या जीवनव्यवहाराचा निकाल देणारा आणि त्यानुसार मनुष्याला माफ करणारा आणि शिक्षा देणारा सर्वेसर्वा आहे.

(७) फक्त अल्लाहच एकेश्वरत्वाचा वैभवशाली हकदार आहे. तोच सर्वांचा निर्माता आणि एकमेव पूजनीय आहे. स्तुतीसाठी फक्त तोच पात्र आहे. फक्त अल्लाहचीच प्रसन्नता प्राप्त होईल ही अभिलाषा धरावी. प्रार्थनेत नतमस्तक त्याच्याऐवजी दुसऱ्या कोणापुढेही होणे अन्यायकारक कृत्य आहे.

अल्लाहशिवाय दुसरा कुणीही नाही जो आपला उपकारक, समस्या निवारण करणारा, आपल्या गरजा पूर्ण करणारा आणि संकटांपासून आपले रक्षण करणारा आहे. अल्लाहशिवाय इतर कोणीही नाही जो भक्ती आणि प्रार्थनेसाठी लायक आहे आणि कठीण परिस्थितीत ज्याच्या मदतीची याचना केली जावी. अल्लाहशिवाय इतर कोणीही नाही ज्याच्यावर विश्वास ठेवला जावा आणि ज्याचे भय मनात बाळगले जावे. त्या अल्लाहशी फक्त आपल्या आशा आकांक्षा निगडीत आहेत आणि अल्लाहच फक्त खऱ्या प्रेमाला पात्र

आहे. खऱ्या शक्तीचा एक कण सुध्दा दुसऱ्या कोणाला ही प्राप्त होत नाही. अल्लाहशिवाय दुसरा कोणीही नाही ज्याला कायदेकानू बनविण्याचा वैधानिक अधिकार आहे आणि त्याची इच्छा दुसऱ्यांवर लादण्याचा हक्क नाही. शक्ती आणि सामर्थ्याने दुसऱ्यांना आपल्या आज्ञांकित करावे हे कृत्य अन्यायकारक आहे. अल्लाहशिवाय इतर दुसरा कोणीही नाही ज्याला कायदेकानू बनविण्याचा वैधानिक अधिकार आहे. आणि आपली इच्छा दुसऱ्यांवर चालविण्यासंबंधी आणि इतरांना आपले आज्ञांकित करण्याचा न्यायिक अधिकार फक्त अल्लाहचाच आहे.

हे अल्लाहच्या एकेश्वरत्वाचे मौलिक घटक अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यातील एखादा जरी आपण अमान्य करत असाल तर अल्लाहवर आपला विश्वास निरर्थक आणि खोटा ठरतो. याचाच अर्थ हा आहे की हे सर्व घटक एकेश्वरत्वाच्या संकल्पनेत अंतर्भूत आहेत, तो खरा आणि सच्चा मुस्लिम नाही, जर तो श्रध्देच्या सर्व मौलिक घटकांना मनापासून मान्यता देऊ शकत नाही.

अल्लाहसाठी भागीदार

ही कल्पना स्पष्ट होण्यासाठी त्याच्या विरुध्द बाजूला आपण पाहू या. महत्त्वाच्या तत्त्वांना आणि नियमांना पाहताना त्यांच्या विरुध्द बाजूंचासुध्दा विचार केला जातो. एकेश्वरत्वाची संकल्पना स्पष्ट रूपाने समोर येण्यासाठी त्याची विरुध्द बाजू म्हणजे अल्लाहसाठी सहाय्यक (भागीदार) ठरविणे इ.चा येथे विचार करणे क्रमप्राप्त ठरते. दिव्य कुरआनने आपणा सर्वांसमोर एक मार्गदर्शक रेषा याविषयी आखून दिलेली आहे. कुरआन याविषयी मार्गदर्शन करताना फक्त व्याख्या देऊन थांबत नाही तर एकेश्वरत्वाची शिकवण देताना या संकल्पनेचे फायदे तोटे देऊन तथा परिणामांवर फक्त चर्चा करीत नाही. दिव्य कुरआन एकेश्वरत्वाच्या विरुध्द अनेकेश्वरत्वाच्या स्वरुपावर, आचरणावर आणि तोट्यांविषयी सविस्तर चर्चा करतो. अनेकेश्वरत्वात अल्लाहचे भागीदार (पार्टनर) ठरविले जातात. अनेकेश्वरवादी श्रध्दा कशी समूळ खोटी आहे याचा सविस्तर उहापोह दिव्य कुरआन करीत आहे. एकेश्वरत्वाची शिकवण देताना दिव्य कुरआनने ज्या पारिभाषिक शब्दावलीचा उपयोग केलेला आहे त्यात एकेश्वरत्वाचा स्वीकार आणि या एकेश्वरत्वाच्या विरोधातील सर्व संकल्पनांचा अस्वीकार व विरोध आहे. ''अल्लाह फक्त पूजनीय आहे'' असे म्हणण्याऐवजी कुरआन स्पष्टोक्ती आहे,

''अल्लाहशिवाय कोणी खरा ईश्वर नाही.'' *(३७:३५)*

दिव्य कुरआनची ही वर्णनशैली अगदी स्पष्ट आहे. जोपर्यंत अल्लाहसाठी भागीदार

(पार्टनर) ठरविण्याची कल्पना म्हणजेच अनेकेश्वरत्व पूर्णरुपेण नाकारला जात नाही, तोपर्यंत एकेश्वरत्वाची विशुध्द कल्पना पुढे येऊच शकत नाही. म्हणून ही अनेकेश्वरत्वाची कल्पना नाकारणे जितके महत्त्वाचे आहे तितकेच महत्त्वाचे त्याबद्दलचे ज्ञान बाळगणे महत्त्वाचे आहे.

अल्लाहव्यतिरिक्त इतरांना ईशत्वात भागीदार ठरविणे या कल्पनेला अरेबिक भाषेत 'शिर्क' असे म्हणतात. शिर्कचा अर्थ भागीदार होणे. पारिभाषिक भाषेत अल्लाहसोबत आणि त्याच्या गुणांबरोबर इतर कुणाला भागीदार करून घेणे असा अर्थ आहे. तसेच अल्लाहच्या गुणविशेषांपैकी दुसऱ्या एखाद्याला अल्लाहच्या गुणविशेषात समर्थ ठरविणे. अल्लाहव्यतिरिक्त इतरांना ईशत्वात भागीदार ठरविण्याचे तीन प्रकार आहेत.

१. पहिला प्रकार त्याच्या अस्तित्वासंबंधीचा आहे.

२. दुसरा प्रकार अल्लाहच्या गुणविशेषांसंबंधी आहे.

३. तिसरा प्रकार त्याच्या गुणविशेषांच्या परिणामांसंबंधी आहे.

वरील तिन्ही 'शिर्क' (द्रोह) च्या प्रकारांची उदाहरणे खालीलप्रमाणे आहेत.

(१) कुण्या एखाद्याला अल्लाहच्या समकक्ष समजणे.

(२) कुण्या एखाद्याला अल्लाहचा पिता अथवा मुलगा समजणे.

(३) असा विश्वास ठेवणे की अल्लाहच्या एकत्वात इतरांचा समावेश करून एकेश्वरत्व बनले आहे.

(४) असा विश्वास ठेवणे की अल्लाह इतरांच्या रूपात प्रकट होतो अथवा कुणी इतर अल्लाहच्या वंशाचा आहे ही श्रध्दा बाळगणे इ.

उदारणार्थ, अरब लोक दूतांना ईश्वरकन्या मानत असत आणि पवित्रयोनी (जिन्न) यांना अल्लाहचे कुटुंब मानत. त्याच प्रकारे ख्रिश्चन लोक ईसा (अ) येशू यांना ईश्वराचा एकमेव पुत्र मानतात. अशा प्रकारे येशूला ते देव मानतात. हा सर्व प्रकार कुण्या एखाद्याला अल्लाहच्या समकक्ष मान्य करण्याचा आहे.

दुसऱ्या प्रकारचा ईशद्रोह (शिर्क) हा आहे की अल्लाहचे गुणवैशिष्ट्यांपैकी एखादा गुण कुण्या दुसऱ्यांमध्येसुध्दा आहे आणि ते अल्लाहसारखेच गुण राखून आहेत, असे समजून असणे. उदाहरणार्थ, 'ज्ञान' (ज्ञानी) हा अल्लाहच्या अनेक गुणांपैकी एक आहे. अल्लाह सर्व काही जाणून आहे, मग ते प्रकट अथवा अप्रकट (गुप्त) असो. अल्लाहसाठी भूतकाळ आणि भविष्यकाळ हे वर्तमानकाळाप्रमाणे आहेत. झालेले आणि होणारे सर्वांचे

ज्ञान अल्लाहजवळ आहे. अल्लाहसारखे ज्ञान अल्लाहजवळच आहे. कोणी एखादा असा विचार करू लागतो की अल्लाहसारखे ज्ञान त्याच्याजवळसुध्दा आहे तर हाच ईशद्रोहाचा प्रकार आहे. तसेच शुभ-अशुभ (नफा-तोटा) हे अल्लाहच्या हातात आहे. म्हणजे अल्लाह ज्याला इच्छितो त्याल सुखी-समाधानी करतो आणि ज्याला इच्छितो त्याला वंचित ठेवतो. जर कोणी असा विचार करू लागतो की कोणी दुसरासुध्दा म्हणजे दूत, जिन्न, साधु-संत, बाबा इ.सुध्दा नफा-तोटा (शुभ-अशुभ) करण्याचे सामर्थ्य बाळगून आहेत तर असा मनुष्य ईशद्रोही आहे. तो अल्लाहच्या निर्मितींनाच अल्लाहच्या (निर्माणकर्ता) गुणवैशिष्ट्यांत भागीदार करून घेतो, हा घोर ईशद्रोह आहे.

तिसरा प्रकार ईशद्रोहाचा हा आहे की अल्लाहच्या गुणवैशिष्ट्यांच्या अत्यावश्यक परिणामांना फक्त आणि फक्त अल्लाहसाठीच न मानता सर्वगुणसंपन्न अथवा काही गुणसंपन्न इतरांनासुध्दा मान्य करणे. उदाहरणार्थ, खरे प्रेम (मनापासून) आणि आज्ञाधारकता फक्त अल्लाहसाठीच आहे. एकाद्या व्यक्तीने मनापासून प्रेम आणि आज्ञाधारकता इतर कुणाची केली आणि त्याला पूजनीय मानू लागला तर अशा व्यक्तीने अल्लाहशी द्रोह केला. अशी व्यक्ती ईशद्रोही आहे, कारण त्याने इतरांना अल्लाहच्या हक्कांमध्ये सामील करून घेतले आहे. अल्लाह सर्वशक्तिमान आणि सत्ताधीश आहे. आदेश देणे त्याच्याच हातात आहे. इतर कुणाला सर्वशक्तिमान तथा सत्ताधीश शासनकर्त्याचे पद बहाल केले गेले, मग ती कुणी व्यक्ती असो की एखादा समुदाय असे समजून करणे म्हणजेच अल्लाहशी द्रोह करणे होय. अल्लाहच्या या गुणवैशिष्ट्यांमध्ये इतरांना भागीदार करून घेण्यासारखे हे कृत्य आहे. हा घोर ईशद्रोह आहे.

वर नमूद केलेल्या सर्व तत्त्वप्रणाली कार्यरत असताना त्या ठिकाणी इस्लामी सिध्दान्तानुसार अल्लाहच्या एकेश्वरत्वाला मुळीच वाव राहात नाही. एकेश्वरत्व अशा वेळी अशा ठिकाणी अस्तित्वहीन बनून राहते. जेथे एकेश्वरत्वाची संकल्पना अस्तित्वहीन बनते तेथे ईमान-श्रध्दा कुचकामी ठरते. जेथे जेथे श्रध्दा आणि ईमान नाही तेथे इस्लाम नाही. इस्लाम अशा ठिकाणी अस्तित्वहीन सिध्द होते. म्हणून अशा स्थितीला दिव्य कुरआन ''घोडचूक'' म्हणून संबोधित करीत आहे.

''अल्लाहसमवेत कोणालाही सहभागी ठरवू नकोस, सत्य हे आहे की अल्लाहसमवेत कोणालाही सहभागी ठरविणे (शिर्क) फार मोठी घोडचूक आणि फार मोठा अन्याय आहे.'' *(३१:१५)*

म्हणून कुरआन अनेकदा स्पष्टोक्ती करीत आहे की प्रत्येक गुन्ह्यासाठी क्षमा आहे. परंतु अल्लाहसमवेत इतर कुणालाही सहभागी ठरविण्याच्या ईशद्रोही कृत्यासाठी आणि

गुन्ह्यासाठी क्षमा नाही.

"नि:संशय अल्लाह केवळ त्याच्यासोबत अन्य कुणाला सामील करणाऱ्यांना क्षमा करीत नाही. याव्यतिरिक्त इतर जितके गुन्हे आहेत तो हवे ते माफ करतो, अल्लाहबरोबर ज्याने इतर कोणाला भागीदार केले त्याने तर एक मोठे असत्य रचले आणि भयंकर मोठ्या पापाची गोष्ट केली." (४ : ४८)

येथे हे निर्विदित मान्य करावेच लागते की विरोधी मुद्याला दिव्य कुरआन अतिशय स्पष्टपणे समोर ठेवत आहे. रुपकाद्वारा त्या वादातित मुद्याला स्पष्ट करावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की क्षयरोगी जो शेवटच्या (तिसऱ्या) स्टेजला जाऊन पोहचला आहे. त्यालासुध्दा औषधाने बरे करता येते, परंतु ज्याच्या हृदयाचे ठोकेच बंद पडले त्याला कसे बरे करता येईल? काय झाडाची वाढ बीजांकूराशिवाय शक्य आहे?

प्रकरण तिसरे

पारलौकिक जीवन

पारलौकिक जीवनावर श्रध्दा

पारलौकिक जीवनावर श्रध्दा ठेवणाऱ्या व्यक्तीला खालील गोष्टींना अंत:करणाने स्वीकारावे लागते.

(१) मनुष्याची निर्मिती विशिष्ट हेतुसाठी (सकारण) केली गेली आहे. माणूस एक जबाबदार व्यक्तिमत्त्व आहे. त्याच्या निर्माणकर्त्याने (अल्लाहने) त्याला एक परिपूर्ण जीवनसिध्दान्त (मार्गदर्शन) दिला आहे. या मार्गदर्शनानुसार जीवन कंठने सदाचार आहे, पुण्य आहे. परंतु एखाद्याचा मनपसंत मार्ग स्वीकारणे की ज्याचा दिव्य प्रकटनाशी (मार्गदर्शनाशी) काहीएक संबंध नाही आणि असे जीवन कंठने हे दुराचार आणि पाप आहे.

(२) माणसाचे जीवन त्याच्या मृत्युमुळे समाप्त होत नाही तर मृत्युपश्चातसुध्दा निरंतर एक जीवन आहे. त्याच्या जीवनकाळात मनुष्याचे जीवनव्यवहार भौतिकदृष्ट्या संपुष्टात येतात जेव्हा मनुष्य मरतो. परंतु त्याच्या जीवनव्यवहाराचे नैतिक परिणाम निरंतर असतात. तो अंतिम दिवस अल्लाहच्या इच्छेनुसार येणारच आहे जेव्हा ही सर्व सृष्टीव्यवस्था नाश पावेल आणि एकही सजीव जीवंत राहणार नाही. सर्वांनाच मृत्यू येणार आहे. दिव्य कुरआनच्या पारिभाषिक शब्दावलीत यास "प्रलय" (कयामत) म्हटले आहे.

(३) प्रलय (कयामत) नंतर समस्त सजीवांना की ज्यांनी जन्म घेतला आणि मृत्यू पावले आहेत असे सृष्टीनिमणिापासूनच्या सर्व सजीवांना पुन्हा जीवन प्रदान केले जाईल. (आत्मा आणि शरीर दिले जातील) यालाच पुनरुज्जीवन असे म्हणतात.

(४) या पुनरुज्जीवनानंतर मनुष्याच्या जीवनाचा दुसरा अध्याय सुरू होतो. आपणा सर्वांना अल्लाहच्या दरबारात हजर केले जाईल आणि तेथे आपल्या जीवनांच्या प्रथम सत्र (अध्याय) विषयी विचारणा होईल. आपल्या प्रथमसत्र जीवनाचा तंतोतंत हिशेब की ज्यात सदगुणांचा तथा दुर्गुणांचा एक एक कणसुध्दा नमूद केलेला असेल, अल्लाहसमोर ठेवला जाईल. हा प्रत्येकाचा हिशेब सर्वांसमक्ष ठेवला जाईल. न्यायदानाचे माप निश्चित असेल आणि प्रत्येक कार्य मोजले जाईल. ते नशीबवान ज्यांचे सदाचाराचे पारडे जड होईल त्यांना द्वितीय सत्र जीवनात बक्षीस देऊन उपकृत केले जाईल. ही

ईशकृपा अमर्याद अशी असेल, निरंतर आणि मानवी कल्पनेपलिकडील अशी असेल. ही स्थिती प्राप्त केल्यानंतर माणसाला दुसरी कशाचीच इच्छा राहणार नाही. या स्थितीला ''जन्नत'' (स्वर्ग) असे दिव्य कुरआन संबोधन करीत आहे.

दुर्दैवी लोक ते आहेत ज्यांची स्थिती वर नमूद केलेल्या स्थितीविरुध्द असेल आणि ज्यांचे रेकार्ड पापी कृत्यांनी भरलेले असेल आणि अल्लाहसमोर जो अल्लाहचा द्रोही म्हणून उभा ठाकेल अशा माणसाला त्याजागी फेकून दिले जाईल जिथे त्याला अमर्याद आणि निरंतर वेदना, कष्ट दिले जाईल. दिव्य कुरआन या जागेला ''जहन्नम'' (नरक) असे नाव देतो.

(५) जेव्हा हा हिशेब करणे पूर्ण होईल आणि त्यांचा निर्णय होईल तेव्हाच आपणा सर्वांच्या जीवनाचे द्वितीय सत्र आरंभ होईल. हा काळ (द्वितीय सत्र) निरंतर असा न संपणारा असेल. तेथील जीवन चिरंजीव असेल. तेथे मृत्यु हे नाव अनभिज्ञ असेल.

पारलौकिक जीवनाचे महत्त्व

हे मुस्लिमांसाठी (श्रध्दावंतासाठी) निर्विवाद आहे की त्यांची श्रध्दा आणि विश्वास अल्लाहवर जितका आहे तितकाच पारलौकिक जीवनावर असतो. याव्यतिरिक्त तो सच्चा श्रध्दावंत (सच्चा मुस्लिम) बनू शकतच नाही. पारलौकिक जीवनावरील श्रध्देविना अल्लाहवरील विश्वास आणि ईमान हे कुचकामी ठरते. कारण पारलौकिक जीवन हे अल्लाहच्या अनेक गुणवैशिष्ट्यांचे परिणामस्थळ आहे. उदा. न्याय, ज्ञानी, दयाळु, प्रभुत्वशाली आणि चांगुलपणाची जाण असलेला इ.

पारलौकिक जीवन आणि न्यायदिनाव्यतिरिक्त आपली श्रध्दा की अल्लाह जो या सृष्टीचा निर्माता आहे तो न्यायप्रिय आहे, ज्ञानी आहे, दयाळु आणि कृपाळु आहे आणि प्रभुत्वशाली असा आहे इत्यादी सर्व त्याचे गुण निरर्थक ठरतात.

या जगात कधी कधी आपल्या नेक कार्याचे (सत्कार्य) फळ हवेतसे मिळत नाही. येथे दुराचारी सुखसमृध्दीत ऐशआरामात आणि सदाचारी मात्र काबाडकष्ट आणि गरीबीत जीवन कंठीत राहतो.

पारलौकिक जीवनात अशी संधी जर मिळाली नाही की प्रत्येकाला त्याच्या करणीचा योग्य मोबदला मिळेल, तर अल्लाहचे वरील नमूद केलेले सर्व गुण नाकारणारी स्थिती तयार होईल. अशा स्थितीत अल्लाहवरील विश्वास आणि पारलौकिक जीवन व न्यायदिनावरील अविश्वास हे दोन्ही या जगात एकत्र नांदत आहेत. म्हणजेच श्रध्दाळु आणि विद्रोही हे दोन्ही या जगात नांदत आहेत, परंतु पारलौकिक जीवनात मात्र हे दोघे

वेगवेगळे राहतील. त्यांचे तेथे एकत्र राहाणे अशक्य आहे. सदाचारी मुस्लिम जन्नतमध्ये आणि दुराचारी असा विद्रोही श्रध्दाहीन जहन्नममध्ये राहील.

मध्यस्थीची कल्पना

ज्याने या जगात सदाचारी मुस्लिमाचे जीवन कंठले असेल त्याला पारलौकिक जीवनात जन्नतमध्ये प्रवेश देऊन उपकृत करणे हे अल्लाहच्याच फक्त हातात आहे. कुरआनोक्ती आहे,

"नाकारणारे तर शंकेतच पडलेले राहतील येथपावेतो की त्यांच्यावर पुनरुत्थानाची घटका अकस्मात येईल, अथवा एक अशुभ दिनाचा प्रकोप कोसळेल. त्या दिवशी राज्य अल्लाहचेच असेल, आणि तो त्यांच्या दरम्यान निर्णय करील."

(२२ : ५५-५६)

आपण वरील संकेत वचनांवर बौध्दिक आणि तार्किक विचार केला तर आपणास खालील निष्कर्षच स्वीकारणे भाग पडते.

(१) अल्लाह या समस्त सृष्टीचा मालक आणि शासक आहे. म्हणून अल्लाहव्यतिरिक्त इतरांच्या हातात निर्णय देण्याचा अधिकार असू शकतच नाही.

(२) फक्त अल्लाहच ज्ञानी (सर्वज्ञ) आहे. प्रारंभापासून ते अंतापर्यंतचे सर्व ज्ञान त्यालाच आहे. एखाद्या व्यक्तीच्या हाताने कोणते कृत्य घडले आहे, त्याच्या मनात काय विचार येत आहेत आणि कोणती इच्छा तो बाळगून आहे, तसेच तो रात्रीच्या अंधारात आणि दिवसाच्या उजेडात काय करतो हे सर्व काही अल्लाहपुढे उघडे होणारच आहेत. हे सूर्य प्रकाशाइतके सत्य आहे. या दृष्टिकोनातून पाहता अल्लाहसाठी निर्णय देण्याच्या प्रक्रियेत कुण्या इतरांवर अवलंबून राहाणे अशक्य प्राय आहे. त्याला कुणाच्या उपदेशाची अथवा मार्गदर्शनाची आवश्यकता मुळीच भासणार नाही. अशा वेळी हा "इतर कुणी" तर असा आहे की त्याला आपल्या भूत आणि भविष्याचेसुध्दा पूर्ण ज्ञान नाही. मग हे कसे शक्य आहे की या अल्प ज्ञानाने तथा अज्ञानापोटी तो अल्लाहचा सहाय्यक आणि मदतनीस बनेल? अल्लाह जो सर्वज्ञ आहे त्याला हा अज्ञानी योग्य निर्णय घेण्यासाठी काय साह्य करील?

(३) अल्लाह न्यायप्रिय आहे. अशा स्थितीत अल्लाहने कुण्या इतरांच्या मध्यस्थीने अशा व्यक्तीला माफी द्यावी जी व्यक्ती आपल्या श्रध्दाहीनतेमुळे आणि कर्तृत्वामुळे माफी देण्याच्या लायक नाही. हे अल्लाहच्या न्यायप्रियतेविरुध्द आहे, हे अशक्य आहे.

थोडक्यात म्हणजे कोणत्याही दृष्टिकोनातून विचार केला तरी हे अगदी

अशक्यप्राय आहे की पारलौकिक जीवनातील यश हे कुण्या बाबा, वली, फकीर यांच्या मध्यस्थीने आणि शिफारशीमुळे प्राप्त होते आणि अशा दलालांच्या शिफारशींमुळे अल्लाह पापी लोकांना माफ करील. हे कृत्य अल्लाहच्या न्यायदान प्रक्रियेत दबाव आणि हस्तक्षेप आहे. ते मध्यस्थ स्वत: माफ करण्याच्या लायकीचे नसले तरी त्यांना शिफारशीचा अधिकार बहाल करणे म्हणजे मूर्खपणा आहे. दिव्य कुरआनने या कपोलकल्पित कल्पनाविलास जे आधारहीन आहेत, अशा सर्वांचे मुळासकट खंडन केले आहे आणि स्पष्ट केले आहे की पारलौकिक जीवनात मध्यस्थ (दलाल) काहीएक उपयोगी पडणार नाहीत. खरे तर असे मध्यस्थ आणि दलाल यांची काहीच गरज भासणार नाही. मध्यस्थी तेथे अशक्य आहे. कुरआनोक्ती आहे,

"हे श्रध्दावंतांनो, जी काही धनदौलत आम्ही तुम्हाला बहाल केली आहे. त्यातून खर्च करा यापूर्वी की तो दिवस येईल ज्यामध्ये खरेदी विक्री होणार नाही, मित्रताही उपयोगी पडणार नाही आणि शिफारसदेखील चालणार नाही. आणि खरे अत्याचारी तेच आहेत जे द्रोहाचा मार्ग अवलंबितात." *(२ : २५४)*

म्हणून शिफारस करण्याचे, मध्यस्थीचे हे तत्त्व आधारहीन आहे. यावर जर गंभीरतेने विचार केला तर हे तथ्य उजेडात येते ही की योजना आणि युक्ती श्रध्दाहीनांची आणि द्रोही लोकांची आहे. ही योजना स्वीकार तेव्हाच केली जाऊ शकते जेव्हा अल्लाहची गुणवैशिष्ट्ये - न्यायप्रियता, सर्वज्ञता, प्रभुत्वशाली आणि निर्णय घेण्यास तत्पर अशा सर्व गुणांना नाकारले जाईल. स्वाभाविकत: हे कृत्य फक्त श्रध्दाहीन आणि द्रोही लोकच करतील, श्रध्दावंत मुस्लिम कधीच करू शकणार नाहीत.

मध्यस्थीची कल्पना इस्लामी दृष्टिकोन -

याचा अर्थ असा होत नाही की त्या वेळी शिफारस केली जाणार नाही. कुरआन आणि हदीस (प्रेषितवचने) यात अनेकदा श्रध्दाहीनांच्या या मध्यस्थीच्या चुकीच्या कल्पनेला विरोध केला गेला आहे. परंतु शिफारस आणि मध्यस्थीबद्दल त्यांनी अगदी स्पष्ट पुरावा दिलेला आहे. हे तत्त्व (शिफारस) अशा वेळीच ईमान-श्रध्देच्या मूलतत्त्वांचा एक भाग बनते, कारण निर्णयाच्या दिवशी काही सत्कर्मी लोक इतरांसाठी शिफारस करतील. कोणत्या प्रकारची ती शिफारस अथवा मध्यस्थी असेल? निश्चितच वर चर्चेत आलेल्या मध्यस्थीसारखी ती मुळीच नसणार. दोघामध्ये मूळ फरक आहे. ही दुसऱ्या प्रकारची शिफारस अल्लाहच्या गुणवैशिष्ट्यांना अजिबात नाकारीत नाही. ते या प्रस्थापित सत्याविरुध्द मुळीच नाही की अल्लाह समस्त सृष्टीचा मालक आणि शासक आहे. तोच सर्वज्ञ, सर्वसमावेशक, न्यायप्रिय असा प्रभुत्वशाली आहे. अल्लाहचे हे गुण पूर्णपणे लक्षात

ठेवले तर शिफारस करणे ही साधी बाब आणि साधारण गोष्ट राहात नाही. ते कृत्य (शिफारस करणे) हे वैशिष्ट्यपूर्ण, मर्यादित असे नियमांकित असलेले सिध्द होते. दिव्य कुरआन फक्त वर नमूद केलेल्या सिध्दान्ताचा उल्लेख करून थांबत नाही तर त्याविषयीच्या नियमावलीची सविस्तर चर्चा करतो. या नियमांच्या आधीन राहूनच शिफारस तथा मध्यस्थी केली जाऊ शकते, ते नियम खालीलप्रमाणे आहेत.

(१) शिफारस करण्याची परवानगी देणे हे अल्लाहच्या हातात आहे आणि त्यावेळी त्याच्या इच्छे विरुध्द काही एकमात्र होणार नाही. कुरआनोक्ती आहे,

"सांगा, संपूर्ण शिफारस अल्लाहच्या अखत्यारीत आहे. आकाशांचा व पृथ्वीच्या साम्राज्यांचा तोच स्वामी आहे, मग त्याच्या कडेच तुम्ही रुजू केले जाणार आहात."
(३९ : ४४)

(२) ज्याला अल्लाह परवानगी देईल तोच दुसऱ्यांसाठी काही शब्द देऊ शकेल. तोच शिफारस करु शकेल. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"अल्लाह तो चिरंतनजीवी आहे ज्याने तमाम सृष्टीचा भार सांभाळलेला आहे, त्याच्या शिवाय इतर कोणीही ईश्वर नाही, तो झोपतही नाही आणि त्याला झोपेची गुंगी ही येत नाही, पृथ्वी आणि आकाशात जे काही आहे त्याचेच आहे. असा कोण आहे जो त्याच्या पुढे त्याच्या पगवानगी शिवाय शिफारस करू शकेल ? जे काही दासांच्या समक्ष आहे. त्यालाही तो जाणतो आणि जे काही त्यांच्यापासून अदृश्य आहे त्यालाही तो जाणतो आणि त्याच्या माहिती पैकी कोणतीही गोष्ट त्यांच्या बुध्दीकक्षेत येऊ शकत नाही याव्यतिरिक्त की एखाद्या गोष्टीचे ज्ञान तो स्वतःच त्यांना देऊ इच्छित असेल, त्याचे राज्य आकाश आणि पृथ्वीवर पसरले आहे, आणि त्यांचे संरक्षण काही त्याला थकवून सोडणारे काम नव्हे, फक्त तोच एकटा महान व श्रेष्ठ आहे." (२ : २५५)

(३) शिफारस करणारा फक्त त्याचीच शिफारस करील ज्याची शिफारस करण्यास अल्लाहने त्याला परवानगी दिली असेल. कुरआनोक्ती आहे,

"ते कुणाचीही शिफारस करीत नाहीत, त्याव्यतिरिक्त की ज्याच्याबाबत शिफारस ऐकण्यास अल्लाह प्रसन्न होतो, आणि ते त्याच्या भयाने लटपटतात, आणि जर त्यांच्यापैकी कुणी सांगितले की अल्लाहशिवाय मीदेखील एक उपास्य आहे तर आम्ही त्याला नरकाची शिक्षा देऊ, आमच्या येथे अत्याचाऱ्यांचा हाच बदला आहे."
(२१ : २८-२९)

(४) त्याची शिफारस करण्याच्यासाठी तो फक्त त्या बाबींचाच उल्लेख करील जे

सर्व दृष्टीने न्याय संगत असतील. कुरआनोक्ती आहे,

"ज्या दिवशी आत्मा आणि दूत रांगेत उभे राहतील, कुणीही बोलणार नाही या खेरीज की ज्यास कृपावंत परवानगी देईल आणि जो योग्य गोष्ट बोलेल, तो दिवस सत्याधिष्ठित आहे. आता ज्याची इच्छा असेल त्यांनी आपल्या पालनकर्त्याकडे परतण्याचा मार्ग स्वीकारावा." (७८ : ३८-३९)

आता हे अगदी स्पष्ट आहे की वर नमुद केलेल्या मर्यादेतच शिफारस केली जाईल. ही शिफारस नम्र निवेदन, प्रार्थना, विनवणी आणि पश्चात्ताप याव्यतिरिक्त दुसरे काही नसणार आहे. शिफारस करणारा काही अल्लाहच्या ज्ञानात भर टाकणार नाही की सदरच्या इसमाची श्रध्दा आणि आचरण असे आहे किंवा शिफारस करणारा आपले मत मांडणार नाही की सदरची व्यक्ती माफ करण्यास कशी लायक आहे. तसेच तो शिफारशी मनुष्य अल्लाहच्या निर्णयांवर दबावसुध्दा आणू शकणार नाही. अल्लाहच्या परवानगीने तो शिफारस करणारा मनुष्य अल्लाहच्या आज्ञांकित बनेल आणि याचना करील,

"माझ्या पालनकर्ता प्रभुस्वामी, मी याचना करतो की त्या दासाचे पाप क्षमा कर त्याच्या चुकांसाठी त्याला माफ कर आणि त्याला तुझ्या कृपा छत्राखाली दयेखाली आश्रय दे."

खरे पाहता अल्लाहच शिफारस करणारा आहे, कारण शिफारस करण्याची परवानगी सगळे काही माहीत असतानासुध्दा तोच देतो. दिव्य कुरआनने हे सत्य अनेक ठिकाणी उघड केलेले आहे. कुरआनोक्ती आहे,

"आणि हे पैगम्बर (स) तुम्ही या (दिव्य प्रकटनाच्या ज्ञाना) व्दारे त्या लोकांना उपदेश करा जे लोक याचे भय बाळगतात की, आपण आपल्या पालनकर्त्यासमोर कधीतरी अशा अवस्थेत हजर केले जाऊ जेथे त्याच्याशिवाय कोणीही (असा सत्ताधीश) नसेल जो त्यांचा समर्थक व सहायक असेल किंवा त्यांची शिफारस क़रील, कदाचित (या उपदेशाने सावध होऊन) त्यांनी ईशपरायणतेचे वर्तन अंगिकारावे." (६ : ५१-५३)

हे शिफारस करणारे लोक कोण असतील? आणि कोणासाठी ते अल्लाहच्या परवानगीने अल्लाहसमोर शिफारस करतील? हदीसमध्ये सत्कर्मी लोक अशी शिफारस करतील असे नमूद केले आहे. असेच लोक अल्लाहसाठी प्रिय असतील. ज्यांची शिफारस ते करतील. ती मंडळी अशी असेल ज्यांचे सदाचार आणि श्रध्देचे पारडे बरोबर असतील. हिशेब करताना फक्त काही कमी भासेल. सामान्यत: असे लोक कृपा आणि माफ करण्यासारखे असतील. माफीसाठी त्यांच्याकडे कमतरता आहे. शिफारस याच कमतरतेला दूर करण्यासाठी त्या वेळी होईल.

येथे हा प्रश्न निर्माण होतो की शिफारस करण्याची काय वैशिष्ट्ये आणि मोजमाप आहे? शिफारशीचा उद्देश काय आहे? वर नमूद केलेल्या कुरआन वचनांनुसार शिफारस करणारा हासुध्दा लाचार आहे, तर अल्लाहने माफ करण्याचे त्या लोकांसाठी पूर्वीच ठरविलेले असणार की ज्यांना अल्लाह शिफारस केल्यानंतर सार्वजनिक माफी देईल? या प्रश्नाचे उत्तर सरळ आहे. अल्लाह शिफारस करण्याऱ्या व्यक्तीला शिफारस करण्याची परवानगी देऊन त्याला अनुग्रहित करील की त्याने सर्वांसमोर अल्लाहशी बोलावे आणि विनंती करावी. निर्णयाच्या दिवशी सर्वजण हे स्तब्ध असतील, भयभीत आणि तळपळत असतील. त्यांच्या नजरासुध्दा ते वर करू शकणार नाहीत की कोणाची बोलण्याची हिंमत होणार नाही. अशा वेळी अल्लाहचा तो एक सन्मान आणि विशेष अनुग्रह असेल त्या लोकांसाठी ज्यांना अल्लाह त्या वेळी शिफारस करण्याची परवानगी देईल. (अल्लाहु अकबर!) याव्यतिरिक्त इतरांविषयी की ज्यांचे सदाचाराचे पारडे कमी भरत आहे त्यांच्या माफीची अल्लाहजवळ अशा वेळी अल्लाहसमोर याचना, प्रार्थना करणे हे त्या सत्कर्मींचे भाग्य आहे. सृष्टीचा पालनकर्ता, प्रभुस्वामी, अल्लाह त्यांच्या त्या प्रार्थनेला मान्य करील आणि त्या लोकांसाठी माफीची घोषणा करील ज्यांच्यासाठी शिफारस केली गेली.

हे अगदी स्पष्ट आहे की शिफारस करणे हे एक माफ करणे या अल्लाहच्या गुणवैशिष्ट्याचा भाग आहे. परंतु अल्लाह सामान्यतः माफी देतो त्या तत्त्वाशी किंचित वेगळा आहे. आपण याला असे म्हणू या की हे सवलत (कनशेशन) देण्याचे तत्त्व आहे, जे अल्लाहच्या गुणवैशिष्टांशी सुसंगत असे आहे. हे सवलतीचे तत्त्व (शिफारस करणे) कोणत्याही परिस्थितीत अल्लाहच्या उपकृत करण्याच्या आणि शिक्षा देण्याच्या तत्त्वाशी किंचितही विसंगत नाही.

कुरआन आणि हदीसमध्ये या मुद्याला अगदी स्पष्ट करण्यात आले आहे की पारलौकिक जीवनात लोकांना माफ करण्याची कृती ही अल्लाहच्या कृपेशिवाय आणि दयेविना अगदी अशक्य गोष्ट आहे. प्रेषित (स) यांचे कथन आहे,

"कोणीही आपल्या कतृत्वाच्या सामर्थ्यावरच फक्त मुक्ती प्राप्त करु शकणार नाही." *(मुस्लिम)*

मुक्तीचा हा दृष्टिकोन निर्विवादित आहे. परंतु हेसुध्दा खरे आहे की अल्लाहची कृपा आणि दया ही विशिष्ट अशा न्यायाच्या तत्त्वांवर अवलंबून आहे. अल्लाहच्या दया आणि कृपेसाठी त्याच लोकांचा समावेश होईल जे त्यास पात्र आहेत. अल्लाहचा अनुग्रह त्या त्या व्यक्तींच्या सत्कृत्यांच्या दर्जानुसार असणार आहे. ज्यांचे सत्कृत्य उत्तम दर्ज्याचे

आहे अशांना अल्लाहची कृपा आणि दया प्राप्त होण्याची शक्यता जास्त असणार आहे. कमी दर्ज्याच्या सदाचारींना हा योग (संधी) कमी उपलब्ध होणार आहे. म्हणून फार मोठी संख्या यापासून वंचित राहणार की अल्लाहच्या अनुग्रहासाठी त्यांची योग्यता कधी सिध्द होणार! हा मोठा कळीचा प्रश्न आहे. थोडक्यात, मुक्ती ही व्यक्तीच्या श्रध्दाशीलतेवर (ईमान) आणि सत्कर्मांवर अवलंबून आहे. परंतु पारलौकिक जीवनात मुक्तीबद्दलचे सर्व निर्णय घेणे हे सर्वथा अल्लाहच्याच हातात आहे.

इस्लाम धर्मात शिफारस तथा मध्यस्थीबद्दलची ही खरी संकल्पना आहे. पारलौकिक जीवनावर श्रध्दा– ईमान ठेवणे हे तोपर्यंत कुचकामी आणि निरर्थक ठरते जोपर्यंत व्यक्ती इस्लामच्या या शिफारशीच्या खऱ्या संकल्पनेला जाणून उमजून घेत नाही आणि आपल्या मनातून सर्व खोट्या कल्पना शिफारशीबद्दलच्या मुळासकट उपटून फेकत नाही. जोपर्यंत व्यक्तीच्या मनात या खोट्या शिफारशीच्या कल्पना घर करून आहेत तोपर्यंत अशी व्यक्ती एकेश्वरत्वाचा खोटा दावा करते हे सिध्द होते. अशी व्यक्ती एकेश्वरत्वाला आपल्या कृत्याने निरर्थक ठरविते. अल्लाह आणि पारलौकिक जीवनावर श्रध्दा ठेवणे म्हणजे सत्याचा शोध घेणे होय. व्यक्तीला सत्यज्ञान प्राप्त झाल्यनंतरच ती जीवनव्यवहारात सरळ मार्ग प्राप्त करील आणि अल्लाहचा सच्चा आणि आज्ञाधारक दास स्वत:ला आचरणाने सिध्द करून दाखवील. श्रध्दाहीनांच्या शिफारशीबद्दलची खोटी कल्पना त्यांना सत्यापासून दूर नेऊन सोडते आणि त्यांचा सर्वनाश करते. त्या व्यक्तीला ही खोटी श्रध्दा (ईमान) कल्पनाविलासात ठेवते की पारलौकिक जीवनातील मुक्ती श्रध्दाशीलतेवर आणि सत्कर्मांवर अवलंबून नसून कुण्या साधु–संताच्या, पीर, फकीर बाबा यांच्या शिफारशीवरच अवलंबून आहे. अशा दलालांना खूश करण्यासाठी आणि त्यांच्या प्रसन्नतेसाठी लोक त्यांचे शिष्य बनतात आणि नजराणे देतात. ही संकल्पना व्यक्तीला अल्लाहच्या आज्ञाधारकतेपासून अतिदूर नेते आणि त्या व्यक्तीच्या मनातून पारलौकिक जीवनाबद्दलची भीती नाहीशी होते. हे एक निष्क्रीय तत्त्वज्ञान आहे आणि काल्पनिकता आहे. या काल्पनिकतेमुळे अशा व्यक्तीची श्रध्दा निष्क्रीय बनून राहते. हे अत्यावश्यक आहे की व्यक्तीचे मन आणि विचार शिफारस (वशीला) बद्दल स्पष्ट असले पाहिजे. इस्लामच्या परलोकत्वाला पूर्णपणे योग्यरीतीने समजून उमजून घ्यावयाचे असेल तर हे आवश्यक आहे.

प्रकरण चौथे

प्रेषित्व

प्रेषित्वावर श्रध्दा

प्रेषित्वाची गरज

इस्लामचे तिसरे मूलतत्त्व प्रेषित्व आहे. अरेबिक भाषेत यासाठी 'रिसालत' हा शब्द आलेला आहे ज्याचा अर्थ प्रेषित्व आहे. पारिभाषिक व्याख्येत अल्लाहने मनुष्याच्या मार्गदर्शनासाठी पाठविलेले प्रेषित असा अर्थ आहे. अरेबिक भाषेत दुसरा शब्द 'नबूवत' हा वापरला जातो. प्रेषितांची एक साखळी ईश्वराने का निर्माण केली? याची गरज का भासली होती आणि प्रेषित्वावर श्रध्दा ठेवणे आवश्यक का आहे? या प्रश्नांच्या उत्तरासाठी आपणास थोडे सविस्तर चिंतन करावे लागेल. प्रथमत: आपल्याला पाहावे लागले की मनुष्याच्या जीवनाचा उद्देश प्राप्त करण्यासाठी कोणती कार्यप्रणाली आहे?

मनुष्य निर्मितीचा उद्देश आणि त्याची जबाबदारी इस्लाम नुसार ही आहे की त्याने अल्लाहची उपासना करावी आणि अल्लाहला शरण जावून अल्लाहच्या आज्ञांकित राहावे. मनुष्याचे पारलौकिक जीवनातील यश हे जीवनउद्देश प्राप्त करण्यातच आहे. अल्लाहची उपासना आणि त्याचे आज्ञांकित होणे म्हणजे त्याच्या आदेशाचे पालन जीवनव्यवहारात करणे आणि त्याद्वारे अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करून घेणे होय. आज्ञाधारकता दिव्य प्रकटनासाठी आहे. दिव्य प्रकटनाशिवाय आपण अल्लाहबद्दल विचारसुध्दा करू शकत नाही. जेव्हा मनुष्य अल्लाहचा आज्ञाधारक सेवक बनून जीवन कंठण्याचे ठरवितो तेव्हा तो आपल्या स्वामीच्या दिव्य प्रकटनाला जाणून घेण्यास आतूर होतो आणि जीवनात अल्लाहचा आज्ञांकित बनून राहातो. तो हे जाणून घेण्यास आतूर होतो की अल्लाहची प्रसन्नता कशात आहे आणि अप्रसन्नता कशात! तो तत्परतेने हे जाणून घेण्यास तयार होतो की त्याने काय करावे की जेणेकरून तो अल्लाहचा विश्वासु सेवक गणला जाईल आणि कोणत्या कृत्यापासून त्याने आपला बचाव करून घ्यावा जेणेकरून अल्लाहची अप्रसन्नता आणि शिक्षेपासून दूर राहता येईल. अल्लाहची आज्ञा न पाळल्यास अल्लाहचा क्रोध आणि कोप होतो याची जाण त्याला सतत असते. हे न जाणता तो अल्लाहच्या आज्ञाधारकतेच्या मार्गात एक पाऊलसुध्दा पुढे जाऊ शकत नाही.

प्रश्न स्वाभाविकत: निर्माण होतो की आपण कसे जाणून घ्यावे की अल्लाहची इच्छा आणि आदेश काय आहेत? अल्लाहने कोणते कार्य करण्याचे आणि कोणते कार्य न

करण्याचे आदेश दिलेले आहेत, हे आपण कसे जाणून घ्यावे ? एक मार्ग आहे तो आपल्या बुध्दीने त्याची खात्री करून घ्यावी. पण हे पर्याप्त नाही. मानवी बुध्दीच्या पलीकडील हे कार्य आहे. कोणीही आपल्या बुध्दीविवेकानेच फक्त आपले आणि या सृष्टीचे सत्य ओळखू शकत नाही. त्याच्या निर्मात्याचे आणि पालनकर्त्याची कोणती गुणवैशिष्ट्ये आहेत हे जाणून घेणे अशक्य आहे. मनुष्यावर या गुणवैशिष्ट्यांचा कोणता परिणाम होतो? त्याचे कोणते आदेश आहेत? मर्यादित बुध्दी या सत्याला जाणून घेण्यास अपात्र ठरते.

दुसरा मार्ग आहे स्वतःच्या अंतर्ज्ञानाचा आणि इच्छाशक्तीचा! परंतु दुसरा मार्गसुध्दा तसा पहिल्यामार्गाप्रमाणेच अपुरा आहे. स्वअस्तित्वाला संपविण्याचे हे अविरत प्रयत्न या उद्देशाला प्राप्त करू शकत नाहीत. अंतर्ज्ञान याने पवित्र जरूर होईल, परंतु असा मनुष्य दिव्य प्रकटन आणि ईश्वरेच्छेला पाहू अथवा अनुभवू शकत नाही. आरशाला जर एखाद्याला प्रतिबिंबित करावयाचे असेल तर आरसा फक्त शुभ्र आणि स्वच्छ असून चालत नाही, हेसुध्दा आवश्यक आहे की ज्याला प्रतिबिंबित करावयाचे आहे ते आरशासमोर जवळ असणे आवश्यक आहे. जोपर्यंत अल्लाह दिव्य प्रकटन निश्चित करून त्याला एखाद्याच्या हृदयावर अवतरित करीत नाही तोपर्यंत, अल्लाहचा संदेश परिवर्तीत होणार नाही. परंतु आजपर्यंत हा दावा कोणी केलेला नाही की अल्लाहने दिव्य प्रकटन अंतर्ज्ञानाने आयोजित केले आहे. म्हणून हा दुसरा प्रकारसुध्दा दिव्य प्रकटन जाणून घेण्यासाठी असमर्थ ठरतो.

तिसरा मार्ग अल्लाहचे दिव्य प्रकटन आणि प्रसन्नता प्राप्त करण्याचा सामुदायिक चिंतन मनन हा आहे. व्यक्तिगत चिंतनच्या विरोधात जसा आंधळा मनुष्य म्हणजेच दृष्टीहीन मनुष्य दृष्टीवान मनुष्याची बरोबरी करू शकत नाही, तसेच माणसांची गर्दी दिव्य प्रकटन जाणून घेण्यास असमर्थ आहे. ही गर्दी अशा माणसांची असते जे व्यक्तिगतरित्या दिव्य प्रकटन आपल्या बुध्दीनुसार जाणून घेण्याससुध्दा असमर्थ ठरतात. म्हणून हा मार्गसुध्दा वरील दोन्ही मार्गांप्रमाणे अपूर्ण आणि अपर्याप्त असा आहे. म्हणून असा निष्कर्ष काढणे चुकीचे ठरणार नाही की वरील तिन्ही मार्ग मनुष्याची ही निकड पूरी करण्यास असमर्थ आहेत.

आपण हे सत्य नाकारू शकत नाही की आपण स्वतः अनेक बाबतीत वाईटापासून चांगले ओळखू शकतो. अशा प्रसंगी आपली बुध्दी, अंतरात्मा, दिव्य मार्गदर्शन आणि आपला विवेक आपणास साहय्य करीत असतात. हे दुसरे तिसरे काही नसून चांगले आणि वाईट यांची पारख करणे होय. पण असा अनुमान काढणे हे योग्य

होणार नाही की मनुष्य जर लहानातील लहान बाबींना वेगळे करू शकतो अथवा ओळखू शकतो तर तो दिव्य प्रकटनाला जाणून घेण्याससुध्दा पात्र आहे. काही बाबींचे ज्ञान असणे म्हणजे सर्व बाबींचे ज्ञान आहे असे समजणे चुकीचे आहे. आपण जर धावता दृष्टीक्षेप जगाकडे टाकला तर कळून येते की येथे जीवनमूल्यांबद्दल एकवाक्यता नाही. अनेक बाबींना वाईट किंवा चांगले म्हणून सर्वमान्यता अद्याप मिळालेली नाही. अशा अनेक बाबींची लांबलचक यादीसुध्दा सौम्य दृष्टीने साकार होणे अशक्य आहे? अतिसूक्ष्म पडताळणी केल्यास ही यादी आणखी निराशाजनक दिसेल. स्वाभाविकपणे आपण हा दावा करूच शकत नाही की हा पुरावा तकलादू आहे. जर मानवाने ठरविले की लहान वस्तूंचा गट आपणास कशाचीच खात्री देऊ शकत नाही की ते चांगल्या आणि वाईटाचे प्रश्न सोडविण्यासाठी सक्षम आहेत. पणती प्रकाशमान आहे परंतु ती सूर्यांची जागा घेऊ शकत नाही, जो समस्त सृष्टीला प्रकाशमान करतो.

म्हणून मनुष्याची असमर्थता याबाबतीत मान्य करणे स्वाभाविक आहे. बुध्दी किंवा अंतर्ज्ञानसुध्दा याला आवाहन देऊ शकत नाही. अशा परिस्थितीला दिव्य मार्गदर्शनाचीच गरज भासते. एकीकडे मनुष्याची बुध्दी आणि आंतर्ज्ञान दिव्य प्रकटन जाणून घेण्यास असमर्थ आहेत. तर दुसरीकडे दिव्यप्रकटनाची गरज ही अन्न आणि पाण्यासारखी निकडीची आहे. अशा परिस्थितीत दुसरा पर्यायच शिल्लक राहत नाही आणि तो म्हणजे अल्लाहने बाह्य रूपाने एखादी व्यवस्था दिव्य प्रकटनासाठी करावी.

म्हणून एका बाजूला माणसाची असमर्थता आणि दिव्य प्रकटनाची तीव्र आणि मौलिक निकड, तसेच दुसऱ्या बाजूला अल्लाहचे प्रभुत्व, कृपाळु, दयाळु आणि सर्वज्ञ न्यायप्रियता, या सर्व ईशगुणांच्या परिणामामुळे मनुष्याला अंधारात चाचपडत ठेवणे हे अशक्यप्राय आहे. मानवाला अशा वेळी मदतीची गरज होती आणि दिव्य मार्गदर्शनाची निकड होती, ज्यामुळे त्याला सरळ मार्गक्रमण व आज्ञाधारकता आपल्या जीवनात अंगीकारता आली. हे कसे शक्य आहे की सर्व विश्वांचा स्वामी अल्लाह हा आपल्या निर्मिती (मानवतेसाठी) मार्गदर्शनाची बाह्य व्यवस्था करून दिव्य संदेश मानवापर्यंत पोहोच करणार नाही? अल्लाहने यासाठी एक दिवसाचासुध्दा उशीर केलेला नाही. अल्लाह एकीकडे मानवासाठी भौतिक गरजा भागविण्यासाठी विस्तीर्ण अशी व्यवस्था करून ठेवतो आणि दुसरीकडे मानवासाठी त्याच्या नैतिक आणि धार्मिक गरजांची व्यवस्था करून ठेवणार नाही, असे होणे नाही! अल्लाहने मनुष्यावर ही जबाबदारी टाकली आहे की त्याने सत्यमार्गावर आपले जीवन कंठावे, अल्लाहच्या कृपेच्या आणि न्यायप्रियतेच्या विरोधात असते जर मानवाच्या मार्गदर्शनासाठी अल्लाहने आवश्यक ती

व्यवस्था केले नसती. अल्लाहने तशी व्यवस्था केली आहे. या व्यवस्थेला पारिभाषिक शब्दात ''प्रेषित्व'' असे म्हणतात. ज्या मनुष्याद्वारे दिव्य मार्गदर्शनाची ही व्यवस्था केली जाते त्यांना 'प्रेषित' असे म्हणतात.

हे अगदी स्पष्ट आहे की मनुष्य दिव्य प्रकटनाबद्दल प्रेषिताशिवाय जाणू शकत नाही. हेसुध्दा तितकेच स्पष्ट आहे की प्रेषित्वावरील श्रध्दा (ईमान) मुस्लिमासाठी अत्यावश्यक आहे. हे इतके गरजेचे आहे जसे स्पष्ट पाहण्यासाठी दोन डोळ्यांची आवश्यकता आहे. जर एखाद्या ठिकाणी जाण्यासाठी एकच मार्ग असेल तर त्या मार्गालाच त्या ठिकाणी पोहचण्यासाठी स्वीकारावे लागते.

ही बाब येथे संपत नाही तर प्रेषित्वाचे व्यावहारिक महत्त्व यापेक्षा अधिक स्पष्ट आहे. प्रेषित्वाविना अल्लाहला व पारलौकिक जीवनास समजणे उमजणे अशक्य आहे. मग दिव्य प्रकटनाबद्दल तर विचारू नका! प्रेषित्व हे एक माध्यम आहे, ज्याद्वारे आपणास अल्लाह आणि पारलौकिक जीवनाचे ज्ञान मिळते. स्पष्टपणे सांगायचे तर प्रेषित्वामध्ये श्रध्दा ठेवण्याशिवाय अल्लाह आणि पारलौकिक जीवनावर श्रध्दा ठेवणे शक्य नाही. म्हणून प्रेषितांवरील श्रध्दा ही इस्लामच्या मूलतत्त्वांपैकी एक आहे. श्रध्देचे हे एक मौलिक अंग आहे.

प्रेषित्व हे मानवासाठी अत्यावश्यक आहे जसे पाणी आणि अन्न मानवासाठी अत्यावश्यक आहे. प्रेषित्वावरील विश्वास हा श्रध्देचा एक मौलिक अंग आहे. आता आपण सविस्तर विचार करु या. कुरआन या संदर्भात स्पष्टोक्ती करीत आहे,

''*सर्व प्रेषित हे मानव होते.*''

अल्लाहने नेहमीच मानवाच्या मार्गदर्शनासाठी मानवाचीच नियुक्ती केलेली आहे. हे प्रेषित दूत नव्हते की जिन्न (पवित्रयोनि) नव्हते. असेही कधी घडले नाही की या कार्यासाठी अल्लाहने मानवी रूप धारण केले अथवा इतर रूप धारण केले. जेव्हा जेव्हा या भूतलावर प्रेषित पाठविले गेले ते सर्व मानव होते. अल्लाहने कुरआनमध्ये स्पष्ट केले आहे,

''*हे पैगम्बर (स) तुमच्या अगोदर आम्ही जे प्रेषित पाठविले होते, ते सर्व देखील माणसेच होते, आणि जे याच वस्त्यांच्या निर्वासितांपैकी होते आणि त्यांच्याकडे आम्ही दिव्य-प्रकटन पाठवित राहिलो होतो.*'' *(१२ :१०९)*

कुरआन धर्मांच्या आणि राष्ट्रांच्या घटनांचा उल्लेख करून स्पष्ट करतो की अल्लाहच्या प्रेषितांवर त्यांच्या विरोधकांनी अविश्वास ठेवला होता तो यामुळे की ते (प्रेषित) त्यांच्यासारखे होते. ते प्रश्न विचारीत की आमच्यासारखा मनुष्य प्रेषित कसा

बरे बनू शकेल? कुरआनोक्ती आहे,

"त्यांच्या पैगम्बरांनी त्यांना सांगितले, "खरोखरच आम्ही काहीच नाही परंतु तुमच्या सारखे मानव." परंतु अल्लाह आपल्या दासांपैकी ज्याला इच्छितो त्याला उपकृत करतो, आणि हे आमच्या अखत्यारीत नाही की तुम्हाला एखादे प्रमाण आणून द्यावे." *(१४ : ११ - १२)*

म्हणून हे खरे आहे की प्रेषित मानवातूनच अल्लाहने वेळोवेळी नियुक्त केले आहेत. आपल्यासारखे त्यांना शरीर होते, मने होती, इच्छा आकांक्षा होत्या. त्यांना बायका आणि मुले होती. त्यांचा जन्म आपणासारखाच झाला आणि संगोपण नैसर्गिकरित्या झाले. ते खात आणि पित होते. झोपत आणि जागे होत असत. हसत आणि रडत असत. आपल्यासारखेच सुखी आणि दु:खी बनत असत. त्यांना मृत्यू आपल्यासारखाच येत असे. थोडक्यात ते सर्व प्रेषित मानव होते आणि त्यांच्यात मानवाची ती सर्व गुणवैशिष्ट्ये होती. या सत्यतेला कुरआन स्पष्ट करीत आहे,

"खरोखरच आम्ही काहीच नाही परंतु तुमच्या सारखे" *(१४ :११)*

इतर अनेक ठिकाणी कुरआन या सत्यतेला स्पष्ट करीत आहे,

"हे पैगम्बर (स) तुमच्यापूर्वीजे कोणतेही पैगम्बर आम्ही पाठविले होते, ते सर्व ही अन्न खाणारे आणि बाजारात हिंडणारे, फिरणारे लोकच होते." *(२५ : २०)*

एके ठिकाणी कुरआन या सत्यतेला आणखी स्पष्ट करून देत आहे,

"तुमच्या पूर्वीदेखील आम्ही अनेक पैगंबर पाठविले आहेत आणि त्यांना आम्ही पत्नी व मुलेबाळे असलेलेच बनविले होते. आणि कोणत्याही पैगंबराचे हे सामर्थ्य नव्हते की अल्लाहच्या आज्ञेशिवाय एखादा संकेत त्याने स्वत:च आणून दाखविला असता." *(१३ : ३८)*

अल्लाहने मानवालाच प्रेषित म्हणून का नियुक्त केले, याचे सविस्तर कारण आणि खुलासा कुरआन देत आहे. जे लोक आदरणीय मुहम्मद (स) यांच्या प्रेषित्वास विरोध करीत होते ते लोक आपल्या विरोधाच्या समर्थनार्थ सांगत की अल्लाहला जर प्रेषित आमच्यासाठी पाठवायचा होता तर त्याने दूत पाठविला असता, आमच्यासारखा मनुष्य पाठविला नसता. या लोकांच्या विरोधाला खोडून काढताना कुरआन स्पष्ट करतो,

"यांना सांगा, जर पृथ्वीवर ईशदूत समाधानाने वावरू लागले असते, तर जरूर आम्ही आकाशातून एखाद्या ईशदूतालाच त्यांच्यासाठी पैगंबर बनवून पाठविले असते." *(१७ : ९५)*

वरील संकेतवचन प्रेषित्वाच्या दैवी आदेशित नियमांना प्रदर्शित करीत आहे. म्हणजे प्रेषित हा ज्यांच्यासाठी पाठविला गेला तो त्यांच्यापैकीच (सजातीय) असतो. हे अगदी साधे वाक्य आहे, परंतु विद्वतापूर्ण आहे. ही विद्वता सत्यता पटवून देत आहे. प्रेषितांची नियुक्ती मनुष्यातून केली गेली नसती तर प्रेषित्वाच्या उद्देशालाच तडा गेला असता. हे निर्विवादित सत्य आहे की समस्त मानवांसाठी प्रेषित हे अल्लाहचे संदेशवाहक होते. परंतु याचा असा मुळीच अर्थ नाही की ते पोस्टमनसारखे होते ज्याचे काम फक्त संदेश पोहचविणे आहे. प्रेषित संदेशवाहक होते परंतु ते प्रचारक, शिक्षक, मार्गदर्शक आणि समजविणारे होते, सावध करणारे होते. त्यांनी समाजाच्या नैतिक उन्नतीसाठी अहोरात्र प्रयत्न, काबाडकष्ट केले. त्यांनी ईशसंदेश आपल्या जीवनव्यवहारात आत्मसात करून लोकांपुढे आदर्श ठेवला आहे. प्रेषित हा प्रथम मानव आहे, ज्याने दिव्य प्रकटनाद्वारे मिळालेले आदेश आणि मार्गदर्शनानुसार आपले जीवन कंठीले जे अनुकरणीय आहे. प्रेषिताच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे की, त्याने सर्वांसाठी आदर्श बनावे. जोपर्यंत तो आपले सर्व जीवनकार्य तडीस नेत नाही तोपर्यत प्रेषितांची ही शृंखला परिपूर्ण होतच नाही. प्रेषिताव्यतिरिक्त इतरांना हे मदतकार्य पार पाडणे शक्य आहे का? निश्चितच उत्तर नकारार्थीच आहे. एखाद्याला अंशतः हे महतकार्य पार पाडणे शक्य होईल, परंतु प्रेषितकार्य पूर्णपणे कोणी इतर पार पाडूच शकत नाही. आपण दूतांचे उदाहरण घेऊ या. ते सर्वप्रथम या कामासाठी आपण अपेक्षित धरू या. दूतांना मानवांमध्ये प्रेषित म्हणून पाठविले असते तर स्थिती काय असती? दूतांनी अल्लाहचे संदेश (दिव्य प्रकटन) मनुष्यापर्यंत जरूर पोहचवले असते. परंतु दूत म्हणून त्यांनी इच्छा–आकांक्षा, भावना इ.बद्दलचे ईशादेश कसे पाळले असते? माणसाच्या विशिष्ट प्रश्नाबद्दलचे आदेश दूतांनी कसे व्यवहारात आणले असते? दूत दिव्य प्रकटनाचा बहुतांश भाग जर अंगिकारात नसेल तर त्यांच्याकरवी अनुकरणीय असे आदर्श स्थापित होऊच शकत नाही. दूतांना मनुष्याच्या इच्छा आणि भावनांबद्दल अज्ञान असल्याने ते मानवांना मार्गदर्शन करुच शकत नाहीत. मानवांच्या समस्या सोडविणे दूतांच्या कक्षेबाहेरील कार्य आहे. दूत मनुष्यापुढे आदर्श दैवी जीवनप्रणाली ठेवू शकतच नाही. मनुषत्वाबद्दलचे अज्ञान त्यांना त्यांच्या प्रेषितकार्यात मोठा अडथळा असल्याने मनुष्याचे चारित्र्य घडणकार्य अशक्य आहे.

दिव्य कुरआननुसार प्रत्येक प्रेषित हा त्या त्या लोक समुदायांमधून नियुक्त केला गेला होता. त्याचप्रमाणे दिव्य प्रकटनसुध्दा त्याच स्थानिक भाषेत अवतरित होत होते. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"आम्ही आपला संदेश देण्यासाठी जेव्हा कधी एखादा प्रेषित पाठविला आहे, त्याने आपल्या लोकांच्याच भाषेत संदेश दिला आहे जेणेकरून त्याने त्यांना चांगले स्पष्ट करून आपले म्हणणे मांडावे. मग अल्लाह ज्याला इच्छितो मार्गदर्शन करतो, तो प्रभुत्वसंपन्न व बुध्दिमान आहे." (१४ : ४)

दिव्य प्रकटन अशा प्रकारे स्थानिक भाषेत अवतरित करून त्यांना (लोकांना) स्पष्ट करून सांगण्याची गरज मनुष्यच भागवू शकतो, दूत नाही.

"त्याने (प्रेषिताने) त्यांना (लोकांना) चांगले स्पष्ट करून आपले म्हणणे (दिव्यप्रकटन) मांडावेत." (१४ : ४)

वरील कुरआन संकेत स्पष्ट आहे की प्रेषितकार्यासाठी मानवातूनच एक मनुष्य नियुक्त करणे आवश्यक आहे आणि त्यामुळे ईशसंदेश अगदी स्पष्टपणे त्यांच्याच भाषेत मांडला जाण्यासाठी अल्लाहने परिपूर्ण अशी व्यवस्था केली होती. ईशसंदेश समजण्यासाठीचे जे अडथळे होते त्यांना दूर करण्यासाठी अतिमहत्त्व देण्यात आले होते. म्हणून प्रेषित ज्या ठिकाणी नियुक्त केला अल्लाहने त्या लोकातूनच नियुक्त केला. म्हणूनच प्रेषित हे मनुष्यच असणे अत्यावश्यक होते हे वरील विवेचनावरून अगदी स्पष्ट होते.

प्रेषित्वाचे स्वरूप

प्रेषित्व हे काही असे काम नव्हे की ते मेहनतीने प्राप्त केले जावे. प्रेषितांची नियुक्ती अल्लाह करत असे आणि प्रेषित्व ही अल्लाहची खास कृपा आहे. अल्लाह प्रेषित त्यांनाच नियुक्त करीत ज्यांना तो या कार्यासाठी निवडत असे. मनुष्याची इच्छा अथवा त्याचे परिश्रम या कामी म्हणजे प्रेषित्व प्राप्तीसाठी कुचकामी आहेत. अल्लाह स्वत: या महान कार्यासाठी एखाद्याची नियुक्ती करीत असे. कुरआनच्या पारिभाषिक शब्दावलीत यास "इस्तफा" असे संबोधले गेले आहे. म्हणजे अनेकातून एक उत्तम माणसाची निवड करणे होय. या शब्दाने अभिप्रेत अशी व्यक्ती ज्यास प्रेषित म्हणून निवडले गेले ती व्यक्ती या दिव्य कामासाठी अतियोग्य आहे. प्रेषित नियुक्त करण्याची ही पध्दत तार्किकदृष्ट्यासुध्दा योग्य आहे आणि महत्त्वाची आहे. कुरआन यास अनेक वेळा स्पष्ट करून सांगत आहे. जेव्हा प्रेषित मुहम्मद (स) यांच्या प्रेषित्वावर आक्षेप घेण्यात आले आणि इतरांनीसुध्दा तसा दावा केला तेव्हा अल्लाहने स्पष्ट केले,

"अल्लाह उत्तम प्रकारे जाणून आहे की दिव्य प्रकटन कोणावर अवतरित करावे." (६ : १२५)

प्रेषित्व हे शिकून आणि कष्ट करून आत्मसात करता येणे अशक्य आहे किंबहुना त्याचे खरे महत्त्व आपल्या दृष्टीपलीकडील गोष्ट आहे. कुरआन स्पष्टोक्ती आहे की,

"हे लोक तुम्हाला आत्म्याविषयी विचारतात सांगा, "हा आत्मा माझ्या पालनकर्त्याच्या आज्ञेने येतो, पण तुम्हा लोकांना अल्पज्ञान मिळाले आहे." आणि हे पैगंबर (स) आम्ही इच्छिले तर ते सर्वकाही तुमच्याकडून हिरावून घेऊ जे आम्ही तुम्हाला दिव्य प्रकटनाद्वारे प्रदान केले आहे. मग आमच्याविरुध्द तुम्हाला कोणी समर्थक मिळणार नाही, जे ते परत मिळवून देऊ शकेल. हे तर जे काही तुम्हाला प्राप्त झाले आहे तुमच्या पालनकर्त्याच्या कृपेने मिळाले आहे, वस्तुस्थिती अशी आहे की त्याची कृपा तुम्हावर फार मोठी आहे. सांगून टाका की मानव आणि जिन्न (अदृश्य निर्मिती) सर्वच्या सर्वजनांनी मिळून जरी या कुरआनसारखी एखादी वस्तू आणण्याचा प्रयत्न केला तरी आणू शकणार नाही, मग ते सर्व एकदुसऱ्याचे सहायक का असेनात." (१७:८५-८८)

मनुष्याची बुध्दी आणि आकलनशक्ती अगदी मर्यादित आहे. मनुष्य आत्मा आणि त्याचे स्वरुप जाणून घेण्यास असमर्थ आहे. आत्मा जाणून घेण्याची असमर्थता हीच खरी प्रेषित्वाला जाणून घेण्याची असमर्थता आहे. खरे तर प्रेषित्वाचा हा गाभा आहे ज्याला ते प्राप्त झाले तोच प्रेषित होतो.

प्रेषित्वाचे वैश्विक स्वरूप

प्रेषित प्रत्येक लोकसमूहात पाठविले गेले आहेत. याविषयी कुरआन सविस्तरपणे माहिती करून देत आहे,

"परंतु (हे पैगंबर (स)), तुम्ही लोकांना ऐकवू शकत नाही जे कबरीत दफन आहेत. तुम्ही तर केवळ एक सावध करणारे आहात. आम्ही तुम्हाला सत्यानिशी पाठविले आहे. शुभवार्ता देणारा व सावधान करणारा बनवून. आणि कोणताही लोकसमुदाय असा होऊन गेला नाही ज्यात सावध करणारा आला नाही. आता जर हे लोक तुम्हाला खोटे ठरवित असतील, तर यांच्यापूर्वी होऊन गेलेल्या लोकांनीदेखील खोटे लेखले आहे. त्यांच्या पाशी त्यांचे पैगंबर, स्पष्ट प्रमाण, संदेश आणि उज्वल आदेश करणारा ग्रंथ घेऊन आले होते. मग ज्या लोकांनी मान्य केले नाही. त्यांना मी पकडले आणि पाहून घ्या माझी शिक्षा किती कठोर होती." (३५ : २३-२६)

कोणताही लोक समुदाय (राष्ट्र) या पृथ्वीवर असा नाही जिथे लोकांना सावध करणारा आला नाही. याचे एकमेव कारण हे आहे की पृथ्वीवरील सगळी माणसे एकसारखी आहेत. ते सर्व एका हेतुपोटी निर्माण केले गेले. अल्लाहची आज्ञाधारकता

स्वीकारणे हा प्रत्येकाचा उद्देश आहे. परलोकात याविषयी प्रत्येकाला विचारणा होणारच आहे. अशी जर परिस्थिती आहे, तर मग अल्लाहने काहींना जबाबदाऱ्यांचे स्मरण करून द्यावे आणि इतरांना दुर्लक्षित करावे हे कसे शक्य आहे? काहींना अल्लाहने आपले मार्गदर्शन द्यावे आणि इतरांना त्यापासून वंचित ठेवावे हे कसे शक्य आहे? हे अशक्य आहे. कारण अल्लाह सर्वांचा आणि या सृष्टीचा निर्माणकर्ता, पालनकर्ता, मालक आणि शासक आहे. त्याची दया सर्वांसाठी सारखी आहे आणि त्याचा न्याय खरा न्याय आहे.

येथे हे स्पष्ट लक्षात घेतले पाहिजे की जेव्हा असे म्हटले जाते की प्रेषित प्रत्येक लोक समुहात-राष्ट्रात पाठविले गेले आहेत, याचा अर्थ ते (प्रेषित) राष्ट्राच्या एका विशिष्ट पिढीदरम्यान पाठविले गेले होते.

प्रेषितांच्या शिकवणी

जे जे काही प्रेषित शिकवत असत ते सर्व अल्लाहकडून असत. ते स्वतःच काहीएक सांगत नसत. कुरआनोक्ती आहे,

"तो आपल्या इच्छेने बोलत नाही, हा तर एक दिव्यबोध आहे जो त्याच्यावर अवतरला जातो. त्याला जबरदस्त बलशालीने शिकविले आहे." (५३ : ३-५)

जेव्हा असे म्हटले जाते की प्रेषित जे काही शिकवतात ते सर्व अल्लाहकडून असते. हे म्हणण्याला विस्तृत अर्थ आहे. ही शिकवण दोन प्रकारची आहे.

(१) पहिल्या प्रकारची शिकवण अल्लाह प्रत्यक्ष अथवा दूताकरवी प्रेषितांना देतो.

(२) दुसऱ्या प्रकारची शिकवण प्रेषित दिव्य प्रकटनानुसार अथवा दिव्यबोधनुसार काही नीतिनियम तयार करीत असत.

पहिल्या प्रकारची शिकवण मूळ स्वरुपाची आणि अल्लाहने प्रत्यक्ष अवतरित केलेली आहे तर दुसरी अप्रत्यक्ष आणि प्रेषितांनी दिव्यबोधच्या प्रकाशात तयार केलेली आहे. परंतु हेतु आणि पावित्र्यात दोन्ही शिकवणी सारख्या आहेत.

निष्पापपणा आणि प्रेषित

प्रेषित निष्पाप आहेत. त्यांच्या हातून धार्मिक-प्रकारची चूक न होणे अटळ आहे. त्यांची इच्छा, आकांक्षा, वागणूक, विचार, आचार हे सर्वप्रकारच्या वाईटांच्या विरोधातील पुरावेच होत. ते धर्मबाह्य बाबतीत चूक करणे शक्य आहे, परंतु याचा त्यांच्या प्रेषित्वावर काहीच परिणाम होत नाही. त्यांचा निष्पापपणा दर्शवितो की दिव्य प्रकटनाचा अर्थबोध घेताना त्यांच्याकडून चूक होणे अशक्य आहे. तसेच दिव्यबोधाच्या

प्रकाशात नीतिनियम तयार करताना अथवा ईशादेश आचरणात आणताना त्यांच्याकडून हलगर्जीपणा अथवा एखादी चूक अजिबात होणार नव्हती. म्हणून त्यांच्या इतर बाबींसाठी (धर्मबाह्य) त्यांच्या निष्पापपणावर काहीच परिणाम होणार नव्हता.

प्रेषित हे विचार करीत नाहीत अथवा चूक करीत नाहीत म्हणून निष्पाप होते असे मुळीच नाही तर वस्तुस्थिती वेगळी आहे. इतर मानवांसारखेच प्रेषितांच्या हातून चूक होणे सहाजिक आहे. परंतु प्रेषितांची ही चूक करण्याची पात्रता कधीच घडून येत नसे, कारण त्यांचे विचार आणि दृष्टी त्यांच्या नैतिकतेइतकीच परिपूर्ण अशी होती. एकीकडे प्रेषित मुहम्मद (स) दिव्य प्रकटनाचा उद्देश जाणून होते आणि त्या प्रकाशात ते नीतिनियम बनवित असत. दुसऱ्या बाजूला त्यांना त्यांच्या 'स्व'वर पूर्ण नियंत्रण होते. त्यांचे नैतिक अधिष्ठान, अल्लाहचे भय आणि परलोकाविषयीचे ज्ञान अतिउच्च दर्ज्याचे असल्यामुळे त्यांना त्यांच्या हातून पापकर्मे घडतील अशी कधीच भीती नव्हती. हे त्यांच्या निष्पापपणाचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य होते.

पण हे फक्त एकमेव वैशिष्ट्य प्रेषित मुहम्मद (स) यांच्या निष्पापपणाचे नाही. त्यांना निष्पापपणाचा उच्च दर्जा प्राप्त होण्यास दिव्यबोध आणि त्यांचे आत्मिक निरीक्षण हेसुध्दा कारणीभूत आहे. खरे तर हे दिव्य निरीक्षणच त्यांना बौध्दिक आणि नैतिक चुकांपासून दूर ठेवत होते. प्रेषितांच्या हातून चूक अशी होतच नव्हती असे म्हणणे धाडसाचे ठरेल. त्यांच्या हातून चुका घडत होत्या, परंतु जेव्हा असे घडत तेव्हा त्यांना अल्लाहकडून सावधानतेचा इशारा त्वरित मिळत असे. दुसऱ्यापर्यंत ही चूक पोहचण्याअगोदर त्यास दिव्यबोधाद्वारे अगदी दुरूस्त केले जात असे. जेव्हा त्यांना काही विपरीत (चूक) आपल्या हातून घडावे असे मनोमन वाटे तेव्हा त्यांची अतिउच्च दर्ज्याची नैतिकशक्ती त्या अइच्छेला गाडून टाकत असे. कुविचार आणि अनाचाराबरोबर दोन हात करताना त्यांची उच्च दर्ज्याची नैतिक शक्तीच फक्त मुकाबला करीत नसे, तर त्याबरोबर दिव्यबोधसुध्दा लढाईत सामील होत असे आणि त्या कुविचाराचा तथा दुष्टकर्माचा कायमचाच नाश करीत असत.

प्रेषितांचा निष्पापपणा हा प्रेषितशृंखलेच्या महान कार्यासाठी अत्यावश्यक होता. प्रेषित जर खोटे बोलत असतील. पूर्वग्रहदूषितता आणि दिव्यप्रकटनाचे चुकीचे अर्थ लावत असतील तर त्यांच्यावर कोण वेडा विश्वास ठेवणार होता? लोक अशा व्यक्तीवर विश्वास तरी कसा ठेवणार की तो अल्लाहचा संदेश त्यांच्यापर्यंत ढवळाढवळ करून पोहोचवित आहे? असा मनुष्य मानवी चारित्र्याचा अनुकरणीय असा आदर्श जगापुढे ठेऊ शकत नाही कारण त्याचे स्वतःचेच चारित्र्य हे हीन दर्जाचे आणि दुसऱ्याला उपदेश

करण्यालायक नसते. प्रेषित्व पूर्णत: असफल ठरते जर ते प्रेषित या महान कार्यासाठी दिव्यप्रकटनापुढे पूर्णपणे आज्ञांकित होण्याचे उदाहरण जगापुढे ठेवण्यास असमर्थ ठरणार होते.

प्रेषित हे निष्पाप होते म्हणजे ते व्यक्ती म्हणूनसुध्दा निष्पाप होते. बौध्दिक आणि शारीरिक भ्रष्ट आचारांचा (भ्रष्टाचार) तिटकारा त्यांना होता. हे अशामुळे की ते अल्लाहचे खास उपकृत केलेले दास होते. दुसऱ्या कोणाला हा दर्जा प्राप्त होऊच शकत नाही. भले तो कितीही धार्मिक, नैतिक का असेना. मनुष्याचे विचार आणि आचार हे निष्पापपणाला पोहचू शकतील, पण हे अशक्य आहे की त्याची नैतिकता चूक करण्यापलीकडील आणि विचाराने दैवी बोधाचा अचूकपणे अर्थ काढण्याचे बौध्दिक सामर्थ्य प्राप्त करणारी आहे, हे अशक्य कोटीचे आहे.

म्हणून हा शेवटचा मुद्दा फार महत्त्वाचा आहे. जोपर्यंत व्यक्ती हे जाणून घेत नाही की प्रेषित मुहम्मद (स) हेच फक्त निष्पाप आहेत आणि हे सत्य त्या व्यक्तीच्या हृदयात खोलवर जाऊन पोहोचत नाही, तोपर्यंत ही व्यक्ती प्रेषितांवर मनापासून प्रेम करूच शकत नाही आणि त्यांचा खरा अनुयायी आणि अज्ञांकित बनून राहू शकत नाही. अशा स्थितीत प्रेषितांबरोबर कोणी भागीदार ठरविण्याचे पाप त्या व्यक्तीकडून अनायासे घडून जाते.

प्रेषितांचे महत्त्व

पूर्णपणे प्रेषितांना आज्ञांकित होणे हे अनुयायीसाठी अत्यावश्यक आहे. ही सर्वप्रथम गरज आहे श्रध्दावंत होण्याची. धर्मासाठी आणि दैवी नियमांसाठी हे आवश्यक आहे की प्रेषित जे काही सांगतील त्यास अनुयायींनी कुचराई न करता अंगीकारले पाहिजे. प्रेषित जे काही सांगतील अनुयायींना समजो अथवा न समजो, त्यांनी ते त्वरीत खरे आणि चांगले म्हणून स्वीकार केला पाहिजे. हा प्रेषितांचा दर्जा स्वत: अल्लाहनेच ठरवून दिलेला आहे. कुरआनोक्ती आहे,

''यांना सांगा की आंम्ही जो कोणी प्रेषित पाठविला आहे. याकरिताच पाठविला की अल्लाहच्या आदेशांचा आधारावर त्याची आज्ञा पाळली जावी, जर यांनी ही पध्दत अंगीकारली असती की जेव्हा हे स्वत:वर अत्याचार करून बसले होते तेव्हा तुमच्यापाशी आले असते आणि अल्लाजवळ क्षमायाचना केली असती, तर नि:संशय अल्लाह यांना क्षमा करणारा व कृपा करणारा आढळला असता.'' (४: ६४)

ही आज्ञाधारकता आणि शरणागती फक्त मौखिक स्वरूपाचीच नसावी तर ती

प्रेषिताच्या आज्ञेला गांभीर्यपूर्वक आणि मनाने स्वीकार करणारी असावी. अंतिम प्रेषित मुहम्मद (स) यांच्या आज्ञांकित राहण्याबद्दल कुरआन स्पष्टोक्ती आहे,

''हे मुहम्मद (स)! तुमच्या पालनकर्त्याची शपथ, हे कधीही श्रध्दावंत होऊ शकत नाहीत. जोपर्यंत आपल्या वादग्रस्त प्रश्नात हे तुम्हाला निर्णय देणारा मान्य क़रीत नाहीत. मग जो काही निर्णय तुम्ही द्याल त्यावर आपल्या मनातदेखील काही संकोच वाटू नये तर पूर्णतः मान्य करावे.'' *(४ : ६५)*

हे स्वभाविकतः अत्यावश्यक आहे. वरील संकेतवचनात नमूद केलेली प्रेषिताची संकल्पना व्यतिरिक्त दुसरी अस्वाभाविक ठरेल. मनुष्य हा निर्माण केला गेला आहे मुळात अल्लाहची शरणागती आणि आज्ञाधारकतेसाठीच फक्त! प्रेषित हे माध्यम आहे अल्लाहचे आदेश आणि संदेश जाणून घेण्यासाठी. म्हणून प्रेषितांचे पूर्णतः आणि गांभीर्यपूर्वक अनुकरण अनिवार्य आहे. हे खरे आहे की एखादी व्यक्ती रस्ता चालूनच एखाद्या ठिकाणी पोहचू शकते किंवा एखादा हवाई प्रवाशी विमानाने प्रवास करूनच हवाई प्रवास करू शकतो. त्याचप्रमाणे व्यक्ती अल्लाहचे मार्गदर्शन तोपर्यंत प्राप्त करूच शकत नाही. जोपर्यंत ती व्यक्ती प्रेषित मुहम्मद (स) यांचा सच्चा अनुयायी बनत नाही. कुरआन स्पष्ट करीत आहे की जेव्हा जेव्हा प्रेषितांनी त्यांच्या प्रेषित्वांची घोषणा केली, तेव्हा त्यांनी लोकांपासून अपेक्षा ठेवली की,

''*म्हणून तुम्ही अल्लाहच्या कोपचे भय बाळगा आणि माझे (प्रेषित) आज्ञांकित राहा.*'' *(२६ : १२६)*

खरे तर हे संकेतवचन स्पष्ट करीत आहे की अल्लाहची शरणागती आणि आज्ञाधारकता यांना प्राप्त तेव्हाच करून घेता येईल जेव्हा प्रेषित मुहम्मद (स) यांचे पूर्ण अनुकरण केले जाईल. प्रेषितच फक्त सांगू शकतात की अल्लाहचे आदेश काय आहेत आणि आपण त्यांना कसे आचरणात आणावेत. म्हणून तर अल्लाहने फक्त त्याचीच शरणागती पत्करण्यास सांगितले नाही तर त्याबरोबर प्रेषितांची आज्ञाधारकता स्वीकारण्याचासुध्दा आदेश दिलेला आहे.

वस्तुतः प्रेषितांनी धर्माच्या बाबतीत जे काही सांगितले आहे ते सर्व अल्लाहकडून आहे, प्रेषितांची ही स्थिती त्यांच्या कार्याला आणखी जास्त महत्त्व प्रदान करते. म्हणून त्यांचे आज्ञांकित होणे (प्रेषितांची आज्ञा पाळणे) म्हणजे अल्लाहची आज्ञा पाळण्यासारखे कृत्य आहे.

''*हे मुहम्मद (स), आम्ही तुम्हाला लोकांसाठी पैगम्बर बनवून पाठविले आहे*

आणि यासाठी अल्लाहची साक्ष पुरेशी आहे. ज्याने पैगम्बराची आज्ञा पाळली त्याने खरे म्हणजे अल्लाहचे आज्ञापालन केले आणि जो पराङ: मुख झाला तर आम्ही तुम्हाला या लोकांवर पहारेकरी म्हणून तर पाठविले नाही." (४ : ७९-८०)

थोडक्यात, प्रेषित्वांवर श्रध्दा ठेवणे ही अत्यावश्यक अट आहे. प्रेषितांचे पूर्ण आज्ञापालन करण्यासाठी प्रेषितांचे अनुयायी वर वर आणि दिखाऊ आज्ञाधारकता दाखविणारे मुळीच नसतात. प्रेषितांवरील श्रध्देत थोडीसुध्दा चलबिचल ही श्रध्देच्या मुळांवर घाव घालणारी ठरते. असे करणे हे दुसरे तिसरे काहीच नसून प्रेषितांच्या महान कार्याबद्दलचे घोर अज्ञान आहे. असा मनुष्य अज्ञानाच्या घोर अंधारात चाचपडत असतो.

एखाद्या प्रेषिताला नाकारणे

प्रेषित्वावर विश्वास अर्थहीन होतो जर या श्रध्देत सर्व प्रेषित येत नाहीत. कुरआन अशा लोकांना श्रध्दावंत (मुस्लिम) म्हणत नाही जे काहींना तर प्रेषित मानतात आणि इतर प्रेषितांना नाकारतात. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"जे लोक अल्लाह आणि त्याच्या पैगंबरांशी द्रोह करतात आणि इच्छितात की अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांच्या दरम्यान भेदभाव करावा आणि म्हणतात, आम्ही काहींना मान्य करू आणि काहींना मानणार नाही, तसेच अश्रध्दा व श्रध्दा यांच्या दरम्यानातून एक मार्ग काढण्याचा निश्चय करतात ते सर्व पक्के अश्रध्दावंत (काफीर) आहेत आणि अशा अश्रध्दावंतांसाठी आम्ही अशी शिक्षा तयार करून ठेवली आहे जी त्यांना अपमानित व तिरस्करणीय करून सोडणारी असेल. याविरूध्द जे लोक अल्लाह आणि त्याच्या सर्व प्रेषितांना मानतील आणि त्यांच्या दरम्यान फरक करणार नाहीत, त्यांना आम्ही अवश्य त्यांचा मोबदला प्रदान करू आणि अल्लाह मोठा क्षमा करणारा व दया करणारा आहे." (४ : १५०-१५२)

वरील ईशवाणी स्पष्ट करीत आहे की एखाद्या प्रेषितालासुध्दा नाकारणे म्हणजे पक्के अश्रध्दावंताचे (काफीर) लक्षण आहे. जर एखादा व्यक्ती प्रेषितांपैकी एका प्रेषितालासुध्दा नाकारत असेल अथवा त्यावर विश्वास ठेवत नसेल तर त्याने सर्व प्रेषितांना नाकारल्यासारखे आणि अविश्वास ठेवल्यासारखे आहे. हे काही मामुली आदेश नाहीत. हे सत्याला धरून आहे की एका प्रेषिताला नाकारणे हे घोर पाप आहे. प्रत्येक प्रेषित अल्लाहकडून पाठविला गेला आहे आणि तो लोकांना दिव्यसंदेश पोहोच करीत असतो. अशा प्रकारे प्रेषित त्या काळातील लोकांचा शासक असतो जो अल्लाहकडून नियुक्त केला गेलेला होता. एखादी व्यक्ती प्रेषितांपैकी एका प्रेषितावर विश्वास ठेवत

नसेल तर त्याने या सृष्टीचा स्वामी अल्लाहच्या प्रभुत्वावर अविश्वास ठेवला आणि त्याचे आज्ञापालन केले नाही हे सिध्द होते. हा अल्लाहविरुध्द विद्रोह आहे. एका प्रेषितावरील अविश्वास इतर सर्व प्रेषितांवरील विश्वासाला तार्किकदृष्ट्यासुध्दा कुचकामी ठरवितो. हे असे आहे की एक मनुष्य सरकारच्या सर्व अधिकाऱ्यांना मान्य करतो, परंतु एका अधिकाऱ्याला मान्य करीत नाही. अशाने ती व्यक्ती सरकारची विश्वासु ठरत नाही. ही त्याची लहर (स्वच्छंदता) आहे. त्याचे मानने अथवा न मानने हे मूल्यहीन ठरते. प्रेषित्वाच्या बाबतीत जर कोणी आपल्या इच्छेप्रमाणे वागत असेल तर अल्लाह अशांना पक्के अश्रध्दावंत (काफीर) ठरवितो. नूह (अ) यांच्या लोकसमुदायाला उद्देशून अल्लाहने निर्णय दिला ज्याला कुरआनने कायमचेच सुरक्षित करून ठेवले आहे,

''आणि त्यांना सांगितले की जा, त्या लोकसमूहाकडे ज्याने आमच्या वचनांना खोटे ठरविले आहे. सरतेशेवटी त्या लोकांना आम्ही नष्ट करून सोडले. हीच स्थिती नूह (अ) यांच्या लोकसमूहाची (राष्ट्राची) झाली, जेव्हा त्यांनी पैगंबरांना खोटे ठरविले, आम्ही त्यांना बुडवून टाकले आणि जगभरातील लोकांसाठी एक धडा देणारे संकेत बनविले, आणि या अत्याचाऱ्यांसाठी आम्ही एक वेदनादायक कोप उपलब्ध करून ठेवला आहे.'' *(२५ : ३६-३८)*

नूह (अ.) यांच्या लोकांनी तर फक्त एका प्रेषितांनाच नाकारले होते. सरतेशेवटी अल्लाहने त्यांच्या या घोर अपराधापायी (काफीर) त्यांना बुडवून टाकले. आणि जगभरातील लोकांसाठी एक धडा देणारे शाश्वत असे संकेत त्या घटनेला बनविले. त्या लोकांनी इतर प्रेषितांबद्दल तर काहीच म्हटले नव्हते अथवा त्यांना नाकारलेही नव्हते.

आपण हे पाहिले आहे की प्रेषित आपल्या लोकसमूहात म्हणजे राष्ट्रात यासाठी येत असत की लोकांनी त्यांचे अनुकरण अल्लाहच्या इच्छेनुसार करावे. जो कोणी प्रेषिताची आज्ञाधारकता स्वीकार करतो तो खरे तर अल्लाहचीच आज्ञाधारकता स्वीकारतो. म्हणून प्रेषितांपैकी एकाचा अस्वीकार करणे म्हणजेच अल्लाहच्या इच्छेविरुध्द वागणे आणि त्याच्या आदेशांचे पालन न करणे होय. हे काय विद्रोह आणि घोर अश्रध्देचे लक्षण नव्हे? अल्लाहच्या प्रत्येक प्रेषितावर श्रध्दा न ठेवता खऱ्या श्रध्दावंताचा दावा करणे हे न्यायसंगत आहे काय?

प्रेषित मुहम्मद (स)

प्रेषित्वाबद्दल वर सविस्तर जी चर्चा झाली आहे त्यात प्रेषित्वावरील श्रध्देचा

साधारण आराखडा देण्यात आला आहे ते काही परिपूर्ण असे विवरण नाही. इस्लामी प्रेषित्वाच्या संकल्पनेला येथे पूर्णपणे स्पष्ट करणे हे या संक्षिप्त अभ्यासाचा उद्देश मुळीच नाही. इस्लामच्या प्रेषित्वाचे खरे स्वरूप आणि खरी इस्लामी संकल्पनासुध्दा या विवेचनाने पूर्णपणे पुढे येणे अशक्य आहे. इस्लामी प्रेषित्वाची संकल्पना तेव्हाच खऱ्या अर्थाने परिपूर्ण होते आणि साकारली जाते जेव्हा मनुष्य अंतिम प्रेषित मुहम्मद (स.) यांचा आज्ञांकित होऊन त्यांना शरण जातो. असे करणे जेव्हा मनुष्यासाठी अनिवार्य सिध्द होते. मनुष्य तत्त्वतः मुहम्मद (स.) यांना प्रेषित मानतो जसे तो इतर प्रेषितांना मानतो आणि इतर प्रेषितांवरसुध्दा तसाच विश्वास ठेवतो जसा तो मुहम्मद (स.) यांच्यावर ठेवतो. परंतु व्यवहारात आणि आचरणात मात्र फक्त आदरणीय प्रेषित मुहम्मद (स.) यांचेच अनुकरण करतो. आणि हेसुध्दा त्या निष्ठेने की फक्त मुहम्मद (स.) यांचेच आज्ञांकित होणे अत्यावश्यक आहे अनिवार्य आहे. सर्व प्रेषित अल्लाहचे संदेशवाहक होते म्हणून मनुष्य जेव्हा प्रेषित्वाच्या संकल्पनेवर श्रध्दा ठेवतो तेव्हा वर नमूद केलेल्या तार्किक वैशिष्ट्यांचा आणि अटींचा तो स्वीकारच करीत असतो आणि तेव्हाच तो खऱ्या अर्थाने इस्लामी प्रेषित्वाचा स्वीकार करून श्रध्दावंत (मुस्लिम) बनतो.

प्रकरण पाचवे

• मुस्लिमांची मौलिक कर्तव्ये

(म्हणजेच इस्लामची व्यावहारिक बाजू)

इस्लामचे आधारस्तंभ

आतापर्यंत श्रध्दविषयी चर्चा झाली. आता हे स्वाभाविक आहे की इस्लामची जी मौलिक कर्तव्ये आहेत त्याकडे वळावे. हेतु हा आहे की इस्लामच्या व्यावहारिक बाजूचा अभ्यास करून पाहावे की इस्लाम आज्ञाधारकांसाठी (मुस्लिमांसाठी) कोणती कर्तव्यें निश्चित करत आहे. हा फार विस्तृत विषय आहे. याचा खुलासा करण्यासाठी हजारहून जास्त पाने खर्च करावी लागतील. आपण येथे खोलात न जाता सर्वसामान्य चर्चा करू या. इस्लामच्या प्रमुख आदेशांचा येथे थोडक्यात आढावा घेतला तरी आपला उद्देश पूर्ण होणार आहे. हे प्रमुख आदेश दोन भागांमध्ये विभागले जाऊ शकतात.

एक म्हणजे जे आदेश मौलिक महत्त्वाचे आहेत. इस्लामच्या शिकवणुकीत अशांचा समावेश श्रध्देनंतर लगेचच केला गेला आहे.

दुसरा प्रकार म्हणजे ज्या आदेशांचे स्वरूप हे पहिल्या प्रकारांपासून भिन्न आहे ते पहिल्या प्रकारच्या आदेशानंतर येतात. त्यांचे महत्त्व हे पहिल्या प्रकारच्या आदेशानंतरचे आहे.

म्हणून पहिल्या प्रकारच्या आदेशांचाच आपण स्वाभाविकपणे प्रथम विचार करु या कारण हे मौलिक स्वरूपाचे आदेश त्यातही प्रथम श्रेणीतील आहेत.

इस्लामने मुस्लिमांसाठी कोणत्या मौलिक अशा कर्तव्यांची जबाबदारी निश्चित केले आहे? उत्तरासाठी आपणास अनुमान अथवा कयास करण्याची मुळीच आवश्यकता नाही कारण प्रेषित मुहम्मद (स.) यांनी त्यांचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे.

"इस्लामचा पाया पाच बाबींवर आधारित आहे. अल्लाहशिवाय इतर कोणीही दुसरा ईश्वर नाही, मुहम्मद (स.) अल्लाहचे प्रेषित आहेत, नमाज अदा करणे, जकात अदा करणे आणि रमजानचे उपवास (रोजे) ठेवणे, पाचवे कर्तव्य हज यात्रा करणे होय." *(बुखारी)*

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या एका कथनानुसार (हदीसनुसार) त्यांनी "इस्लामचा पाया पाच गोष्टींवर आधारित आहे." असे म्हटल्यानंतर प्रेषितांनी

''दायिम'' हा शब्दसुध्दा वापरला आहे. या शब्दाच्या समावेशानंतर अर्थ असा होतो की ''इस्लाम पाच खांबांवर उभा आहे.'' आता खांब म्हणजे संपूर्ण इमारत नव्हे. ते त्या इमारतीचे अंग आहेत. इमारतीच्या इतर अंगाप्रमाणे खांब इमारतीचे एक महत्त्वाचे अंग आहे. इमारतीत त्यांचे महत्व हे अनन्यसाधारण असे आहे. जोपर्यंत खांब उभे राहत नाहीत तोपर्यंत इमारतीचे इतर भाग पूर्ण होतच नाहीत आणि त्यामुळे इमारत उभी राहाणे अशक्य आहे. त्याचप्रमाणे इस्लामची कर्तव्ये जर पाळली गेली नाहीत तर इस्लामच्या इतर शिकवणींना आचरणात आणणे कठीण जाते. जर या मौलिक कर्तव्यांना डावलून काही कर्तव्ये पार पाडली गेलीत तर तो फक्त कर्तव्याचा आभास असेल आणि तत्त्वहीन कृत्य असेल.

म्हणून मौलिक अशा महत्त्वाच्या कर्तव्यांना पार पाडले म्हणजे इतर कर्तव्यांना पार पाडण्यासारखे आहे. या दुसऱ्या प्रेषितकथनात (हदीसीमध्ये) फक्त याच इस्लामच्या मूलतत्त्वांना आणि कर्तव्यांना इस्लाम असे संबोधण्यात आले आहे. प्रेषित मुहम्मद (स.) यांचे कथन आहे,

''इस्लाम म्हणजे तुम्ही यांची खात्री करावी की ईश्वर दुसरा नाही फक्त अल्लाह आणि मुहम्मद (स) हे अल्लाहचे प्रेषित आहेत आणि तुम्ही नमाज अदा करावी, जक़ात द्यावी रमज़ानचे उपवास (रोजे) ठेवावेत आणि काबागृहाचे हज करावे आयुष्यातून एकदा तरी.''

पहिल्या हदीसीमध्ये ही कर्तव्ये ''इस्लामचे खांब'' असे संबोधले गेले परंतु ते अतिमहत्त्वाचे असल्याने त्यांनी संपूर्ण इस्लामला प्रदर्शित केले आहे हे आपण खालील चर्चेतून पाहू या. आपण या इस्लामच्या प्रथम श्रेणीतील कर्तव्यांविषयी जाणून घेऊ या.

एकेश्वरत्व आणि प्रेषित्व

एकेश्वरत्वाला आणि प्रेषित्वाला मान्यता तोंडी स्वरूपात दिली जाते. ते त्यांच्या शाब्दिक अर्थापेक्षा जास्त काही सूचित करते. ते तोंडी एकेश्वरत्वाचे आणि प्रेषित्वाचे अभिवचन सर्व प्रेषितांना, ईशग्रंथांना, दूतांना तसेच पारलौकिक जीवन आणि नशीब या सर्वांना मान्यता देते. थोडक्यात, हे इस्लामच्या संपूर्ण श्रध्देलाच मान्यता आहे. कारण जो प्रेषित मुहम्मद (स) यांचे प्रेषित्व मान्य करतो त्याच क्षणी तो या सर्व अदृश्य सत्यतेलासुध्दा मान्य करतो की ज्यांना प्रेषितांनी सर्वांपर्यंत पोहचविले आहेत.

एकेश्वरत्वात आणि प्रेषित्वात अंतःकरणपूर्वक श्रध्दा असणे हा एक भाग आहे. आणि दुसरा भाग त्या श्रध्देला मान्य करणे आणि मानल्यानंतर तोंडी अभिवचन देणे

होय, प्रेषितवचनांचा आणि धार्मिक विद्वानांच्या टिकात्मक साहित्याचा अभ्यास केल्यानंतर हे कळून येते की मुस्लिम (श्रध्दावंत) बनण्यासाठी फक्त मनापासून श्रध्दा असणे हे पुरेसे नाही तर त्यासाठी तोंडी अभिवचन अथवा घोषणा करणे हेसुध्दा तितकेच महत्त्वाचे आहे. तोंडी घोषित केल्याशिवाय श्रध्दा वैध ठरत नाही. तोंडी अभिवचन देणे आणि घोषणा करणे म्हणजे सत्य मान्य करणे की इस्लाम हा धर्म– परिपूर्ण जीवनव्यवस्था आहे आणि कुजबुजणारी मुहीम मुळीच नाही. इस्लामच्या कर्तव्यांची पूर्तता एकांतात होऊच शकत नाही. हा तो धर्म आहे जो समस्त मानवतेशी उंच आवाजात संभाषण करीत आहे. (कुजबुज नव्हे) जीवनाच्या प्रचंड अशा गोगांटामध्ये इस्लाम मनुष्याला प्रस्थापित करीत आहे. इस्लाम मनुष्याला चांगल्या आणि वाईटाच्या दरम्यानच्या निरंतर चाललेल्या संघर्षात गुंतवून ठेवतो. इस्लाम मुस्लिमाला अविश्वास आणि अनाचाराच्या निरंतर लढाईतील सैनिकांमध्ये सर्वांत पुढे ठेवतो. अशा परिस्थितीत इस्लामचा स्वीकार करण्याची आम घोषणा करणे अत्यावश्यक ठरते. ती त्याच्या श्रध्दाशीलतेने (ईमानने) त्यावर सोपविलेल्या धर्मप्रचारकाची आणि कर्तव्यपूर्तीसाठी लढणारा सैनिकाच्या जबाबदारीची घोषणा आहे. म्हणून इस्लामच्या श्रध्दाशीलतेबद्दल आम घोषणा करणे हे अत्यंत महत्त्वाचे मौलिक कार्य आहे.

या मान्यतेचा आणि उद्‌घोषणेचा आपण जर राजकीय दृष्टिकोणातून विचार केला तर त्याचे महत्त्व अधिक स्पष्ट होते. जो कोणी व्यक्ती अल्लाहच्या एकेश्वरत्वाला आणि मुहम्मद (स) यांच्या प्रेषित्वाला जाहिररित्या मान्य करून विश्वास ठेवतो, त्याला श्रध्दावंत (मुस्लिम) म्हणतात. जरी तो खरोखरच विश्वास श्रध्दा ठेवत नसेल किंवा व्यवहारात इस्लामच्या कर्तव्यपूर्तीस अपयशी ठरत असेल. श्रध्दाशीलतेची (ईमानची) जाहिररित्या कबूली देऊन त्या व्यक्तीस इतर मुस्लिमांप्रमाणेच राजकीय आणि सामाजिक फायदे मिळतात. जर दुसरा एखादा व्यक्ती मनापासून इस्लामवर श्रध्दा ठेवून आहे परंतु त्याने त्यास जाहिररित्या कबूली दिली नाही तर त्याला मुस्लिम म्हणून स्वीकारले जाणार नाही. तो तर मुस्लिमेतरच राहील आणि त्याच्याशी तसाच व्यवहार केला जाईल.

मनुष्याने जर इस्लामच्या श्रध्देतील अचूकपणा आणि सत्यतेवर निष्ठा ठेवली तर अशी व्यक्ती इस्लामचा मजबूत पाया प्राप्त करून घेते आणि उत्साहाने इस्लामवर श्रध्दा ठेवून जाहिररित्या त्याला मान्य करते. अशा प्रकारे मनुष्य इस्लामच्या प्रथमस्तंभास परिपूर्ण करतो म्हणजेच इस्लामच्या प्रथमस्तंभाची उभारणी करतो.

प्रार्थना (नमाज)

प्रार्थनेचे इस्लाममध्ये महत्त्व

इस्लामचा दुसरा स्तंभ नमाज आहे. नमाज कर्तव्यपूर्तीतील पहिली महत्त्वाची पायरी आहे. दुसरे कोणतेही कर्तव्य याबरोबरीचे नाही. श्रध्दावंताचे (मुस्लिम) प्रत्येक कृत्य आज्ञाधारकता आहे. परंतु प्रार्थनेचे (नमाज) कृत्य सर्व कृत्यांपेक्षा श्रेष्ठतम आहे. नमाज प्रार्थना म्हणजे अल्लाहशी दृश्य स्वरुपात आणि परिणामस्वरूपात शरणागती आहे. नमाजकडे एक दृष्टीक्षेप या सत्यतेला स्पष्ट करते. नम्रता, लीनता, स्तुती आणि स्तुंतीगान हे सिध्द करते की दास्यतेचे आणि विनम्रतेचे दुसरे एखादे असे नमाजच्या स्वरूपातील उदाहरण मिळणे अशक्य आहे. नमाजमध्ये झुकून दोन्ही हाथ बांधून उभे राहणे, कृतज्ञतापूर्वक नतमस्तक होणे, नम्रतेने नतमस्तक (सजदा) होणे आणि सातत्याने स्तुतीगान आणि प्रेमपूर्वक अल्लाहची भीती बाळगून असणे ही सर्व नमाजची अंगभूत लक्षणे आहेत. दिव्य कुरआन आणि प्रेषितकथन (हदीस) हे नमाजच्या सद्‌गुणांनी आणि सर्वोत्कृष्ठतेने भरलेले आहेत. त्यातील काही स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहेत.

नमाज श्रध्देचे पहिले प्रकटीकरण आहे. नमाज प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या परंपरेनुसारच अदा करतात. श्रध्दाशीलता धारण केल्यानंतर सर्वप्रथम श्रध्दावंत नमाज अदा करतो. नमाज त्या सत्यतेचे द्योतक आहे की व्यक्ती श्रध्दाशील आहे, अल्लाहवरच त्याची निष्ठा आहे. अल्लाह एकमेव स्वामीश्रेष्ठ आहे आणि मी त्याचा नम्र दास आहे. हा विश्वास त्याच्या नमाजच्या कर्तव्यपूर्तीतून दिसून येतो. नमाजबद्दल अनेक हदीसींचा उल्लेख आलेला आहे.

याचप्रमाणे दिव्य कुरआनमध्ये अनेक ठिकाणी श्रध्दाशीलतेच्या उल्लेखानंतर त्वरित नमाजचा उल्लेख आलेला आहे. कुरआनोक्ती आहे,

''जे लोक श्रध्दा ठेवतील आणि पुण्यकर्म करतील आणि नमाज कायम करतील व जकात देतील, निःसंशय त्यांचा मोबदला त्यांच्या पालनकर्त्यापाशी आहे आणि त्यांच्यासाठी कोणत्याही भयाचा आणि दुःखाचा प्रसंग नाही.'' (२ : २७७)

तसेच दुसऱ्या ठिकाणी कुरआनोक्ती आहे,

''जे लोक ग्रंथाचे पालन करतात व ज्यांनी नमाज कायम केली आहे, निश्चितच अशा सदाचारी लोकांचा मोबदला आम्ही वाया जाऊ देणार नाही.'' (७ : १७०)

"परंतु त्याने ना खरे मानले आहे आणि ना नमाज अदा केली" (७५ : ३१)

हे त्या सत्यतेला स्पष्ट करीत आहे जर मनुष्याच्या हृदयात श्रध्देचे बीजारोपण झाले तर त्यातून पहिले अंकूर फुटेल ते नमाज असेल.

नमाज श्रध्देचे पहिले प्रकटीकरण फक्त नाही तर ते तर्कशुध्द परिणाम आहे. ज्याचे हृदय श्रध्देने काठोकाठ तुडुंब भरलेले असेल त्याचे मस्तक आज्ञाधारकतेत नमाजमध्ये नतमस्तक होणारच आहे. हे खरोखर तर ती आंतरिक स्थिती आहे ज्याचे प्रकटीकरण नमाजच्या रूपात होत असते. जसे प्रकाश आणि उष्णता सूर्यापासून आहे तसेच श्रध्देतून नमाज आहे आणि नमाज श्रध्देसाठी आहे. म्हणून नमाज श्रध्देची अत्यावश्यक बाब आहे हे काही फक्त अनुमान नाही. प्रेषित मुहम्मद (स.) यांचे अतिस्पष्ट कथन आहे,

"जो कोणी फर्ज नमाज (अनिवार्य प्रार्थना) साठी हलगर्जीपणा करतो, अशा व्यक्तीशी अल्लाहला काही देणेघेणे नाही." (अहमद)

"खरोखरच! नमाज मनुष्याला श्रध्दाहीनतेपासून आणि द्रोहापासून वेगळे करते." (मुस्लिम)

प्रेषित मुहम्मद (स) यांनी नमूद करून ठेवले आहे की ज्या वस्तीतून आज़ान ऐकू येत असे त्या वस्तीवर जिहाद (पवित्र युध्द) केला जात नसे. जेथून अज़ानचा स्वर ऐकू येत नसे त्या वस्तीवर चढाई केली जात असे. कारण ती वस्ती श्रध्दाहीन लोकांची आहे हे समजून येत असे. म्हणून नमाज श्रध्दाशीलतेचे प्रतीक आहे. श्रध्दावंत व्यक्ती या प्रतीकाशी नमाजशी निगडीत असते.

कुरआनोक्ती आहे की कयामतच्या दिवशी दूत नरकवासींना विचारतील,

"ते (दूत) गुन्हेगारांना विचारतील, "तुम्हाला कोणत्या गोष्टीने नरकात नेले?" ते म्हणतील, "आम्ही नमाज अदा करणाऱ्यांपैकी नव्हतो आणि गरिबांना जेऊ घालत नव्हतो." (७४ : ४२ - ४३)

नरकवासी लोक उत्तर देतील,

"आम्ही नमाज अदा करणाऱ्यांपैकी नव्हतो." (७४ : ४३)

याचाच अर्थ स्पष्ट होतो की जो कोणी नमाज अदा करतो तो श्रध्दावंत असतो आणि त्याची अल्लाहच्या एकेश्वरत्वावर निष्ठा असते. हे अगदी स्पष्ट आहे की व्यक्तीची जन्नत (स्वर्ग) अथवा जहन्नम (नरक) साठीची लायकी आणि पात्रता श्रध्दाशीलता आणि श्रध्दाहीनतेवर अवलंबून आहे.

जेव्हा मनुष्यांना जहन्नममध्ये (नरकात) डांबले जाईल तेव्हा ते सर्व गुपितांना जाणून घेतील जे अदृश्य सत्य होते. ते मान्य करतील की ही यातना परिणाम आहे त्यांच्या नमाज अदा करण्याच्या हलगर्जीपणाचा! ईमान (श्रध्दा) आणि नमाज कयामतच्या दिवशी एक दुसऱ्यास पूरक आणि वैशिष्ट्यपूर्ण असे असतील. ''जहन्नमी (नरकवासी) त्या वेळी असे म्हणण्याऐवजी की ''आम्ही त्यांच्यापैकी नव्हतो ज्यांनी श्रध्दा ठेवली.'' (''आम्ही श्रध्दावंतांपैकी नव्हतो.'') असा पश्चात्ताप करून करून म्हणतील की ''आम्ही नमाज अदा करणाऱ्यापैकी नव्हतो.''

या संकेतवचनांच्या आधारे काही धार्मिक विद्वानांचे मत आहे की जो कोणी हेतुपुरस्सर नमाजची हेळसांड करेल आणि नियमित हे कृत्य करीत राहील तर तो शिरच्छेद करण्याच्या लायक बनतो. ही शिक्षा धर्मद्रोही (विद्रोही) ला दिलेल्या शिक्षेसारखीच आहे.

आणखी एक अतिमहत्वाचे नमाजचे वैशिष्ट्य कुरआन स्पष्ट करीत आहे त्याची पुष्टी हदीसीमध्ये (प्रेषितकथन) सुध्दा आहे, ती म्हणजे नमाजला धार्मिक कृती म्हणून संबोधले गेले आहे. नमाज श्रध्दाशीलतेची (ईमान) रक्षक आहे. नमाज जर कायम केली गेली तर इतर ईश आदेशांचे पालन आपोआप होऊ लागते. याविरुध्द नमाजची हेळसांड झाली तर इतर ईश आदेशांचे उल्लंघन होणे साहजिक आहे. हृदयाचे महत्त्व शरीरात जसे आहे त्यासारखेच नमाजचे महत्त्व श्रध्दाशीलतेसाठी आहे. हृदय जर तंदुरूस्त असेल तर रक्त शरीराच्या सर्व भागांत पसरते आणि पूर्ण शरीर हे कार्यक्षम व तंदुरूस्त बनते. जर हृदयाची स्पदने बंद झाली आणि हृदयक्रिया बंद पडली तर पूर्ण शरीर निर्जीव बनते, अकार्यक्षम बनते. अशा प्रकारची अनेक उदाहरणे कुरआन आणि हदीसीमध्ये स्पष्ट केली गेली आहेत. हदीसीमध्ये वर नमूद केल्याप्रमाणे इस्लामचा पाया हा पाच स्तंभांवर आधारित आहे आणि तसेच ईमानचा (श्रध्देचा) स्तंभ नमाज आहे, प्रार्थना आहे.

''श्रध्देचे मूळ हे एकेश्वरत्व आणि प्रेषित मुहम्मद (स) यांना मान्य करण्यात आहे आणि श्रध्देचे मूळ (स्तंभ) इस्लाम आहे.'' *(तिरमीजी)*

हा एक सज्जड पुरावा आहे या वास्तवतेचा की जकात, हज, रोजे हे श्रध्दाशीलतेचे (ईमानचे) स्तंभ आहेत आणि श्रध्देची इमारत त्यांच्याशिवाय उभीच राहू शकत नसली तरी नमाजचे महत्त्व वेगळेच आहे. नमाजच्या गुणांमुळे नमाज श्रध्देचा सर्वगुणसंपन्न स्तंभ आहे, म्हणूनच नमाजला पूर्ण श्रध्देचे वैशिष्ट्य गणले जाते. जर नमाजला सोडून दिले तर श्रध्दा आपले अस्तित्व गमावून बसते. आदरणीय खलीफा उमर (र) आपल्या अधिकाऱ्यांना लिहिलेल्या पत्रात म्हणतात,

''माझ्यासाठी तुमची सर्वात मोठी समस्या नमाज ही आहे. जो कोणी नमाज कायम करील आणि तिला पूर्ण न्याय देईल तर तो पूर्ण श्रध्देचे रक्षण करतो. आणि जो कोणी नमाजला सोडून देतो तर ती व्यक्ती फार काही गमावून बसते.'' *(मालिक)*

नमाजच्या वैशिष्ट्यांची कारणे

दिव्य कुरआन आणि हदीसीच्या पुराव्यानुसार नमाजचे महत्त्व लक्षात येते. स्वाभाविकपणे एखादी व्यक्ती विचारू शकते की हे असे कसे की पाच स्तंभांपैकी नमाज एक स्तंभ आहे तर मग नमाज एकटी पूर्ण श्रध्देसारखी कशी आहे? या प्रश्नाचे उत्तर हे आणखी दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर आहे. नमाज काय आहे आणि त्याचा उद्देश काय आहे? दिव्य कुरआन स्पष्ट करीत आहे की नमाज अल्लाहचे स्मरण आहे.

''मीच अल्लाह आहे माझ्या शिवाय कोणीच ईश्वर नाही. म्हणून तू माझीच भक्ती कर आणि माझ्या स्मरणाकरिता नमाज कायम कर.'' *(२० : १२ - १४)*

नमाज ईशदासाला ईश्वराच्या सान्निध्यात नेते.

''आणि नतमस्तक व्हा (नमाज अदा करा) व आपल्या पालनकर्त्याशी जवळीक साधा.'' *(९६ : १९)*

मनुष्य अल्लाहच्या अगदी जवळ असतो जेव्हा तो नतमस्तक होतो. (सजदा करतो) म्हणून मनुष्य नमाज अदा करीत असेल तर तो त्या वेळी अल्लाहशी संभाषण साधून असतो. नमाज अदा करताना मनुष्य सर्व गोष्टींपासून अलिप्त होऊन स्वत:ला अल्लाहच्या सान्निध्यात आणि अल्लाहसमोर उभा आहे असे समजून अल्लाहशी वार्तालाप करतो.

अल्लाहचे स्मरण करणे, अल्लाहशी जवळीक साधणे आणि अल्लाहशी संभाषण करणे म्हणजेच नमाज अदा करणे होय. याव्यतिरिक्त दुसरे आणखी काय माध्यम असू शकते अल्लाहची शरणागती आणि पूर्ण श्रध्देला प्राप्त करण्यासाठी? नाही! निश्चित नाही!! अल्लाहची भक्ती करण्यासाठीचे प्रत्येक कृत्य श्रध्देचेच फळ आहे. अल्लाहच्या स्मरणाने (नमाज) श्रध्देचे मूळ सशक्त बनते त्यास जोपासले जाते. श्रध्दावंतांना उपदेश केला जातो की त्यांनी खालील महावाक्य सतत उच्चारून श्रध्देला सशक्त बनावे.

''ला ईलाह ईल्ललाह''

दुसरा कोणी ईश्वर नाही परंतु अल्लाह!

अल्लाहशिवाय दुसरा कोणी ईश्वर नाही.

''लोकहो, तुमची श्रध्दा बळकट करा'' दुसरा कोणी ईश्वर नाही परंतु अल्लाह'' हें महावाक्य पुन्हापुन्हा उच्चारून !'' *(बुखारी)*

जर झाडाच्या मुळांनी त्यांची जीवनशक्ती आणि अन्नपाणी घेण्याचे बंद केले तर झाडाची वाढ खुंटेल आणि झाड वाळून जाईल. तसेच मनुष्याचे हृदय हे जर अल्लाहच्या स्मरणाने खाली असेल तर श्रध्दा जीवंत ठेवणे त्याच्यासाठी अशक्य आहे. ज्या मनुष्याची श्रध्दा डळमळीत आहे, त्याचे प्रत्येक कृत्य हे सत्यतेविरुध्द आणि अल्लाहच्या भयाने रिक्त असे असेल. धर्मनिष्ठ कृत्य (सत्कार्य) त्याच व्यक्तीच्या हाताने पार पडेल ज्याचे हृदय श्रध्देने आणि सामर्थ्याने पुरेपूर भरलेले असेल, ज्यांचा उगम अल्लाहच्या स्मरणात आहे. नमाज अल्लाहचे फक्त स्मरण नाही तर नमाज खरोखरच अल्लाहच्या स्मरणाचे अत्युत्तम, परिपूर्ण आणि कार्यक्षम असे बेजोड माध्यम आहे. म्हणून धर्मनिष्ठा आणि अल्लाहची भक्ती नमाज अदा करण्यात आहे. हे सत्य आपण एक उदाहरण घेऊन स्पष्ट करू या, एखादा भाट (खुशामत्या) जो आपल्या राजासमोर येत नाही आणि त्याच्याविषयी आदर सन्मानसुध्दा दाखवत नाही तर त्याला विश्वासु आणि आज्ञाधारक समजले जात नाही. विश्वासु आणि आज्ञाधारकता त्याच व्यक्तीपासून अपेक्षित आहे जो राजदरबारात राजासमोर हजेरी लावण्यात हलगर्जीपणा करत नाही आणि राजाला आदर सन्मान दाखविण्यात कसूर करत नाही. हे स्वाभाविक आहे की जी व्यक्ती तुमच्याजवळ येत नाही ती तुमच्या इच्छेला आणि प्रसन्नतेला जाणून घेण्यास तयार होऊ शकतच नाही. तुमच्यासाठी अशी व्यक्ती काहीएक त्याग करू शकणार नाही. नमाज हे अल्लाहच्या दरबारात हजेरी लावणे आहे. आणि अल्लाहच्या प्रति निष्ठेचे आणि आदराचे प्रकटीकरण आहे. कोणी अंतकरणाने ही हजेरी देण्यास आणि निष्ठा दाखविण्यास तयार नसेल तर अशी व्यक्ती अल्लाहचे आदेश जीवनव्यवहाराच्या या विस्तृत क्षेत्रात पाळू शकणारच नाही हे अगदी स्पष्ट आहे.

नमाजची पूरक वैशिष्ट्ये

नमाजचे महत्त्व आणि वैशिष्ट्ये आपण पाहिलीत, परंतु नमाजचे आणखी काही उपजत अशी वैशिष्ट्ये आहेत. परंतु ही सर्व पूरक अशी वैशिष्ट्ये आहेत तरी ती अत्यंत महत्त्वाची आणि मौलिक आहेत. त्यांचे ज्ञान असणे महत्त्वाचे कारण त्यावरून इस्लामचे दर्शन आणि जीवनप्रणाली कळून येते. हे पूरक आकर्षक गुण आहेत. ते खालीलप्रमाणे आहेत.

(१) इस्लाम आपल्या अनुयायींना त्यांचे जीवनकार्य त्यांच्या मनावर बिंबवतो.

यासाठी ते स्वाभाविकपणे एक शिस्तबध्द सामुदायिक जीवनाचे नेतृत्व करतात. त्यांचा एक नेता असतो जो अल्लाहच्या आदेशांनुसार स्वत: जीवन कंठत असतो आणि समाजापुढे आदर्श ठेवतो. तो ईशआदेशांना प्रस्थापित करतो. त्याच्या नेतृत्वाखाली लोक एक शिस्तबध्द आणि प्रशिक्षित लष्करासारखे वागतात. तो जेव्हा त्यांना हालचाल करण्याची मुभा देतो तेव्हा ते हालचाल करू शकतात आणि जेव्हा तो त्यांना थांबवतो तेव्हा ते थांबतात. अशी ही उच्च प्रतीची शिस्त नमाजमध्ये अंतर्भूत आहे आणि नमाज इस्लामच्या अनुयायींच्या मनावर शिस्तबध्दता ठसवत असते. जेव्हा त्यांना नमाजसाठी बोलविले जाते तेव्हा ते आपले घरदार, कारखानदारी, दुकानदारी सोडून मशिदीची वाट चालू लागतात. मशिदीत ते सरळ रेषेत व रांगेत उभे राहतात आणि नमाजचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीचे (इमाम) आदेश पूर्णत: पाळतात. एखादा व्यक्ती या सामुदायिक प्रार्थनेत आपल्या नेत्याविरूध्द शारीरिक आणि मानसिक दुर्लक्ष करूच शकत नाही. हे सर्व काही दैवी आदेशांच्या आज्ञाधारकतेनुसार धार्मिक आज्ञा आणि परलोकाची जाण ठेवून पार पाडले जाते. नमाजव्यतिरिक्त या जगात दुसरी कोणती प्रार्थना आहे जी मानसिक आणि शारीरिक प्रशिक्षण शिस्तबध्दतेने देत आहे?

(२) इस्लामला आपल्या अनुयायींमध्ये प्रेमाचे आणि बंधुत्वाचे अतूट नाते स्थापित करणे अपेक्षित आहे. इस्लाम त्याच मुस्लिम व्यक्तीला खरा मुस्लिम सिध्द करतो जो आपल्या भावासाठी तेच पसंद करतो जे स्वत:ला पसंद आहे. नमाज माणसामध्ये प्रेम आणि बंधुत्व निर्माण करते. जेव्हा वस्तीतील लोक प्रार्थनेसाठी अल्लाहसमोर एकत्र येतात तेव्हा ते शारीरिक आणि अध्यात्मिक बंधुभाव प्रस्थापित करतात. त्यांचे एकमेकाचे खांदे आणि अंगठे फक्त एकमेकांना भिडलेले असत नाहीत तर त्यांची मनेसुध्दा एकीने बांधली जातात. ते फक्त आपल्या स्वत:साठीच प्रार्थना करीत नाहीत तर सर्वांसाठी मार्गदर्शन मदतीची आणि क्षमेची याचना करतात. काय यापेक्षा चांगले दुसरे एखादे मार्ग मानवतेवर प्रेम करण्याचे याव्यतिरिक्त आहे? मनुष्य आपल्या बांधवांचा प्रार्थनेत आणि नमाजमध्ये कधीच विसर पडू देत नाही. तो अल्लाहसमोर सातत्याने याचना करतो की,

''आम्हा सर्वांना सरळ मार्ग दाखव.'' *(१ : ५)*

''अल्लाहच्या सर्व सदाचरणी दासांवर शांतीचा वर्षाव सतत होवो.''

''हे आमच्या पालनकर्त्या ! आम्हाला इहलोकीही चांगले फळ दे आणि परलोकामध्येही चांगले फळ दे आणि नरकाग्नीच्या यातनांपासून आम्हा सर्वांना वाचव.''

(२ : २०१)

अति उच्च समजली जाणारी विश्वबंधुत्वाची कल्पना इस्लामच्या या

विश्वबंधुत्वाच्या कल्पनेपुढे फिकी आहे. जो दर्जा इस्लामने आपल्या अनुयायींसाठी निश्चित केला आहे तो बेजोड आहे.

(३) इस्लाम समस्त मानवांना एक स्वामीचे दास समजतो. इस्लाम समस्त मानवजातीला एका आईवडीलाची लेकरे मानतो. मामव सर्व एकमेकांचे भाऊ भाऊ आहेत.

''हे अल्लाहच्या दासानों तुम्ही सर्व बंधु व्हा.'' *(कुरवादी)*

इस्लाम आज्ञा देतो की कोणीही दुसऱ्याला आपल्यापेक्षा कमी लेखू नये. कुणीही रंगाने, वंशाने, कुळाने, श्रीमंतीने अथवा राष्ट्राने एकमेकात उचनीच नाहीत. ईशपरायणता आणि धर्मनिष्ठा हेच फक्त श्रेष्ठतेचे लक्षण आहे. आदरणीय प्रेषित मुहम्मद (स) यांचे कथन आहे,

''मनुष्याचे श्रेष्ठत्व त्याच्या धर्मनिष्ठेवर आणि ईशपरायणता या सदगुणांवर अवलंबून आहेत.''

नमाज समाजातील, माणसामाणसातील भेदाभेद दूर करून एकसंघ समाजनिर्मितीचा पाया घालते. राजा आणि रंक एकसाथ उभे राहून एकसाथ आपल्या स्वामीपुढे नतमस्तक होतात. हे नमाजच्या प्रक्रियेतील एकतेचे प्रकटीकरण आहे. आध्यत्मिक स्तरावरसुध्दा नमाज सर्वांना एकसमान बनविते. अल्लाहचे महात्म्य आणि मनुष्यांचे पूर्ण नम्रता धारण करणे हे सर्व मनुष्यांच्या मनांमध्ये एकीची भावना जागृत करते. प्रत्येकजण जाणून घेतो की अल्लाह आणि फक्त अल्लाह प्रभुत्वशाली आहे. सर्व माणसे त्याची निर्मिती व दास आहेत. नमाजमुळे प्रत्येकाला त्याच्या तुच्छतेची जाणीव सतत होत राहते. म्हणून असा मनुष्य रंगभेद, जातीभेद, वंशभेद, राष्ट्रभेद, उच्चनीचता या कुकर्मांना कधीच थारा देत नाही. स्वतःलासुध्दा इतरांपेक्षा काही वेगळा अथवा श्रेष्ठ समजत नाही. अशा प्रकारे नमाज या सत्यवचनाला सिध्द करून दाखविते की ईशपरायणता आणि धर्मनिष्ठा हेच फक्त श्रेष्ठतेचे लक्षण आहे. मनुष्याचे श्रेष्ठत्व त्याच्या धर्मनिष्ठेवर आणि ईशपरायण या सदगुणांवर अवलंबून आहे.

मान्यताप्राप्त नमाज

वर आपण नमाजची उद्दिष्ट्ये पाहिली आणि तिचे फायदेसुध्दा आपण जाणून घेतले आहे. आता आपण इस्लामला अभिप्रेत खरी नमाज कोणती आहे ते पाहू या. प्रत्येकजण जो माणसासारखा दिसतो तो खऱ्या अर्थाने मनुष्य नसतो. त्यांच प्रमाणे नमाज सारखी दिसणारी प्रार्थना ही खरी नमाज आहे असे नाही. नमाज जी अल्लाहने दिलेली

आहे आणि जे स्तंभ नव्हे तर अत्यंत महत्त्वाचे इस्लामचे स्तंभ आहे, तिला पूर्णपणे तिच्या स्वरूपात औचित्यपूर्ण अदा करणे आवश्यक आहे. नमाजला व्यवस्थित अदा करण्यासाठी कुरआनने एक विशिष्ट शब्द वापरला आहे. 'इकामत' याचा अर्थ होतो सरळ उभे राहणे. हा शब्दप्रयोग (इकामत) कुरआन आणि हदीसीमध्ये अनेक वेळा आलेला आहे. नमाज त्याच्या बाह्य शिष्टाचारानुसार आणि अंतरंगातील गुणांनुसार अदा करणे आवश्यक आहे. याबद्दलचा तपशील दिव्य कुरआन, हदीसी आणि धर्मग्रंथातून सहज प्राप्त होतो. म्हणून मान्यताप्राप्त नमाज ती आहे, ज्यास तिच्या वेळेत सामुदायिकरित्या अदा केली जाते. ही नमाज तिच्या आकर्षकपणामुळे, शिस्तबध्दतेमुळे आणि एकाग्रतेमुळे ओळखली जाते. अशा नमाजमध्ये पाठांतर हळूहळू केले जाते आणि प्रत्येक भाग म्हणजे उभे राहणे, वाकणे, नतमस्तक होणे इ. अधिक अधिक वेळ घेतात. ही नमाज ती प्रार्थना आहे ज्यात अल्लाहचे स्मरण भरभरून असते आणि अल्लाहबद्दलचा आदर नितांत भरलेला असतो. ही ती प्रार्थना नमाज असते ज्यात व्यक्ती अल्लाहची नितांत कदर आणि परम आदरशीलतेचा मूर्त स्वरूप बनते. अशी व्यक्ती अल्लाहच्या भीतीने आणि स्वत:च्या तुच्छ दर्जाच्या विचारांनी भरलेली असते. अशा प्रकारची नमाज हीच खरी नमाज म्हणून ओळखली जाते. या गुणांमध्ये जी नमाज जास्तीतजास्त उच्च दर्जाची असेल तशी ती नमाज त्याप्रमाणे मान्यताप्राप्त म्हणून ओळखली जाते. या गुणांपैकी एखाद्या नमाजमध्ये ज्यांचा काहीच लवलेश नसेल तर ती नमाज बाह्यरूपी असते. तिचे आध्यात्मिक दृष्टीने काहीच महत्त्व नसते. अशी नमाज फायदेशीर नसून इस्लामचे तथा श्रध्देचे स्तंभसुध्दा तिला संबोधणे चुकीचे आहे. ती नमाज म्हणजे वाळूची भिंत आहे.

वर नमूद केलेले नमाजचे आकर्षक गुण आणखी वैशिष्टपूर्ण आहे. त्या गुणांचा उपयोग आपल्या नमाजचे मूल्यमापन करण्यासाठी होतो. आपण यावरून आपली स्वत:ची नमाज कोणत्या स्वरूपाची आहे हे ठरवू शकतो. आपण जेव्हा जेव्हा आपल्या नमाजचे आत्मपरीक्षण करतो तर आपण या निष्कर्षापर्यंत सहज पोहोचू शकतो की आपली नमाज त्या दर्जाची आहे का जिला इस्लामचे आणि इस्लामी श्रध्देचे स्तंभ संबोधले गेले आहे? जर तुमचे मन ग्वाही देत असेल हो म्हणण्यासाठी, तर मग पुढे काय?

जक़ात (गरीबांसाठीचा निधी)

जक़ातचे महत्त्व

इस्लामचे तिसरे स्तंभ जक़ात आहे. इस्लाममध्ये प्रार्थनेपेक्षा म्हणजेच नमाजपेक्षा इतर कोणतेही कृत्य जास्त महत्त्वाचे नाही याबद्दल सविस्तर उल्लेख मागील प्रकरणात झाला आहे. म्हणून जक़ात आणि नमाजचे महत्त्व एकसारखेच आहे असे म्हणणे तर्कशुध्द होणार नाही. परंतु आपण कुरआनची याविषयीची संकेतवचने आणि हदीसचा विचार करता चटकन लक्षात येते की नमाजनंतर जक़ातचे स्थान आहे. दिव्य कुरआन श्रध्देचा उल्लेख करताना अनेकदा दोन धर्माचरणांचा उल्लेख लगेच सोबत देतो. ते म्हणजे नमाज आणि जक़ात. निष्ठावंत मुस्लिमांची प्रतिमा दिव्य कुरआन खालीलप्रमाणे स्पष्ट करीत आहे,

''जे लोक श्रध्दा ठेवतील आणि पुण्यकर्म करतील आणि नमाज कायम करतील व जक़ात देतील, निःसंशय त्यांचा मोबदला त्यांच्या पालनकर्त्यापाशी आहे आणि त्यांच्यासाठी कोणत्याही भयाचा आणि दुःखाचा प्रसंग नाही.'' *(२ : २७७)*

वरील संकेतवचन विशेष महत्त्वाचे आहे कारण सच्चा मुस्लिम होण्यासाठी अनेक धर्माचरण आत्मसात करणेसुध्दा आवश्यक आहेत. सच्चा मुस्लिमचे वैशिष्ट्ये सांगताना कुरआन सर्वप्रथम श्रध्देचा उल्लेख करतो. श्रध्देनंतर कुरआन इस्लामच्या इतर आधारस्तंभांचा उल्लेख न करता लगेचच नमाज आणि जक़ातचा उल्लेख का करीत आहे? इतर चांगल्या गोष्टींचा उल्लेख त्याऐवजी का करीत नाही? असे करण्याला साहजिकच काही महत्त्व आहे. आपण विचारपूर्वक लक्ष दिल्यास हेतु लक्षात येईल. अल्लाह नमाज आणि जक़ात (गरीबांसाठी द्यावयाचा निधी) या दोघांना श्रध्देच्या व्यावहारिकतेच्या पायाचे दोन दगड समजून अतिमहत्त्व देतो. मनुष्याने ही दोन्ही कृत्ये व्यवस्थित पार पाडली तर धर्म पूर्णपणे पाळण्यासाठीचा व्यावहारिक पुरावाच असा मनुष्य देत असतो. अशा माणसाकडून इतर धर्माचरण श्रध्देच्या मूलतत्त्वानुसार पाळणे सहज शक्य होते. तो येथे हलगर्जीपणा दाखवूच शकत नाही. असे का बरे घडावे? या प्रश्नाचे उत्तर श्रध्देच्या अर्थामध्ये आणि श्रध्देच्या वैशिष्ट्यांमध्ये लपलेले आहे जे नमाज आणि जक़ातसाठी सारखेच आहेत. आपण जर श्रध्देच्या मूलतत्त्वाचे तर्कशुध्द विभाजन केले तर ते दोन विभागांत होईल.

(१) ईशआदेश जे अल्लाहचे मनुष्यावरील हक्कासंबंधी आहेत.

(२) ईशआदेश जे मानवतेचे मनुष्यावरील हक्कासंबंधी आहेत.

श्रध्देचे व्यावहारिक रूप म्हणजे मनुष्याने अल्लाहचे हक्क जाणून घेऊन तसेच मानवतेचे हक्क जाणून घेऊन त्यानुसार जीवन कंठत राहाणे होय. आपण हे पाहिलेच आहे की नमाज अल्लाहच्या हक्कासंबंधी अनिवार्य असे मूलतत्त्व आहे तर जक़ात मानवतेच्या हक्कासाठीची अनिवार्यता आहे. जेव्हा मनुष्य मशिदीत नमाज अदा करतो, तेव्हा तो अल्लाहच्या हक्कासंबंधी जागृत असतो आणि मशिदीबाहेरसुध्दा अल्लाहच्या हक्कासंबंधी सचेत राहतो. अशा परिस्थितीत तो मनुष्य अल्लाहचे हक्क सातत्याने अदा करीत जातो. तसेच मनुष्य जक़ात आपल्या समाजबांधवांसाठी, शेजाऱ्यांसाठी स्वखुशीने खर्च करतो. असे करताना उपकार न करता फक्त ईशप्रसन्नतेसाठीच इतरांवर खर्च करतो. असाच मनुष्य मानवतेच्या कल्याणासाठी सतत झटत असतो.

या विषयाची आणखी एक बाजू आहे. कुरआन वारंवार जोर देऊन सांगत आहे की श्रध्दा तेव्हाच जिवंत शक्ती म्हणून अस्तित्व धारण करते जेव्हा अल्लाहवरील प्रेम हे इतर सर्वांपेक्षा प्रभुत्वशाली असते. आणि ऐहिक जीवनात मनुष्य आपल्या पारलौकिक जीवनास प्राधान्य देतो. हे ध्येय साध्य करण्यासाठी नमाज आणि जक़ात अत्यंत प्रभावी साधन आहे. नमाज मनुष्याला अल्लाहचे सान्निध्य प्राप्त करून देते तर जक़ात मनुष्याला त्याच्या देशबांधवांच्या कल्याणासाठी प्रयत्नशील ठेवते. जर अल्लाहची प्रसन्नताप्राप्ती आणि पारलौकिक जीवनसाफल्य हे एखादा कठीण चढ चढून जाण्यासारखे आहेत, तर त्या रेल्वेचे दोन इंजीन म्हणजे नमाज आणि जक़ात आहेत. चढ चढताना एक इंजीन (नमाज) ट्रेनला पुढे ओढते तर दुसरे इंजीन (जक़ात) हे त्या ट्रेनला मागून ढकलत राहते. अशा प्रकारे जीवनाची ही ट्रेन आपल्या ध्येयापर्यंत पोहचते. म्हणून या दोन्ही मूलतत्त्वांना इस्लामचा खरा आधार म्हणतात. कारण इस्लामी व्यावहारिकतेत त्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

मक्केतील श्रध्दाहीनांविरुध्द जिहाद पुकारण्यासाठी अंतिम आदेश देताना कुरआन स्पष्टोक्ती आहे की आपल्या तलवारी म्यानात ठेवू नका जोपर्यंत तुम्ही शत्रुंचा नाश करीत नाही अथवा ते इस्लाम कबूल करीत नाहीत. दोन दशके त्यांना इस्लामची शिकवण देण्यात आली होती आणि त्यांना श्रध्दावंत बनण्यासाठी सर्व काही प्रयत्न झाले होते. याप्रसंगी कुरआन काही अटी त्यांच्यासाठी स्पष्ट करीत आहे, ज्यानुसार त्यांनी श्रध्दावंत बनून राहावे आणि त्यांच्याविरुध्द जिहाद समाप्त केला जावा. कुरआनोक्ती आहे,

''मग जेव्हा निषिध्द महिने लोटतील तेव्हा त्या अनेकेश्वरवादींना ठार करा, जेथे सापडतील तेथे त्यांची नाकेबंदी करा व प्रत्येक पातळीवर त्यांचा समाचार घेण्यासाठी सज्ज राहा. मग जर त्यांनी पश्चात्ताप केला व नमाज कायम केली आणि जक़ात दिली तर

त्यांना सोडून द्या. अल्लाह क्षमाशील आणि दया दाखविणारा आहे. आणि जर अनेकेश्वरवादींपैकी कोणी इसम शरण मागून तुमच्याकडे येऊ इच्छित असेल जेणेकरून अल्लाहची वाणी ऐकावी तर त्याला आश्रय द्या येथपावेतो की त्याने अल्लाहची वाणी ऐकावी. मग त्याला त्याच्या सुरक्षित ठिकाणी पोहचवा. हे अशासाठी करावयास पाहिजे की हे असे लोक आहेत ज्यांना ज्ञान नाही.'' *(९ : ५-६)*

पुढे याच अध्यायात कुरआन स्पष्टोक्ती पुन्हा आहे,

''पण जर त्यांनी पश्चाताप केला व नमाज कायम केली व जक़ात दिली तर हे तुमचे धर्मबंधु आहेत आणि जाणणाऱ्यां लोकांसाठी आम्ही आमचे आदेश स्पष्ट करीत आहोत.'' *(९ : ११)*

यावरून हे अगदी स्पष्ट होते की श्रध्देचा (ईमान) स्वीकार जरी झाला असेल तरी इस्लामचा स्वीकार मात्र नमाज कायम करणे आणि जक़ात देणे या दोन्ही कृत्यांना आत्मसात करण्यावर अवलंबून आहे. मनुष्य जर या दोन्ही कर्तव्यांना पार पाडत नसेल तर त्याची श्रध्दा अस्वीकार्य आहे, निरर्थक आहे. जक़ात देणे हे कृत्य श्रध्देची पूर्वअट आणि अंगभूत गुण आहे. प्रेषित मुहम्मद (स.) यांनी हा मुद्दा स्पष्ट करताना सांगितले आहे,

''मला आदेश देण्यात आला आहे त्या लोकांविरुध्द लढाई करण्याचा जो पर्यंत ते हे मान्य करतील की ईश्वर कोणी दुसरा नाही. परंतु अल्लाह आणि ते नमाज कायम करतील व जक़ात देतील. त्यांनी असे केले तर त्यांचे जीव आणि वित्तरक्षणाची जबाबदारी माझी आहे. त्यांची सर्व कार्ये अल्लाहसाठी आहेत.'' *(मुस्लिम)*

नवमुस्लिमांसाठी कुरआन जक़ात देण्याची अट घालत नाही तर हे सर्वांसाठी आहे, यासाठी अपवाद नाही. एखादा मुस्लिम जक़ात देण्याचे बंद करतो तर त्याच्याविरुध्द इस्लामी शासन त्याला शिक्षा करते. अबु बकर (र.) यांच्या शासनकाळात काही टोळ्यांनी जक़ात देण्यास नकार दिला होता तेव्हा त्यांनी त्यांच्याविरुध्द युध्द घोषित केले. जेव्हा उमर (र.) यांनी हा आदेश अंमलात आणण्यासाठी दिरंगाई दाखविली तेव्हा अबु बकर (र.) यांनी घोषित केले,

''मी, अल्लाह शपथ त्याच्या विरोधात लढेन ज्यांनी नमाज आणि जक़ात या दोहोत फरक केला.'' (कारण दोन्ही कृत्ये कुरआनने एकत्रित करून सांगितली आहेत) *(मुस्लिम)*

हा वादाचा मुद्दा आदरणीय उमर (र.) यांनीच स्वीकारला नाही तर सर्व

सहाबांनी (र.) यांनीसुध्दा स्वीकारला. यावरून आपण या निष्कर्षाप्रत येतो की मुस्लिमांचे जीवित आणि वित्तिय संरक्षण हे त्याच्या नमाज़ अदा करणे आणि जक़ात देण्यावर अवलंबून आहे. नमाज अदा करणारा आणि जक़ात देणारा आदरणीय ठरतो. नमाज अदा तर केली जाते परंतु त्याच्याकडून जक़ात मात्र दिली जात नाही तर अशा मुस्लिमासाठीसुध्दा सारखीच शिक्षा आहे जी नमाज सोडणाऱ्यासाठी आहे. त्याच्याविरुध्द युध्द पुकारले आहे. कुरआनोक्ती आहे,

''हे पैगम्बर (स.) यांना सांगा,'' मी तर एक मनुष्य आहे तुम्हासारखा मला दिव्यबोधाद्वारे सांगण्यात येते की तुमचा उपास्य तर केवळ एकच उपास्य आहे, म्हणून तुम्ही सरळ त्याच्याकडेच रोख ठेवा, आणि त्याच्याकडे क्षमायाचना करा. विनाश आहे त्या अनेकेश्वरवादींसाठी जे जक़ात देत नाहीत आणि परलोकांचा इन्कार करणारे आहेत. उरले ते लोक ज्यानी मान्य केले आणि सत्कृत्ये केली, त्यांच्यासाठी निश्चितपणे असा मोबदला आहे ज्याचा क्रम कधीही खंडित होणार नाही.'' (४१ : ६-८)

''शिक्षा तर मी ज्याला इच्छितो त्याला करतो. पण माझी कृपा प्रत्येक वस्तूवर आच्छादित आहे आणि ती मी त्या लोकांसाठी लिहीन जे अवज्ञापासून दूर राहतील, जक़ात देतील व माझ्या संकेतांवर श्रध्दा ठेवतील.'' (७ : १५६)

हे निदर्शनात येते की पहिल्या आयतमध्ये जक़ात न देणे म्हणजे श्रध्दाहीनतेचे कृत्य आणि परलोकाला अस्वीकार करण्यासारखे कृत्य आहे तर दुसऱ्या आयतनुसार जक़ात देणे हे श्रध्दाशीलतेचे प्रभावी लक्षण आहे आणि सदाचार आहे असे म्हटले आहे. या दोन्ही आयतींनुसार जक़ात देणे ही श्रध्दाशीलतेची अनिवार्यता आहे. जो श्रध्दावंत आहे तो जक़ात न चुकता देतो.

कुरआनची वरील संकेतवचन आणि हदीस कथनांनुसार जक़ातचे इस्लाममध्ये असलेले स्थान सिध्द होते. इस्लामची ही इमारत जक़ातला पूर्ण न्याय दिल्याशिवाय उभीच राहू शकत नाही. आणि म्हणूनच जक़ातला इस्लाममध्ये श्रध्देचे महत्त्वाचा आधारस्तंभ ठरविले आहे.

जक़ातचा हेतु

जक़ात देणे अनिवार्य का ठरविले आहे याबद्दल आता आपण चर्चा करू या. तसेच जक़ातमुळे कोणता हेतु साध्य होतो हेसुध्दा पाहू या. कुरआन अध्ययन आणि हदीसचा परामर्श घेतल्यानंतर कळून येते की जक़ातचे तीन हेतू आहेत. पहिला मौलिक आणि विशिष्ट प्रकारचा आहे तर दुसरे दोन दुय्यम आणि सामुदायिक महत्त्वाचे आहेत.

मनाचे पावित्र्य

जक़ातचा मौलिक हेतु मनाचे शुध्दीकरण करणे होय. यामुळे संपत्तीची लालसा जाऊन त्या जागी मनात ईशपरायणता निर्माण होते आणि मनुष्य सदाचारी बनतो. कुरआनोक्ती आहे,

"नि:संदेह मार्ग दाखविणे आमच्यावर आहे आणि खरें पाहता परलोक आणि इहलोक, दोन्हीचे स्वामी आम्हीच आहोत. तर मी तुम्हाला खबरदार केले आहे भडकत्या अग्नीपासून. त्यात होरपळणारे नाही परंतु तो अत्यंत दुर्दैवी ज्याने खोटे ठरविले आणि तोंड फिरविले, आणि त्यापासून दूर ठेवला जाईल तो अत्यंत पापभीरू, जो निर्मळ होण्यासाठी आपले धन देतो, त्याच्यावर कुणाचेही काही उपकार नाहीत. ज्याचा बदला त्याने द्यायला हवा, तो तर केवळ आपल्या उच्चतर पालनकर्त्याच्या प्रसन्नता प्राप्तीसाठी हे कार्य करतो. आणि जरूर तो (त्यावर) प्रसन्न होईल." (९२ : १२ - २१)

दुसऱ्या ठिकाणी कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"हे पैगम्बर (स), तुम्ही याच्या मालमत्तेतून दान घेऊन यांना शुध्द करा आणि (सदवर्तनाच्या मार्गात) यांना पुढे करा आणि यांच्यासाठी कृपेची दुआ करा कारण तुमची दुवा यांच्यासाठी समाधानकारक ठरेल, अल्लाह सर्वकाही ऐकतो व जाणतो." (९ : १०३-१०४)

वरील कुरआन संकेत वचनाने जक़ातचे महत्त्व अगदी स्पष्ट होते. जक़ात देण्याने मन निर्मळ होऊन आत्मशुध्दी होते. हे सर्वश्रुत आहे की या जगातील वस्तूवरील प्रेम (भौतिक प्रेम) हाच खरा शत्रु आहे नमाज आणि जक़ात यांचा! हे मनुष्याला अल्लाह आणि परलोकपासून दूर अतिदूर ठेवते. प्रेषित (स) एकदा म्हणाले होते,

"प्रत्येक पापी कृत्याच मूळ हे भौतिक प्रेमात आहे." (मिश्कात)

हे ऐहिक प्रेमात अनेकानेक गोष्टी येतात परंतु सर्वांत शक्तिशाली आणि धोकादायक साधनसंपत्तीबद्दलचे प्रेम आहे. म्हणून प्रेषित (स) यांनी साधनसंपत्तीच्या प्रेमाला मुस्लिमांचा सर्वांत धोकादायक शत्रू ठरविले आहे.

"माझ्या अनुयायींची कसोटी साधन संपत्ती आहे." (तिरमिजी)

मुस्लिम हा धनलालसेपासून अलिप्त राहिला तर तो इतर अनेक पापकृत्यांपासून दूर राहू शकतो. या शत्रूपासून सुटका म्हणजे इतर अनेकानेकांपासून सुटका, मुक्तता मिळणे होय. ऐहिक प्रेमापासून मनाला निर्मळ ठेवणे म्हणजे दुसरे तिसरे काही नाही तर मनशुध्दी - मन:शांती होय! जक़ात देण्यामुळे ऐहिक साधनसामुग्रीच्या प्रेमापासून मन

स्वतंत्र होते, तर याचाच अर्थ हा आहे की त्यामुळे आत्मशुध्दी होते. ऐहिक सुख व ऐहिक लालसेपासून स्वतंत्र मनुष्य अल्लाहची प्रसन्नता आणि परलोक सफलता (मुक्ती) प्राप्त करून घेतो. तो सदाचारी बनतो. म्हणूनच जक़ातचा परिणाम फक्त मनशुध्दीपर्यंतच सीमित नाही. त्याने अनेक सकारात्मक फायदे होतात. जक़ातमुळे सदाचार करण्याची एक प्रेरणा सतत मनात जागृत राहते.

इस्लाममध्ये गरीबांचा हक्क अदा करण्यासाठी जक़ात हा शब्द त्याच्या हेतु आणि उद्देशामुळेच वापरला जातो. जक़ातचा शब्दश: अर्थ होतो ''शुध्दीकरण आणि वाढ''. एखाद्याने दुसऱ्या गरजू, गरीब मनुष्याला आपल्या संपत्तीतून काही विशिष्ट भाग अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी देणे जक़ात आहे, कारण ते आत्मशुध्दी करते आणि धनसंचय शुध्द करते आणि त्यात वाढ करते.

हेसुध्दा येथे ध्यानात ठेवले पाहिजे की जक़ातचा उद्देश फक्त उत्पन्नाचा काही भाग गरीबास देऊन प्राप्त होत नाही तर तो उद्देश प्राप्त करण्यासाठी जक़ात शुध्द मनाने आणि व्यावहारिक कष्टाने प्रेरित असणे आवश्यक आहे. अल्लाहची प्रसन्नता ही प्रथम आणि सर्वांत महत्त्वाची अट आहे. इतर सर्व उद्देशांपासून हे कृत्य अलिप्त राहाणे अत्यावश्यक आहे. कुरआनोक्ती आहे,

''हे नबी (स), लोकांना सरळ मार्गावर आणण्याची जबाबदारी तुमच्यावर नाही. अल्लाह ज्याला इच्छितो त्यालाच मार्गदर्शन प्रदान करतो आणि कल्याणकारी मार्गात जी संपत्ती तुम्ही खर्च करता ती तुमच्या स्वत:च्या हिताकरिता होय, शेवटी तुम्ही याचकरिता खर्च करताना की अल्लाहची मर्जी संपादन करावी. म्हणून जी काही संपत्ती तुम्ही कल्याणकारी मार्गात खर्च कराल त्याचा पुरेपूर मोबदला तुम्हाला दिला जाईल आणि तुमचा हक्क कदापि हिरावला जाणार नाही.'' (२:२७२)

''शेवटी तुम्ही याचकरिता खर्च करताना, की अल्लाहची मर्जी संपादन करावी.'' या वाक्यामुळे जक़ात देण्याची तत्त्वे मांडली गेली आहेत.

कुरआन वारंवार हे स्पष्ट करीत आहे की सच्चा मुस्लिम तोच आहे जो जक़ात देतो दानधर्म करतो ते फक्त अल्लाहच्या प्रसन्नतेसाठीच! म्हणून जक़ात देण्यास *''अल्लाहच्या मार्गात खर्च करणे''* असेही संबोधले आहे.

दुसरी अट जक़ात ही वैध (हलाल) मार्गाने कमविलेल्या संपत्तीतूनच अदा केली जाते कुरआनोक्ती आहे,

''हे श्रध्दावंतांनो! जी संपत्ती तुम्ही कमविली आहे आणि जे काही आम्ही

जमिनीतून तुमच्याकरिता उत्पन्न केले आहे, त्यापैकी उत्कृष्ट भाग अल्लाहच्या मार्गात खर्च करा.'' *(२ : २६७)*

प्रेषित (स) यांनी वरील कुरआनोक्तीला स्पष्ट करताना खुलासा दिला आहे,

''लोकहो! अल्लाह सर्वोत्तम गुणांनी संपन्न आहे आणि तो उत्कृष्ठतेचाच स्वीकार करतो अन्य काहीही नाही. तो शुध्द आहे आणि शुध्दतेचाच स्वीकार करतो.''

तिसरी महत्त्वाची अट आहे अल्लाहच्या मार्गात चांगलेच खर्च करा निकृष्ट खर्च करणे हा दांभिकपणा आहे.

''असे होता कामा नये की त्याच्या मार्गात देण्याकरिता निकृष्टतम प्रतीची वस्तू निवडण्याचा तुम्ही प्रयत्न करावा.'' *(२ : २६७)*

चौथी अट आहे की जक़ात ज्याला दिली जाते तो गरीब मनुष्य उपकृत होता कामा नये. त्याच्या स्वाभिमानाला ठेच पोहचू नये. अन्यथा जक़ात देणे व्यर्थ ठरते. कुरआनोक्ती आहे,

''हे श्रध्दावंतांनो, आपले दान, उपकार दाखवून आणि दु:ख देऊन त्या माणसासारखे मातीत मिसळू नका जो आपली संपत्ती केवळ लोकांना दाखविण्यासाठी खर्च करतो.'' *(२ : २६४)*

हदीसनुसार तीन माणसे सर्वप्रथम नरकात जाणार आहेत. त्यांच्यापैकी एक आहे तो मनुष्य जो दान फक्त आपले वर्चस्व समाजात वाढावे आणि लोकांनी आपणास दानशूर म्हणावे याच हेतुने दान करतो. दुसऱ्या हदीसमध्ये चांगलीच कानउघाडणी केली आहे,

''जो कोणी दान दुसऱ्यांनी प्रशंसा करावी म्हणून देत असेल तर असा मनुष्य अल्लाहशी शत्रुत्व स्वीकारतो.'' *(मिश्कात)*

जक़ात देतानाच्या काही अटी आहेत. या अटींचे काटेकोर पालन केल्यास हे कृत्य पुण्यमयी आणि शुध्दीकरणाचे स्त्रोत ठरते. जक़ात माणसात एक नैतिक अधिष्ठान निर्माण करते. याचमुळे सर्वसाधारण दानधर्म करणे आणि जक़ात देणे यात मौलिक अंतर आहे. जक़ात देण्याच्या अटींचा जर विचार केला तर असे कळते की स्वत:चे काटेकोर आत्मपरीक्षण करणे हे त्याचे अत्यंत महत्त्वाचे कारण आहे. ही एक अशी उपासना व भक्ती आहे की जिच्या आजुबाजूला असंख्य विरोधी तत्त्वे कार्यरत असतात. त्यावर कुठाराघात करण्यासाठी म्हणून कुरआनने सदाचरणी माणसाची मानसिकता स्पष्ट करताना म्हटले आहे,

"आणि अल्लाहच्या प्रेमात गरीब आणि अनाथ व कैद्यांना जेवू घालतील आणि त्यांना म्हणतील." आम्ही तुम्हाला केवळ अल्लाहसाठी जेवू घालीत आहोत, आम्ही तुमच्याकडून कोणताही मोबदला इच्छित नाही की आभार प्रदर्शन." (७६:८-९)

"जे लोक आपल्या पालनकर्त्याच्या धास्तीने भयभीत होणारे असतात, जे आपल्या पालनकर्त्याच्या संकेतांवर श्रध्दा ठेवतात, जे आपल्या पालनकर्त्यांबरोबर कोणाला भागीदार बनवीत नाही, आणि ज्यांची स्थिती अशी आहे की देतात जे काही देतात आणिं हृदयाचा त्यांचा या विचाराने थरकाप होत असतो की आम्हाला आमच्या पालनकर्त्यांकडे परतावयाचे आहे." (२३ : ५९-६०)

गर्वाबद्दल काय बोलावे? अत्यानंद, डामडौल इ. लाभकारींच्या आत्मसन्मानाला आघात करतात. जक़ात देताना श्रध्दावंत हे अल्लाहच्या भयाने भयभीत झालेले असतात ते यामुळे की मनात काही अविचार गुपचूप येऊन त्यांच्या या सत्कृत्याला वाया घालवू नये. त्याला भीती असते की पुनरुत्थानाच्या दिवशी अल्लाहसमोर त्याचे दान देणे, जक़ात देणे हे सर्व वाया जाऊ नये.

गरीबांची मदत

आता आपण दुय्यम दर्जाच्या हेतुचा विचार करू या जक़ात देताना गरीब मुस्लिमांना त्यांच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी मदत करणे हा हेतु कार्यरत असतो. प्रेषित (स) यांचे कथन आहे,

"अल्लाहने जक़ात त्यांच्यावर अनिवार्य केली आहे. श्रीमंत मुस्लिम कडून जक़ात घेऊन ती गरीब मुस्लिमांना देण्यात यावी." - मुस्लिम

कुरआन जक़ात देणे हे सदाचारी मुस्लिमाचे लक्षण ठरवतो आणि जक़ात देण्याचा तपशील खालीलप्रमाणे स्पष्ट करतो.

"सदाचार हा नव्हे की तुम्ही आपले तोंड पूर्वेकडे किंवा पश्चिमेकडे करावे तर सदाचार हा आहे की जे अल्लाहवर आणि अंतिम दिवसावर ईमान धारण करतात. तसेच सर्व दूतांवर, सर्व ग्रंथ आणि सर्व प्रेषितांवर ईमान धारण करतात. ईशप्रेमापोटी आपल्याला प्रिय असलेली संपत्ती आपले नातेवाईक आणि अनाथ, गरजवंत, वाटसरू व याचक तसेच गुलामांच्या मुक्ततेसाठी खर्च करतात आणि नमाज कायम करतात व जक़ात अदा करतात. तसेच दिलेल्या वचनांची पूर्तता करतात आणि अडचणी संकटे आणि युध्दप्रसंगीदेखील संयम राखतात. हेच लोक सत्यशील आणि अल्लाहच्या कोपचे भय बाळगणारे आहेत." (२ : १७७)

वरील संकेतवचनावरून हे सिध्द होते की जक़ात अदा करण्याचा आर्थिक आणि सामाजिक अंग आहे. त्याच्याशिवाय जक़ात देण्याला काहीच अर्थ उरत नाही. जक़ात देणारा तर आपली आत्मशुध्दी करून घेतो. परंतु गरीबाला ती रक्कम (जक़ात) दिल्यानंतरच त्या रकमेतून तो गरजू आपली गरज भागवितो. यानंतरच त्याचे (जक़ातचे) उद्देश साध्य होते. म्हणूनच कुरआन जक़ातचा उल्लेख श्रीमंत लोकांच्या धनसंपत्ती वर गरीबांचा हक्क असा उल्लेख करतो.

''परंतु ते लोक जे नमाज अदा करतात, जे आपल्या नमाजात नेहमी नियमित पणा ठेवतात, ज्यांच्या मालमत्तेत याचक व वंचित असलेल्यांचा एक ठराविक हक्क आहे. जे मोबदल्याच्या दिवसाला सत्याधिष्ठित मानतात, जे आपल्या पालनकर्त्याच्या कोपचे भय बाळगतात.'' *(७० : २३-२६)*

या हक्कासाठी इस्लामी शासनाला युध्द घोषित करण्याचा अधिकार आहे. आदरनीय अबू बकर (र) यांच्या उदाहरणाने वर हे स्पष्ट झालेले आहे. गरीबांना मदत करणे हा जक़ात देण्याचा दुय्यम हेतु जरी असला तरी त्याचे महत्त्व हे असाधारण असे आहे. त्याचे महत्त्व या ऐहिक जीवनात आणि पारलौकिक जीवनात उल्लेखनीय असे आहे. खालील हदीसनुसार त्याचे महत्त्व आपल्या लक्षात येईल.

(१) ''जो स्वत: पोट भरून खातो आणि त्याचा शेजारी मात्र उपाशी पोटी राहतो, तर असा मनुष्य खरा मुस्लिम नाही.'' *(मिश्कात)*

(२) न्यायदानाच्या दिवशी अल्लाह विचारणा करील की,

''हे आदमच्या संततीनो, मी तुम्हाला अन्नाबद्दल विचारले होते परंतु तुम्ही मला ते दिले नाही.'' मनुष्य उत्तर देईल, ''हे माझ्या प्रभुस्वामी, मी तुला अन्न कसे देणार की जेव्हा तू सर्वांचाच अन्नदाता आहेस!'' या प्रश्नाचे उत्तर अल्लाह देईल की ''तुला आठवत नाही की तुझ्याकडे एक मनुष्य आला होता आणि तो उपासी होता. तो तुझ्याकडे अन्नासाठी भीक मागत होता आणि तू त्यास नकार दिला?'' *(मुस्लिम)*

हे अगदी निर्विवाद आहे की इस्लाम गरीबांच्या आणि गरजूंच्या गरजा भागविण्याबद्दल अत्यंत भावनाशील आहे. गरीबांच्या गरजा पुऱ्या करणे इस्लाममध्ये असाधारण असे कृत्य आहे.

इस्लामचा आधार

इस्लाममध्ये जक़ातचा दुय्यम हेतु मदत करणे आहे. कुरआन जक़ातच्या लाभ धारकांबद्दल तपशील देताना स्पष्ट निर्देश देत आहे,

"हे दान तर खऱ्या अर्थी फकीर आणि गोर-गरीबांसाठी आहे. आणि त्या लोकांसाठी जे दान वसुलीच्या कामावर नेमले आहेत आणि त्या लोकांकरिता ज्यांची दिलजमाई अपेक्षित आहे. तसेच हे, गुलामांच्या मुक्ततेसाठी व कर्जदारांना मदत करण्यासाठी व ईशमार्गात आणि वाटसरूंच्या सेवेसाठी उपयोगात आणण्याकरिता आहे. एक कर्तव्य आहे अल्लाहकडून आणि अल्लाह सर्व काही जाणणारा द्रष्टा व बुध्दिमान आहे." *(९ : ६०)*

अल्लाहच्या मार्गात (ईशमार्गात) ही शब्दावली इस्लामसाठी केलेला संघर्ष दर्शविते, विशेषत: जिहादच्या गरजा पुऱ्या करण्यासाठी जक़ात व दान देणे हेसुध्दा उद्देशांपैकी एक उद्देश आहे. या उद्देशाने मुस्लिमांना कुरआन सतत सतर्क ठेवित आहे.

"निघा, मग तुम्ही हलके असा अगर बोजड असा व संघर्ष करा अल्लाहच्या मार्गात आपल्या जीवित व वित्तानिशी, हे तुमच्यासाठी उत्तम आहे जर तुम्ही जाणत असाल." *(९:४१)*

कुरआन ज्या वेळी सदाचारी मुस्लिमांच्या गुणांचा उल्लेख करतो त्या वेळी हा गुण उल्लेखित केला जातो की ते अल्लाहच्या मार्गात प्रयत्नांची पराकाष्ठा (जिहाद) करतात आपल्या वित्तानिशी. याचा अर्थ अगदी स्पष्ट आहे. जिहादसाठी जो काही खर्च होतो तो मुस्लिमांनी आपल्या खाजगी मालमत्तेतून देणे आवश्यक आहे. धर्माचे रक्षण आणि धर्माची मदत करणे ही काही साधी बाब नाही. म्हणूनच आपली संपत्ती त्यासाठी खर्च करणे हे अतिमहत्त्वाचे आहे. जिहादवर खर्च करण्यासाठी आदेश देताना कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"अल्लाहच्या मार्गात (संपत्ती) खर्च करा आणि आपल्या हाताने स्वत:ला अडचणीत टाकण्यापासून (स्वत:चा विनाश करण्यापासून) परावृत्त राहा आणि सद्‌वर्तन करा, अल्लाहला सद्‌वर्तन करणारेच आवडतात." *(२ : १९५)*

यावरून हे सिध्द होते की धर्माचे रक्षण आणि धर्माला मदत करण्यासाठी आपली संपत्ती खर्च न करणे म्हणजे स्वत:च्याच हातून स्वत:चे लौकिक आणि पारलौकिक दोन्ही जीवन उध्वस्त करणे होय. आपल्या हाताने स्वत:चा विनाश करणे थांबविण्यासाठी दान व जक़ात देणे ही काही साधी बाब नाही. हे एक महान सद्‌वर्तन आहे.

जक़ातचे प्रमाण

जक़ातचे हेतु आणि उद्देश पाहिल्यानंतर हा प्रश्न उभा राहतो की जक़ात देण्याचे काय प्रमाण आहे? उत्तर आहे की अशा प्रमाणात जक़ात द्यावी की जेणेकरून वर

उल्लेखित तिन्ही हेतु साध्य होतील. एकीकडे संपत्तीची लालसा मनातून धुवून काढणे, दुसरीकडे गरीबी आणि उपासमारीच्या आपत्ती हद्दपार करणे आणि एकीकडे (तिसरा हेतु) इस्लामचे रक्षण आणि मदतीसाठी रक्कम खर्च करणे आहे.

वरील तिन्ही हेतुंच्या स्वरुपामुळे जकातचे निश्चित असे प्रमाण ठरविता येतच नाही. या उदार कार्यात प्रत्येकाने जास्तीतजास्त खर्च करणे अपेक्षित आहे. सदाचारी मुस्लिम सदाचार करणेच म्हणजे पुरेसे आहे असे मुळीच समजत नाही. हे धर्माची कळकळ आणि उत्साहाविरुध्द गोष्ट आहे, कुरआन मुस्लिमाना अल्लाहच्या मार्गात खर्च करण्यासाठी वारंवार आव्हान करीत आहे. या कळकळीच्या उपदेशामुळे प्रेषित (स) यांचे साथी (सहाबा (र)) वर असा परिणाम झाला की मोठ्यातला मोठा त्याग करूनसुध्दा त्यांना समाधान प्राप्त होत नव्हते. ते भीतीपोटी विचारीत असत, आणखी किती रक्कम खर्च आम्ही करावी जेणेकरून जकातचे प्रमाण पूर्ण होईल? कुरआनोक्ती आहे,

"ते तुम्हाला विचारतात की काय खर्च करावा? सांगा की जे काही आवश्यकतेपेक्षा अधिक असेल. अशा प्रकारे अल्लाह तुम्हाला आपली संकेत वचने स्पष्ट करून सांगत आहे जेणेकरून तुम्ही चिंतन करावे भौतिक आणि मरणोत्तर जीवनाचे."

(२ : २१९)

अशा प्रकारे ईशआदेश आहे की तुमच्या आवश्यकतेपेक्षा जे काही अधिक असेल ते सर्व अल्लाहच्या मार्गात खर्च करा.

"सांगा की, जे काही आवश्यकते पेक्षा अधिक असेल." *(२ : २१९)*

या संकेतवचनानुसार अल्लाहच्या मार्गात खर्च करण्यासाठीचे प्रमाण ठरविण्यास मदत होते. यावरून सिध्द होते की इस्लाममध्ये गरीबाच्या वैयक्तिक गरजा आणि इस्लामच्या सामुदायिक गरजा पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत श्रीमंत मुस्लिमांना अल्लाहच्या मार्गात खर्च करणे चालूच ठेवावे लागते. यासाठी कितीही जास्त रक्कम एकदाच खर्च केली म्हणजे झाले असे कधीच होत नाही. असे कधीच होत नाही की मुस्लिम समाजाच्या सर्व प्रकारच्या गरजा आता पूर्ण झाल्या आहेत आणि यापुढे जकात देण्याची आवश्यकता नाही. म्हणून सधन मुस्लिमांना अल्लाहच्या मार्गात सतत खर्च करावाच लागतो. म्हणून अल्लाहच्या मार्गात किती खर्च करावा हे त्या व्यक्तीच्या इस्लामच्या कळकळीवर अवलंबून आहे.

इस्लाम धर्म हा कल्पनारम्य धर्म नाही. हा त्याचा स्वभाव नाही. हा व्यावहारिक

धर्म आहे. तो त्या आदर्शांची स्वप्ने पाहात नाही जे प्राप्त करणे अशक्य आहे. इस्लाम जीवनाच्या समस्त वास्तवतेला समोर ठेवून वाटचाल करतो. म्हणून तो आपल्या अनुयायींच्या धार्मिक चैतन्यावर जक़ात किती द्यावी हे सोडून देतो असे नाही तर त्याचे प्रमाण ठरवून देतो. हे मात्र कमीतकमी प्रमाण आहे. ते निश्चित करताना इस्लामने मनुष्याच्या गरजा आणि त्याचे स्वहित लक्षात ठेवले आहेत.

इस्लाम मानवाच्या प्रत्येक वर्गाला आवाहन करीत आहे. हे आवश्यकच होते की मनुष्याच्या मोठ्या भागासाठी वस्तूची निश्चित व्याख्या करणे हितावह ठरते. फक्त सिध्दांत मांडणे पुरेसे नाही. आदेश जर निश्चित स्वरुपात दिला गेला तर त्याला पाळणे सहज शक्य होते.

तसेच धार्मिक चेतना प्रत्येक मनुष्यात सारखी नसते. काही लोक तर कमी प्रमाणावर खूश होतात. इस्लामी मूलभूत तत्त्वांच्या किमान मर्यादा घालून देणे आवश्यक ठरते. सर्वसाधारण मुस्लिम बनण्यासाठी हे आवश्यक आहे.

जक़ात देणे हे अनिवार्य ठरविले गेले ते फक्त आत्मशुध्दीसाठीच नव्हे तर गरीबांना मदत करणे, धर्मरक्षण व धर्माला मदत करणे हीसुध्दा त्याची उद्दिष्टे आहेत. आत्मशुध्दी तर प्रत्येक मनुष्याच्या धार्मिक चैतन्यावर अवलंबून आहे. पण गरीबांना मदत करणे, धर्म रक्षण आणि धर्माला मदत करणे हे पारलौकिक जीवनापेक्षा लौकिक जीवनाशी जास्त निगडीत आहेत. असे समजणे चुकीचे आहे की अल्लाहने गरीबांच्या भौतिक गरजांकडे फार कमी लक्ष दिले आहे. मानव जक़ातचे दुय्यम प्रतीचे उद्देश जरी असले तरी इस्लामने त्यांना अतिमहत्त्व दिले आहे. याला लोकांच्या इच्छेवर आणि त्यांच्या मर्जीवर सोडलेले नाही. हे नैतिक जबाबदारीतून एक वैधानिक कर्तव्य आहे. शासन त्याच्या अंमलबजावणीची दक्षता घेत असते.

कायदेशीर प्रमाण खालीलप्रमाणे आहे,

१) शेती मालावर जे बागायती जमिनीतून प्राप्त होते ५% आणि जीरायती जमिनीतून मिळालेल्या शेती मालावर १० %

२) दागदागिण्यावर आणि मालमत्तेवर आणि रोकड रकमेवर २.५ %

३) जनावरे जी सार्वजनिक जमिनीवर चरतात १.५ ते २.५ %

४) खनिज उत्पादन आणि जमिनीतून उत्पादन २० %

प्रत्येक सधन मुस्लिमासाठी हे कायदेशीर देणे (जक़ात) आहे. याला कमी करता येत नाही कारण हे किमान दर आहेत. जर चुकीने कमी दिले अथवा देण्यात आले नाही

तर इस्लामची इमारत अपूर्ण राहील आणि ती पूर्ण या कारणाने होऊ शकणार नाही. जक़ातच्या किमान दरात कपात करणे म्हणजे त्याचे हेतु साध्य करण्यात बाधा आणणे आहे. या हेतुंना पुढे ठेवून मुस्लिमांनी किमान दरापेक्षा जास्त देणे अपेक्षित आहे. मुस्लिमाने अधिक वाटा उचलला तरी त्याने आपल्या मनास समाधानी करून घेऊ नये. प्रेषित (स.) यांचे कथन आहे,

''मुस्लिमांच्या संपत्तीमध्ये त्यांच्या धर्म बांधवांचा हिस्सा जक़ात पेक्षा अधिक आहे.'' *- तिरमीजी*

याचाच अर्थ असा आहे की मुस्लिमाने जर किमान दराने आपली जक़ात अदा केली तर तो आर्थिक जबाबदारीतून मुक्त होत नाही. त्यावर आणखी काही जबाबदाऱ्या असतात. या तीन प्रकारच्या जबाबदाऱ्या आहेत. एक आत्मशुध्दीची, गरीबांच्या मदतीची आणि धर्मरक्षण आणि धर्माला मदत करण्याची जबाबदारी. हे हक्क त्याच्यावर राहतील जोपर्यंत त्याच्या मनात धनलालसा राहील. भूक आणि उपासमारी समाजात शिल्लक राहील आणि धर्मरक्षण आणि धर्मासाठी मदत शिल्लक राहील. कायद्याच्या बडग्याखाली स्वत:ची पूर्ण संपत्ती दान करूनसुध्दा आत्मशुध्दी प्राप्त होणार नाही. हे स्वेच्छेने आणि मनापासून केल्यानेच प्राप्त होणार आहे. शक्तीने आणि बळजबरीने काहीही साध्य होणार नाही. परंतु इतर दोन हेतुंना साध्य करण्यासाठी कायद्याचा आधार घेणे शक्य आहे. म्हणून हे दोन हेतु (गरीबांना मदत आणि इस्लामचे रक्षण आणि इस्लामला मदत) कायदेशीर बाब ठरते. इस्लामचे रक्षण आणि मदत करण्यास समाज अयशस्वी ठरला तर त्यासाठी या नैतिक जबाबदारीचे कायद्यात रूपांतर होते. वरील हदीसनुसार इस्लामी शासन सधन लोकांवर जक़ातपेक्षाही जास्त रक्कम गरीबांची मदत करण्यासाठी आकारू शकते. शासनास जादा रक्कम समाजाकडून उभी करून तिला गरीबांवर तसेच धर्मरक्षण आणि मदतीवर खर्च करण्याचा अधिकार आहे.

म्हणून येथे इस्लामच्या दृष्टिकोनातून श्रीमंतीची व्याख्या वेगळी आहे. जर एखादा मुस्लिम वर्षाच्या शेवटी सर्व खर्च वजा जाऊन ५२॥ (साढेबावन्न) तोळे व चांदी अथवा तितकी रक्कम शिल्लक ठेवत असेल तर तो मनुष्य इस्लामच्या दृष्टीने श्रीमंत आहे.

जक़ातचे व्यवस्थापन

इस्लामने अगदी स्पष्ट आदेश जक़ात कशी जमा करावी आणि कशी खर्च करावी याबद्दल दिलेले आहेत. जक़ातव्यतिरिक्त दानधर्म करण्यास प्रत्येकजण स्वतंत्र आहे. हे स्वातंत्र्य जक़ातसाठी दिले गेलेले नाही. या बाबतीत जक़ातचे व्यवस्थापन हे नमाज

सामुदायिकरित्या कायम करण्यासारखे आहेत. ही सामुदायिक व्यवस्था आहे. इस्लामी शासन आपल्या महसूल खात्यातर्फे जक़ात गोळा करते आणि गरजूंना त्याचे वाटप करते. शासनाला जक़ात देणे अनिवार्य आहे. कुरआन जक़ात कुणासाठी खर्च करावी हे तपशीलाने सांगत आहे आणि जक़ातच्या खर्चाचा खातेवाटप स्पष्ट देत आहे. जे जक़ातसाठी काम करतात त्यांचा विशेष उल्लेख कुरआन करीत आहे. कुरआनच्या स्पष्टीकरणानुसार जक़ात गोळा करणे आणि वाटप करणे ही शासनाची धार्मिक जबाबदारी आहे आणि हे इस्लामी व्यवस्थेचे एक महत्त्वाचे अंग आहे. हदीसमध्ये अनेक वेळा याबाबत उल्लेख आलेला आहे.

जक़ातची सामुदायिक व्यवस्था खालील कारणांमुळे आवश्यक आहे.

(१) हे इस्लामच्या तत्त्वानुसार आहे. इस्लाम स्वभावतः सामुदायिक आहे. इस्लाम जगाला जे देऊ इच्छितो, ते त्याच्या सामुदायिक व्यवस्थेतूनच शक्य आहे. यामुळे मुस्लिम समाज एक शिस्तबध्द आणि योजनाबध्द जीवन कंठत राहतो.

(२) गरीबांची मदत करून त्यांचे कल्याण करणे, इस्लामचे रक्षण इ. अत्यावश्यक गोष्टी आहेत, परंतु श्रीमंत लोकांचा या बाबींकडे हलगर्जीपणा नजरेआड करता येण्यासारखा नाही. म्हणूनच जक़ात गोळा करण्याची जबाबदारी शासनाकडे देऊन इस्लाम या हक्कांची अंमलबजावणी पूर्ण रूपात करू इच्छितो.

जेथे इस्लामी शासन नाही तेथे सामुदायिक व्यवस्था यासाठी कार्यरत राहणे आवश्यक आहे. नमाजला कायम करणे, विशेषतः जुमा (शुक्रवार) आणि दोन ईदच्या वेळी नेतृत्व हे त्या नमाजचे शासनकर्त्यांने करणे अपेक्षित आहे. याचा अर्थ असा नाही की नेता गैरहजर असल्यास प्रत्येकाने नमाज स्वतंत्र्यरित्या अदा करावी. समाजातील लोकांनी एखादा इमाम नियुक्त करून अशा स्थितीत सामुदायिक नमाज अदा करावी. जक़ातसाठीसुध्दा हीच अट आहे. इस्लामी शासन अस्तित्वात जरी नसले तरी जक़ातची व्यवस्था सामुदायिकरीतीने होणे आवश्यक आहे. मशिद बांधण्यासाठी मुस्लिम समाज जसा एकत्र येतो आणि नमाजसाठी इमाम नियुक्त करून सामुदायिक नमाज अदा केली जाते त्याचप्रमाणे त्यांनी जक़ात गोळा करण्यासाठी आणि जक़ात वितरण करण्यासाठी सामुदायिक व्यवस्था करावी. त्यासाठी ''बैतुलमाल'' (लोककोषागार) स्थापन करून मुस्लिम समाजात जक़ातचे व्यवस्थापन करावे. इस्लामी शासन जेथे नसेल तेथे अशा संस्था जक़ातचे हेतु साध्य करण्यास सहाय्यक ठरतात. अशी व्यवस्था ज्या मुस्लिम समुदायात केली नसेल तर ते सर्वजण चूक करत आहेत. एक धार्मिक अपराध करीत आहेत.

जक़ातसाठी शब्दावली

धार्मिक शब्दावलीत जक़ातसाठी आणखी दोन संज्ञा (नाव) वापरात आहेत. एक ''सदका'' (दान) आणि ''इनफाक़फी सबीलिल्लाह''– अल्लाहच्या नावाने खर्च करणे. या दोन्हींचा येथे विचार करू या. 'सदका' या शब्दाची व्युत्पत्ती 'सिदक' या शब्दाने झालेली आहे. ज्याचा अर्थ सदाचार व देण्यासाठी गंभीर असा होतो. हे दोन्ही गुण त्या व्यक्तीमध्ये आहेत हे सिध्द होते. तसेच ''इनफाकफी सबीलिल्लाह''म्हणजे अल्लाहच्या नावाने म्हणजे अल्लाहच्या सेवेत खर्च करणे. जक़ात आणि दान देण्याचे अंतिम ध्येय अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करणे आहे. जक़ात अल्लाहच्या नावानेच दिली जाते हे त्याच्या मूळ हेतूमुळे कळून येते. म्हणून ही तिन्ही शब्दावली एकाच वास्तवतेची असून त्याचे हे तीन घटक आहेत.

कुरआनने मात्र ही तिन्ही नावं एकाच अर्थाने वापरली आहेत. जक़ात, सदका (दान) आणि अल्लाहच्या नावाने खर्च करणे इ. अल्लाहच्या प्रसन्नतेसाठीच केले जाते. हे गौण आहे की तिन्हींपैकी एखाद्या रूपात खर्च केला जात असेल. म्हणून कुरआन आणि हदीसमध्ये खर्च करण्याच्या हेतु आणि ध्येय यावर लक्ष दिले गेले आहे आणि वैधानिकतेकडे दुर्लक्ष केले गेले आहे. इस्लामच्या कायद्यानुसार जक़ात देणे सधन मनुष्यासाठी आवश्यक आहे आणि कायद्याने बंधनकारक आहे. परंतु सदका (दान) आणि अल्लाहच्या नावाने खर्च करणे ऐच्छिक आहे.

सौम (रोजा) - उपवास

चौथा इस्लामचा आधारस्तंभ रोजा (उपवास) आहे. सौम अथवा सियाम याचा अर्थ होतो आराम करणे. मनुष्य उपवासाच्या कालावधीत खाणे, पिणे आणि समागम करणे यास पहाटेपासून ते संध्याकाळपर्यंत आराम देतो.

रोजाची वैशिष्ट्ये

कुरआनने रोजाविषयीचे अनेक फायदे आणि लाभदायक गोष्टी वर्णन केलेल्या आहेत. त्यातील काही मौलिक महत्त्वाच्या आहेत. रोजाचे महत्त्व समजण्यासाठी त्याची सुधारणात्मक वैशिष्ट्ये पाहणे आवश्यक आहे.

ईशपरायणता स्रोत

प्रथम आणि अतिमहत्त्वाचा रोजा (उपवास) चा गुण ईशपरायणता आहे. कुरआन, हदीस आणि मानवी बुध्दीने अनेक उदाहरणे याबद्दलची दिलेली आहेत.

कुरआनने ही वास्तविकता सांगताना स्पष्ट केले आहे,

"हे श्रध्दावंतांनो! विहित केले तुमच्यावर उपवास जसे विहित केले होते तुमच्या पूर्वीच्यांवर जेणेकरून तुम्ही ईशपरायण व्हाल." *(२ : १८३)*

प्रेषित मुहम्मद (स) यांचे कथनसुध्दा वरील सत्यता स्पष्ट करीत आहे.

"रोजा (उपवास) तुमच्यासाठी ढाल आहे (कारण या जगात तुम्हाला पापकर्मापासून ते दूर ठेवते आणि परलोकात तुमचे नरकापासून संरक्षण करते)."

- मुस्लिम

"रोजा पापकृत्याविरुध्द ढाल आहे" म्हणजेच उपवास मनुष्याला पापभिरू आणि ईशपरायण बनवते. खालील प्रेषितकथन स्पष्ट करून सांगत आहे,

"तुम्ही जेव्हा उपवास धराल, तेव्हा तुम्ही वाईट भाषा वापरू नका अथवा मोठ्याने बोलू नका. जर कोणी तुमच्याशी भांडत असेल, शिवीगाळ करीत असेल तर त्याला सांगा की मी उपवास धरलेला रोजादार आहे." *- मुस्लिम*

याचाच अर्थ होतो की मुस्लिम नेहमीच शिवीगाळ आणि वाईट गोष्टींपासून दूरच राहतो. जेव्हा तो उपवास करतो तेव्हा याचे महत्त्व आणखी वाढते. जर त्याला या दुर्गुणांचा नेहमीच्या जीवनव्यवहारात विटाळ नसेल तर त्याने कमीतकमी उपवास कालावधीत त्या वाईट सवयींपासून दूर राहावे. हे प्रेषित मुहम्मद (स) यांचे कथन या गोष्टीचा स्वीकार करीत आहे की रोजा (उपवास) हे ईशपरायणता, पापभिरूता, धर्मनिष्ठा प्राप्त करण्याचे एक प्रबळ साधन आहे.

यासाठी कुरआन संकेत सर्वस्वी पुरावे आहेत. यासाठी आणखी चर्चेची मुळीच गरज नाही. परंतु अधिक समाधानासाठी बुध्दीचा वापर करून या वास्तवतेला अधिक स्पष्ट करू या. आपण यावर विचार करू या की रोजा मनुष्यात ईशपरायणता, पापभिरूता आणि धर्मनिष्ठा कशी निर्माण करतो?

आपण अगोदर हे पाहू या की ईशपरायणता (तकवा) म्हणजे काय आहे. हे त्या सखोल काळजीचे नाव आहे ज्यामुळे आपण अल्लाहच्या अप्रसन्नतेपासून आपला बचाव करतो आणि वाईटापासून दूर राहून चांगुलपणा आत्मसात करतो. दुसऱ्या शब्दांत ही अशी मन:स्थिती आहे की ज्यामुळे अशी मानसिकता तयार होते की मनुष्य आज्ञाधारकता आणि अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करण्यासाठी जीवन कंठत असतो. अशी व्यक्ती प्रत्येक क्षणी अल्लाहच्या प्रसन्नतेचा विचार करीत राहते. त्याला अल्लाहची अप्रसन्नता होऊ नये म्हणून एखाद्या कृत्यामुळे अल्लाहची अप्रसन्नता ओढवून घेण्याची

भीती त्याच्या मनात नेहमी असते. अल्लाहला प्रसन्न करण्याचा कोणताही प्रसंग अथवा संधीला अशी व्यक्ती हातातून जाऊ देत नाही.

ही धडपड आणि आकांक्षा अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करून घेणे आणि अल्लाहच्या अप्रसन्नतेपासून सुरक्षित राहाणे (ईशपरायणता) हे कसे प्राप्त करता येईल? हे तेव्हाच प्राप्त होईल जेव्हा मनुष्याला त्याच्या 'स्व'वर संपूर्ण नियंत्रण असेल आणि मनुष्य आपल्या इच्छा–आकांक्षेच्या आहारी गेलेला नसावा. मनुष्य आपल्या 'स्व'ला नियंत्रित ठेवून आणि इच्छा–आकांक्षांना बंदिस्त ठेवूनच 'ईशपरायणता' प्राप्त करू शकतो. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

''आणि ज्याने आपल्या पालनकर्त्यासमोर उभे राहण्याचे भय बाळगले होते, आणि मनाला वाईट इच्छेपासून दूर ठेवले होते, स्वर्ग त्याचे ठिकाण असेल.''

(७९ : ४०-४१)

आता आपण 'रोजा' म्हणजे काय पाहू या. तीन गोष्टी या रोजासाठी पूर्वअटी आहेत. खाणे, पिणे आणि समागम करणे या तिन्ही गोष्टींचा प्रात:काळापासून ते सूर्यास्तापर्यंत त्याग करणे. दुसऱ्या शब्दांत मनुष्याने आपल्या 'स्व'च्या मागणीपासून (तिन्ही गरजांपासून) स्वत:ला पूर्ण अलिप्त ठेवणे होय. या तीन गरजा 'स्व'च्या सामुदायिक गरजांमध्ये महत्त्वाचे स्थान प्राप्त करून आहेत. इतर दुसऱ्या कोणत्याच गरजा इतक्या महत्त्वाच्या आणि शक्तिशाली नाहीत. इतर सर्व गरजा या तीन गरजांच्या नंतरच्या आहेत. त्या फक्त इच्छा अथवा गरजा नाहीत तर उत्कट स्वाभाविक इच्छा आहेत. मनुष्याचे अस्तित्वच त्यावर अवलंबून नाही तर त्याची वंशपरंपरा त्यावर अवलंबून आहे. त्याला खाणे आणि पिणे स्वत:ला जीवंत ठेवण्यासाठी आणि वंशपरंपरावाढीसाठी समागम अत्यावश्यक आहे.

रोजा या शक्तिशाली उत्कट स्वाभाविक इच्छांवर नियंत्रण ठेवते. महिन्याभराचे आंतरिक प्रशिक्षण दररोज बारा ते चौदा तास निरंतर चालत राहते. मनुष्य या कालावधीत इतका तहानलेला बनतो की त्याला नीटसुध्दा बोलता येत नाही. त्याच्या हातात थंड पाणी आपली तहान भागविण्यासाठी असते. त्याला ते पाणी प्यावेसे वाटते परंतु रोजा असे करण्यापासून त्याला परावृत्त करतो आणि ती व्यक्ती असहाय्य बनते. अशाच प्रकारे इतर दोन, गरजांची स्थिती आहे. महिन्याभरात अशा व्यक्तीमध्ये कशा प्रकारची सहनशक्ती, संयम आणि ईशपरायणता निर्माण होत असेल. याची कल्पना करावी तितकी थोडीच! अशा प्रकारे रोजा (उपवास) मनुष्यामध्ये 'स्व'ला नियंत्रित करून उत्कट स्वाभाविक इच्छांवर प्रबळ नियंत्रण ठेवते. ही ती शक्ती आहे की जिच्या

साह्याने मनुष्य 'स्व' अथवा सैतानाने निर्माण केलेले अडथळे (दुराचार) दूर करून शुध्द धर्माचरण करतो. ही शक्ती मनुष्याला पापभीरू बनवते आणि मनुष्यात खऱ्या अर्थाने ईशपरायणता निर्माण होते. आणखी दुसरे महत्त्वाचे कारण उपवासांमुळे पापभीरूता निर्माण होण्याचे आहे. प्रेषित मुहम्मद (स) यांच्या कथनानुसार,

''उपवास (रोजा) दांभिकते पासून मुक्त आहे.'' - फतहलबारी दांभिकतेचा अभाव हे या वास्तवतेची हमी आहे की मनुष्य अल्लाहच्या सान्निध्यात आहे. याव्यतिरिक्त चांगले आणि खात्रीलायक साधन असूच शकत नाही. म्हणून हे ईशपरायणतेच्या अत्युत्तम खाद्यापैकी एक आहे. याबद्दल शंका असू शकतच नाही. स्वत: प्रेषित मुहम्मद (स) यांचे कथन आहे की *''रोजा हे एक शाश्वत असे माध्यम आहे दांभिकतेपासून दूर राहण्याचे!''* तसे पाहता नमाज हे दिखाव्याव्यतिरिक्त अथवा एखाद्याजवळ (नमाजी व्यक्ती) दांभिकता अथवा दिखावा नाही असे खात्रीलायक म्हणू शकतच नाही. हे मात्र रोजाबद्दल घडू शकत नाही.

रोजा हे दिखाव्यापासून आणि दांभिकतेपासून पूर्ण अलिप्त अशी उपासनापध्दती आहे. नमाज, हज आणि जकात या उपासनापध्दतीमध्ये काही अनिवार्य कार्य करावे लागते, नाहीतर ती उपासना ठरत नाही. असे मात्र रोजाबद्दल नाही. ही उपासना कुणीही पाहू शकत नाही की ऐकू शकत नाही. अशी उपासना दिखाऊ स्वरूपाची असूच शकत नाही. इस्लामच्या मूलतत्त्वांपैकी रोजा हे एक असे मूलतत्त्व आहे ज्यास दांभिकतेचा सैतान पछाडू शकत नाही.

'रोजा'च्या याच गुणवैशिष्ट्यामुळे कुरआन वैशिष्ट्यपूर्ण उल्लेख करीत आहे,

''हे श्रध्दावंतांनो! विहित केले तुमच्यावर उपवास (रोजा) जसे विहित केले होते तुमच्या पूर्वीच्यांवर जेणेकरून तुम्ही ईशपरायण व्हाल.'' *(२ : १८३)*

वरील संकेतवचन फक्त आणि फक्त रोजा (उपवास) साठीच अवतरित झाले आहे. इतर उपासनापध्दतींद्वारे जरी ईशपरायणता प्राप्त होते तरी त्यांच्यासाठी अशा प्रकारचे वर्णन कुरआनमध्ये कोठेच आलेले नाही. रोजाच्या याच गुणवैशिष्ट्यामुळे अल्लाहने रोजा ''माझा'' आणि ''माझ्यासाठी'' हा शब्दप्रयोग केला आहे. उपवासाचा मोबदला आणि बक्षीस सर्वापेक्षा वजनदार राहील अशी ग्वाही दिली आहे.

''प्रत्येक सत्कृत्याच्या मोबदल्यात सत्कृत्य करणाऱ्यास दहा ते सातशे पटीने बक्षीस दिले जाईल परंतु रोजा यास अपवाद आहे. कारण हे फक्त 'माझ्यासाठी' आहे. म्हणून याचा मोबदला मी माझ्या मर्जीनुसार देणार. अल्लाह पुढे म्हणतो की रोजादार

(उपासकरू) माझ्यासाठी अन्न–पाणी त्यागून देतो आणि वासनांना आवर घालतो तेसुध्दा माझ्यासाठीच!'' (मुस्लिम)

''*रोजा माझ्यासाठी आहे*'' हेच सिध्द करते की या उपासनेत दिखावा नाही की दांभिकता नाही.

रोजामुळे ईशपरायणता आणि संयम यासारखे सद्‌गुण निर्माण करण्यावर भर दिला गेला आहे. धर्मशील बनण्यावर मुळीच भर दिला गेला नाही. हे खरे गमक आहे रोजा या उपासनेचे! मनुष्य रोजा कालावधित खाण्या–पिण्यापासून आणि संभोगापासून अलिप्त राहात असतो, याचाच अर्थ असा आहे की इतर वेळी मनुष्य अल्लाहच्या प्रसन्नतेविरुध्द कोणतीही गोष्ट करू शकत नाही. म्हणून रोजादार इतर बाबतीतसुध्दा अल्लाहच्या आज्ञापालनात राहतो, त्याच वेळी त्याचा रोजा खरा सिध्द होतो. किंबहुना त्याचा रोजा भूक–तहानेशिवाय काहीच नाही. असा रोजा निरर्थक ठरतो. रोजा फक्त भूक–तहान आणि संभोग यापासून अलिप्त राहणे नव्हे. रोजा उपासनेच्या तांत्रिक बाबी आहेत. कोणी रोजाच्या बाह्य आणि तांत्रिक बाबींमुळे संतुष्ट होत असेल तर अशी व्यक्ती रोजा उपासनेच्या आत्म्याला आणि अंतरंगात प्रवेश करू शकत नाही. प्रेषित मुहम्मद (स) यांचे कथन आहे,

''*असे कितीतरी रोजादार (उपासकरू) आहेत ज्यांना भूक आणि तहानेशिवाय त्यांच्या पदरात काहीच पडत नाही.*'' (दारीमी)

अशी व्यक्ती कशा प्रकारची असते याबद्दल खालील प्रेषितकथनात स्पष्ट झाले आहे.

''*एखादी व्यक्ती खोटे बोलणे अथवा पाप करणे (दुराचार) सोडत नसेल तर अल्लाहला त्याच्या उपाशी राहण्याचे काहीएक देणे–घेणे नाही.*'' (बुखारी)

वरील प्रेषितकथनाने हेच सिध्द होते की रोजामध्ये या तिन्हींपासून (भूक, तहान आणि वासना) परावृत्त रखणे म्हणजे आपल्या 'स्व'ला ताब्यात ठेवणे होय. रोजा यासाठीच प्रशिक्षण आहे. रोजा कालावधीत या कृती चालू राहिल्या तर अशा व्यक्तीला रोजाचे खरे उद्दिष्ट कळलेच नाही. म्हणून त्याने उपाशी राहण्यासारखेच आहे. रोजादार आणि खोजदार (रोजा न ठेवणारा) या दोन्हींमध्ये अशा वेळी काहीच फरक राहत नाही.

रोजा

ईशपरायणतापूर्ण जीवन

दुसरे महत्त्वाचे कारण आहे रोजा हे ईशपरायणता प्राप्त करण्याचे एक प्रभावी साधन आहे. त्याच्याशिवाय मनुष्याच्या जीवनात ईशपरायणता येऊ शकत नाही. इतर सद्‌गुणांमुळे मनुष्य जरूर धर्मशील बनू शकतो, परंतु रोजा या सर्वांपेक्षा प्रभावशाली माध्यम आहे. रोजाची जागा दुसरी कोणतीच उपासनापध्दत घेऊ शकत नाही. कुरआन या संदर्भात स्पष्टोक्ती करीत आहे,

''*हे श्रध्दावंतांनो ! विहित केले तुमच्यावर उपवास (रोजे) जशे विहित केले होते तुमच्या पूर्वीच्यावर जेणे करून तुम्ही ईशपरायण व्हाल.*'' *(२ : १८३)*

रोजाचा उद्देश फक्त श्रध्दाळू आणि धर्मशील बनून राहण्याचाच असता तर अल्लाहने ''*जसे विहित केले होते तुमच्या पूर्वीच्यांवर*'' हे वाक्य (आयत) येथे दिले नसते. हे एक ऐतिहासिक सत्य आहे की तुमच्या पूर्वीच्या लोकांसाठी (पूर्वजांना) सुध्दा रोजा अनिवार्य केला गेला होता. मुस्लिमांना रोजाच्या उद्देशापासून सचेत करण्यात आले आहे. वरील संकेतवचनामध्ये धर्मशीलतेचा उल्लेख आलेला नाही. तर या संकेतवचनांनुसार हेच स्पष्ट होते की ईशपरायण जीवन व्यतीत करण्यासाठी रोजाव्यतिरिक्त अन्य दुसरी अत्युत्तम अशी कोणतीच उपासनापध्दत नाही. दुसरे कोणतेच कृत्य त्याची जागा घेऊ शकत नाही. असे जर नसते तर उपवास प्रत्येक धर्माचा आधारस्तंभ गणला गेला नसता, हे वरील आयतीमुळे स्पष्ट होते. रोजाची अनिवार्यता हे सिध्द करते की नमाज, जक़ातप्रमाणे रोजासुध्दा धर्माची स्वाभाविक अनिवार्यता आहे. रोजाअभावी नमाजची शिस्तप्रिय व्यवस्था पूर्णतेला पोहचू शकत नाही.

रोजा रोजादार (उपासकरू) मध्ये ईशपरायणता कशा प्रकारे निर्माण करतो हे पाहण्यासाठी वरील स्पष्टीकरणाचा पुन्हा विचार करणे गरजेचे आहे. हे निर्विवादित सत्य आहे की रोजाव्यतिरिक्त अत्युत्तम प्रभावशाली दुसरी कोणतीच उपासनापध्दत (इस्लामचा आधारस्तंभ) नाही ज्यामुळे ईशपरायणता अंगीकारली जाते. त्यात दिखावा नाही की बडेजाव नाही. दांभिकता यात मनुष्याला शिवतसुध्दा नाही. यामुळे रोजा सर्वसामान्यजनांसाठी एक महत्त्वाची आणि आवडती उपासना आहे.

रोजा– ईशपरायणता द्योतक

रोजा हे अनेक कारणामुळे इस्लामच्या खऱ्या स्वरुपाचे द्योतक आहे. कुरआनने

धर्माची स्पष्ट केलेली कल्पना ही रोजा मध्ये सर्वांगांने स्पष्ट होते. कारण रोजा मनुष्याला फक्त सदाचरणींच बनवत नाही तर त्याच्या आत्म्याला आणि विचाराला एक दिशा देते. बहिरंग आणि अंतरंग दोन्ही ईशपरायण बनतात. याबद्दलचे स्पष्टीकरण खालील प्रेषितकथनाने अधिक स्पष्ट होते.

''जी व्यक्ती आयुष्यभर रोजे ठेवते अशा व्यक्तीचे रोजे निरर्थक आहेत.''
(बुखारी)

''तुम्हाला दोन किंवा त्यापेक्षा जास्त दिवसांचे सततचे रोजे ठेवण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.'' *(मुस्लिम)*

एकदा प्रवासात प्रेषित मुहम्मद (स.) यांनी लोकांची गर्दी एका व्यक्तीभोवती पाहिली. विचारपूस केल्यानंतर कळले की तो प्रवासी रोजादार आहे. प्रेषित म्हणाले, ''प्रवासात रोजा ठेवणे योग्य नाही. त्यामुळे सर्वसामान्यांना अपरिमित कष्ट झेलावे लागतात.'' (बुखारी)

प्रेषित मुहम्मद (स.) यांचा सोबती (र.) जो मदिनाबाहेर राहत होता तो एकदा त्यांच्याजवळ आला आणि भेट झाल्यानंतर निघून गेला. एक वर्षानंतर तो पुन्हा आला या वेळी तो फार दुबळा झाला होता. तो ओळखूसुध्दा आला नाही. प्रेषितांनी त्याला विचारले, ''काय झाले आहे, मागील वर्षी तू चांगला सदृढ होता.'' त्याने उत्तर दिले, ''मी वर्षभर दिवसातून एकदाच जेवण घेत असे (रोजा ठेवत असे).'' हे ऐकल्यानंतर प्रेषित म्हणाले, ''तू स्वत: ला का कष्ट दिले?'' *(अबुदाअद)*

आपण वरील प्रेषितकथनांचा विचार केला तर हे सिध्द होते की रोजामुळे ईशपरायणतेचा क्रांतीकारक अर्थ निघत आहे. ईशपरायणता रोजाचा मूळ हेतु आहे. रोजामध्ये 'स्व'चा नाश होत नाही. तर 'स्व'वर नियंत्रण राहते. दुसऱ्या शब्दांत ईशपरायणतेबरोबर त्याची मौलिकता आणि महत्त्वसुध्दा रोजादार जाणून घेतो. समजून उमजून घेतो. हे सर्व अनुभवातूनच! जेव्हा 'रोजा' हा शब्द कानी पडतो तर लगेचच 'स्व'च्या मागणीला रोखून धरणे म्हणजे रोजा हे आपल्या लक्षात येते. ती 'स्व'च्या मागणीचा अतिरेकसुध्दा होऊ देत नाही. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

''ज्याने आपल्या पालनकर्त्यासमोर उभे राहण्याचे भय बाळगले होते आणि मनाला वाईट इच्छेपासून दूर ठेवले होते, स्वर्ग त्याचे ठिकाण असेल.'' *(७९ : ४१)*

ईशपरायणता मनाला स्वैर सोडून कधीच प्राप्त होत नाही. रोजा दिव्य अवतरणानुसार त्या 'स्व'वर नियंत्रण ठेवतो व त्याला सैरावैरा पळू देत नाही. याचा अर्थ

'स्व'ला मारून टाकणे असा मुळीच नाही. दुसऱ्या धर्मात 'स्व'ला अतिकष्ट देऊन आणि मनोकामनांचे दमन करून नष्ट करणे अतिउच्च दर्जाचे पुण्य समजले जाते. इस्लामला हा अतिरेक मुळीच मान्य नाही. इस्लामनुसार हे पुण्य नाही तर पाप आणि अत्याचार आहे. रोजा तुम्हाला या सत्यतेची आठवण नेहमी करून देतो. काही संबंधित प्रेषितकथने आपण येथे पाहू या.

(१) ''पहाटे सहेरी (जेवण) करा रोजा सुरू करण्यापूर्वी हे एक लाभकारक कृत्य आहे. (मुस्लिम)

(२) लोक रोजा सोडण्यासाठी वेळेत घाई करतील तेवढे त्यांना पुण्य लाभेल.'' (मुस्लिम)

(३) ''लोक जोपर्यंत रोजा सोडण्यात वेळेवर घाई करत राहतील तोपर्यंत हा धर्म वर्चस्व स्थापित करून राहील.'' (अबू दाऊद)

(४) ''अल्लाह स्पष्ट करतो की माझा प्रिय दास तो आहे जो वेळेत रोजा सोडण्यासाठी घाई करतो.'' (तिरमिजी)

अशा प्रकारे वरील प्रेषितकथनानुसार रोजाचे महत्त्व स्पष्ट होते. ईशपरायणता म्हणजे 'स्व'चे दमन अथवा नाश नव्हे तर स्वयंनियंत्रण होय. हे स्वयंनियंत्रण दृष्टिकोनाची शिस्तबध्दता आणि आवडीनिवडीची शिस्तबध्दता दर्शविते. 'स्व'ला दिव्यप्रकटन अथवा ईश्वरेच्छेला प्रत्यक्ष व्यवहारात कार्यान्वित करणे. असे करताना स्वतःच्या आवडीनिवडींना, इच्छांना कुठेही थारा न देणे ईशपरायणतेला अपेक्षित आहे. अल्लाहची प्रसन्नताप्राप्तीसाठी फक्त अल्लाहचे आदेश पाळणे पुरेशे नाहीत तर त्याबरोबर आपल्या मनातील इच्छांना आवर घालून स्वतःच्या इच्छेनुसार न वागणे आवश्यक आहे. अल्लाहची उपासना– इबादत करणे म्हणजे अल्लाहव्यतिरिक्त इतर तथाकथित ईश्वरांना नाकारणे आणि अल्लाहचे एकत्व, एकेश्वरत्व मान्य करणे या दोन्ही मौलिक गोष्टी आहेत. अल्लाहला आत्मसमर्पण करणे आणि ईशपरायण जीवन जगणे म्हणजे अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताची आज्ञाधारकता स्वीकारणे होय. ज्यांना न करण्याचा आदेश दिला आहे त्यांना नाकारणे आणि ज्यांच्यासाठी परवानगी दिली आहे त्या गोष्टी आचरणात आणणे हे माणसाला आत्मिक समाधान प्राप्त करुन देते. अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताने घालून दिलेल्या मर्यादांचे पालन करणे आणि स्वतःची भर त्यात न घालता, मर्यादा भंग न करता जीवन कंठत राहणे ईशपरायणता आहे.

रोजाचा उद्देश ईशपरायणतेला वृध्दिगंत करणे आहे. एकीकडे रोजा ठेवण्याच्या

व्यक्तीला पहाटे जेवण सेहरी करण्याची कडक ताकीद दिली आहे. सेहरी न करता रोजा ठेवणारा अल्लाहची कृपा प्राप्त करु शकत नाही, तसेच रोजा सोडण्याच्या वेळेसंबंधीसुध्दा कडक ताकीद आहे. रोजा सोडण्यात विलंब याला श्रध्देत कमतरता म्हटले गेले आहे. ही दोन्ही कृत्ये ईशपरायणता प्राप्त करण्याच्या मार्गातील अडथळे आहेत. 'स्व'वर नियंत्रण अशा कृत्यामुळे होते. यामुळे रोजाचा हेतूसुध्दा साध्य होण्यास मदतच होते. ही दोन्ही प्रकारची ताकीद स्वतःच्या मनाप्रमाणे वागण्याचा मार्ग बंद करते. स्वतःच्या इच्छेनुसार आवडीनुसार तर रोजाचे योग्यरित्या पालन होऊच शकत नाही. रोजा ठेवण्यासाठी ठरवून दिलेली वेळ न पाळता आपल्या मनाप्रमाणे करणे हे स्वार्थी वृत्तीचे लक्षण आहे. हे तर खरे धर्मात स्वतःची ढवळाढवळ करण्यासारखे आहे. असे जर असेल तर रोजामुळे स्वयंनियत्रंण होते हे म्हणणेच चुकीचे ठरते. मर्यादांचे उल्लंघन करणे याचसाठी निषिध्द आहे. या सर्व बाबींचा आपण विचार केला तर कळून येते की रोजाला इस्लामचा आधारस्तंभ का म्हणून संबोधले आहे आणि इस्लामची इमारत या अधारस्तंभाअभावी का म्हणून अपूर्ण राहते हेसुध्दा आपणास कळून येते.

रोजाचे महत्त्वाचे फायदे

ईशपरायणता रोजामुळे मनुष्यात निर्माण होते हे कळल्यानंतर इतर महत्त्वाचे काही विचार करण्यासाठी उरत नाहीत, कारण जो ईशपरायणता धारण करतो तो अल्लाह आणि प्रेषित मुहम्मद (स.) यांनी घालून दिलेल्या मर्यादांचे तंतोतंत पालन करीत राहतो. यामध्ये संपूर्ण धर्माचरण समाविष्ट आहे. तरी आणखी काही फायदे रोजामुळे होतात त्यांना आपण येथे पाहू या, जेणेकरून आपणास रोजाचे अनन्यसाधारण महत्त्व कळून येईल.

(१) रोजामुळे अल्लाहचे प्रभुत्व आणि सार्वभौमत्वाच्या विश्वासाला आणखी बळकटी मिळते. पहाटे सहेरी केली जाते, परंतु जेव्हा उषःकाल होतो त्याचक्षणी खाणेपिणे आणि जीवनातील इतर सुखांचा उपभोग घेण्यापासून मनुष्य दूर राहतो. संपूर्ण दिवसभर त्याला ईशपरायणता यापासून रोखून धरते. सूर्यास्तानंतर लगेचच रोजा सोडल्यानंतर त्याला खाण्यापिण्याला आणि जीवनांनद उपभोगता येतो. हा आदेश आणि आज्ञापालनाची व्यवस्था इतर कोणत्याच धर्मात तुम्हाला सापडणार नाही. हे पाहणाऱ्याला अल्लाहचे स्वामीत्व आणि प्रभुत्वाची जाणीव करून देते.

(२) रोजा समाजात सहानुभूतीचे वातावरण निर्माण करतो. सहजीवनाच्या इस्लामी समाजनिर्मितीला प्रोत्साहन देतो. श्रीमतांना गरीबीचे चटके कळून येतात.

महिनाभर त्यांना ही आठवण येत राहते. भूक आणि तहान काय असते हे त्यांना कळते. यातूनच गरीबांबद्दलची सहानुभूती त्यांच्या मनात निर्माण होते आणि अल्लाहच्या मार्गात खर्च करण्याची मानसिकता तयार होते. याच कारणावरून प्रेषित मुहम्मद (स.) यांनी रमझान महिन्यास "सहानुभूतीचा महिना" म्हणून संबोधले आहे. प्रेषित मुहम्मद (स.) रमजान महिन्यात त्यांच्याकडील सर्व गुलामांना सोडून देत असत आणि प्रत्येक भिक्षुकाला भिक्षा देत असत.

"रमजान महिन्यात प्रेषित मुहम्मद (स.) प्रत्येक गुलामास मुक्त करीत असत आणि प्रत्येक मागणाऱ्यास दान देत असत." *(मिश्कात)*

इब्ने अब्बास यांच्यानुसार, प्रेषित मुहम्मद (स.) सर्वांपेक्षा दयाळू जरी होते तरी ते रमजानमध्ये अतिशय दयाळू होत असत.

"अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) हे सर्व मानवांपेक्षा दानशूर आणि दयाळू होते. आणि विशेषत: रमज़ानमध्ये ते अतिशय दानशूर बनत असत." *(बुखारी)*

(३). रोज़ा एकतेची भावना समाजात वाढीला लावते. रमजान महिन्यात समाजातील श्रीमंत आणि गरीब, राजा आणि रंक, सर्वसामान्य आणि सामान्येतर सर्व एकसारखे असतात. प्रत्येकजण एकसारखीच आज्ञाधारकता बाळगून असतो, त्या सर्वांचे चेहरे जगाला दाखवून देतात की आम्ही एकाच स्वामीचे दास आहोत. आम्हा सर्वांचा मालक– शासक एकच आहे. त्यांची ही मानसिकता समाजातील सर्व लोकांना एका स्तरावर एकत्र करते आणि समाजात एकीला बळ देते.

(४) रोजादार व्यक्तीस रोजा अल्लाहच्या मार्गात काबाडकष्ट झेलण्यास तयार करतो. यासाठी मनुष्याला तहान, भूक आणि इतर गैरसोयींच्या कठीणतेची जाणीव होते. या सर्व हालअपेष्टा आणि कष्ट तो अल्लाहच्या प्रसन्नतेसाठीच फक्त सहन करतो. अशी व्यक्ती अल्लाहच्या प्रसन्नतेखातरच आपली संपत्ती खर्च करते आणि वेळ पडल्यास आपला जीवसुध्दा त्यागून देते. हे फक्त तीच व्यक्ती करू शकते जी संयमी आहे, ईशपरायण आहे, रोजा हे त्यासाठी अत्युत्तम प्रशिक्षण आहे. हालआपेष्टांना सामोरे जाण्यासाठी तयारी याच महिन्यात माणूस करून घेतो. म्हणून प्रेषित मुहम्मद (स.) यांनी या महिन्याला 'संयमाचा महिना' म्हणून संबोधले आहे आणि रोजा त्याचा निम्मा संयम आहे असे म्हटले आहे.

(५) रोजाच्या मान्य व्यवस्थेमुळे राष्ट्रीय एकात्मतेला बळ मिळते. यामुळे मनुष्यांना सतत स्मरण करून दिले जाते की तुम्ही एकेश्वरवादी चळवळीचे ध्वजवाहक

आहात. प्रत्येकजण रमजान महिन्यातच रोजा पाळतो, कारण तसा ईशआदेश आहे. प्रत्येकजण प्रात:काळापूर्वी सहेरी करतो आणि दिवसाचे १२ ते १४ तास काही न खाता–पिता आणि वासनेपासून दूर राहून सूर्यास्तानंतर लगेचच उपवास सोडतो. रोजाची ही वैश्विक व्यवस्था आहे. एकाच कालावधीत जगभर रोजा पालन केले जाते. जगभरातील मुस्लिम एकाच कारणासाठी, एकाच वेळी, एकाच ध्येयासाठी एकसारखा असा शिस्तबध्द रोजापालन महिनाभर करत राहतात. जगात कोण्याही दुसऱ्या धर्मात ही वैश्विक व्यवस्था आपणास सापडणार नाही.

काही अटी

इतर सर्व उपासनापद्धतींप्रमाणे रोजाचे फायदे मिळविण्यासाठी खालील अटींची पूर्तता करणे अत्यावश्यक आहे.

(१) रोजाच्या पूर्ण औपचारिकतेचे पालन होणे आवश्यक आहे. हेतुचे गांभीर्य, अल्लाहचे भय आणि दृढ विश्वास की अल्लाह आणि फक्त अल्लाहच पूजनीय आहे आणि मनुष्य काहीच नाही, परंतु त्याचा दास आहे. तसेच अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करण्याची ओढ आणि पारलौकिक जीवनातील यशप्राप्तीसाठी सतत कार्यरत राहणे या रोजासाठीच्या पूर्वअटी आहेत. प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या कथनानुसार, रोजापालन पूर्ण श्रध्देने आणि आत्मपरीक्षणपूर्वक होणे आवश्यक आहे. वरील अटींशिवाय रोजा निव्वळ उपाशी राहण्यासारखे आहे. या अटींशिवाय जो कोणी रोजापालन करीत असेल आणि तो समजत असेल की माझे कर्तव्य मी बजावत आहे आणि इस्लामच्या आधारस्तंभाला उभारण्याचे काम मी करीत आहे तर ही त्याची घोडचूक आहे. त्याचे असे रोजापालन निरर्थक आहे.

(२) फक्त अनिवार्य रोजापालन करून भागले असे समजू नये, तर ऐच्छिक रोजापालनसुध्दा माणसाने करीत राहावे. या ऐच्छिक रोजापालनमुळे त्याला रोजाचे उद्देश सतत स्मरणात राहतील. असे करण्याने ती व्यक्ती स्वयंनियंत्रणासाठीचे प्रशिक्षणसुध्दा वारंवार घेत राहते. ऐच्छिक रोजापालनसाठी तपशीलवार माहिती प्रेषित कथनांत आलेली आहे. त्यातून कोणते रोजे (उपवास) पाळावेत हे प्रत्येकाने आपल्या सोयीनुसार ठरवावे, कारण ते ऐच्छिक आहेत.

हज (पवित्र यात्रा)

पाचवा आणि शेवटचा इस्लामचा आधारस्तंभ हजयात्रा आहे. 'हज'चा अर्थ होतो पवित्र स्थानाला भेट देणे. या उपासनापध्दतीला हज असे म्हणतात, कारण त्यात पवित्र

स्थान काबागृहाची यात्रा अभिप्रेत आहे.

महत्त्व

प्रत्येक श्रध्दावंताचे कर्तव्य आहे की त्याने आयुष्यात एकदा हजयात्रा करावी, जर तो प्रौढ असेल आणि त्याची तितकी आर्थिक क्षमता असेल्. एखादी प्रौढ आणि आर्थिक सक्षम व्यक्ती काबागृहाची यात्रा (हज) करत नाही तर ती व्यक्ती आज्ञाधारक (मुस्लिम) राहण्याचा दावा करू शकत नाही. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"लोकांवर अल्लाहचा हा हक्क आहे की या गृहापर्यंत पोहोचण्याची ऐपत आहे त्याने त्याची हजयात्रा करावी आणि जो कोणी या आदेशाचे पालन करण्यास नकार देईल त्याने समजून असावे की अल्लाह सकल जगवासियांपासून निरपेक्ष आहे."

(३ :९७)

वरील कुरआनोक्तीला स्पष्ट करताना खालील हदीस (प्रेषितवचन) आहेत,

"जर एखाद्या व्यक्तीला सशक्त कारण नसेल अथवा जालीम राज्यसत्तेमुळे हजयात्रा करणे अशक्य आहे, हेसुध्दा कारण नसेल तर ती व्यक्ती यहुदी अथवा इसाईप्रमाणे मृत्यु पावली तरी काही एक फरक पडणार नाही."

"आदरणीय उमर (रजि.) यांच्यानुसार, अशी व्यक्ती यहुदी अथवा इसाईप्रमाणे मरण पावली (हे शब्द तीनदा उच्चारले गेले) जिला आर्थिक सुबत्ता आहे आणि हजयात्रा करणे सुकर आहे तरी हजयात्रा न करता मृत्यु आला."

याविरुध्द ज्याने हजयात्रा गांभीर्यपूर्वक व्यवस्थितरित्या पार पाडली अशा व्यक्तीची वाखाणणी करताना स्पष्ट करण्यात आले आहे की या पवित्र कार्याव्यतिरिक्त अधिक चांगले कृत्य दुसरे असूच शकत नाही.

अशा प्रकारच्या मान्यताप्राप्त हजयात्रेसाठी स्वर्ग हेच एकमेव पारितोषिक आहे.

"जो हजयात्रेला जाऊन तेथे कोणतेही पाप आपल्या हातून करीत नाही आणि विधीपूर्वक सर्व हजकार्य व्यवस्थित पार पाडतो तो नुकत्याच जन्मलेल्या बालकाप्रमाणे निरागस बनून परत येतो." (बुखारी)

अल्लाह आणि त्याचे प्रेषित (मुहम्मद स.) यांनी हजयात्रेला इतके महत्त्व का दिले आहे? हजयात्रेव्यतिरिक्त एखाद्याचा मुस्लिम (आज्ञाधारक) राहण्याचा दावा खोटा कसा ठरतो? हजयात्रेने स्वर्गप्रवेश सुकर कसा बनतो? या प्रश्नांची उत्तरे प्राप्त करण्यासाठी आपणास हजयात्रा म्हणजे काय हे सर्वप्रथम पाहावे लागेल. इस्लाम धर्माच्या आत्म्याशी हजयात्रेचा कसा संबंध आहे, इस्लामी चारित्र्यसंवर्धनकार्यात हजयात्रेला काय महत्त्व

आहे? अल्लाहची उपासना करण्यात व्यक्तीला हजयात्रेमुळे काय मदत मिळते? हे सर्व जाणून घेण्यासाठी आपणास खालील दोन प्रश्नांची उकल करून घ्यावी लागेल. प्रथम काबागृह म्हणजे काय, जिथे लोक हजयात्रेला जातात? ते कशासाठी बांधले गेले? त्याचा इस्लामशी संबंध काय? आणि दुसरे म्हणजे हजयात्रेत कोणते धर्मविधी पार पाडले जातात आणि त्यांचा हेतु काय? हे सर्व मुद्दे अभ्यासले गेले तर स्पष्ट होईल की हजयात्रेला इस्लाममध्ये अनन्यसाधारण महत्त्व का आहे.

काबागृहाचे महत्त्व

प्रथमतः आपण काबागृहाच्या बांधकामाची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि त्याचे महत्त्व पाहू या. पितापुत्र (इब्राहीम व इस्माईल) काबागृहाचे बांधकाम उभारीत होते व प्रार्थना करीत होते,

''हे आमच्या पालनकर्त्या प्रभू! आमच्याकडून या सेवेचा स्वीकार कर. तू सर्वांचे ऐकणारा आणि सर्व काही जाणणारा आहेस. हे प्रभू आम्हा दोघांना तुझे आज्ञाधारक बनव. आमच्या वंशामधून असा समाज घडव, जो तुझाच आज्ञाधारक झालेला असेल. आम्हाला आमच्या उपासनेचा विधी सांग आणि आमच्या उणिवांकडे दुर्लक्ष कर. निःसंशय तू क्षमावंत आणि दयावंत आहेस.'' (२ :१२७-१२८)

पितापुत्राच्या वरील प्रार्थनेवरून हेच सिध्द होते की काबागृह बांधण्याचा जो मूळ हेतु होता तो साध्य करण्यासाठी त्यांच्या वंशामधूनच तो समाज उभा राहिला जो आज्ञाधारक (मुस्लिम) होता.

येथे हे स्पष्ट केले पाहिजे की त्यांच्या प्रार्थनेत त्यांनी विनवणी केली होती,

''आमच्या वंशामधून असा समाज घडव जो तुझाच आज्ञाधारक झालेला असेल.''

येथे मुस्लिम हा शब्द वापरण्यात आलेला आहे. मुस्लिम या शब्दाचा अर्थ होतो आज्ञाधारक.

काबागृहाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर इब्राहीम (अ.) यांनी आपल्या पुत्राला आणि पत्नीला इतरत्र स्थलांतरित केले नाही. ते तेथेच स्थायिक झाले, जो वाळवंटी, ओसाड प्रदेश होता व तो निर्मनुष्य प्रदेश होता. काबागृहाजवळ त्यामुळे त्यांची जी वंशावळ जन्माला येणार होती ती सर्व ''त्या एक अल्लाहचेच आज्ञाधारक असतील.'' इब्राहीम (अ.) यांनी स्वतः अल्लाहजवळ त्यावेळी प्रार्थना केली,

''हे पालनकर्त्या प्रभू! मी एका निर्जल व ओसाड खोऱ्यात आपल्या संततीच्या

एका भागास तुझ्या आदरणीय घराजवळ आणून वसविले आहे. हे पालनकर्त्या प्रभू! असे मी अशासाठी केले आहे की या लोकांनी येथे नमाज कायम करावी.'' (१४ :३७)

''या लोकांनी येथे नमाज कायम करावी'' याचा अर्थ असा आहे की त्यांनी अल्लाहची सेवा (इबादत-उपासना) करावी. अल्लाहचा धर्म पाळावा आणि त्याचा प्रसार करावा. प्रार्थना श्रध्दाशीलतेचे अनिवार्य अंग आहे. म्हणून ''लोकांनी नमाज कायम करावी'' याचा अर्थच असा होतो की इस्लाम धर्म (आज्ञाधारकता) पूर्णरूपेन प्रस्थापित केला जावा. अल्लाहच्या आज्ञाधारकतेचा (इस्लाम) एक आदर्श त्यांच्या वंशात प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या हस्ते त्या ठिकाणी प्रस्थापित झाला याची साक्ष इतिहास देत आहे.

त्यांच्या वंशातून पुढे आज्ञाधारक समाज कसा बनणार होता? अल्लाहच्या आज्ञाधारकतेच्या पध्दती त्यांना कशा प्रकारे माहीत होणार? यासाठी त्या पितापुत्रांनी अल्लाहजवळ अशी विनवणी केली होती,

''हे पालनकर्त्या प्रभू! या लोकांमध्ये ह्यांच्यातील एक प्रेषित उभा कर. जो तुझे संदेश यांना ऐकवील आणि यांना ग्रंथ आणि विवेकाची शिकवण देऊन ह्यांचे जीवन पवित्र करील. तूच प्रभूत्वशाली न्याय करणारा आहेस.'' (२:१२९)

मानवी इतिहासातील या दोन प्रार्थना आहेत ज्यांचा स्वीकार अल्लाहने कालांतराने (सुमारे २००० वर्षानंतर) केला. आदरणीय मुहम्मद (स.) यांच्या रूपात 'प्रेषित' आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या (सहाबी) रूपात 'आज्ञाधारक समाज' उभा केला. (इस्लामी राष्ट्र निर्माण केले.) हा आज्ञाधारक समाज म्हणजेच मुस्लिम समाज आणि मुस्लिम राष्ट्र होय. त्यांचे नाव मुस्लिम (आज्ञाधारक) यासाठी झाले की इब्राहीम (अ.) यांनी त्यांचा उल्लेख आपल्या प्रार्थनेत याच मुस्लिम शब्दाने केलेला होता. अशा प्रकारे इब्राहीम (अ.) यांनी मुहम्मद (स.) आणि त्यांच्या सहकाऱ्यांना मुस्लिम हे नाव अगोदरच दिले होते. हे कुरआनच्या 'हज्ज' या अध्यायाने सिध्द केले आहे.

वरील विवेचनाने हे सिध्द होते की काबागृहाला इस्लामचे प्रेरणास्रोत आणि केंद्र संबोधने अगदी योग्य आहे.

हजयात्रेचे धार्मिक विधी

आता आपण हजयात्रेच्या वेळी जे विधी आणि कार्यक्रम पार पाडले जातात त्याविषयी येथे विचार करू या.

एखादी मुस्लिम व्यक्ती जेव्हा हजयात्रेसाठी निघते तेव्हा ती जाहीररित्या सर्वांना त्याची सूचना देते. 'एहराम' विशिष्ट प्रकारचा साधा पोषाख (सोवळं) असतो तो

परिधान करण्यापूर्वी ती व्यक्ती शुचिर्भूत होते. स्नान केल्यानंतर ते वस्त्र 'एहराम' परिधान केले जाते. साधे दोन पांढरे शुभ्र कापड विना शिवलेले असते. एक कमरेभोवती गुंडाळले जाते आणि दुसरे खांद्यावर सोडले जाते. नंतर ती व्यक्ती दोन रकात नमाज अदा करते आणि औपचारिकरित्या हजयात्रेसाठी इरादा खालीलप्रमाणे मोठ्याने जाहीर केला जातो.

''लब्बैक! अल्लाहुम्मा! लब्बैक! लब्बैक! ला शरीक लक! लब्बैक! इन्नीलहम्द वन नियमत लक, वल मुल्क ला शरीक लक!''

(हे अल्लाह! मी तुझ्या सेवेत हजर आहे! मी हजर आहे! मी हजर आहे! तुझा कोणीही भागीदार नाही! मी हजर आहे! मी हजर आहे! सर्व प्रशंसा तुझ्यासाठीच आहे! प्रशंसा आणि समृध्दी तुझ्यासाठीच आहे! तुझा कोणीही भागीदार नाही!)

व्यक्ती जेव्हा 'लब्बैक' (मी हजर आहे) 'लब्बैक' (मी हजर आहे) अशी ग्वाही देतो, तर त्याच क्षणी तो 'एहराम'च्या स्थितीत असतो. हे शब्द तो हजच्या काळात सतत उच्चारत असतो. प्रत्येक नमाजनंतर, चढताना, उतरताना, चालताना, बसताना अशा प्रत्येक क्षणी तो हे शब्द उच्चारत राहतो. एहरामच्या स्थितीत सुख-चैनीच्या वस्तू त्याच्यासाठी ताज्य असतात. तो आपला नेहमीचा पोषाख सोडून देतो आणि या साध्या पोषाखात हजच्या काळात वावरतो. जी दोन वस्त्रे त्याच्या अंगावर असतात तीसुध्दा शिवलेली नसतात. रंगीत कापड त्याला अंगावर घालण्याची मनाई आहे. तो आपला चेहरासुध्दा झाकू शकत नाही किंवा डोक्यावर काही सावलीसाठी आच्छादन घेऊ शकत नाही. आपले अंगावरचे केस अथवा नखेसुध्दा कापू शकत नाही. सुंगधसुध्दा वापरू शकत नाही की स्नान करताना साबणसुध्दा वापरू शकत नाही. पत्नीशी त्या काळात शरीरसंबंध ठेवणे निषिध्द केले आहे. त्या कृत्याची इच्छा करणे अथवा चर्चा करणेसुध्दा अवैध ठरविले आहे. हजयात्रेच्या काळात ती व्यक्ती शिकार करू शकत नाही. अशा प्रकारे तो मक्का शहराकडे रवाना होतो. जेव्हा त्याला काबागृह प्रथमतः दिसते तेव्हा तो आनंदाने आणि मोठमोठ्याने उद्‌गारतो ''अल्लाहु अकबर! अल्लाहु अकबर!'' (अल्लाह महान आहे! अल्लाह महान आहे!) ''लाईलाहा इल्लल्लाह.'' (अल्लाहव्यतिरिक्त दुसरा कोणीही ईश्वर नाही.) मक्का शहरात प्रवेश केल्यानंतर तो प्रथमतः काबागृहाकडे जातो. काबागृहाच्या प्रवेशद्वाराजवळ असलेल्या काळ्या दगडावर (संगेअस्वद) आपले दोन्ही हाथ ठेवून तो चुंबन घेतो. नंतर तो काबागृहाला सात फेऱ्या मारतो. त्यानंतर इब्राहीमच्या स्थानावर तो दोन रकात नमाज अदा करतो. जेव्हा तो काबागृहाच्या बाहेर येतो तेव्हा तो 'सफा' नामक टेकडीवर चढतो. ही टेकडी काबागृहालगतच आहे.

टेकडीवरून तो काबागृहाकडे पाहतो आणि म्हणू लागतो, ''अल्लाह महान आहे - अल्लाह महान आहे. अल्लाहव्यतिरिक्त कोणीही ईश्वर नाही.'' नंतर ती व्यक्ती मुहम्मद (स.) यांच्यासाठी अल्लाहचा आशीर्वाद मागते व सफा टेकडीवरून उतरून दुसऱ्या समोरच्या टेकडीवर जिचे नाव 'मरवा' आहे चढते. मरवा टेकडीवरूनसुध्दा तीच प्रार्थना म्हटली जाते जी 'सफा' टेकडीवर म्हटली होती. दोघांमध्ये सात फेऱ्या मारल्या जातात. त्यानंतर ती व्यक्ती मक्का शहरात राहू लागते आणि ज्या ज्या वेळी संधी मिळाली काबागृहाकडे धाव घेते. यात्रेच्या सातव्या दिवशी सर्व हाजी लोक काबागृहात एकत्र येतात आणि इमाम (नेता) चे व्याख्यान ऐकतात. सुमारे साडेचार हजार वर्षांपूर्वी इब्राहीम (अ.) आणि त्यांचे सुपुत्र इस्माईल (अ.) या पितापुत्रांच्या शुभहस्ते काबागृहाचे बांधकाम पार पडले. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

''आणि स्मरण करा की जेव्हा इब्राहीम आणि इस्माईल या गृहाच्या भिंती उभारीत होते व प्रार्थना करीत होते की हे आमच्या पालनकर्त्या, आमच्याकडून या सेवेचा स्वीकार कर.''

काबागृहाची स्थाननिश्चिती आणि काबागृहाचे बांधकाम या दोन्ही गोष्टी अल्लाहकडून निवडल्या गेल्या आहेत. कुरआनोक्ती आहे,

''स्मरण करा ती वेळ जेव्हा आम्ही इब्राहीम (अ.) साठी या पवित्र काबागृहाची जागा योजिली होती.'' (२२:२६)

जेव्हा त्या पवित्र काबागृहाचे बांधकाम पूर्ण झाले लोकांना हजयात्रा करण्याचा आदेश देण्यात आला. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

''आणि लोकांमध्ये हजयात्रेची आम घोषणा करा'' (२२:२७)

या पवित्र काबागृहाचे महत्त्व आणि उद्देश स्पष्ट करताना अल्लाहने कुरआनमध्ये स्पष्ट नमूद केले आहे,

''आणि या काबागृहाला आम्ही साऱ्या लोकांसाठी 'मध्यवर्ती शांतीस्थान' निश्चित केले आणि लोकांना आदेश दिला की इब्राहीम ज्या ठिकाणी प्रार्थनेसाठी उभा राहतो त्या स्थानाला कायमस्वरूपी नमाजचे स्थान बनवा आणि इब्राहीम व इस्माईलला आदेश दिला की माझ्या या घराला परिक्रमा आणि एकांतवास तसेच रुकूअ व सजदा करणाऱ्यांसाठी (नमाजसाठी) स्वच्छ (पवित्र) ठेवा.'' (२:१२५)

''निःसंशय सर्वप्रथम उपासनास्थळ जे मानवांकरिता बांधण्यात आले ते तेच आहे जे मक्का शहरी विद्यमान आहे. त्याला मांगल्य व समृध्दी दिली गेली आणि सर्व

जगवासियांकरिता मार्गदर्शनाचे केंद्र बनविले गेले.'' (३:९६)

''आठवा ती वेळ जेव्हा आम्ही इब्राहीम (अ.) साठी या काबागृहाची जागा योजिली होती (या आदेशासह) की माझ्यासमवेत कोणासही भागीदार करू नका आणि माझ्या घराची पवित्र प्रदक्षिणा करणाऱ्या, उभे राहणाऱ्या आणि झुकणाऱ्या व नतमस्तक होणाऱ्यांसाठी पवित्र ठेवा, आणि लोकांत हजयात्रेची आम घोषणा करा. की त्यांनी तुमच्यासाठी प्रत्येक लांबवरच्या ठिकाणाहून पायी व उंटावर स्वार होऊन यावे.'' (२२:२६-२७)

अशा प्रकारे मक्का शहरी विद्यमान काबागृहाला अल्लाहने मांगल्य आणि समृध्दी प्रदान केली आहे. त्याला सर्व जगवासियांकरिता मार्गदर्शनाचे केंद्र बनविले आहे. तसेच नमाजसाठीचे आणि एकेश्वरत्वाचे केंद्र बनविले आहे. आपण या सर्व बाबींचा विचारपूर्वक अभ्यास केला तर उमजून येईल की ही वैशिष्ट्ये एकमेकांत गुंफलेली आहेत. मार्गदर्शनाचे केंद्र हे प्रार्थना केंद्र असणारच, अशा स्थानाला मांगल्य आणि समृध्दी राहणारच कारण ते एकेश्वरत्वाचे केंद्र आहे.

आपण यापूर्वीच एकेश्वरत्वावर आणि श्रध्दाशीलतेवर सविस्तर चर्चा केली आहे. उपासनापध्दती व्यावहारिकतेत धर्माचे मूलतत्त्व आहे. काबागृह हे केंद्र आहे जिथे प्रार्थना आणि एकेश्वरत्वाची एककेंद्राभिमुखता आहे. म्हणून हे म्हणणे योग्य आहे की काबागृह हे धर्माचे केंद्रिय स्थान आहे आणि याच कारणामुळे अल्लाहने काबागृहाला 'अल्लाहचे घर' म्हणून कुरआनमध्ये संबोधिले आहे. म्हणून काबा हे गृह अथवा केंद्र आहे ईशधर्माचे!

हे पवित्र घर इब्राहीम (अ.) यांनी बांधले ते ईशधर्माचे आणि इस्लामचे केंद्र कसे बनले? या प्रश्नाचे उत्तर मिळण्यासाठी आपणास काबागृहाच्या बांधकामाची पार्श्वभूमी समजून घेतली पाहिजे. हे बांधकाम कधी पूर्ण झाले हे जाणून घेणेसुध्दा महत्त्वाचे आहे. काबागृहाचा हेतु साध्य करण्यासाठी कोणती व्यावहारिक पावले उचलली गेली याबद्दलची माहिती करून घेणे गरजेचे आहे. पार्श्वभूमी खालीलप्रमाणे आहे,

इब्राहीम (अ.) यांना त्यांच्या लोकांनी जेव्हा जबरदस्तीने स्थलांतर करण्यास भाग पाडले. त्यांनी त्यांचे घरदार सोडले आणि धर्माची शिकवण देण्यासाठी व सत्याचे आवाहन करण्यासाठी भटकंती सुरू केली. त्या ठिकाणी इब्राहीमच्या स्वप्नाची प्रसिध्द घटना घडली. त्यांना स्वप्न पडले की ते स्वहस्ते आपल्या पुत्राला बळी देत आहे. जेव्हा त्यांनी आपले हे स्वप्न आपल्या सुपुत्राला इस्माईलला सांगितले तेव्हा क्षणाचाही विलंबन न लावता इस्माईल (अ.) म्हटले, ''की पिताश्री आपण अल्लाहच्या आदेशाचे पालन करा, तुम्ही मला ईशपरायणशील पाहाल.'' इब्राहीम (अ.) यांनी आपल्या पुत्राला

जमिनीवर ओणवे केले आणि पुत्राच्या गळ्यावर सुरी ठेवली आणि पुत्राला बळी देणार तोच ईशवाणी झाली,

"इब्राहीम तुझे हात रोखून धर तू परीक्षेत पूर्ण उतरला, आम्ही इस्माईलच्या जागी एक मेंढरु देऊन इस्माईलची मुक्तता केली."

इब्राहीम (अ.) यांचे संपूर्ण आयुष्य अशा प्रकारच्या परीक्षांनी भरलेले होते. ही घटना त्यांच्या आयुष्यातील शेवटची परीक्षा होती. या अंतिम परीक्षेत ते उत्तीर्ण झाल्याने त्यांना ईशपारितोषिक बहाल करण्यात आले. अल्लाहने त्यांना शुभवार्ता दिली,

"मी तुला सर्व लोकांचा नेता म्हणून नियुक्त करीत आहे." (२:१२४)

इब्राहीम (अ.) यांना हे ईशपारितोषिक बहाल करण्याचा सोहळा काबागृहाच्या भिंती पितापुत्र बांधत असताना ईशआदेशाने (दिव्यप्रकटन) सुरू झाला. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"आणि आठवण करा जेव्हा अल्लाहने इब्राहीमकडून काही गोष्टींमध्ये परीक्षा घेतली आणि जेव्हा तो परीक्षेमध्ये पूर्ण उतरला तेव्हा अल्लाहने त्याला म्हटले "मी तुला सर्व लोकांचा नेता म्हणून नियुक्त करीत आहे." (२:१२४)

या ऐतिहासिक घटनेची दोन महत्त्वाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत,

(१) ईस्माइलला बळी देण्याची घटना मीना या ठिकाणी घडली जे मक्का शहराच्या अगदी जवळ आहे.

(२) इब्राहीम आणि इस्माईल (अ.) या पितापुत्रांनी स्वप्न साकार करताना जे धैर्य आणि ईशपरायणतेचे दर्शन घडविले ते मानवी इतिहासात अद्वितीय आहे. अल्लाहने यास इस्लाम (आज्ञाधारकता) म्हणून संबोधले आहे. कुरआनोक्ती आहे,

"सरतेशेवटी जेव्हा या दोघांनी आज्ञापालनात (इस्लाम) मान तुकविली आणि इब्राहीम (अ.) ने पुत्राला ओणवे केले." (३७:१०३)

काबागृह बांधण्याचा हेतु साध्य करण्यासाठी खालीलप्रमाणे मानवी इतिहासात त्या ऐतिहासिक घटना घडत गेल्या ज्यांची नोंद कुरआनने कायमस्वरूपी घेतली आहे.

त्या व्याख्यानात अल्लाहचे आदेश तसेच हजच्या विधीविधानांबद्दल माहिती दिली जाते. आठव्या दिवशी सर्व हाजी (यात्रेकरू) मीना या स्थळी रवाना होतात. मीना मक्का शहारापासून तीन मैलांच्या अंतरावर आहे. हाजी दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत तेथे राहतात. नंतर आराफात स्थळी रवाना होतात. 'आराफात' हे एक विस्तृत मैदान आहे. ते मक्कापासून बारा मैलाच्या अंतरावर आहे. दुपारच्या प्रार्थनेपूर्वी सर्व हाजीलोक

आराफात येथे एकत्र येतात. जेव्हा मध्यान्हानंतर सूर्य ढळायला लागतो तेव्हा पुन्हा एकदा इमाम (नेता) सर्वांना उद्देशून व्याख्यान देतो. त्यानंतर इमामच्या पाठीमागे सामुदायिकरित्या नमाज अदा केली जाते. इमामच्या पाठीमागे सर्वजण मध्यान्हीची (जुहर) आणि संध्याकाळ (असर) ची नमाज एकत्र अदा करतात. नमाज झाल्यानंतर सर्व हाजी लोक अशा प्रकारे स्थानापन्न होतात की त्यांचा इमाम 'जब्लेरहमत' नामक टेकडीजवळ असेल. इमाम उंटावर स्थानापन्न असतो आणि खाली उतरत नाही. काबागृहाकडे त्याचे (इमामचे) तोंड असते आणि तो सतत प्रार्थना करीत राहतो.

''हे अल्लाह! मी तुझ्या सेवेत हजर आहे, हे अल्लाह! मी हजर आहे!''

एक मोठा हाजी लोकांचा समुदाय इमामच्या मागे उभा राहतो आणि त्याच्यांसोबत प्रार्थना करीत राहतो. या वेळी इमाम आणखी एक छोटेखानी औपचारिक व्याख्यान देतो आणि हाजी लोक ऐकतात. सूर्यास्तापूर्वी हाजी लोक ''अल मुजदल्फा'' या ठिकाणी जातात आणि आपापल्या जागेवर विसावतात. त्यांचा इमाम 'कझा' नामक टेकडीजवळ थांबतो. सूर्यास्तानंतर इमामच्या मागे सर्वजण नमाज अदा करतात. येथे मगरीबची (सूर्यास्तानंतरची) आणि ईशाची (रात्रीची) प्रार्थना (नमाज) एकत्र अदा केली जाते. येथे सर्व हाजी लोक रात्रीचा मुक्काम करतात. दहाव्या दिवशी तिथे प्रात:काळची नमाज (फर्ज) अदा केली जाते. या नमाजनंतर प्रत्येक हाजी अल्लाहजवळ क्षमायाचना करतो. अल्लाहचे स्मरण करतो आणि म्हणत जातो,

''हे अल्लाह! मी तुझ्या सेवेत हजर आहे! हे अल्लाह! मी हजर आहे !''

सूर्य उगवल्यानंतर हाजी लोक मीनाकडे रवाना होतात. तिथे ते तीन सैतानाच्या खांबांना लहान दगड मारण्याचा विधी पार पाडतात. प्रत्येक खांबाला सात सात दगड मारले जातात आणि प्रत्येक वेळी म्हटले जाते की ''अल्लाह महान आहे.''

सैतानी खांबांना दगड मारून झाल्यानंतर हाजी लोक त्यांच्या ओठांवर असलेली उद्घोषणा (हे अल्लाह! मी तुझ्या सेवेत हजर आहे!...) करण्याचे बंद करतात. ह्यानंतर मीना येथे पशुबळी (कुर्बानी) दिले जातात. हा अनिवार्य विधी आहे. बळी (कुर्बानी) दिल्यानंतर हाजी डोक्याचे मुंडन करतात आणि एहेरामच्या स्थितीतून बाहेर येतात. पुन्हा एकदा ते काबागृहाचे सात फेरे मक्का येथे जाऊन पूर्ण करतात. आणखी एकदा हाजी सैतानी खांबांना दगड (सात/सात) मारण्याचा विधी ''अल्लाह महान आहे'' ही उद्घोषणा करताना पार पाडतात. आणि नंतर हाजी लोक मक्का येथे परत येतात आणि काबागृहाची परिक्रमा करतात. हा विधी (परिक्रमा) संपल्यानंतर हाजी लोक काबागृहाच्या प्रवेशद्वाराचे चुंबन घेतात आणि त्यांची छाती आणि चेहरा 'मुएतजम' या

ठिकाणी लावतात. मुएतजम हे ठिकाण काबागृहाचे प्रवेशव्दार आणि हजरे अस्वदच्या मध्यस्थानी आहे. काबागृहाच्या आच्छादनाला धरून हाजी भावनाविभोर होऊन काकुळतीने अल्लाहजवळ प्रार्थना करतात आणि क्षमायाचना करतात. त्यानंतर हाजी लोक मिश्र मन:स्थितीत (सुख–दु:खाच्या) आपापल्या घरी परतु लागतात. अल्लाहच्या घराचे प्रेम हृदयात साठवून आणि त्या काबागृहापासून दूर जाण्याचे दु:ख उरी बाळगून परतीचा प्रवास सुरू होतो.

हा अत्यंत संक्षिप्त असा 'हज' या उपासना विधीचा आढावा आपण येथे घेतला आहे. काही विधी असे आहेत की त्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेतल्यानंतरच त्या विधीचे महत्त्व स्पष्ट होते. यासाठी आपण थोडक्यात त्या उपासना विधींचा मागोवा घेऊ या.

(१) काबागृह :- याबाबत वरील विवेचनात अनेक दाखले आणि घटना आपल्यासमोर आलेल्या आहेत त्यातून वाचकाला स्पष्ट खुलासा होतो.

(२) सफा आणि मरवा टेकड्या :- या दोन्ही टेकड्यांबद्दल कुरआनमध्ये स्पष्ट दिव्य प्रकटन आलेले आहे,

"नि:संशय सफा आणि मरवा अल्लाहच्या संकेतांपैकी आहेत." (२:१५८)

"अल्लाहच्या संकेतांपैकी" हे शब्द स्पष्टपणे अल्लाहची आज्ञाधारकता दर्शवितात. अल्लाहचे ते संकेतचिन्ह का आहेत? तर त्यासाठी आपणास इतिहासात डोकावून पाहावे लागेल. इतिहास साक्ष आहे की सफा आणि मरवा या त्या दोन टेकड्या आहेत ज्यांच्या दरम्यान माता हाजरा यांनी पाण्याच्या शोधात चकरा मारल्या होत्या. जमजम पाण्याचा झरा त्या दोन टेकड्याजवळच उदयाला आला.

(३) जमरात :- मीना शहराच्या लगतच तीन खांब आहेत. प्रत्येक खांबाला जमरा म्हणतात. त्याचे अनेकवचन जमरात आहे. हे ते स्थळ आहे जिथे सैतानाने इब्राहीम (अ.) यांच्या मनात दुष्प्रवृत्ती निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता जेव्हा ते आपल्या प्रिय पुत्राला बळी देण्यास निघाले होते.

हजयात्री आणि उपासना

आपण हजच्या प्रत्येक उपासनाविधीच्या खोलात जाऊन विचार केला तर कळून येईल की त्या प्रत्येकामागे अल्लाहला समर्पण होण्याची तीव्र भावना कार्यरत आहे.

(१) हाजी जे पवित्र वस्त्र हजकाळात अंगावर घेतात त्याला एहेराम म्हणतात, तो काही पोषाख मुळीच नाही. मनुष्याच्या दासत्वाचे व गुलामगिरीचे ते द्योतक आहे

आणि त्यागाचे प्रतीक आहे. जेव्हा भिकारी आपला कटोरा घेऊन कृपाळू धनाढ्य मनुष्यापुढे उभा राहतो तर त्याचे प्रत्यक्ष कपडे, हेतु आणि भावना वर्णन करण्यापलीकडचे असतात. त्याचे बाह्यरूप सर्व सांगून जाते. त्याचप्रमाणे हजयात्रीचे बाह्यरुप स्पष्ट दर्शविते की तो काहीएक नसून अल्लाहचा भिकारी आहे. तो सर्व भौतिक सुखे त्यागून ईशसमाधानाकडे आपले मन वळवितो. अल्लाहच्या विचाराने तो भारावून जातो आणि त्याच्यासाठी आपला त्याग करण्यासाठी तयारीत राहातो. हजच्या काळात तो अल्लाहचा भिकारी आणि अल्लाहचा शिपाई या दोन्ही भूमिकेत राहातो.

एहेरामचा दुसरा महत्त्वाचा फायदा जगाला दिसून येतो तो म्हणजे जगाच्या कानाकोपऱ्यातून आलेला प्रत्येक हाजी हेच साधे एहेरामचे वस्त्र अंगावर घालून असतो आणि उद्‌घोषणा करीत राहतो, ''अल्लाह मी तुझ्या सेवेत हजर आहे! हे अल्लाह, मी हजर आहे!'' त्या वेळी जग इस्लामी राष्ट्रीयत्व पाहून दंग राहते. आंधळासुध्दा पाहू लागतो की इस्लामी नाते हे जगातील इतर कोणत्याही नात्यापेक्षा सर्वश्रेष्ठ आहे. माणसाला दुसऱ्या माणसाशी एकत्र करणारे एकमेव बंधन इस्लामचे नाते आहे. जेव्हा सर्व आसमंत दुमदुमू लागतो,

''हे अल्लाह! मी तुझ्या सेवेत हजर आहे! हे अल्लाह, मी हजर आहे!''

ही उद्‌घोषणा हज काळात सर्व हाजी लोकांच्या ओठावर असते. काबागृह बांधताना अल्लाहने आदेश दिला, ''लोकांत हजयात्रेची आम घोषणा करा.'' या आदेशाचे पालन करताना त्यास प्रतिसाद ''हे अल्लाह मी हजर आहे!'' ही उद्‌घोषणा करून सर्व हजयात्री देत असतात.

(२) इब्राहीम (अ.) यांनी केलेली घोषणा काही औपचारिक नव्हती किंवा ती कर्मकांडाचा भाग नाही. इस्लामच्या तत्त्वाला आणि श्रध्दाशीलतेला बळकटी देण्यासाठीची ती संजीवनी आहे. म्हणूनच त्याला दिलेला प्रतिसाद ''हे अल्लाह! मी तुझ्या सेवेत हजर आहे! हे अल्लाह! मी हजर आहे!'' ही काही पोकळ घोषणा नाही. हे ते अभिवचन आहे जो दास आपल्या निर्माणकर्त्या प्रभु, अल्लाहला देतो आणि स्वत:ला अल्लाहसमोर समर्पित करतो.

(३) हजयात्री जेव्हा काबागृहाला प्रथम पाहतो तेव्हा त्याच्या नजरेसमोर त्याच्या बांधकामाचे पूर्ण दृष्य उभे राहाते. त्याला स्मरण होते की मी त्या राष्ट्राचा (जनसमुदायाचा) सदस्य आहे ज्याच्यासाठी इब्राहीम (अ.) यांनी प्रार्थना केली होती. त्या राष्ट्राला इब्राहीमने अल्लाहशी प्रार्थना करताना आज्ञाधारक (मुस्लिम) राष्ट्र म्हणून संबोधले होते. इब्राहीम (अ.) यांनी अशा राष्ट्रासाठी प्रार्थना केली होती की जो

अल्लाहला आणि त्याच्या धर्माला पूर्णतः समर्पित होऊन आज्ञाधारक (मुस्लिम) बनून राहील.

(४) जेव्हा हजयात्री आपले हात त्या काळ्या दगडावर ठेवतो तेव्हा त्याला वाटू लागते की तो आपले हात अल्लाहच्या हातात देऊन त्या प्रतिज्ञेला उजाळा देत आहे. अल्लाहला समर्पण, त्याची गुलामी आणि अल्लाहच्या आदेशांचे पालन करण्यासाठी प्रतिज्ञा! दोन्ही हात ठेवल्यानंतर त्या काळ्या दगडाचे चुंबन घेतले जाते. त्या वेळी हजयात्रीच्या मनात विचार येतात की अल्लाहला दिलेल्या अभिवचनाचा पुनरुच्चार करताना आपण आपल्या स्वामीजवळ आणि आपल्या निर्माणकर्त्या प्रभुसमोर, जो सर्व सृष्टीचा मालक, पालक आणि शासक आहे, तोच आपल्या उपासनेचा एकमेव हकदार आहे, याची प्रचिती येते. आपल्या प्रेमाचा आणि उपासनेला तोच एकमेव पात्र आहे. म्हणून तो हजयात्री जेव्हा काबागृहात प्रवेश करतो तेव्हा अल्लाहप्रती आपल्या प्रेमाचे प्रतीक म्हणून उंबरठ्याचे चुंबन घेतो. म्हणजेच काळ्या दगडाचे चुंबन घेतो, जो प्रवेशद्वाराजवळ आहे.

(५) तवाफ (परिक्रमा) म्हणजे काय? ते काहीएक नसून भावनेचे प्रकटीकरण आहे. त्या उत्कट भावनेचे आणि इच्छेचे की अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी स्वतःचा त्याग करणे, स्वतःचा बळी देणे. जेव्हा मुस्लिम काबागृहाची परिक्रमा करतो तेव्हा त्याला स्फुर्ती मिळते आणि उत्साह द्विगुणित होतो. हजयात्री आज्ञाधारकतेचा आणि ईशप्रेमाचा दृश्य रूप बनतो. तो स्वतःला विसरून जातो. तो अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करण्यासाठी स्वतःच्या जिवावरसुध्दा उदार होतो.

काबागृहाला परिक्रमा (तवाफ) करणे हे आणखी एका सत्याचे द्योतक आहे की अल्लाह एक आहे आणि अल्लाहचा धर्म एक आहे, त्याचप्रमाणे त्याचे श्रध्दावंत दास सर्व एक आहेत. जगाच्या कानाकोपऱ्यातून वेगवेगळ्या रंगाचे आणि वेगवेगळ्या कुळाचे लोक येथे एकत्र येऊन काबागृहाची परिक्रमा करताना एकरूप होतात.

(६) सफा आणि मरवा या दोन टेकड्यांमध्ये धावत जाण्याचा जो विधी आहे तो या हजयात्रेचा सर्वसंमत ठरावाचे प्रदर्शनच आहे की आम्हाला आदरणीय माता हाजरा यांचे ते कठीणतम परिश्रम आठवतात, जे त्यांनी अल्लाहचे आदेशपालन करण्यासाठी झेलले होते. तशाच प्रकारचे परिश्रम झेलण्यास आम्हीसुध्दा तयार आहोत.

(७) हजयात्रेच्या सातव्या दिवसापासून ते दहाव्या दिवसापर्यंत हजयात्री आपल्या इमाम (नेता) च्या अधिपत्याखाली असतो. ते एकत्र चालतात व एकत्र थांबतात. पहिल्या दिवशी ते सर्वजण इमामसह काबागृहात असतात. दुसऱ्या दिवशी

मीनामध्ये एकत्र येतात तर तिसऱ्या दिवशी सकाळीच 'आराफात'च्या विस्तृत मैदानात येतात. रात्री ते 'मुज्दलफा' येथे मुक्कामी असतात आणि पुढच्या दिवशी मीनामध्ये पुन्हा येतात. कधी ते आपल्या नेत्याचे व्याख्यान लक्षपूर्वक ऐकतात तर दुसऱ्याच क्षणी ''हे अल्लाह! मी तुझ्या सेवेत हजर आहे! हे अल्लाह मी हजर आहे!'' अशी उद्‌घोषणा करीत राहतात. सर्व हजयात्री आपापले हजविधीविधान व्यवस्थित आणि गांभिर्यपूर्व पार पाडण्यात मग्न असतात. ते कधी कधी दोन नमाज एकत्र करून अदा करतात. या सर्व घडामोडी एका शिस्तबध्द रीतीने चालत राहतात. हजयात्रेचे हे सर्व विधी शिस्तबध्द मिलीटरी जीवनाचे (शिस्तबध्द सैनिकी जीवनाचे) जगाला दर्शन घडवितात. हजच्या काळात प्रत्येक हजयात्री अल्लाहचा सैनिकच असतो, हे आपण वर पाहिले आहे. हा अलोट सैन्यसमुदाय जो एका पवित्र आणि साध्या वस्त्रात वावरत असतो त्यांना पाहून असे वाटते की एक महान सैन्यदल अल्लाहसाठी जीवदान देण्यास तत्पर आहे.

हज उपासनेचा हा दृष्टिकोन आणि उपासनेचे हे स्वरूप सिध्द करते की शिस्तबध्द सामुदायिक जीवन आणि सामुदायिक लष्करी आचरण व आज्ञाधारक (मुस्लिम) राष्ट्र या संकल्पना एकमेकास पूरक आहेत. अशा राष्ट्राची (आज्ञाधारक) सर्व शक्ती अल्लाहच्या सेवेत अल्लाहचा उद्देश साध्य करण्यासाठी आणि त्याच्या धर्माचे वर्चस्व स्थापित करण्यासाठी खर्च केली जाते.

(८) तीन स्तंभांना दगड मारणे हा विधीसुध्दा त्या अद्वितीय ऐतिहासिक घटनेची आठवण करून देतो. अब्राहा नामक राजाच्या बलाढ्य सैन्यदलाची पक्ष्यांनी आपल्या चोंचीतून त्यांच्यावर आकाशातून वर्षाव केल्याने दाणादाण उडाली होती. काबागृहाला तोडण्यासाठी हा राजा आपल्या बलाढ्य सैन्यदलास घेऊन आगेकूच करीत असताना आकाशातून पक्ष्यांनी त्यावर गारगोटींचा वर्षाव केला होता. हा विधी पार पाडताना हजयात्री ''अल्लाह महान आहे'' अशी जी घोषणा करीत जातो ते म्हणजे जगाला त्यांनी दिलेले आव्हान आहे, या दृढनिश्चय आणि सर्वसंमत ठरावाचे की जर कोणी या ईशधर्मावर वाकडी नजर टाकली तर त्यांचा विनाश निश्चित आहे. ही हजयात्रेकरूंची जाहीर घोषणा आहे की जो कोणी या पवित्र काबागृहावर चाल करून आला तर त्याला चिरडले जाईल.

(९) ईदुल अजहा हा सण दरवर्षी मानवी इतिहासातील त्या श्रेष्ठतम आणि अद्वितीय अशा बलिदानाची आठवण करून देत आहे. अल्लाहने एक मोठे बलिदान इस्माईल (अ.) यांच्यासाठी दिले आणि त्यांची सुटका केली. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

''आम्ही एक मोठे बलिदान देऊन त्या मुलाची सुटका केली.'' *(३७:१०७)*

पशुचे अल्लाहच्या मार्गात बलिदान देणे म्हणजे स्वत:चे बलिदान देण्यासारखे आहे. अल्लाहने जेव्हा कधी त्यांना आपल्या जिवाचे बलिदान देण्यास सांगितले तर ते त्वरित तयार होतील कारण त्याचे संपूर्ण जीवन हे अल्लाहला समर्पित असते. पशुंना बळी देताना त्यांचे रक्त बाहेर पडते ती निशाणी आहे की आपणसुध्दा स्वेच्छेने रक्त सांडवू जेव्हा अल्लाहने तसा आदेश दिला. या बलिदानाचा दुसरा तिसरा काहीएक हेतु नाही. अन्यथा पशुची निव्वळ कत्तल धार्मिक अथवा चांगले कृत्य होऊच शकत नाही.

''त्यांचे मांसही अल्लाहला पोहचत नाही आणि त्यांचे रक्तदेखील नाही, परंतु त्याला तुमची निष्ठा पोहचते.'' (२२:३७)

अशा प्रकारे हजविधींचा अभ्यास केल्यावर हे स्पष्ट होते की त्या प्रत्येक विधीमध्ये अल्लाहची आज्ञाधारकता आणि अल्लाहला समर्पण (शरण) जाण्याची वृत्ती स्पष्ट दिसून येते. विशेषत: अल्लाहच्या मार्गात प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची (जिहाद) जिद्द जाणवते जे सर्वश्रेष्ठ असे समर्पण आहे. शरणागती आहे. व्यावहारिक आणि बौध्दिकदृष्ट्या संपूर्ण हजविधी हे सामूहिकरित्या अल्लाहच्या मार्गात प्रयत्नांची पराकाष्ठा (जिहाद) करण्याचे एक उत्तम असे दृष्य स्वरूप आहे.

आदरणीय माता आयशा यांनी एकदा प्रेषित मुहम्मद (स.) यांना विचारले, 'जिहाद' (धर्मयुध्द) एक सर्वश्रेष्ठ कृती आहे. आम्हा स्त्रियांना त्यात भाग घेण्यापासून का रोखले गेले आहे? प्रेषितांनी उत्तर दिले, ''स्त्रियांसाठी जिहाद (सर्वश्रेष्ठ कृती) हा आहे की त्यांनी पूर्णपणे निर्दोष हजयात्रा करावी.'' (बुखारी)

हजयात्रेचे सर्वसमावेशक गुण

वर उल्लेखित हजयात्रेच्या गुणाबद्दल विचार करताना आपण वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिल्यास लक्षात येते की हजयात्रा एक उत्तम उपासनापध्दती आहे कारण,

(१) हजयात्रेत प्रार्थनेचा (नमाजचा) समावेश आहे. प्रार्थना (नमाज) दुसरे तिसरे काही नसून अल्लाहचे स्मरण आहे. आपण हे पाहिले आहे की हजयात्रेच्या काळात हाजी लोक अल्लाहचे पूर्ण स्मरण करीत असतात. नमाजमध्ये मग्न राहतात.

(२) हजयात्री आपल्या बलिदान दिलेल्या पशुचे मांस गरिबांमध्ये वाटतो. गरिबांचा हिस्सा देणे प्रत्येक हजयात्रीवर बंधनकारक आहे.

''स्वत:देखील खावे आणि अडचणीत असलेल्या वंचित लोकांनासुध्दा द्यावे.'' (२२:२८)

हजयात्रेवर धन खर्च करण्याचा एकमेव उद्देश अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करणे हा आहे. या उद्देशाव्यतिरिक्त हजयात्रा सफल ठरत नाही. तशीच जकातसुध्दा अल्लाहच्याच प्रसन्नतेसाठी दिली जाते.

(३) हजयात्रेत उपवासाचे तत्त्व कार्यान्वित केलेले आहेत. उपवासकाळात दिवसा आपल्या पत्नीशी शरीरसंबंध ठेवणे निषिध्द आहे, पण हजयात्रेच्या काळात पूर्णत: हे निषिध्द केले आहे. हजयात्रेत खाण्यावर बंदी नाही, परंतु उपवासात खाणे पिणे निषिध्द आहे. परंतु हजयात्रेत साज-शृंगार आणि सुंगध निषिध्द केले आहे. अशा प्रकारे मनोकामनांना नियंत्रणात ठेवण्याचे कार्य उपवास या उपासनापध्दतीप्रमाणे हजयात्रेतसुध्दा केले जाते.

(४) काबागृहाची इमारत अल्लाहच्या एकेश्वरत्वावर उभी आहे. काबागृहाकडे पाहून मुस्लिम आपली श्रध्दा आणखी दृढ करतो. हजयात्रेचे सर्व विधी अल्लाहच्या एकेश्वरत्वावरील विश्वास आणखी दृढ करतात. सतत करण्यात येणारी उद्घोषणा, "हे अल्लाह! मी तुझ्या सेवेत हजर आहे! हे अल्लाह! मी हजर आहे!" तसेच काळ्या दगडाचे चुंबन घेणे, काबागृहाची परिक्रमा, सफा मरवा दरम्यान धावणे, जनावरांचा बळी (कुर्बानी) देणे इ. सर्व उपासनाविधी अल्लाहच्या एकेश्वरत्वाला बळकटी देणारे आहेत.

(५) हजयात्रमध्ये सैतानाच्या अडथळ्यांचेसुध्दा स्मरण करून दिले जाते. मीना येथे सैतानी खांबांना लहान लहान दगड मारणे हे कृत्य हाजी लोकांच्या मनात इब्राहीम (अ.) यांच्यासारखा एकेश्वरत्वाचा दृढविश्वास जागृत करते.

(६) हजयात्रेने लोकांच्या मनावर धर्मशीलता व नैतिकतेची प्रभावी आणि अद्वितीय छाप पडते. इतर गुणांसह हजयात्रेमुळे हाजी लोकांत अल्लाहबद्दल असीम प्रेम निर्माण होते. धैर्यशीलता, सहनशीलता, समाधानी वृत्ती, अल्लाहवर दृढ विश्वास, ईशइच्छेला शरण जाणे, तसेच भौतिक सुखाला गौणत्व देणे, समानता, बंधुता इ. सद्गुणांना बळकटी मिळते.

(७) या उपासनापध्दतीला (हजयात्रा) जो कोणी कमी लेखेल आणि पात्रता असूनसुध्दा हजयात्रेला जात नसेल तर अशी व्यक्ती धार्मिक जीवन जगत आहे असे म्हणणे निरर्थक आहे. ती हजयात्रेला जाण्यासाठी सक्षम आणि पात्र असूनसुध्दा जात नसेल म्हणजेच हजयात्रेच्या या उपासनापध्दतीला ती व्यक्ती कमी लेखत आहे. अशा स्थितीत त्या व्यक्तीच्या श्रध्दाशीलतेवर प्रश्नचिन्ह लागते, किंबहुना त्या व्यक्तीची श्रध्दा अपूर्ण ठरते. जी व्यक्ती योग्यता असल्यास हजयात्रा लवकरात लवकर पार पाडते, ती व्यक्ती आपल्या श्रध्दाशीलतेला बळकटी देते आणि इस्लामच्या श्रध्देचा पाया मजबूत

करून घेते.

अशा प्रकारे हजयात्रेचा प्रत्येक उपासनाविधी एक विशिष्ट आणि स्वतंत्र महत्त्व ठेवून आहे. आपणास हे कळले आहे की हे काही कर्मकांड नाही तर ते सदाचाराचे आणि अल्लाहच्या उपासनेचे प्रेरणास्रोत आहेत. प्रत्येक विधी अल्लाहच्या आज्ञाधारकतेत आणि अल्लाहजवळ शरणागती पत्करण्यात आपापला हिस्सा उचलत आहे. अल्लाहच्या आज्ञाधारकतेमध्ये (मुस्लिम) पूर्णत्व आणण्यासाठी हे सर्व विधी अत्यंत प्रभावी भूमिका पार पाडत आहेत. प्रत्येक विधी स्वत:ची भूमिका स्वत: पार पाडतो, दुसरा विधी त्याची जागा घेऊच शकत नाही. हे सर्व उपासनाविधी एकत्रितपणे हाजीलोकांच्या हृदयात आणि मनमस्तिष्कावर इस्लामबद्दल पूर्ण समाधान रूजवतात. ईशइच्छेसाठी त्यांची हृदये मोकळी होतात. अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी अविरत परिश्रम करणारे मन तयार होते. अल्लाहची आज्ञाधारकता संपादन करण्यासाठी ते नेहमी अल्लाहचे आदेश तत्परतेने पालन करण्यास तयार होते. हजयात्रेच्या सर्व उपासनापध्दतींमध्ये अशा प्रकारे इस्लामच्या इतर उपासनापध्दतींचे गुणवैशिष्ट्य सामावलेले आहे. हजयात्रा हे इस्लामच्या आधारस्तंभांपैकी एक महत्त्वाचा आणि शेवटचा आधारस्तंभ आहे.

''हे अल्लाह! मी तुझ्या सेवेत हजर आहे! हे अल्लाह! मी हजर आहे!''

प्रकरण सहावे

इस्लाम : एक परिपूर्ण जीवनपद्धती

इस्लामच्या मूलतत्त्वांचा धावता आढावा घेतल्यानंतर आपण इस्लाम एक परिपूर्ण जीवनपध्दती कशी याबद्दल विचार करू या. ज्याप्रमाणे बी असेल त्याप्रमाणे झाड उगवणार. नेमके त्याचप्रमाणे धर्माच्या शिकवणी त्याच्या मूळ संकल्पनांशी सुसंगत असतात. दुसऱ्या शब्दांत, धर्मशिकवण मूलसंकल्पनांचे प्रतिबिंब आहे. इस्लामच्या शिकवणीबद्दल पूर्णत: अभ्यास करावयाचा असेल तर इस्लामच्या मूळ संकल्पनाविषयी जाणून घेणे आवश्यक आहे.

धार्मिक संकल्पना

जगात सध्या तीन प्रमुख धार्मिक संकल्पना प्रचलित आहेत,

(१) एका संकल्पनेनुसार हे जग बंदी शाळा आहे. मनुष्याचे शरीर पिंजरा आहे. त्याच्या इच्छा–आकांक्षा म्हणजेच त्या पिंजऱ्याचे गज आहेत. एखाद्या व्यक्तीला या तुरुंगातून मुक्ती तुरूंगाच्या भिंती तोडल्यानंतरच मिळते. याचप्रमाणे व्यक्तीचा आत्मा मुक्त अथवा स्वतंत्र त्याच वेळी होईल जेव्हा ती व्यक्ती आपल्या हाताने शरीररूपी तुरूंगाचे गज तोडेल. याचाच दुसरा अर्थ असा आहे की त्या व्यक्तीने या जगाचा सन्यास घ्यावा आणि देवाशी तादाम्य पावण्यासाठी एकांतवास पत्कारावा. त्यांने स्वत:च्या इच्छा–आकांक्षांना मारून टाकावे आणि अशा प्रकारे ईश्वर आणि स्वत:च्या दरम्यानचा पडदा फाडून ईशसान्निध्य प्राप्त करून घ्यावे. या परिस्थितीत व्यक्तीला विद्यमान जगाचा त्याग करावाच लागतो.

धर्माची ही संकल्पना आणि उपासनापध्दत म्हणजेच संन्यासी जीवनपध्दत, तपस्वी अथवा सर्वसंग परित्यागी जीवनपध्दती होय. याचे दुसरे नाव 'योग' आहे (योगिक जीवनपध्दत).

(२) दुसऱ्या धार्मिक संकल्पनेत इंद्रियदमन अथवा सर्वसंग परित्याग नाही. या पध्दतीत ईश्वराची उपासना असते आणि मानवी इच्छा–आकांक्षाचे मर्यादित स्वरूपात पालन होते आणि क्षणिक सुखांचा उपभोग घेता येतो. व्यक्तिगतरित्या धर्माचरण करण्यासाठी विशिष्ट आदेश पाळले जातात. व्यक्तिगत जीवनापलीकडे तो सार्वजनिक जीवनात स्वतंत्र असतो. या संकल्पनेनुसार धर्म आणि उपासनापध्दत ही व्यक्तिगत बाब आहे आणि समाजाशी त्यांचा अजिबात संबंध नाही. धर्म फक्त व्यक्ती आणि ईश्वर

यांच्यातील संबंध आहे. मनुष्याच्या सामाजिक जीवनात धर्माची ढवळाढवळ होऊच शकत नाही. मनुष्याच्या क्षणिक जीवनात तो जे इच्छिल ते करू शकतो. जी पध्दत त्याला आवडते तिचा स्वीकार तो करील. धर्म आणि ईश्वर त्यामध्ये हस्तक्षेप करणार नाहीत.

(३) तिसऱ्या संकल्पनेत इंद्रियदमन आणि सर्वसंग परित्याग यांना चुकीचे ठरविले आहे. यात उपासना ही व्यक्तिगत बाब आहे, या मताला खोडून काढले आहे. तसेच धर्म ही व्यक्तीगत बाब आहे यालासुध्दा चुकीचे ठरविण्यात आले आहे. या संकल्पनेनुसार सत्य हे वेगळे आहे. प्रार्थनेच्या स्थळी, बाजारात, कार्यालयात, शेतात, दुकानात, घरात, घराबाहेर कुठेही तसेच राजकारणात, अर्थकारण, समाजकारण सर्व ठिकाणी तो धार्मिक कृत्य पार पाडत असतो आणि ईश्वर उपासना करीत असतो. तो जीवनाच्या सर्व क्षेत्रांत धर्म व उपासनापध्दतीला टाळू शकत नाही. तसेच त्याच्या मनाप्रमाणे वागू शकत नाही. त्याला जी काही योग्यता आणि शक्ती दिली गेली आहे, ती उपासनेसाठीच दिली आहे. या योग्यता आणि शक्तींचे दमन या संकल्पनेत होत नाही. धर्मश्रध्दा आणि उपासना व्यक्तीला त्याच्या व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवनात दिव्य प्रकटनांच्या आधारे मार्गदर्शन करतात. ती व्यक्ती जर अल्लाहची उपासना पवित्र स्थळी करीत आहे तर ती बाहेरच्या जगातसुध्दा उपासनापध्दतीला कार्यान्वित करणार. अल्लाहने जे आदेश दिले त्याला पाळणार आणि ज्यापासून रोखले त्यापासून ती व्यक्ती स्वत: ला रोखणारच. त्याचे या जगातील जीवन दिव्य प्रकटनाद्वारे नियंत्रित होते.

संन्यास

वैराग्य इस्लामला मान्य नाही. इस्लामला वरील तीन संकल्पनांपैकी प्रथम संकल्पना अजिबात मान्य नाही. इस्लामची तत्त्वे या संकल्पनेच्या पूर्ण विरोधात आहेत. इस्लामची आचारप्रणाली, श्रध्दा आणि मूलकर्तव्ये सर्वप्रथम या संकल्पनेच्या विरोधात जातात. त्याची स्पष्ट कारणे खालीलप्रमाणे आहेत.

(१) इस्लाम धर्मात अल्लाहबद्दलची संकल्पना ही फक्त 'खरा प्रियतम'ची नाही तर ती 'खरा मालक' आणि 'खरा कायदे करणारा' अशी आहे. जर अल्लाहला फक्त 'खरा प्रियतम' मानले तरच वैरागी आणि संन्यासी जीवन पुढे येते. परंतु इस्लामच्या जीवनपध्दतीत अल्लाह मालक, शासक आणि पालक आहे. अल्लाहजवळ त्याच्या निर्मितीसाठी काही कायदे आणि दिव्य मार्गदर्शन आहे. म्हणून मनुष्याने फक्त अल्लाहच्या प्रेमात अथवा अल्लाहच्या भीतीपोटी स्वत:ला विसरून जाणे पुरेसे नाही. तर हे तितकेच महत्त्वाचे आहे की त्या व्यक्तीने आचरणातून स्वत:ला अल्लाहचा आज्ञाधारक सिध्द

करण्यासाठी अल्लाहच्या ईशआदेशांचे पालन करावे.

(२) इस्लामच्या मूलतत्त्वांना आचरणात आणण्यासाठी सामाजिक जीवन अत्यावश्यक आहे. संन्यासी संकल्पनेत सार्वजनिकतेला अजिबात थारा नाही. इस्लामच्या मुख्य कर्तव्यांना जर जीवनव्यवहारात पार पाडले जात नसेल तर अशा व्यक्तीकडून इस्लाम पूर्ण रूपात आपल्या जीवनव्यवहारात आचरणात आणणे अशक्य आहे.

(३) इस्लामचे आधारस्तंभ हे सर्व खरे तर प्रार्थनेच्या स्वरूपात आहेत. परंतु त्याच वेळी त्या प्रार्थनेत अनेक सामाजिक मूल्ये आणि राष्ट्रीय व्यवहार्यता समाविष्ट असतात. म्हणूनच इस्लामचे आधारस्तंभ (प्रार्थना) वैयक्तिकरित्या नव्हे तर सामुदायिकरित्या अदा केले जातात. एकीकडे इस्लामच्या मूळ कर्तव्यामुळे इस्लामी चरित्र जे साकार होते ते संन्यास, वैराग्य आणि सर्वसंग परित्यागच्या विरुध्द आहे. दुसरीकडे व्यक्तीजर सामुदायिकरित्या (जमात) नव्हे तर एकटाच दररोजची नमाज अदा करत असेल आणि जकात देत असेल तर यामुळे इस्लामला अभिप्रेत आणि अपेक्षित परिणाम मुळीच मिळणार नाहीत. अशा परिस्थितीत, अधिक काय सांगावे, प्रार्थनेचे उच्च टोक जरी एखाद्याने पटकावले तरी अल्लाहच्या उपासनेचा हक्क पूर्णतः ती व्यक्ती पार पाडूच शकत नाही.

(४) इस्लामच्या पाच मुख्य कर्तव्यांना इस्लामचा आधार स्तंभ म्हटले आहे आणि 'पूर्ण इस्लाम' असे संबोधण्यात आलेले नाही. हे सत्य येथे जाणून घेणे अत्यावश्यक आहे. याचाच अर्थ असा होतो की इस्लामची ही पाच मुख्य कर्तव्ये म्हणजे इस्लाम नव्हे. आणखी काही प्रमुख बाबींचा समावेश त्यात आहे. इमारत स्तंभाविना उभी राहिली असे आपण म्हणू शकत नाही. इमारतीचे आधारस्तंभ म्हणजेच इमारत हे म्हणणे सुध्दा चुकीचे त्याच प्रमाणे इस्लामची पाच आधार स्तंभ म्हणजे पूर्ण इस्लाम नव्हे. एखाद्याच आधारस्तभाला (उदा. नमाजला) फक्त इस्लाम कदापि म्हटले जाऊ शकत नाही. इमारत खांब, भिंती आणि छत मिळून तयार होते. त्याचप्रमाणे इस्लाम धर्माचे आहे. इस्लाम धर्माचे छत हे त्याची शिकवण आहे जी पाच मूळ कर्तव्यांसोबत जीवनव्यवहारात आचरणात आणली जाते. त्यांना वैयक्तिकरित्या (एकटे) आचरणात आणणे हे तितकेच कठीण कृत्य आहे जितके वाळूत पोहणे. एकटेपणा हा इस्लामला पूर्ण न्याय देऊच शकत नाही. सामुदायिकपणा हा इस्लामच्या कर्मशीलतेचा गाभा आहे. इस्लामच्या पाच मूलतत्त्वांना (मूलाधार) पूर्ण न्याय देणे आणि इस्लामला पूर्णतः कृतीशील आचरणात आणणे या दोन गोष्टी भिन्न भिन्न आहेत.

इस्लाम आणि वैराग्य व संन्यासचा दूरदूरचासुध्दा संबंध नाही. प्रेषित मुहम्मद (स.) यांचे स्पष्ट म्हणणे आहे,

''इस्लाममध्ये वैराग्याला अजिबात स्थान नाही.''

एकदा प्रेषित मुहम्मद (स.) यांच्याकडे उस्मान बिन माजून यांनी स्वत:हून वैराग्य पत्करण्यासाठी परवानगी मागितली तेव्हा नकार देत प्रेषित म्हणाले,

''वैराग्याऐवजी अल्लाहने आपणास एक साधा सरळ मार्ग दिला आहे आणि इब्राहीमचा धर्म दिला.''

अशा प्रकारे ख्रिस्ती धर्मात वैराग्याला सदाचार आणि ईशभक्तीचा उच्चांक समजला जातो, त्याला इस्लामने रद्दबातल ठरविले आहे. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

''आणि त्या सर्वानंतर मरयमपुत्र ईसा (अ.) ला पाठविले आणि त्याला इंजील (बायबल) प्रदान केले, आणि ज्या लोकांनी त्याचे अनुयायित्व स्वीकारले त्यांच्या हृदयात आम्ही करूणा आणि दया घातली, आणि वैराग्य त्यांनी स्वत:च काढले, आम्ही ते त्यांच्यासाठी कर्तव्य म्हणून ठरविले नव्हते, परंतु अल्लाहच्या प्रसन्नतेच्या शोधात त्यांनी स्वत:च ही बिदअत (कुप्रथा) काढली.'' (५७:२७)

वरील ईशवाणीने हे स्पष्ट झाले की इस्लामच फक्त वैराग्याचा धिक्कार करणारा एकमेव धर्म नाही तर इतर ईश्वरीय धर्म सुध्दा वैराग्याचा त्याग करतात. जो कोणी वैराग्य आणि सन्यास पत्करतो, तो स्वत: आपल्यातर्फे तसे करतो. कोणत्याच ईश्वरी धर्माने वैराग्याचे समर्थन केलेले नाही.

ज्याप्रमाणे ईश्वरी धर्म आणि त्याची मूलभूत तत्त्वे वैराग्याच्या विरोधात आहेत, त्याचप्रमाणे त्या ईश्वरी धर्माची शिकवणसुध्दा वैराग्य तथा संन्यासच्या विरोधात आहे. याचमुळे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी अशा सर्व कृत्यांना निषिध्द ठरविले आहे जी वैराग्याशी साम्य राखतात अथवा वैराग्याला प्रोत्साहन देतात. म्हणूनच ब्रम्हचर्य, खच्चीकरण अथवा वैराग्य घेणे, निरंतर उपवास अथवा अन्नत्याग, मौन धारण करणे, रात्रभर जागरण करणे इ. कृत्ये जी शरीराला त्रासदायक आहेत आणि त्या व्यक्तीच्या कुटुंबाच्या हक्कांना पायमल्ली करणारी आहेत. ही सर्व कृत्ये अवैध ठरविण्यात आली आहेत.

इस्लामचे वैयक्तिक जीवन

दुसरी ही संकल्पनासुध्दा इस्लामला मान्य नाही. इस्लाम काही असा धर्म मुळीच नाही जो ईश्वर आणि मनुष्याच्या संबंधांना वैयक्तिक बाब समजतो. तसे असते तर

इस्लामच्या सर्व शिकवणी वैयक्तिक जीवनाच्या समस्या सोडविण्यासाठीच मर्यादित असत्या. मग फक्त मशिदपुरते, उपवासापुरते अथवा काही नैतिक मूल्यांचा फक्त इस्लाम धर्मात उल्लेख असता. परंतु कुरआन आणि हदीसचे प्रत्येक पान अन् पान ग्वाही देत आहे की इस्लाम धर्म फक्त वैयक्तिक बाब नाही. इस्लाम फक्त नमाज अथवा इतर उपासनापध्दतीचे नीतीनियम आणि वैयक्तिक जीवनाचे नीतीनियमच देत नाही. इस्लाम मनुष्यजीवनाच्या सर्व क्षेत्रांत मार्गदर्शन करते. आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, शासकीय, सामाजिक क्षेत्रात कुरआनने मानवी जीवनव्यवहारासाठी नियम आणि मर्यादा घालून दिल्या आहेत. उदा. कुरआन व्यभिचार करणाऱ्याला शंभर फटके देण्याचा आदेश देत आहे. हा ईशआदेश शासनसंस्था, पोलीस आणि न्यायसंस्था यांच्याशी निगडीत आहे. हे सामाजिक कार्य आहे. परंतु कुरआननुसार हे दिव्य प्रकटन 'अल्लाहचा धर्म आहे.' कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"व्यभिचारी स्त्री व व्यभिचारी पुरूष दोहोंपैकी प्रत्येकास शंभर फटके मारा, आणि त्यांची कींव करू नका, अल्लाहच्या धर्माच्या बाबतीत जर तुम्ही सर्वश्रेष्ठ अल्लाह आणि अंतिम दिनावर श्रध्दा बाळगत असाल आणि त्यांना शिक्षा देतेवेळेस श्रध्दावंतांचा एक समूह उपस्थित असावा." (२४:२)

अशा प्रकारे वरील दिव्य प्रकटना नुसार शंभर फटके व्यभिचारी व्यक्तीला मारणे हा 'अल्लाहच्या धर्माचा' एक भाग आहे. हे कृत्य धर्माच्या बाहेरचे मुळीच नाही. त्याच प्रमाणे कुरआन नुसार वर्षातील चार महिने पवित्र मास आहेत (पवित्र चातुर्मास) आणि त्या काळात युध्द करणे निषिध्द आहे. कुरआनचा हा आदेश युध्दशास्त्राबाबतचा आहे. तसेच सामाजिक प्रश्नाशीसुध्दा निगडीत आहे. परंतु कुरआन यास 'योग्य धर्म' म्हणून संबोधते. कुरआनचे खालील दिव्य प्रकटन आहे,

"वस्तुस्थिती अशी आहे की, महिन्यांची सख्या, ज्या दिवसापासून अल्लाहने पृथ्वी व आकाशांना निर्माण केले आहे, अल्लाहच्या लेखी बाराच आहेत आणि त्यापैकी चार महिने अवैध आहेत. हाच योग्य धर्म आहे." (९:३६)

या चार महिन्यांचे पावित्र्य राखण्याचा आदेश आणि युध्दाने त्यांचे पावित्र्यभंजन न करण्याचा आदेश हे कृत्य धर्माचा एक भाग आहे आणि त्यात धर्मबाह्य असे काहीही नाही. कुरआन फक्त इस्लामचे सामाजिक कायदे आणि समाज यांना 'धर्म' ही संज्ञा देत नाही तर इतर धर्माच्या सामाजिक कायद्यांना आणि समाजास 'त्यांचा धर्म' म्हणून संबोधतो. कुरआनोक्ती आहे,

"त्याचे हे काम नव्हते की बादशाहच्या धर्मात (मिस्त्रच्या शाही कायद्यात)

आपल्या भावाला पकडावे.'' *(१२:७६)*

प्रेषित युसुफ (अ.) यांना हे शक्य नव्हते की त्यांच्या बंधुना मिस्रच्या शाही कायद्याद्वारे पकडावे. याचा अर्थच हा होतो की मिस्र देशाचा कायदा किंवा गुन्ह्यासंबंधीचा कायदा त्यांच्या बंधुना लागू होत नाही. कारण ते त्या देशाचे रहिवाशी नव्हते.

वरील उदाहरणे पुरेशी आहेत हे स्पष्ट करण्यासाठी की अल्लाहचा प्रत्येक आदेश आणि प्रेषित मुहम्मद (स.) यांची प्रत्येक हदीस इस्लाम धर्माचे अविभाज्य अंग आहे. त्यांच्यापैकी एकालासुध्दा धर्मबाह्य अथवा बाहेरचे म्हणू शकत नाही. इस्लाम जर अल्लाहला पूर्ण शरण जाणे आणि अल्लाहची आज्ञाधारकता स्वीकारणे आहे तर त्याचे काही आदेशांचे पालन करावयाचे आणि इतर आदेश आज्ञाधारकतेबाहेरचे म्हणून पालन करावयाचे नाही, हे कसे शक्य आहे?

वरील विवेचनाने हेच सिध्द होते की कुरआन आणि हदीस दोघांनी मनुष्याच्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनाला तसेच मनुष्य जीवनव्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्राला व्यापून टाकले आहे. आणि त्यासंबंधीचे सर्व दिव्य प्रकटने इस्लाम धर्माचा भाग आहेत. अशा परिस्थितीत आपण हे कसे सांगू शकता की इस्लाम व्यक्तिगत जीवनापुरताच आहे आणि सार्वजनिक जीवनाशी त्याचा काडीमात्र संबंध नाही?

इस्लाम : परिपूर्ण जीवनव्यवस्था

जर आपण एकदा मान्य केले की आता रात्र आहे आणि दुसऱ्या क्षणी म्हटले की आता दिवस आहे तर असे म्हणणे निरर्थक आहे. इस्लाम वैराग्याला मान्यता देत नाही आणि तो फक्त वैयक्तिक जीवनाचे प्रश्न हाताळत नाही. असे म्हटल्यावर इस्लामची वैशिष्ट्ये आणि तत्त्वे आपोआप सिध्द होतात. म्हणजे असा कोणताही प्रश्न नाही जो इस्लामच्या कक्षेबाहेरचा असावा. हा तो धर्म आहे जो मनुष्याच्या पूर्ण आयुष्याला व्यापून आहे. इस्लाम ही ती नियमावली आहे, ज्यातून मानवी जीवनाचा कोणताच भाग सुटत नाही. धार्मिक, बौध्दिक, नैतिक, व्यावहारिक असा कोणताही प्रश्न इस्लामच्या कक्षेबाहेरचा नाही. हवा जशी सर्व पृथ्वीला व्यापून आहे त्याचप्रमाणे इस्लाम संपूर्ण मानवी जीवन व्यापून आहे. आपण त्याचे महत्त्वाचे घटक पाहू या.

(१) इस्लाम धर्माचा प्रत्येक प्रभाग त्या व्यवस्थेच्या केंद्रस्थानी जोडलेला असतो. सर्व एकरुप असतात. हे केंद्रस्थळ म्हणजे 'श्रध्देची कलमे' होत, ज्यांचा आपण प्रकरण दोन मध्ये विचार केला आहे. त्यात म्हटले आहे की उपासना फक्त अल्लाहचीच केली

जावी. अल्लाहच खरा मालक, खरा शासक, खरा पालक आहे. अल्लाह सार्वभौम आहे. हे इस्लामचे मौलिक तत्त्व आहे, जो इस्लामी व्यवस्थेचा मूलाधार आहे. या व्यवस्थेच्या विभागास समजण्यासाठी त्याची तपशीलवार माहिती घेणे आवश्यक आहे.

(२) या व्यवस्थेला आपल्यावर लागू करणे हे मुस्लिम (आज्ञाधारक) समाजासाठी अनुषंगिक आहे. ज्या समाजमनात अल्लाहवर प्रगाढ विश्वास आहे आणि त्याच्या विशेष गुणांवर भरोसा आहे; तसेच तो समाज गांभीर्यपूर्वक प्रेषित्व आणि परलोकत्व यावर विश्वास ठेवून आहे; असा समाज इस्लामचा आज्ञाधारक आणि अनुयायी समाज आहे. या व्यवस्थेचे व्यवस्थित परीक्षण करण्यासाठी त्याचा अभ्यास इस्लामी समाज व्यवस्थेबरोबर होणे आवश्यक आहे. जसे तलवारीच्या धारेची पारख एक हुशार तरबेज तलवारबाजच करू शकेल त्याचप्रमाणे इस्लामी व्यवस्थेचे खरे परीक्षण इस्लामी समाज पूर्णतः अस्तित्वात आल्यानेच होणार आहे. या इस्लामी व्यवस्थेचे वेगवेगळे भाग एकमेकात गुंतलेले आहेत जसे मशीनचे वेगवेगळे भाग दिसायला वेगवेगळे दिसतात परंतु त्यांचे कार्य एक आहे. आता या वैशिष्ट्यांना लक्षात ठेवून आपण इस्लामी व्यवस्थेचा विचार करू या.

(१) आध्यात्मिक व्यवस्था

इस्लामी व्यवस्थेचा हा प्रभाग आहे जो मनुष्याच्या अंतरंग विश्वाला व्यापून टाकतो, याला सर्वसाधारणतः आध्यात्मिक व्यवस्था असे म्हटले जाते. ते मनुष्याच्या आत्म्याला स्वत्वच्या दासत्वापासून मुक्ती देण्याचे कार्य करते आणि आत्म्याला भौतिक लालसेपासून शुध्द करते. इस्लामची आध्यात्मिक व्यवस्था मनुष्याच्या आत्म्याला ईश्वराच्या प्रेमाने, आज्ञाधारकतेने आणि त्यांच्या प्रसन्नतेने भरभरून टाकते. व्यक्ती जेव्हा त्याच्या आवडीनिवडींना अल्लाहच्या आवडी निवडीशीं जुळवून घेते तेव्हा ती व्यक्ती इच्छा–आकांक्षांबाबत पावित्र्य प्राप्त करते. अल्लाहच्या आदेशानुसार ती आपले आचरण ठेवते. जणूकाही ती अल्लाहला आपल्या डोळ्यांसमोर पाहत आहे. त्याच्या नाराज होण्याला आणि अप्रसन्नतेला अशा प्रकारे भीत असते जणूकाही अल्लाह त्या व्यक्तीच्या सोबत आहे, प्रत्यक्षात अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी अतिदक्ष राहते. तहानलेला पाण्याला पाहून त्याकडे धाव घेतो, तसा मनुष्य आपले तन, मन, धन अल्लाहसाठी त्यागून देण्यासाठी सतत तयार राहतो. अशा प्रकारच्या उच्चतर आध्यात्मिकतेला 'इहसान' असे म्हटले जाते.

या प्रकारच्या पवित्र आणि ईशप्रसन्नतेच्या आध्यात्मिक स्थितीला प्राप्त करण्यासाठी जी पध्दत वापरली जाते त्यास 'इस्लामचे आधारस्तंभ' असे म्हणतात.

यांचा आपण मागील प्रकरणात सविस्तर अभ्यास केला आहे. ही मानसिकता तयार करण्यासाठी नमाज, उपवास, जकात आणि हज कशा प्रकारे सहाय्यक ठरतात हेसुध्दा आपण अभ्यासले आहे.

(२) नैतिक व्यवस्था

मनुष्याचे बाह्य आचरण हे अंतरंगाचे प्रतिबिंब असते. मनुष्याचा नैतिक दर्जा त्याच्या माणुसकी स्वभावावर परिणाम करतो. म्हणूनच आध्यात्मानंतर नैतिकतेला महत्त्व देण्यात आले आहे. मनुष्याच्या नैतिक आचरणाला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. नैतिकव्यवस्था हा धर्माचा अर्क आहे. आदरणीय प्रेषित मुहम्मद (स.) यांचे कथन आहे,

"मला या धरतीवर यासाठी पाठविण्यात आले आहे की मानवतेचा आदर्श बनावे." धर्मनिष्ठेचे दुसरे नाव नैतिक आचरण आहे.

याच कारणाने इस्लामने नैतिकतेविषयी तपशीलात जाऊन नैतिकतेवर अधिक भर दिला आहे. यासाठी इस्लामी समाजाचा स्वभाव विचारात घेणे आवश्यक आहे. इस्लामने चांगल्या व वाईट नीतीचे वर्गीकरण केले आहे का? काय त्यात परिस्थितीजन्य बदल अपेक्षित आहेत? या प्रश्नांची उत्तरे अगदी सहज देता येतील. इस्लाममध्ये नीतीबद्दलचे ध्येय-धोरण ठरविण्यासाठी मूलस्त्रोत अल्लाह आणि त्याचे प्रेषित मुहम्मद (स.) आहेत. हीच एक अशी उच्चतम शक्ती आहे जी प्रत्येक कृत्याचे नैतिक आणि अनैतिक अंग निश्चित करते. म्हणून हा प्रश्न इस्लाममध्ये उद्भवत नाही आणि हा कुणा व्यक्तीच्या बौध्दिकतेवर अथवा निर्णयावर अवलंबून मूळीच नाही. हे निर्विवाद सत्य आहे की काही प्रमाणात नीतीमत्ता समाजात सतत कार्यरत राहते. त्यामुळे नीतीमत्ता ही एकमेव इस्लामचेच वैशिष्ट्य नाही. इस्लामी नीतीमत्ता आणि इतर धर्मिय नीतीमत्ता असे वर्गीकरण करणे हास्यास्पद आहे. इस्लामने तर कोणतेच कृत्य या आधारावर चांगले किंवा वाईट ठरविलेले नाही की लोक त्या कृत्याला फार कालावधीपासून चांगले म्हणत आले आहे. त्यामागे जनाधार आहे किंवा मनुष्याच्या बौध्दिकतेवर अथवा अनुभवावर एखाद्या कृत्याला चांगले म्हणणे इस्लाम मान्य करीत नाही. इस्लाम एखाद्या गोष्टीबद्दल निर्णय स्वत:च्या नीतीनियमांनीच करतो. म्हणूनच जास्त प्रमाणातील समाजमान्य नीतीनियम असे आहेत ज्यांना इस्लामने पूर्वीच मान्यता दिली आहे. परंतु असे काही नीतीनियम आहेत ज्यांना इस्लाम मान्यता देतो, परंतु इतरांजवळ त्याबद्दल वेगळी मते आहेत. तसेच काहींना इस्लाम वाईट ठरवतो. परंतु इतर त्यांना चांगले समजतात. इस्लामजवळ एक शाश्वत अशी प्रणाली आहे जी वाईट आणि चांगल्याबद्दल निर्णय घेते.

म्हणूनच इस्लामी नीतीनियमांना आणि नैतिक व्यवस्थेला कायमस्वरुपी अधिष्ठान आहे. हे शाश्वत अधिष्ठान इस्लामच्या मौलिक तत्त्वांतून तयार झाले आहे. या मौलिक तत्त्वांवर परिस्थितीचा काहीएक परिणाम होऊ शकत नाही. सत्य आणि सदाचार हे नेहमीच उच्च स्थानी असतात. स्वत:ला नुकसान होत असेल तरी निर्णय दिला जातो. शत्रुशी दिलेले वचनसुध्दा तोडण्याची परवानगी नाही. इस्लामी नैतिकतेला आचरणात आणण्यासाठी एक अंगभूत व्यवस्था सतत कार्यरत आहे. त्याला इस्लामी चारित्र्य म्हटले जाते. मौलिक महत्त्वाच्या इस्लामी नीतीनियमांचा आपण येथे आढावा घेऊ या. कुरआनोक्ती आहे,

''उपकार कर ज्याप्रमाणे अल्लाहने तुझ्यावर उपकार केले आहेत. आणि जमिनीवर उपद्रव माजविण्याचा प्रयत्न करू नकोस. अल्लाहला उपद्रवी आवडत नाहीत.'' *(२८:७७)*

''जे राग गिळून टाकतात व दुसऱ्याचे अपराध माफ करतात असे सदाचारी लोक अल्लाहला अतिशय प्रिय आहेत.'' *(३:१३४)*

''खचितच अल्लाह प्रतिकार करतो त्या लोकांच्या बाजुने ज्यांनी श्रध्दा ठेवली आहे. निश्चितच अल्लाह कुणा अपहार करणाऱ्या कृतघ्नाला पसंत करीत नसतो.'' *(२२:३८)*

''नातेवाईकाला त्याचा हक्क द्या आणि गरीब व वाटसरूला त्याचा हक्क वायफळ खर्च करू नका. वायफळ खर्च करणारे सैतानाचे भाऊ आहेत.'' *(१७:२६)*

''सत्कृत्यांचा आदेश दे. दुष्कृत्यांची सफाई कर, आणि जी काही आपत्ती येईल त्यावर संयम राख. या त्या गोष्टी आहेत ज्यांची ताकीद दिली गेली आहे, आणि लोकांशी तोंड फिरवून बोलू नकोस. पृथ्वीवर ऐटीत चालूदेखील नकोस, अल्लाह कोणत्याही अहंकारी व गर्व करणाऱ्या व्यक्तीला पसंत करीत नाही.'' *(३१:१७-१८)*

''विनाश आहे त्या प्रत्येक माणसासाठी ज्याला लोकांना टोमणे मारण्याची व (पाठीमागे) निंदा करण्याची सवय आहे.'' *(१०४:१)*

याचप्रमाणे हदीसमध्येसुध्दा नीतीनियमांबद्दल विवेचन आहे.

आदरणीय प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''खरोखरच सत्यतेमुळे धर्मनिष्ठा येते व धर्म निष्ठेतून स्वर्ग प्राप्ती होते. आणि खोटारडेपणातून दुष्टपणा येतो आणि दुष्टपणा नरकाची वाट दाखवतो.'' *(बुखारी, मुस्लिम)*

''जरासा दिखाऊपणासुध्दा श्रध्दाहीनतेकडे नेतो नव्हे श्रध्दाहीनता आहे.'' *(मिश्कात)*

स्वत:चे क्रुरतेपासून रक्षण करा, कारण क्रुरता ही अंतिमदिनी वायुचक्रासारखी असेल. ज्याच्याजवळ चार दुर्गुण आहेत असा मनुष्य निश्‍चितपणे दांभिक असतो. जर कोणी त्यापैकी एखादा दुर्गुणाचा धनी असेल तर तो एक दुर्गुणी दांभिक ठरतो. ते चार दुर्गुण खालीलप्रमाणे आहेत,

(१) जो कोणी विश्‍वास घात करतो. त्याच्याकडे काही अमानत ठेवली असता तो नंतर नकार देतो. विश्‍वासघात करतो. (२) जो खोटे बोलतो. (३) जो कोणी दिलेले आश्‍वासन पाळत नाही. (४) जो भांडणात घाणेरडे शब्द आणि शिवीगाळ वापरतो.'' (मुस्लिम)

''नम्रता धारन करा, उध्दटपणा सोडून द्या आणि अपशब्द वापरु नका''
(मुस्लिम)

''पाठीमागे निंदा करणारे स्वर्गापासून वंचित राहतील.'' (मुस्लिम)

''अल्लाह त्या लोकांवर कृपादृष्टी करणार नाही जे आपल्या सहकार्यांवर कृपादृष्टी करीत नाहीत.'' (बुखारी)

''फसवणारा, चिंगुस (कृपण) आणि उपकार तोंडावर काढणारा स्वर्गात जाणार नाही.'' (तिरमीजी)

या महत्त्वाच्या मूलभूत नीतीतत्त्वांचा अभ्यास केल्यानंतर विशेष प्रसंगासाठी इस्लामने ठरवून दिलेले नीतीनियम काय आहेत ते पाहू या.

(१) मनुष्याचे प्रथम कार्यस्थळ त्याचे आपले घर आहे जेथे त्याला त्याच्या मुलाबाळांशी आणि बायकोशी संबंध येतो. प्रत्येकजण त्यांच्यासाठी त्याग करतो. इस्लामने याला फक्त आंतरिक ओढ म्हणून मान्यता दिली नाही तर धार्मिक कृत्य म्हणून सिध्द केले आहे. अल्लाह आदेश देत आहे,

''त्यांच्याशी चांगल्या प्रकारे जीवन व्यतीत करा.'' (४:१९)

आदरणीय प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले आहे, ''तुमच्यापैकी सर्वोकृष्ठ तो आहे जो आपल्या पत्नीशी चांगला आहे.'' (तिरमीजी)

''स्त्रियांसाठी हा उपदेश स्वीकारा, त्यांना चांगले वागवा.''
(बुखारी, मुस्लिम)

(२) मनुष्याच्या घरानंतर त्यांचे कुटुंब येते त्यात आईवडील, भाऊबहिणी आणि इतर जवळचे नातेवाईक येतात. आईवडिलांशी संबंध कसे असावेत या संदर्भात कुरआनोक्ती आहे,

"आणि तुम्ही सर्वजण अल्लाहची भक्ती करा, त्याच्या समवेत कोणाला भागीदार बनवू नका, आईवडिलांशी नेक वर्तणूक ठेवा." (४:३६)

"तुझ्या पालनकर्त्याने निर्णय दिलेला आहे की तुम्ही लोकांनी इतर कोणाचीही भक्ती करू नये परंतु केवळ त्याची, आईवडिलांशी सद्वर्तन करा. जर तुमच्यापाशी त्यांच्यापैकी कोणी एक अथवा दोघे वृध्द होऊन राहिले तर त्यांच्यासाठी 'ब्र' शब्ददेखील काढू नका व त्यांना झिडकारून प्रत्युत्तरदेखील देऊ नका. तर त्यांच्याशी आदरपूर्वक बोला आणि नरमी व दयाद्रतेने त्यांच्यासमोर नमून राहा. आणि प्रार्थना करीत जा की, "हे पालनकर्त्या, यांच्यावर दया कर ज्याप्रमाणे यांनी दया व वात्सल्याने अर्भकावस्थेत माझे संगोपन केले." (१७:२३:२४)

आईवडिलांच्या संदर्भात प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले आहे,

"तुमचे आईवडील हे तुमचे स्वर्ग व नरक आहेत." (इब्ने माज़ा)

"सदाचारी मुलं आपल्या म्हाताऱ्या आईवडिलांवर प्रेमाची एक दृष्टी टाकते ती एका मान्यताप्राप्त हजसारखी आहे."

आईवडील मुस्लिमेतर असतील अथवा इस्लामचे शत्रु असतील तरी त्यांचे हक्क आणि सेवा त्या मुस्लिम मुलांवर बंधनकारक आहे. कुरआनोक्ती आहे,

"जर तुमच्यापाशी त्यांच्यापैकी (आईवडीलांपैकी) कोणी एक अथवा दोघे वृध्द होऊन राहिले तर त्यांच्याशी 'ब्र' शब्दसुध्दा बोलू नका. व त्यांना झिडकावून प्रत्युत्तरदेखील देऊ नका तर त्यांच्याशी आदरपूर्वक बोला." (१७:२३)

इतर नातेवाईकांसंबंधी चांगली वर्तणूक करण्यासाठी कुरआनमध्ये अल्लाहने आदेश दिलेले आहेत. वरील जे आदेश आईवडिलांसाठी आले आहे त्यानंतर त्वरित त्याच संकेतवचनात (आयत) पुढे अल्लाहने आदेश दिला आहे,

"नातेवाईकाला त्याचा हक्क द्या आणि गरीब व वाटसरुला त्याचा हक्क" (१७:२५)

"आणि तुम्ही सर्वजण अल्लाहची भक्ती करा, त्याच्या समवेत कोणाला भागीदार बनवू नका, आईवडिलांशी नेक वर्तणूक ठेवा, नातेवाईक आणि अनाथ व गोरगरिबांशी चांगला व्यवहार करा." (४:३६)

अल्लाहच्या या आदेशावरून हेच सिध्द होते की तुमचे मातापिता जसे तुम्हाला जवळचे आहेत तुम्ही त्यांच्याशी नेक वर्तणूक ठेवा. तसेच नातेवाईकातसुध्दा जवळीक पाहून त्यांच्याशी तसा व्यवहार करा.

"तुमच्यावर पहिला हक्क तुमच्या मातेचा नंतर पिता आणि त्यानंतर जवळच्या नातेवाईकांचा आहे." *(बुखारी)*

एका मुस्लिमाने आपल्या नातेवाईकांशी या तत्त्वानुसार संबंध ठेवणे आणि हक्क अदा करणे आवश्यक आहे. नातेवाईकांशी सद्वर्तन याला 'सिलारहमी' म्हटले जाते. याचा अर्थ रक्ताच्या संबंधांना आबाधित ठेवणे. कुरआन या सद्वर्तनाला (सिला रहमी) माणुसकीचा पाया समजतो. आदरणीय प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सद्वर्तनांला (सिला रहमी) श्रध्दाशीलतेची एक गरज म्हणून, एक आवश्यक बाब म्हणून ठरविले आहे.

"जो कोणी अल्लाहवर आणि पारलौकिक जीवनावर श्रध्दा ठेवतो त्याने आपल्या नातेवाईकांशी नेक वर्तणूक ठेवणे आवश्यक आहे." *(बुखारी)*

"जो कोणी रक्ताचे नातेसंबंध तोडतो तो स्वर्गात प्रवेश करु शकणार नाही." (बुखारी)

(३) कुटुंबानंतर शेजारी येतात. मुस्लिमांनी आपल्या शेजाऱ्यांशी कसे संबंध ठेवावेत याबद्दल खालील हदीस आपण पाहू या प्रेषित मुहम्मद (स.) म्हणतात,

"जिब्रईल (अ.) यांनी पुन्हा पुन्हा मला शेजाऱ्यांच्या हक्कांबद्दल उपदेश केला आहे. मी विचार करु लागलो की माझा शेजारी माझा वारस आहे!" *(बुखारी)*

"तो मनुष्य ज्याचा शेजारी त्याच्या अत्याचारांमुळे त्रस्त आहे असा मनुष्य (अत्याचारी) स्वर्गात प्रवेश करू शकणार नाही." *(मुस्लिम)*

(४) शेजाऱ्यानंतर विशाल क्षेत्र असलेला समाज आहे यात अनेक प्रकारच्या लोकांशी त्याला व्यवहार करावा लागतो. त्यांच्याशी कशा प्रकारची वर्तणूक करावी? याबद्दल कुरआन आपणास मार्गदर्शन करीत आहे,

"आणि तुम्ही सर्वजण अल्लाहची भक्ती करा, त्याच्या समवेत कोणाला भागीदार बनवू नका, आईवडिलांशी नेक वर्तणूक ठेवा, नातेवाईक आणि अनाथ व गोरगरिबांशी चांगला व्यवहार करा आणि आप्त शेजारी, अनोळखी शेजारी, तोंडओळख असणारा साथीदार व वाटसरू आणि त्या दासी व दास जे तुमच्या ताब्यात असतील, त्यांच्याशी उपकाराचे व्यवहार करा." *(४:३६-३७)*

वरील आयतीमध्ये समाजातील सर्व प्रकारच्या संबंधांना नमूद केले आहे. त्यासाठी सर्वसमावेशक "नेक वर्तणूक ठेवा" हा उपदेश करण्यात आला आहे.

(५) सामाजिक जीवनानंतर राजकीय जीवनाचा संबंध येतो. इस्लामी समाजात व्यक्तीच्या स्थानाला सामाजिक आणि राजकीय दृष्टिकोनातून पूर्वनिश्चित केले आहे.

म्हणजे प्रत्येकाची स्थिती अशी निश्चित केली आहे की त्यांने आदेश द्यावा किंवा आदेश पाळावा. तो शासित अथवा शासक असतो. त्याने आपल्या सहकार्यांशी कशे वागावे या बद्दल प्रेषित (स.) खुलासा करतांना म्हणतात की -

"ज्या व्यक्तीवर मुस्लिम समाजाचे नेतृत्व दिले गेले आहे परंतु तो मुस्लिमांसाठी कठीण परिश्रम उचलत नाही आणि त्यांच्या भल्याचेसुध्दा पाहत नाही तर अशी व्यक्ती स्वर्गात प्रवेश करू शकणार नाही." (मुस्लिम)

प्रजेने आपल्या राजाबरोबर कसे वागावे याबद्दल खुलासा करताना प्रेषित मुहम्मद (स.) म्हणतात,

"धर्म म्हणजे प्रामाणिकपणा आणि निष्ठा, त्यांना विचारण्यात आले कुणाची निष्ठा आणि कुणाशी प्रामाणिकपणा? त्यांनी उत्तर दिले की अल्लाहशी प्रामाणिकपणा, प्रेषित (स.) यांच्याशी प्रामाणिकपणा आणि मुस्लिमांच्या प्रमुखांशी प्रामाणिकपणा आणि सर्व मुस्लिमांशी प्रामाणिकपणा." (मुस्लिम)

अशा प्रकारे अल्लाहवर निष्ठा आणि त्याचे भय ही आवश्यक अट आहे राजाने प्रजेशी व्यवहार करताना आणि प्रजेने राजाशी व्यवहार करताना.

(६) सर्वात शेवटी मुस्लिमेतरांशी कसे संबंध प्रस्थापित करावेत याबद्दलच्या नीतीनियमांचा खुलासा आला आहे. मुस्लिमेतरांशी कसे वागावे याबद्दल कुरआनोक्ती आहे,

"हे श्रध्दावंतानो! अल्लाहसाठी सत्यावर अटळ राहणारे व न्यायाची ग्वाही देणारे बना-एखाद्या गटाच्या शत्रुत्वाने तुम्हाला इतके प्रक्षोभित करू नये की तुम्ही न्यायापासून विमुख व्हाल. न्याय करा. हे ईशपरायणतेशी अधिक निकटवर्ती आहे." (५:८-९)

अशा प्रकारे इस्लाम मनुष्याच्या नैतिक जीवनाचा आधार मूलतत्त्वांच्या भक्कम आधारांवर ठेवतो. मुस्लिम जीवनव्यवहाराचा प्रत्येक अंग अनिवार्य अशा नीतीनियमांनी बांधलेला आहे.

कौटुंबिक नीतीनियम

इस्लामी समाजरचनेविषयी आणि त्याविषयीची दिव्य प्रकटन यांचा आपण अभ्यास करू या.

स्त्री-पुरुषाच्या एकत्र येण्याने मानवी समाजरचना उदयास येते. त्यातून सामाजिक रचना आकार घेते. हे वर्तुळ (आकार) म्हणजे कुटुंब आणि त्याला नियंत्रित करणारे नीतीनियम म्हणजे कौटुंबिक नियमावली होय. इस्लामने आखून दिलेले

कौटुंबिक नीतीनियमांची काही वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

(१) स्त्री–पुरुषाचे हे एकत्रित राहणे एक सामाजिक करार करून शक्य होते त्यास 'निकाह' असे म्हणतात. हे पवित्र बंधन आहे जे दोघांच्या संमतीने आणि समाजासमोर करार करून घडते. मनुष्याचे एखाद्या स्त्रीबरोबर याव्यतिरिक्त संबंध हे अनैतिक ठरतात. ते अत्यंत हीन कृत्य आहे. त्यासाठी कठोर शिक्षा आहे. लग्न हे काही शारीरिक गरज म्हणून नाही तर ते एक पवित्र आणि धार्मिक गरज आहे.

''स्त्रीशी विवाहबद्ध व्हा. जो कोणी माझ्या परंपरेचा अस्वीकार करील तो माझा नाही.'' *(बुखारी)*

ब्रम्हचर्य इस्लामविरोधी कृत्य आहे.

''अल्लाहचे प्रेषित (स.) यांनी आपल्या एका सहकाऱ्याचा अविवाहित राहण्याचा प्रस्ताव नामंजूर केला होता.'' *(बुखारी)*

लग्नाच्या करारनाम्यास कुरआनने ''महान वचन'' म्हणून नमूद केले आहे. या प्रतिज्ञेचा स्वीकार करून दोघांवर काही जबाबदारी येते. या करारामुळे सामाजिक एकता वृध्दिगत होते. मनुष्य या बंधनामुळे विश्वस्थाची भूमिका पार पाडतो. कुरआनोक्ती आहे,

''पुरूष स्त्रियांवर विश्वस्त आहेत.'' (४:३४)

या सामाजिक एकतेला आबाधित ठेवण्यासाठी मनुष्यावर खालील जबाबदाऱ्या टाकण्यात आलेल्या आहेत.

(१) मनुष्याला आपल्या पत्नीचा, मुलाबाळांचा सांभाळ करावा लागतो. त्यांना जीवनावश्यक वस्तू पुरविणे त्याची जबाबदारी आहे. अल्लाहने कुरआनमध्ये याबाबत आदेश दिलेले आहेत.

ही जबाबदारी काही नैतिक जबाबदारी फक्त नाही ती अनिवार्य आणि कायदेशीर जबाबदारी आहे. जर ही जबाबदारी पार पाडण्यास कोणी हलगर्जीपणा केला तर शासन त्याला ती जबाबदारी उचलण्यास भाग पाडील.

(२) पुरुषाने आपल्या स्त्रीला आणि मुलाबाळांना धार्मिक प्रशिक्षण आणि शिक्षण देण्याची व्यवस्था केली पाहिजे. कुरआनोक्ती आहे,

''हे *लोकहो! ज्यांनी श्रध्दा ठेवली आहे, वाचवा स्वत:ला आणि आपल्या कुटुंबियांना त्या अग्नीपासून जिचे इंधन मनुष्य आणि दगड असतील.''* (६६:६)

अशा प्रकारे पुरुषावर आपल्या मुलाबाळांची पत्नीची दोन प्रकारची जबाबदारी आहे. एक त्यांच्या भौतिक गरजा भागविणे आणि दुसरी जबाबदारी त्यांना पारलौकिक जीवनात यशस्वी बनविण्यासाठीची आहे. प्रत्येकजन हा आपल्या आश्रिताबद्दल जबाबदार आहे. राजा हा प्रजेबद्दल जबाबदार आहे. विवाहित स्त्री ही आपल्या पतीच्या संसाराची रक्षणकर्ती आहे. आणि तिला त्याबद्दल विचारणा होईल.

कुरआन याबद्दल स्पष्ट आदेश देत आहे,

''पुरुष स्त्रियांवर विश्वस्त आहेत या आधारावर की अल्लाहने त्यांच्यापैकी एकाला दुसऱ्यावर श्रेष्ठत्व दिले आहे. आणि या आधारावर की पुरूष आपली संपत्ती खर्च करतात. मग ज्या प्रामाणिक स्त्रिया आहेत. त्या आज्ञाधारक असतात आणि पुरुषांच्या गैरहजेरीत अल्लाहच्या देखरेखीत व संरक्षणात त्यांच्या हक्कांचे रक्षण करतात.'' (४:३४)

त्याचप्रमाणे मुलांची ही जबाबदारी आहे की त्यांनी आपल्या आईवडिलांची सेवा करावी आणि आज्ञा पाळावी. त्यांची आज्ञा न पाळणे हा माफ न करता येणारा गुन्हा आहे.

''अल्लाह जसे इच्छिल तसे गुन्हे माफ करील फक्त मातापित्यांची अवज्ञा करण्याचा गुन्हा सोडून.'' (मिश्कात)

म्हणून लग्न हे धार्मिक कर्तव्य आहे. लग्नामुळे येणाऱ्या जबाबदाऱ्यांना कुरआनने ''अल्लाहने घालून दिलेल्या मर्यादा'' असे म्हटले आहे.

''या अल्लाहने घालून दिलेल्या मर्यादा आहेत त्यांचे उल्लंघन करू नका आणि या मर्यादांचे उल्लंघन करतील ते नि:संशय अत्याचारी आहेत.'' (२:२२९)

स्त्री आणि पुरुष दोघांवर ही मर्यादांचे उल्लंघन न करण्याचे बंधन आहे. प्रत्येक सुसंस्कृत आणि कर्तव्यनिष्ठ सभ्यगृहस्थाला मर्यादांचे पालन करावे लागते. परंतु वैवाहिक जीवनात जर एकत्र राहणे अशक्य कोटीचे असेल तर या मर्यादांचे उल्लंघन 'तलाक' (घटस्फोट) देऊन करता येईल अथवा स्त्रीने खुला देवून. याबद्दल अल्लाहने कुरआनमध्ये स्पष्ट आदेश दिला आहे,

''तुम्हाला भय वाटत असेल की ते दोघे अल्लाहने घालून दिलेल्या मर्यादांवर कायम राहू शकत नसतील तर त्यांच्यामध्ये असा समेट घडविण्यामध्ये कोणताच अपराध नाही की पत्नीने आपल्या पतीला प्रतिदान देऊन स्वत:ला मुक्त करून घ्यावे.'' (२:२२९)

अशा परिस्थितीत शासनालासुध्दा हस्तक्षेप करता येतो आणि लग्नबंधन मोडता

येते. लग्नसंबंधाच्या महत्त्वाला लक्षात घेऊन हे असे करणे आश्चर्यकारक वाटते. परंतु इस्लाममध्ये कोणत्याही परिस्थितीत अल्लाहने घालून दिलेल्या मर्यादांना तोडता येत नाही. अल्लाहच्या मर्यादांचे उल्लंघन करून वैवाहिक जीवन जगता येत नाही.

(३) सामाजिक व्यवस्था

कुटुंबाच्या मर्यादित क्षेत्रापलीकडे अमर्याद असे सामाजिक जीवन पसरलेले आहे ज्याला समाज असे म्हणतात. इस्लामने या क्षेत्रासाठीसुध्दा काही नीतीनियम घालून दिलेले आहेत. आपण इस्लामी सामाजिक व्यवस्थेबद्दलच्या मूलभूत कल्पनेविषयी विचार करू या. इस्लामनुसार जनसमुह ज्यामुळे समाजनिर्मिती होते त्यांचा वंश एक आहे. सर्व एकाच कुळाची संतती आहे. अल्लाहने स्पष्ट केले आहे,

''लोकहो! आपल्या पालनकर्त्या प्रभूच्या कोपचे भय बाळगा ज्याने तुम्हाला एका जीवापासून निर्माण केले आणि त्याच जीवापासून त्याची सहचारिणी बनविली आणि त्या आद्य जोडीपासून पुष्कळ स्त्री–पुरुष जगात पसरविले.'' (४:१)

अशा प्रकारे जन्माने सर्व एक आहेत. उच्चनीचतेचा किंवा पवित्र अपवित्र, शुद्र व सवर्ण असा काहीच फरक नाही. निरनिराळ्या रंगाचे, वंशाचे आणि कुळाचे सर्वच एकसारखे आहेत. त्यांच्यामध्ये रंगभेद, वर्णभेद काही नाही. त्यांच्यात फक्त एकच कारणामुळे फरक पडतो आणि ते कारण म्हणजे इस्लाम होय. समाजातील काही लोक अल्लाहच्या धर्मावर (इस्लाम) श्रध्दा ठेवतात आणि दुसरा गट विश्वास ठेवत नाही. पहिला गट हा इस्लामी समाज आहे आणि दुसरा नास्तिक समाज. या दोन गटांत समाज संरचनेचा मूलभूत फरक आहे. जीवनव्यवहारात दोघांत सारखेपण राहात नाही. लग्नबंधन जे सामाजिक व्यवस्थेचा पाया आहे ते श्रध्दाशील आणि श्रध्दाहीन या दोहोंमध्ये शक्य नाही. ते एकमेकाचे वारससुध्दा बनू शकत नाहीत.

अशा प्रकारे श्रध्देच्या आणि धर्माच्या आधारावर दोन समाज कायमस्वरूपी तयार होतात. स्वाभाविकपणे इस्लाम या दोन्ही समाजांना वेगवेगळे हुकूम नीतीनियम देतो. श्रध्दाहीन समाजातील माणसांबरोबर माणुसकीने वागण्याची इस्लाम शिकवण देतो. न्याय, समानता, खरेपणा, दया तसेच वचन पाळणे बाबतीत दोहोंत फरक करू शकत नाही. इस्लामी समाजासाठी मात्र काही स्पष्ट हुकूम - आदेश इस्लाम देत आहे. हे आदेश 'इस्लामी समाज'निर्मितीसाठीचे मूलाधार आहेत. त्यांचा कुरआनमध्ये स्पष्ट शब्दांत उल्लेख आहे,

''श्रध्दावंत तर एक दुसऱ्याचे भाऊ आहेत.'' (४९:१०)

श्रध्दावंतांची बंधुता कशा प्रकारची असते याचा खुलासा खालील कुरआनोक्तीत आलेला आहे,

''आणि आपल्या स्वत:वर इतरांना प्राधान्य देतात, मग ते स्वत: गरजवंत का असेनात.'' *(४९:८)*

''हे लोक हो! ज्यांनी श्रध्दा ठेवली आहे, पुरूषांनी दुसऱ्या पुरुषांची टिंगल उडवू नये, शक्य आहे की ते त्यांच्यापेक्षा उत्तम असतील, आणि स्त्रियांनीसुध्दा दुसऱ्या स्त्रियांची टिंगल उडवू नये, शक्य आहे की त्या त्यांच्यापेक्षा उत्तम असतील. आपापसात एकमेकांना टोमणे मारू नका आणि एकमेकांचा उल्लेख वाईट नावाने ही करू नका, श्रध्दा ठेवल्यानंतर दुराचारांत नाव मिळविणे फार वाईट गोष्ट आहे. जे लोक या वर्तनापासून परावृत्त होत नसतील ते अत्याचारी होत.

हे लोकहो! ज्यांनी श्रध्दा ठेवली आहे, अधिक शंका घेण्यापासून दूर राहा कारण काही बाबतीत शंका घेणे हे पाप आहे. हेरगिरी करू नका आणि तुमच्यापैकी कुणीही कुणाची चहाडी करू नये. काय तुमच्यापैकी एखादा असा आहे की जो आपल्या मृत भावाचे मांस खाणे पसंत करील? पाहा, तुम्हा स्वत:ला याची घृणा वाटेल. अल्लाहच्या कोपचे भय बाळगा, अल्लाह मोठा पश्चात्ताप स्वीकारणारा आणि परम कृपाळू आहे.'' (४९:११-१२)

तसेच यासंदर्भात खालील हदीसमध्ये स्पष्ट नमूद आहे,

''श्रध्दावंत इमारत सारखे आहेत. एक भाग दुसऱ्याला आधार देतो *(बुखारी)*

''प्रेम, दया आणि कृपाशीलतेबद्दल श्रध्दावंत शरीराप्रमाणे आहेत. जसे एक अवयवास दुखापत झाल्यास संपूर्ण शरीर पीडाग्रस्त होते.'' *(बुखारी)*

''एक दुसऱ्याचा द्वेष करू नका. लिलावात जास्त किंमत बोलून वस्तू खरेदी करू नका. दुसऱ्याबद्दल कुविचार मनात आणू नका. आणि नातेसंबंध तोडू नका. दुसऱ्याच्या काराभारात हस्तक्षेप करून आपला फायदा करू नका. परंतु अल्लाहचा सच्चा सेवक बना आणि एक दुसऱ्यास बंधुत्वाने वागवा. प्रत्येक श्रध्दावंत दुसऱ्या श्रध्दावंताचा भाऊ आहे. दुसऱ्याबद्दल वाईट बोलू नका. किंवा त्याला संकटात एकटे सोडू नका. कुणालाही कमी लेखू नका हे प्रत्येक श्रध्दावंताचे परम कर्तव्य आहे. की याने आपल्या दुसऱ्या श्रध्दावंत बंधुचे रक्त, वित्त आणि अस्मितेचे रक्षण करावे.'' *(मुस्लिम)*

प्रत्येक श्रध्दावंताची दुसऱ्या श्रध्दावंताबद्दल सहा कर्तव्ये आहेत.

(१) जेव्हा एक दुसऱ्याला भेटाल तेव्हा सलाम करा.

(२) जेव्हा एकाने मदतीसाठी हाक दिली तर त्याच्या मदतीला धावून जा.

(३) जर एखादा उपदेशाची इच्छा करीत असेल तर त्याला उपदेश द्या.

(४) जेव्हा एकाने शिंकले आणि ''सर्व प्रशंसा अल्लाहसाठी आहे'' अशी प्रार्थना केली तर दुसऱ्याने उत्तरादाखल म्हणावे की ''अल्लाहची तुझ्यावर दया होवो.''

(५) जर एखादा आजारी पडला तर त्याला भेटण्यासाठी व विचारपूस करण्यासाठी त्याच्या घरी जावे.

(६) जर एखादा मृत्यू पावला तर त्यांच्या अंत्यविधीला हजर रहावे. (मुस्लिम)

''एखाद्या श्रध्दावंताने दुसऱ्या श्रध्दावंतांशी तीन दिवसापेक्षा जास्त काळ अबोला ठेवू नये.'' (बुखारी)

''एखाद्या श्रध्दावंताने लग्नासाठी मागणे एखाद्या अशा स्त्रीला घालू नये जिच्यासाठी लग्नाचं बोलनं इतर ठिकाणी चालू असेल. ती बोलणी फिसकटल्यानंतरच त्या स्त्रीला लग्नाचं मागणं द्यावे.'' (बुखारी)

''आपापसात बेबनावपासून सावध राहा त्यामुळे धर्माची अपरिमित हानी होते.'' (तिरमीजी)

(१) अशा प्रकारे आपापसातील सौहार्दपूर्ण वातावरणाला इस्लामी समाजव्यवस्थेत महत्त्व आहे. जेव्हा हे प्रेमाचे आणि बंधुत्वाचे नाते गैरसमजुतीमुळे किंवा स्वार्थीपणामुळे तुटत असतील तर इतरांनी पूर्ववत स्थिती पुन्हा निर्माण करून देणे त्यांच्यासाठी अनिवार्य आहे. कुरआनोक्ती आहे,

''श्रध्दावंत तर एक दुसऱ्याचे भाऊ आहेत, म्हणून आपल्या भावांच्या दरम्यान संबंध सुरळीत करा आणि अल्लाहच्या कोपचे भय बाळगा, आशा आहे तुमच्यावर दया केली जाईल.'' (४९:१०)

एकदा आदरणीय प्रेषित मुहम्मद (स.) आपल्या सहकाऱ्यांना म्हणाले,

''मी तुम्हाला उपवास करण्यापेक्षा, दानधर्म करण्यापेक्षा आणि नमाज अदा करण्यापेक्षा श्रेष्ठ कृत्य सांगू का? सहकाऱ्यांनी आग्रहपूर्वक विनंती केली तेव्हा सांगितले की आपले आपापसातील संबंध सुरळीत ठेवा.'' (तिरमीजी)

(२) समाजाचे भले करण्यासारखा आणि अल्लाहच्या कोपचे भय बाळगण्यासारखा सद्‌गुणांना समाजात वाव दिला गेला पाहिजे. त्यांना फक्त प्रोत्साहन देणे पुरेसे नाही तर सदाचारात लोकांनी एकमेकांना मदत केली पाहिजे. अल्लाहने

कुरआनमध्ये स्पष्ट आदेश दिला आहे,

''जे पुण्य आणि ईशपरायणतेचे कार्य आहे, त्यामुळे सर्वांशी सहकार्य करा आणि जी पाप आणि अत्याचाराची कामे आहेत, त्यामध्ये कोणाशीही सहकार्य करू नका. अल्लाहच्या कोपचे भय बाळगा, त्याची शिक्षा फार कठोर आहे.'' (५:२)

फक्त सदाचाराच्या आणि ईशपरायणतेच्या कार्यात सहकार्य करून तेथेच थांबणे योग्य नाही. तर या कार्यात त्यांना उत्तेजन देणे महत्त्वाचे आहे. कुरआनोक्ती आहे,

''श्रध्दावंत पुरुष व श्रध्दावंत स्त्रिया हे सर्व एक दुसऱ्याचे मित्र आहेत, भलेपणाचा आदेश देतात व वाईट गोष्टीपासून रोखतात.'' (९:७१)

(३) दुराचारांना समाजात प्रोत्साहन दिले नाही पाहिजे. यासाठी दुराचारात एक दुसऱ्याचे सहकार्य करू नका असा अल्लाहने स्पष्ट आदेश दिला आहे,

''आणि जी पाप आणि अत्याचाराची कामे आहेत, त्यामध्ये कोणाशी ही सहकार्य करू नका.'' (५:२)

अशा प्रकारे मनुष्याने इतरांना दुष्कृत्यांपासून आणि अत्याचारापासून दूर ठेवण्यास मदत केलीच पाहिजे.

''जो कोणी दुष्कृत्याची आणि अत्याचाराची कामे होतांना पाहील तर त्याने स्वहस्ते त्यांना रोखले पाहिजे.'' (बुखारी)

लोकांना दुराचारांपासून आणि अत्याचारापासून दूर ठेवणे अथवा रोखणे ही फक्त समाजाच्या भल्यासाठीच अथवा समाज सेवाच फक्त नाही तर त्या व्यक्तीचेसुध्दा भले करणे व त्याची सेवा करण्यासारखे आहे.

आदरणीय प्रेषित मुहम्मद (स.) यांनी उपदेश दिला आहे,

''तुमच्या बंधुला मदत करा जेव्हा तो अत्याचार करीत असेल अथवा जेव्हा तो अत्याचारपीडीत बनला असेल.''

हे ऐकल्यानंतर प्रेषितांच्या सहकाऱ्यांनी कुतुहलाने विचारले,

''हे अल्लाहचे प्रेषित! आम्ही अत्याचार पीडिताला मदत करणे समजू शकतो परंतु अत्याचारीला मदत करणे हे काही आम्हाला समजू शकत नाही?''

प्रेषितांनी उत्तर दिले, ''तुम्ही त्याला अत्याचार करण्यापासून रोखा हेच त्याला मदत करण्यासारखे कृत्य आहे.'' (बुखारी)

(४) व्यभिचारी कृत्यांना समाजात प्रोत्साहन देणारे सर्व मार्ग बंद झाले

पाहिजेत. यासाठी खालील उपाययोजना करणे आवश्यक आहे.

(अ) इस्लामने व्यभिचाराला अत्यंत खालच्या दर्जाचे पाप म्हणून ठरवले आहे. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"आणि व्यभिचार ही करीत नाहीत, हे कृत्य जो कोणी करील तो आपल्या गुन्हयाचे फळ भोगील, पुनरुत्थानाच्या दिवशी त्याला सतत यातना दिली जाईल आणि त्यातच तो सदैव अपमानित पडून राहील." *(२५:६८)*

अशा या पापी व्यक्तीचा तिरस्कार आणि निषेध समाजात केला जातो. अल्लाहने कुरआनमध्ये याबद्दल स्पष्ट आदेश दिले आहेत,

"व्यभिचाऱ्याने विवाह करता कामा नये परंतु केवळ व्यभिचारिणीबरोबर अथवा अनेकेस्वरवादी स्त्रीशी, आणि व्यभिचारी स्त्रीशी विवाह करता कामा नये परंतु केवळ व्यभिचारी अथवा अनेकेश्वरवादी पुरुषाने आणि हे निषिध्द केले गेले आहे श्रद्धावंतांसाठी." *(२४:३)*

(ब) व्यभिचारासाठी अत्यंत कडक अशी शिक्षा आहे. त्याला दगड मारून ठार करणे अथवा शंभर फटके मारण्याची शिक्षा आहे. ही शिक्षा सार्वजनिकरित्या जास्तीत जास्त लोकांसमोर दिली गेली पाहिजे. यात काहीच ढील दिली जाणार नाही याची दक्षता घेण्यास सांगितले गेले आहे. अल्लाहने स्पष्ट आदेश दिला आहे,

"व्यभिचारी स्त्री व व्यभिचारी पुरूष दोहोंपैकी प्रत्येकांना शंभर फटके मारा आणि त्यांची कींव करू नका, अल्लाहच्या धर्माच्या बाबतीत जर तुम्ही सर्वश्रेष्ठ अल्लाह आणि अंतिम दिनावर श्रध्दा बाळगत असाल आणि त्यांना शिक्षा देते वेळेस श्रध्दावंतांचा एक समूह उपस्थित असावा." *(२४:२)*

साधारणत: स्त्रीचे कार्यस्थळ हे तिचे आपले घर आहे आणि त्यांना बाहेर पडण्याची मनाई आहे. अल्लाहने याबद्दल कुरआनमध्ये आदेश दिला आहे,

"आपल्या घरात टिकून राहा आणि गत अज्ञानमूलक काळाप्रमाणे शृंगाराचे प्रदर्शन करीत फिरू नका." *(३३:३३)*

स्त्री पुरूषांचे मिळून मिसळून वागणे निषिध्द केले आहे. फक्त जवळच्या नातेवाईकांना सोडून इतर परपुरूषा समोर स्त्रीने पूर्ण पोषाख (बुरखा) घालूनच आले पाहिजे यात सक्ती केली आहे. अल्लाहचा श्रध्दावंत स्त्रीयांना स्पष्ट आदेश आहे,

"आणि श्रध्दावंत स्त्रियांना सांगा की आपल्या चादरीचे पदर लोंबते ठेवत जा ही अधिक योग्य पध्दत होय जेणेकरून त्या ओळखल्या जाव्यात आणि त्रास दिला जाऊ नये.

सर्वश्रेष्ठ अल्लाह क्षमाशील आणि परमकृपाळू आहे.'' (३३:५९)

पुरुषांप्रमाणे स्त्रियांना सुगंध लावून बाहेर पडण्याची मनाई करण्यात आलेली आहे. आणि अशा प्रकारचे दागिनेसुध्दा परिधान करण्यास मनाई आहे, ज्यामुळे चालताना आवाज होतो. परपुरुषाशी अनावश्यक गप्पा गोष्टी करण्याची त्यांना मनाई आहे. परपुरुषांशी संभाषण करताना लवचिक आवाजात बोलण्यास मनाई आहे. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

''जर तुम्ही अल्लाहचे भय बाळगणाऱ्या असाल तर हळू आवाजात बोलू नका की विकृत हृदयाचा एखादा माणूस लालसेत पडेल, तर स्पष्ट सरळ आवाजात बोला.'' (३३:३२)

(क) श्रध्दावंत स्त्रीला अंगप्रदर्शन करणारा पोषाख परिधान करण्यास मनाई आहे. अशा प्रकारचा पोषाख परिधान करणारी स्त्री शापित ठरते. नाचणारी स्त्रीसुध्दा शापित आहे. प्रेषितकथन आहे,

''जी स्त्री पोषाख घालूनसुध्दा नग्न आहे, ती व्यभिचाराकडे आकर्षित होते आणि आपल्या पतीलासुध्दा त्याकडे (व्यभिचार) आकर्षित करते. अशी स्त्री स्वर्गप्रवेश करू शकणार नाही आणि तिला स्वर्गाचा सुगंधसुध्दा प्राप्त होणार नाही.'' (मुस्लिम)

(ड) लज्जा, मर्यादाशीलता आणि सभ्यता या सद्‌गुणांना श्रध्देचे महत्त्वाचे अंग (भाग) म्हटले आहे.

''मर्यादाशीलता आणि सभ्यता ही श्रध्देची एक शाखा आहे.'' (बुखारी)

(ई) श्रध्दावंत स्त्री आणि पुरुष समोरासमोर आले तर त्यांनी एकमेकांच्या नजरेला टक (नजर) लावून पाहू नये. त्यांनी अशा प्रसंगी आपल्या नजरा झुकवाव्यात. या संदर्भात अल्लाहने कुरआनमध्ये स्पष्ट आदेश दिला आहे,

''हे पैगम्बर (स.) श्रध्दावंत पुरुषांना सांगा की त्यांनी आपल्या दृष्टीची जपणूक करावी आणि आपल्या लज्जास्थानांचे रक्षण करावे, ही त्यांच्यासाठी अधिक पवित्र पध्दत आहे. जे काही ते करतात अल्लाह त्याची खबर राखणारा आहे. आणि हे पैगम्बर (स.) श्रध्दावंत स्त्रियांना सांगा की त्यांनी आपल्या दृष्टीची जपणूक करावी आणि आपल्या लज्जास्थानांचे रक्षण करावे. आणि आपला साज शृंगार दर्शवू नये त्याव्यतिरिक्त जे सहजासहजी प्रकट होईल आणि आपल्या छातीवर आपल्या ओढणीचा पदर घालून ठेवावा. त्यांनी आपला साजशृगांर प्रकट करु नये परंतु या लोकांसमोर, पती पिता, पतीचे वडील, आपली मुले, पतीची मुले भाऊ, भावांची मुले, बहिणींची मुले, आपल्या

मेलमिलाफाच्या स्त्रिया, आपल्या दासी, गुलाम, ते हाताखालचे पुरुष जे एखादा अन्य प्रकारचा हेतु बाळगत नसतील आणि ती मुले जी स्त्रियांच्या गुप्त गोष्टींशी अद्याप परिचित झाली नसतील. त्यांनी आपले पाय जमिनीवर आपटत चालू नयेत की जेणेकरुन त्यांनी जो आपला शृंगार लपविलेला आहे त्याचे ज्ञान लोकांना होईल. हे श्रध्दावंतांनो तुम्ही सर्वजण मिळून अल्लाहजवळ पश्चाताप व्यक्त करा, अपेक्षा आहे की सफल व्हाल.'' (२४: ३०-३१)

तसेच श्रध्दावंत स्त्री आणि पुरुषाला दुसऱ्याच्या घरात विनापरवानगी प्रवेश करण्यास मनाई आहे. कुरआनोक्ती आहे,

''हे लोकहो! ज्यांनी श्रध्दा ठेवली आहे, आपल्या घराशिवाय दुसऱ्यांच्या घरात प्रवेश करीत जाऊ नका जोपर्यंत त्या घरातील लोकांची सम्मती मिळत नाही आणि त्या घरातील लोकांना तुम्ही सलाम करीत नाही. ही पध्दत तुमच्यासाठी उत्तम आहे. अपेक्षा आहे की तुम्ही हे लक्षात ठेवाल. मग जर तेथे कोणी आढळला नाही तर प्रवेश करु नका जोपर्यंत तुम्हाला परवानगी दिली जात नाही, आणि जर तुम्हाला सांगितले गेले की, परत जा तर निघुन जा. ही तुमच्यासाठी अधिक पवित्र पध्दत आहे. आणि जे काही तुम्ही करता ते अल्लाह चांगल्या प्रकारे जाणतो.'' (२४: २७-२८)

(उ) अश्लिलतेचा आणि दुराचाराचा प्रचार करण्याची सक्त मनाई आहे कारण त्यामुळे समाजाच्या मानसिक सभ्यतेला आघात होतो. आणि दुराचारबद्दलचा आणि व्यभिचाराबद्दलचा नैसर्गिक तिरस्कार कमी होत जातो. जो कोणी असे करील त्याच्यासाठी अत्यंत कडक शिक्षा आहे.

''माझ्या अनुयायींपैकी प्रत्येक व्यक्तिसाठी कृपा आहे परंतु अश्लिलतेचा आणि दुराचाराचा प्रचार करणाऱ्या व्यक्ती शिवाय!'' (बुखारी)

जी व्यक्ती समाजात अश्लिलता फैलावत असेल अशा व्यक्तीला कुरआनमध्ये अत्यंत कडक शिक्षा सुनावली गेली आहे,

''जे लोक इच्छितात की श्रध्दावंताच्या समुदायात अश्लिलता पसरावी ते लोक या जगात व पारलौकिक जीवनात दुःखदायी शिक्षेस पात्र आहेत.'' (२४:१९)

(ऊ) इस्लाममध्ये लग्नाला मान्यता आणि तरुणांनी लग्न न करण्याला (अविवाहीत राहाणे) कडक शब्दांत विरोध केला आहे.

''तुमच्यापैकी जो कोणी विवाह करण्यास पात्र आहे त्याने लग्न केलेच पाहिजे की त्यामुळे समाजाचे पावित्र्य आणि सभ्यता टिकून राहाते.'' (मिश्कत)

"मुलगी जेव्हा लग्नाला येते तेव्हा योग्य जोडीदार पाहून तिचे लग्न करावे. जर कोणी तुम्हाला लग्नासाठी प्रस्ताव दिला आणि त्यांची धार्मिकता आणि आचरण तुम्हाला पसंत आहे तर तुम्ही लग्न करा. जर तुम्ही तसे केले नाही तर पृथ्वीवर चहुकडे अनाचार माजविण्याचे साधन तुमचे हे कृत्य ठरेल." (तिरमीजी)

इस्लामने लग्न संस्थेला अगदी साधे आणि सुकर केले आहे. अत्यंत जवळच्या नातेवाईकांऐवजी इतर सर्वांशी लग्न करण्याची मूभा इस्लामने दिली आहे. जात पात या पवित्र कार्यात आड येत नाही. प्रेषित कथन आहे,

"लग्न करताना लोक साधारणत: जात-पात, खानदान, सौंदर्य आणि श्रीमंतीच्या मागे पळतात. परंतु श्रध्दावंताने यासाठी फक्त ईशपरायणता आणि सदाचरणाकडेच लक्ष केंद्रित करावे." (मिश्कात)

"त्याच्या धर्माचरणाकडे लक्ष केंद्रित करा" (मिश्कात)

देणगी आणि हुंड्याच्या बाबतीत मध्यमार्ग स्वीकारावा. लग्नविधी अत्यंत साधा आणि सुटसुटीत आहे. त्यासाठी धर्मगुरुची अथवा अधिकाऱ्याची गरज नाही. त्यासाठी काही पूर्व अट नाही. जोडपं स्वत: लग्नविधी दोन साक्षीदारांच्या साह्याने पार पाडू शकतात. दोघांनी आपापली लग्नासाठीची संमती दोन साक्षीदारांसमोर दिली की लग्नविधी पार पडतो! हेतु साध्य करण्यासाठी हीच एकमेव अट आहे.

काही अपरिहार्य कारणांमुळे (सामाजिक आणि नैतिक कारणामुळे) चार लग्न एखादी व्यक्ती करु शकते. ही परवानगी पूर्वअटीसह आहे की त्याने प्रत्येकीला न्याय द्यावा. उदा. लहान बाळाचे संगोपन करण्यासाठी अथवा दुसरी पत्नी करणे भाग पडत असेल तर कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"आणि जर तुम्हाला भय असेल की तुम्ही अनाथांशी न्याय करु शकणार नाही. तर ज्या स्त्रिया तुम्हाला पसंत पडतील त्यांच्यापैकी दोन-दोन, तीन-तीन, चार-चारशी विवाह करा. परंतु जर तुम्हाला भय असेल की तुम्ही त्यांच्याशी न्याय करु शकणार नाही तर मग एकच पत्नी करा. किंवा त्या स्त्रियांना आपल्या दांपत्य जीवनात आणा ज्या तुमच्या ताब्यात आल्या आहेत, अन्यायापासून वाचण्यासाठी हे औचित्याच्या अधिक जवळचे आहे." (४:३)

हा आदेश यासाठी देण्यात आला आहे की समाजामध्ये एक तरुणसुध्दा अविवाहित राहू नये. जर अविवाहीत (ब्रम्हचर्य) राहिला तर पापकृत्य (अन्याय) त्याच्या हातून घडेल.

इस्लाम बेभान करमणुकींना अजिबात परवानगी देत नाही ज्यामुळे व्यक्ती विषयासक्ती आणि स्वैराचाराकडे आकर्षित होतो. अशा करमणुकींमुळे मनुष्याची विवेकबुध्दी आणि नैतिकता रसातळाला पोहचते. यामुळेच नाचगाणे, नृत्य, संगीत, मद्य इ. अवैध (हराम) ठरविले आहे. आणि खाण्यापिण्याच्या पध्दतीबाबत इस्लाम मध्यमार्ग स्वीकारतो. कुरआनमध्ये सांगितल्याप्रमाणे एक श्रध्दावंत (मुस्लिम) उधळपट्टी करणारा नसतो आणि कंजुषसुध्दा नसतो.

''जो खर्च करतात तो न फाजील खर्च करतात न कंजुषपणा, त्यांचा खर्च दोन्ही टोकांच्या दरम्यान संतुलनावर आधारित असतो. ते अल्लाहशिवाय इतर कोणत्याही उपास्याचा धावा करीत नाहीत.'' (२५.६७)

येथे दोन प्रेषितवचनं नमुद करणे संयुक्तीक ठरेल.

''अल्लाह आपल्या कृपेचा प्रभाव आपल्या दासांच्या रहाणीमानावर पाहण्यास इच्छुक असतो.'' (मुस्लिम)

परंतु याचवेळी अल्लाहला आपल्या दासाने दिखाऊपणाचे, उधळपट्टीचे आणि चैनीचे जीवनमान (राहणीमान) ठेवावे हे अजिबात पसंत नाही. जशाप्रकारे अत्यंत हीन दर्जाचे कपडे घालणे तसेच दिमाखाने खालपर्यंत लोळत जाणारे कपडेसुध्दा अल्लाह पसंत करीत नाही.

''जो जमिनीवर दिमाखाने खालपर्यंत लोळत जाणारे कपडे परिधान करील तर अशा व्यक्तीकडे अल्लाह पुनरुत्थानाच्या दिवशी अजिबात दृष्टी कृपा टाकणार नाही.'' (मिश्कात)

याचप्रकारे सोने आणि चांदीचे दागिने पुरुषासाठी अवैध ठरविण्यात आले आहे. रेशमी कपडे पुरुषासाठी निषिध्द आहे. किंबहुना तो रेशमी खुर्चीवरसुध्दा बसू शकत नाही.

''अल्लाहच्या प्रेषिताने आम्हाला सोने अथवा चांदीच्या भांड्यात खाण्यापिण्यास मनाई केली आहे. तसेच रेशमी कपडे अथवा रेशमी शैय्या (अंथरुण) वापरण्याची मनाई केली आहे.''

प्रत्येकाने आपल्या गरजेचेच तेवढे संसाराचे साहित्य जवळ बाळगावेत.

''एक बेड (शय्याकक्ष) पतीसाठी, दुसरा पत्नीसाठी, तिसरा पाहुण्यांसाठी तर चौथा बेड शैतानासाठी असतो.'' (मुस्लिम).

अत्यंत भव्य आणि दिव्य घर स्वतःसाठी बांधणेसुध्दा योग्य नाही प्रेषितकथन

आहे,

''एकश्रध्दावंत जो आपल्यासाठी खर्च करतो तो सर्व खर्च अल्लाहच्या मार्गातील खर्च समजला जातो. फक्त इमारतीवरील खर्च जो त्याच्या गरजे पेक्षा जास्त आहे असा खर्च अल्लाहच्या मार्गातील खर्च समजला जात नाही कारण की हे एक चांगुलपणाचे कृत्य नाही.'' *(तिरमीजी)*

श्रध्दावंतांना चंगळवादापासून आणि चैनीच्या राहणीमानापासुन दूर राहण्यास सांगितले आहे. ''चैनीच्या राहणीमानापासून सावध राहा की अल्लाहला चंगळवाद अजिबात पसंत नाही.'' *(मिश्कात)*

(७) स्त्री आणि पुरुष या दोघांच्या नैसर्गिक शक्ती वेगवेगळ्या आहेत. त्यांची कार्यक्षेत्रे वेगवेगळी आहेत. त्यांचा पोषाख आणि स्वरुपसुध्दा वेगवेगळे आहेत.

आदरणीय प्रेषित मुहम्मद (स.) यांनी लोकांना सावध केले आहे,

''अल्लाह तिरस्कार करतो अशा माणसांचा जे स्त्री रूपात दिसतात (स्त्रीसारखे रूपधारण करतात) आणि त्या स्त्रिया ज्या पुरुषांचे (याबाबतीत) अनुकरण करतात.''

(बुखारी)

(८) श्रध्दावंतांनी संयम, पावित्र्य आणि सदगुणावरील आपली पकड ढिली करता कामा नये. नातेवाईकाचा मृत्यु ही दुःखद घटना आहे तरीपण अशा प्रसंगी संयम सोडता कामा नये. अशा प्रसंगी एखाद्याने मोठ्याने रडणे (विव्हळणे), तोंड झोडणे, स्वतःचे कपडे फाडणे आणि केस विस्कळीत करण्यासाठी मनाई आहे. *(अबूदाऊद)*

तसेच सुखाच्या प्रसंगी एखाद्याने फुगून जाऊ नये. कुरआनोक्ती आहे,

''जे काही अल्लाह तुम्हाला प्रदान करील त्यावर तुम्ही फुगून जाऊ नये. अल्लाह अशा लोकांना पसंत करीत नाही जे आपल्या स्वतःला फार मोठे समजतात आणि घमेंड दाखवितात.'' *(५७:२३)*

इस्लामी आदेश फक्त संयम, सद्‌गुण आणि पावित्र्यासंबंधीच फक्त नाहीत तर चांगल्या संवयीबद्दलसुध्दा आहेत. प्रेषित मुहम्मद (स.) यांची शिकवण आहे,

''डाव्या हाताने खाऊ नका.'' *(मुस्लिम)*

''तुमचे गुप्तांग तुमच्या उजव्या हाताने स्वच्छ करू नका.'' *(बुखारी)*

''एक पायातच फक्त पायतान आहे आणि दुसऱ्यात नाही अशा स्थितीत चालू नका.'' *(मुस्लिम)*

"डोक्याच्या काही भागाचीच हजामत करू नका आणि काही भाग तसाच सोडू नका." *(बुखारी)*

(९) अशी कृत्ये करू नका जी या जगात आणि पारलौकिक जीवात परिणामशून्य आहेत, कुरआनमध्ये श्रध्दावंताच्या मुलभूत गुणांचा उल्लेख आला आहे त्यात अशा निरुपयोगी कृत्यांचा संबंधविच्छेद केला आहे.

आदरणीय प्रेषित मुहम्मद (स.) यांचे कथन आहे,

"श्रध्दावंताचे हे लक्षण आहे की तो निरुपयोगी तुच्छ कृत्यांपासून अलिप्त राहतो." *(तिरमीजी)*

(१०) इस्लाम अशा कृत्यांना करण्याची सक्त मनाई करतो जी गैरइस्लामी आहेत आणि ज्यांच्यामुळे श्रध्दावंतांची सांस्कृतिक ओळख व धार्मिक स्वभावाला बाधा येईल.

श्रध्दावंताने अश्रध्दावंतांच्या चालीरीतींना आत्मसात करता कामा नये अन्यथा त्यांचा समावेश अश्रध्दावंतात होईल.

"जो कोणी ज्यांचे अनुकरण करील तो त्यांच्या पैकी होईल." *(अबूदाऊद)*

श्रध्दावंतांची दाढी आणि मिशा अश्रध्दावंतांच्या विरुध्द असावेत.

"अश्रध्दावंतांच्या दाढी आणि मिशा ठेवण्याच्या पध्दती विरुध्द तुम्ही दाढी मिशा ठेवा". *"ख्रिस्ती आणि यहुदी त्यांचे केस रंगवत नाहीत तर तुम्ही त्यांच्या विरुध्द करा."* *(बुखारी)*

अशा प्रकारे श्रध्दावंत समाजाला चांगुलपणा आणि एकीच्या बंधनात अशा प्रकारे ठेवण्याचा स्वाभाविक प्रयत्न आहे की जेणेकरून प्रत्येक क्षेत्रांत त्यांची वेगळी छाप व ओळख दिसावी. याचसाठी स्वच्छंदतेला इस्लामचा विरोध आहे. आणि तथाकथित उदारमतवादी धोरणालासुध्दा! इस्लामची श्रध्दा आहे की काळे हे पांढऱ्यापेक्षा वेगळे आहे. दोघांची सरमिसळ इस्लामला मान्य नाही.

(४) आर्थिक व्यवस्था

ज्याला इस्लामचे ज्ञान आहे त्याला हे चांगल्या प्रकारे माहीत होते की आज्ञाधारक श्रध्दावंतांची खरी रूची या जगात नसून पारलौकिक विश्वात आहे. त्याच्या जगण्याचे आणि मरण्याचे हे एकमेव उद्देश आहे. श्रध्दावंताचे हेच वैशिष्ट्य असते की तो पारलौकिक जीवनाला या जगाच्या जीवनावर प्राधान्य देतो. हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. याचा अर्थ हा मुळीच होत नाही की इस्लामने भौतिक जीवनाला काही एक महत्त्व

दिलेले नाही. इस्लामने मनुष्याला या विश्वात जे स्थान दिले आहे आणि ज्या उद्देशासाठी त्याला या जगात पाठविले आहे. त्याची ही निकड आहे की भौतिक जीवनाला पारलौकिक जीवनाइतकेच महत्त्व आहे. अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करण्यासाठी आणि ध्येयप्राप्तीसाठी इस्लामने दाखवून दिलेल्या सरळमार्गावर चालण्यासाठी या जगातील जीवनाची गरज आहे. हे एक परीक्षास्थळ आहे. श्रध्दावंत (मुस्लिम) हे फक्त आत्म्याचेच नाव नाही तर शरीर आणि आत्मा मिळून श्रध्दावंत जन्माला येतो. याचे ज्ञान ज्याला नाही त्याला इस्लामचे ज्ञान नाही. मनुष्याच्या कर्तृत्वाची पूर्तता आणि ध्येयप्राप्तीसाठी (अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करणे) त्याला शरीराची आवश्यकता आहे, तसेच भौतिक वस्तुंचीसुध्दा गरज आहे. यांना आपण आर्थिक गरज असे म्हणतो. प्रेषितवचन आहे,

"अनिवार्य उपासनापध्दतीच्या नंतर वैध आणि प्रामाणिक मार्गाने जीवनसामग्री प्राप्त करणे अनिवार्य आहे." यासाठी कुरआनने अशा जीवनसामग्रीला "अल्लाहची कृपा" म्हणून संबोधले आहे.

अशा प्रकारे इस्लाम भौतिक गरजांना पूर्ण महत्त्व देतो. इस्लामी व्यवस्थेत याची काळजी घेतली गेली आहे की मनुष्याच्या भौतिक गरजांपासून कोणीही वंचित राहू नये. यासाठी खालील उपाययोजना केलेल्या आहेत.

(१) प्रत्येक श्रध्दावंताने त्याची रोजीरोटी स्वत: कमविली पाहिजे.

(२) उत्पन्न आणि खर्चाची मर्यादा घालून दिलेली आहे.

(३) श्रीमंताने गरीबांच्या गरजा भागविणे त्याचे नैतिक कर्तव्य आहे.

(४) गरीबांबद्दलची श्रीमंताची न्यायिक (कायदेशीर) जबाबदारी आहे.

वरील बाबींचा खुलासा थोडक्यात आपण पाहू या.

प्रत्येक श्रध्दावंताने त्याची रोजीरोटी स्वत: कमविणे आवश्यक आहे.

"वैध आणि प्रामाणिक मार्गाने कमविणे प्रत्येकावर अनिवार्य आहे."

कोणीही दुसऱ्यासाठी ओझे बनून राहू नये आणि स्वत: ने स्वत:च्या हाताने कमविले पाहिजे. जशी कमाई तसा खर्च केला पाहिजे. *(बुखारी)*

भीक मागणे हे तिरस्करणीय कृत्य आहे. जर कोणी अपरिहार्य कारणा अभावी रोजीरोटी अवैध मार्गाने प्राप्त करीत असेल अथवा निषिध्द अन्न खात असेल तर त्याचे कृत्य भीक मागण्यासारखेच आहे.

सर्व प्रकारचे वैध मार्ग रोजीरोटी प्राप्त करण्याचे सर्वांसाठी खुले आहेत. आर्थिक

क्षेत्रात सर्वांना सारखी संधी आहे. संधीपासून वंचित कोणीही राहात नाही. मक्तेदारीला तिथे वाव नाही. शेती, व्यापार, उद्योग, सेवा अशी सर्व उत्पन्नांची साधने सर्वांसाठी खुली असतात, प्रत्येकाला उत्पन्नाचे कोणतेही क्षेत्र त्याच्या आवडीनुसार निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. उत्पन्नाची ही सर्व साधने अल्लाहनेच मनुष्यासाठी निर्माण केली आहेत. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"तोच तर आहे ज्याने पृथ्वीमध्ये तुमच्यासाठी सर्वगोष्टी निर्माण केल्या."

(२:२९)

पृथ्वीतील, अवकाशातील सर्व गोष्टींचा निर्माता अल्लाह आहे. मनुष्याचा त्यात काही वाटा नाही, म्हणून प्रत्येकाने आपल्या गरजेनुसार त्यांचा उपभोग घ्यावा.

सर्व श्रध्दावंतांचा तीन गोष्टींमध्ये समान वाटा आहे एक हवा, दोन पाणी आणि अग्नी अशा प्रकारे ज्या वस्तू नैसर्गिकपणे तयार होतात त्या सर्व वस्तू निर्मितीत मनुष्याचा काहीच वाटा नसतो. अशा वस्तू सर्वांसाठी असतात. प्रेषितकथन आहे,

"अल्लाह पुनरुत्थानाच्या दिवशी त्या व्यक्तीला सांगेल की तू आज माझ्या कृपेपासून वंचित आहे कारण इतरांना तू त्या वस्तूंपासून वंचित ठेवले होते. ज्यांना तू नव्हे तर आम्ही निर्माण केले होते."

अशा प्रकारे पाणी, नद्या, नाले, तलाव, झरे, झाडेझुडपे, गवत, जंगली लाकूड, जंगली झाडावरची फळ, जंगलातील जनावरे, जंगलातील पक्षी, दगड माती, खनिज संपत्ती, मीठागरे अशा प्रकारचे अनेक वस्तू सार्वजनिक वापरासाठी आहेत. पडिक जमिनीसुध्दा सार्वजनिक हितासाठीच आहेत. जो कोणी त्याला मशागत करू इच्छितो तो तसे करण्यास स्वतंत्र आहे. "पडिक जमीन अल्लाहची आणि त्याच्या प्रेषिताची आहे आणि ती तुमच्यासाठी माझ्या वतीने आहे." *(हुज्जतुल्लाह अल बलिग)*

एखाद्या व्यक्तीने जर पडिक जमीन जी सर्वांसाठी आहे ताब्यात घेऊन त्यावर मशागत केली तर तो जमिनीचा तुकडा त्या व्यक्तीचा होईल. (कसेल त्याची जमीन) त्या जमिनीला त्याच्यापासून कोणीही दुसरा हिसकावून घेऊ शकत नाही. प्रेषितांची शिकवण आहे,

"जो जी जमीन कसेल ती त्याची जमीन ठरेल आणि तो त्या जमिनीचा मालक बनेल." *(अलबलिग)*

नैसर्गिक साधन संपत्ती जर कोणी आत्मसात केली तर तीला तो मनुष्य पडिक ठेवू शकत नाही. जर तसे झाले तर ती संपत्ती पुन्हा सार्वजनिक बनते.

"जर कोणी सतत तीन वर्षे जमीन पडिक ठेवील तर ती जमिन सार्वजनिक संपत्ती ठरते आणि दुसरा कोणीही त्या जमिनीत नांगर घालू शकतो."

(हुज्जतुल्लाह अलबलिग)

प्रत्येकजन त्याची संपत्ती वापरण्यास आणि तिला वृध्दिगंत करण्यासाठी स्वतंत्र आहे. इस्लाम त्याच्या अनुयायींना उद्योगधंद्यासाठी अनेक सवलती देतो. जो कोणी उद्योग आणि व्यापार (धंदा) करेल त्याच्यासाठी अल्लाहच्या अनेकानेक कृपा आणि देणग्या आहेत.

संपत्ती भरमसाठ साठविण्याबद्दलची मनाई आहे. संपत्तीची अमर्याद वाढ नैतिक आणि कायदेशीर बंधनाद्वारे नियंत्रित करण्यात आली आहे.

प्रत्येक आर्थिक व्यवहारांत प्रामाणिकपणा आणि सत्यतेला अधिक महत्त्व आहे. ग्राहकाला धोका देणे पाप आहे. प्रेषित वचन आहे,

"जो दुसऱ्याला फसवतो तो माझ्या अनुयायीपैकी नाही."

विक्री वाढविण्यासाठी खोट्या शपथा खाणेसुध्दा पाप आहे. प्रेषित कथनानुसार,

"जो कोणी खोट्या शपथा खावून आपला धंदा वाढवित असेल अशी व्यक्ती पुनरुत्थानाच्या दिवशी अल्लाहच्या कृपेपासून वंचित राहील." (मुस्लिम)

धंद्यामध्ये कोणत्याही प्रकारे व्याज देणे घेणे निषिध्द आहे. कुरआन या बाबतीत स्पष्ट आदेश देत आहे,

"वास्तविक पाहता अल्लाहने व्यापाराला वैध केले आहे आणि व्याजाला निषिध्द." *(२:२७५)*

व्याज देणे घेणे हा गुन्हेगारी स्वरुपाचा आणि देशद्रोहाचा गुन्हा आहे. अल्लाहने कुरआन मध्ये स्पष्ट आदेश दिला आहे,

"हे श्रध्दावंतांनो! अल्लाहच्या कोपचे भय बाळगा आणि जे काही तुमचे व्याज लोकांकडून येणे बाकी असेल ते सोडून द्या. जर खरोखर तुम्ही श्रध्दावंत असाल. परंतु जर तुम्ही असे केले नाही, तर सावध व्हा. अल्लाह व त्याच्या पैगंबराकडून तुमच्याविरुध्द युध्दाची घोषणा आहे." *(२:२७८-२७९)*

अशी पार्टनरशीप (भागीदारी) की ज्यामध्ये फक्त एका भागीदाराचा नफा निश्चित आहे आणि दुसऱ्याचा अनिश्चित, तर ही भागीदारी व्याजाच्या कक्षेत येते.

जुगार हे निषिध्द कृत्य आणि पापी कृत्य आहे. कुरआनोक्ती आहे,

"हे श्रध्दावंतांनो! ही दारू आणि जुगार व वेदी (देवस्थानं) आणि शकून ही सर्व अमंगल सैतानी कामे होत, यांच्यापासून दूर राहा, आशा आहे की तुम्हाला यश मिळेल. सैतानाची तर अशीच इच्छा आहे की दारू व जुगाराद्वारे तुमच्यात शत्रुत्व व कपट निर्माण करावे आणि तुम्हाला अल्लाहचे स्मरण व नमाजपासून रोखावे. मग काय तुम्ही या गोष्टीपासून अलिप्त राहाल? अल्लाह व त्यांच्या पैगंबराचे म्हणणे मान्य करा आणि अलिप्त राहा, परंतु जर तुम्ही अवज्ञा केली तर हे समजून असा की आमच्या पैगंबरावर स्पष्टपणे आदेश पोहचविण्याची फक्त जबाबदारी होती." *(५:९०-९२)*

इस्लाम फक्त जुगारावरच बंदी घालत नाही तर त्यासारख्या इतर कामांवरसुध्दा बंदी घालतो उदा. - सट्टेबाजी, लॉटरी, जीवनविमा इ. इ.

ज्या वस्तू खाण्यापिण्यासाठी निषिध्द आहेत त्यांचा व्यापार करणेसुध्दा अवैध आहे. "अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांनी दारूचा, डुकरांचा आणि मूर्तींचा व्यापार अवैध ठरविला आहे." *(बुखारी)*

अशा वस्तूंची किंमतसुध्दा अवैध आहे. अल्लाहने ज्या वस्तू खाण्यासाठी अवैध ठरविल्या आहेत त्यांच्या किंमती ठरविणेसुध्दां अवैध आहे.

ज्या व्यापार पध्दतीमुळे दुसऱ्याला त्रास होईल असा व्यापार करण्यास इस्लाम परवानगी देत नाही. नंतर जास्त किंमत व भाव मिळावा म्हणून जीवनावश्यक वस्तूंचा साठा करून ठेवणे अवैध आहे. जो कोणी असे करील त्याचा कठोर शब्दांत तिरस्कार केला आहे.

"साठा करणारा शापग्रस्त आणि निंद्य आहे." *(बैहकी)*

बाजारात वस्तू घेऊन जाणाऱ्यास रस्त्यांमध्ये अडवून ती वस्तू विकत घेणे अयोग्य आहे.

"बाजारात वस्तूंचा साठा व्यवस्थित होताना त्यास मध्येच रोखू नका."

(मुस्लिम)

गावाकडून एखाद्या शेतकऱ्याने आपला माल विक्रीसाठी शहरात आणला तर शहरातील व्यक्तीने दलाली करू नये. त्या शेतकऱ्याला त्याचा माल विकू द्यावा. त्याचा माल कोणीही साठवून ठेऊ नये की त्यापासून नंतर जास्त पैसे कमवता येतील.

कोणत्याही शहरी माणसाने शेतकऱ्यांच्या पश्चात त्याचा माल विकू नये.

(मुस्लिम)

जर माल विक्रेत्याच्या ताब्यात नसेल तर त्याने त्या मालाची विक्री (बोली) करू

नये. अशा व्यवहाराने आर्थिक उपद्रव माजतो. भविष्यात असा व्यवहार सट्टाबाजीचे स्वरूप घेतो.

"जो माल तुमच्या ताब्यात नाही त्याची तुम्ही विक्री करू नका." *(अबू दाऊद)*

दुसऱ्याला तोटा देणारे असे सर्व उपजीविकांचे स्त्रोत इस्लामला अमान्य आहे. तसेच ते उपजीविका स्त्रोत जे नैतिक आणि धार्मिक नुकसान करतात सर्व अवैध ठरविली आहेत. धुंदी, उन्माद निर्माण करणारे पदार्थ, नृत्य, संगीत, चित्रकला, अश्लील साहित्य, सिनेमा इ. द्वारा आपली उपजीविका प्राप्त करणे निषिध्द आहे.

कोणताही व्यवहार जो पारदर्शक नसेल आणि त्यामुळे वाद निर्माण होत असेल तर असा व्यवहार वैध समजला जात नाही.

"अल्लाहच्या प्रेषितांनी अप्रामाणिक आणि संदिग्ध व्यवहाराला विरोध केला आहे." (अवैध आहे) *(मुस्लिम)*

वर उल्लेखित मर्यादेत राहून प्राप्त केलेली धनसंपत्ती वैध आहे आणि तिला तो खर्च करण्यास मोकळा आहे. परंतु हे खर्च करण्याचे स्वातंत्र्य अमर्याद नाही. त्यांला नैतिक आणि कायदेशीर मर्यादा घालून दिलेल्या आहेत. जो कोणी या मर्यादांचे उल्लंघन करील त्यास शासन शिक्षा करील. जर कोणी या जगात शिक्षा टाळू शकेल तर पारलौकिक जीवनात त्याला शिक्षा मिळणारच आहे. या मर्यादांचा उल्लेख 'सामाजिक व्यवस्था' या मागील प्रकरणात थोडाफार आलेला आहे. पुढील प्रकरणात सविस्तर उल्लेख होणार आहे. मर्यादा घालून देण्यामागील हेतु हा आहे की आरामदायी आणि भरभराटीचे जीवन जगण्याला काही हरकत नाही परंतु चैनीचे, उधळपट्टीचे, दिखाव्यासाठी जीवन जगणे इस्लामला अमान्य आहे.

(५) गरीबांचे हक्क

प्रत्येकजण संपत्ती मिळवण्यासाठी स्वतंत्र आहे. परंतु जन्मतः सर्वजण मानसिक शारीरिक आणि बौध्दिकरीत्या सारखे नसतात. म्हणून सर्वांची आर्थिक स्थितीसुध्दा सारखी नसते. समाजातील एक वर्ग जर गर्भश्रीमंत बनला तर दुसरीकडे समाजात एक वर्ग अत्यंत गरीब बनतो. त्याला जीवनावश्यक गरजा भागविणे अशक्य होते. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी समाजात वाढत जाते. जीवनावश्यक गरजा भागविणे ही नागरिकांची मूलभूत गरज आहे तसेच ते धार्मिक कर्तव्यसुध्दा आहे. हे सत्य मान्य करूनसुध्दा समाजात विषमता राहाते. इस्लाम समस्त मानवांना 'अल्लाहची संतती' म्हणून ओळखतो (मिश्कात) ज्याप्रमाणे आपण आपल्या मुलांना अन्न, वस्त्र,

निवाऱ्यापासून वंचित राहिलेले पाहू शकत नाही. तसेच अल्लाह जो दयाळू आणि कृपाळू आहे तो आपल्या संततीला दयनीय अवस्थेत कसा बरे ठेवेल? म्हणूनच इस्लाम यावर भर देतो की आर्थिक संघर्षात जो यशस्वी होत नाही त्याला आर्थिक सुबत्ता मिळालेल्या बंधुंनी मदतीचा हात द्यावा. लोकांना दयनीय अवस्थेतून बाहेर काढण्याची शासन आणि श्रीमंत दोघांची जबाबदारी आहे. अल्लाहने पृथ्वीवर निर्माण केलेली उपजीविकेची सर्व साधने सर्वांसाठी उपलब्ध आहेत. जर काही लोक त्यांच्या रोजगारातून त्यांना आवश्यक असणाऱ्या गरजा भागवू शकत नसतील तर जे गरजेंपेक्षा जास्त कमवतात तर त्यांची ती जास्त संपत्ती त्यांची नाही. तर त्या अधिक संपत्तीवर इतर गरीबांचा हक्क आहे. श्रीमंत त्या अधिक संपत्तीचे विश्वस्त आहेत. त्यांनी ती संपत्ती त्यांच्या खऱ्या मालकांसाठी (गरीब) खर्च करावी. श्रध्दावंताचे वैशिष्ट्य स्पष्ट करताना कुरआनमध्ये अल्लाहने स्पष्ट आदेश दिला आहे,

"त्यांच्या मालमत्तेत हक्क आहे याचकांचा आणि वंचितांचा" (५१:१९)

अल्लाहने खालीलप्रमाणे कुरआनमध्ये श्रीमंताना गरीबांची मदत करण्यासाठी आदेश दिलेले आहेत.

"तुम्ही जोपर्यंत (अल्लाहच्या मार्गात) तुमच्या सर्वाधिक प्रिय वस्तू खर्च करत नाही, तोपर्यंत तुम्ही पुण्य प्राप्त करू शकत नाही. जे काही तुम्ही खर्च कराल त्याविषयी अल्लाह सर्वज्ञ आहे." (३:९२)

"हे श्रध्देविरुध्द आहे की श्रध्दावंताने भरल्यापोटी आरामशीर झोपावे आणि त्याचा शेजारी मात्र भुकेने बिछाण्यात रात्रभर तडफडत राहावा." (मिश्कात)

श्रीमंती ही एक मोठी परीक्षा आहे. श्रीमंती ही खरोखरच मोठी सत्वपरीक्षा आहे. त्यामुळे बहुतेकदा आपत्ती उद्‌भवते. जो कोणी आपली श्रीमंती धार्मिक कार्यात गरीबांवर खर्च करीत आहे. त्यांच्यावरील संकटाना त्यांना सहसा तोंड द्यावे लागत नाही.

प्रेषितकथन आहे, *"मी काबागृहाच्या ईश्वराची (अल्लाहची) शपथ घेतो की ते घाट्यात (तोट्यात) आहेत." कोण तोट्यात आहे ही विचारणा केली असता प्रेषितांनी सांगितले, "त्यांच्या पैकी श्रीमंत लोक! फक्त तेच श्रीमंत लोक तोट्यात राहणार नाहीत आणि श्रीमंतीच्या दुष्ट परिणामांपासून स्वतःचा बचाव करू शकतील जे आपली संपत्ती स्वखुशीने धर्मकार्यात आणि गरीबांसाठी खर्च करतील."*

गरीबांच्या हक्कांचे रक्षण

गरीबांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी इस्लामने श्रीमंतावर काही कायदेशीर

जबाबदाऱ्या, नैतिक जबाबदाऱ्यांव्यतिरिक्त टाकलेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे आहेत.

(१) प्रत्येकाला वर्षाला काही ठराविक रक्कम गरीबांसाठी गरीबांच्या कायदेशीर हक म्हणून खर्च करावी लागते. शासन प्रत्येकांकडून यासाठी जकात वसूल करते. आणि त्या जकातरकमेला गरीबांमध्ये वाटप करण्याची व्यवस्था करते. कोणीही विरोध करू शकत नाही. जर कोणी विरोध केला तर तो त्याचे पारलौकिक जीवन बरबाद करतोच पण शासन अशा अभागीस कडक शिक्षा ठोठावते.

(२) शासनाने गोळा केलेली जकातची रक्कम गरीबांच्या गरजा पुरविण्यासाठी आणि धार्मिक गरजा भागविण्यासाठी अपुरी असेल तर शासन श्रीमंतावर आणखी करआकारणी करू शकते.

(३) श्रध्दावंत मरण पावला तर त्याची संपत्ती जवळच्या नातेवाईकांत वाटली जाते. जवळचे नातेवाईक नसतील तर त्यापुढील नातेसंबधात. (इस्लामने यासाठी विस्तृत वारसाहक्क कायदा केला आहे.) अशा प्रकारे संपत्ती समाजातील काही मोजक्यांच्यांच हातात स्थिरावत नाही तर ती वाहती असते. गरीबी हटविणे इस्लामी अर्थव्यवस्थेमुळेच शक्य आहे. संपत्तीचे समाजात सहज सुलभ अभिसरण आणि योग्य वितरण इस्लामी अर्थव्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे. हे महत्वाचे दोन प्रकार समाजात आर्थिक विषमता दूर करते. सामाजिक आणि आर्थिक समता प्राप्त करणे इस्लामी अर्थ व्यवस्थेमुळे सहज शक्य होते.

(६) राजकीय व्यवस्था

इस्लामची राजकीय व्यवस्था ही दोन मूळ सत्यांवर आधारीत आहे. ते खालीलप्रमाणे आहेत.

(१) **अल्लाहचे स्वत:चे स्थान आणि मानवी विश्व** - अल्लाह मनुष्याचा आणि ह्या विश्वाचा फक्त निर्माता आणि नियंताच नाही तर खरा मालक व शासकसुध्दा आहे.

(२) **मनुष्याचे स्वत:चे स्थान** - मनुष्याला ह्या विश्वात (पृथ्वीवर) अल्लाहने फक्त निर्माण केले आहे असे नाही तर मनुष्य अल्लाहचा नम्र दास आहे आणि अल्लाहचा या पृथ्वीवर प्रतिनिधी (खलिफा) आहे.

वरील दोन महत्त्वाच्या सत्यतेवर "इस्लामी राजकीय व्यवस्था" उभी आहे. इस्लामी राजकीय व्यवस्थेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत,

(१) सर्वोच्च अधिकार आणि सार्वभौमत्व अल्लाहकडे फक्त आहे. कोणीही व्यक्ती, समाज अथवा संपूर्ण मानवता त्यात एका अणुचाही भागीदार नाही. मनुष्य हा जन्मजात अल्लाहचा दास आहे. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"शासनाची सत्ता अल्लाहखेरीज इतर कोणासाठी नाही. त्याची आज्ञा आहे की त्याच्या स्वत:शिवाय तुम्ही इतर कोणाची ही भक्ती करू नका, हीच थेट सरळ जीवनपध्दती आहे, पण बहुतेक लोक जाणत नाहीत." *(१२:४०)*

(२) अल्लाह एकमेव खरा कायदे करणारा आहे. अल्लाहने दिलेली राज्यघटना ही मानवी जीवनाची राज्यघटना आहे. याच एकमेव ईशराज्यघटनेमुळे मानवी जीवनव्यवहार अनुशासित होते. कोणत्याही व्यक्तीला अथवा संस्थेला त्यांच्यासाठी अथवा इतरांसाठी राज्यघटना बनविण्याचा अधिकार नाही.

(३) अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) हे अल्लाहचे प्रतिनिधी आणि त्याच्या दिव्य प्रकटनांस स्पष्ट करून सांगणारे आणि अल्लाहच्या मर्जीचे विवरण करणारे आहेत. त्यांच्या या अधिकारीक स्थितीमुळे त्यांना द्वितीय असे स्थान कायदे करण्यासाठी प्राप्त झाले आहे. म्हणून त्यांचे आदेश हे मूळ कायदे करणाऱ्या (अल्लाह) चे आज्ञापालन करण्यासारखे आहे. हे स्पष्ट करताना अल्लाहने कुरआनमध्ये आदेश दिला आहे,

"जे काही पैगंबर तुम्हाला देईल ते घ्या आणि ज्या गोष्टीची तो तुम्हाला मनाई करील त्यापासून अलिप्त राहा. अल्लाहच्या कोपचे भय बाळगा, अल्लाह कठोर शिक्षा देणारा आहे." *(५७:७)*

पैगंबराचे आज्ञापालन दुसरे तिसरे काही नसून अल्लाहचेच आज्ञापालन आहे. कुरआनोक्ती आहे,

"ज्याने पैगंबराची आज्ञा पाळली त्याने खरे म्हणजे अल्लाहचे आज्ञापालन केले." *(४:८०)*

(४) ईशआदेशांचे तंतोतंत पालन होण्यासाठी एक सार्वजनिक शासनव्यवस्था असणे अनिवार्य आहे. इमाम (नेता) ची नियुक्ती यासाठी आवश्यक आहे. पारिभाषिक शब्दावलीत यास आपण 'खिलाफत', 'इमामत' अथवा 'अमारत' म्हणून ओळखतो. या शासनसंस्थेत नेत्याला 'इमाम', 'खलीफा' अथवा 'अमीर' म्हणून संबोधले जाते.

(५) जो कोणी इस्लामवर श्रध्दा ठेवतो ती व्यक्ती इस्लामी राज्यव्यवस्थेची नागरिक ठरते. जे जन्मापासूनच श्रध्दावंत आहेत. त्यांच्याचसाठी नव्हे तर प्रत्येक श्रध्दावंत जो इस्लामवर श्रध्दा ठेवू लागतो (मुस्लिम बनतो) असे सर्व श्रध्दावंतसुध्दा

इस्लामी शासनव्यवस्थेचे घटक बनतात. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"श्रध्दावंत पुरुष व श्रध्दावंत स्त्रिया हे सर्व एक दुसऱ्याचे मित्र आहेत, भलेपणाचा आदेश देतात व वाईट गोष्टींपासून रोखतात, नमाज कायम करतात, जकात देतात आणि अल्लाह व त्याच्या पैगंबराचे आज्ञाधारक आहेत, हे ते लोक आहेत ज्यांच्यावर अल्लाहचा कृपावर्षाव होणारच." *(९:७१-७२)*

(६) अश्रध्दावंत इस्लामी राज्यव्यवस्था अथवा शासनव्यवस्थेचे खरे नागरिक बनू शकत नाही. त्यांची स्थिती दुय्यम नागरिकाची असते. इस्लामी पारिभाषिक शब्दावलीत त्यांना "झीम्मी" असे म्हणतात. ते अशासाठी की इस्लामी राज्य (शासन) अश्रध्दावंतांच्या जिवाचे, वित्ताचे आणि इज्ज़तीचे रक्षण करण्यास जबाबदार आहे. त्यांचे हक्क खलीफाच्या (राजाध्यक्ष्याच्या) मर्जीवर अवलंबून नाहीत तर अल्लाहने आणि त्याच्या प्रेषिताने अशा अश्रध्दावंतांचे हक्क अगोदरच निश्चित केलेले आहेत. त्यांचे तंतोतंत पालन करणे इस्लामी शासनव्यवस्थेचे कर्तव्य आहे.

(७) खलीफा (राजाध्यक्ष) चे हे परम कर्तव्य आहे की त्याने राज्यशासन दिव्य प्रकटनांनुसार चालवावे, राज्यात न्याय प्रस्थापित करावा, राज्याचे रक्षण करावे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अल्लाहने घालून दिलेले कार्य तडीस न्यावे. ज्याच्यासाठी पैगंबरांना पृथ्वीवर पाठविण्यात आले. प्रेषित मुहम्मद (स.) यांनी एक आज्ञाधारक श्रध्दाशील समाज अल्लाहच्या आदेशानुसार उभा केला होता. खलीफा (राजाध्यक्ष) हा अल्लाहशी बांधील आहे. त्याला अल्लाहसमोर जाब द्यावा लागणार आहे. त्याचप्रमाणे या जगात प्रजेसमोर त्याला त्याच्या कामाचा जाब द्यावा लागेल.

(८) खलीफाला सल्ला देण्यासाठी सल्लागार मंडळ असते. त्याला 'शुरा' असे म्हणतात. राजाध्यक्षाला सल्लागार मंडळाच्या साह्याने शासन चालवावे लागते. अल्लाहने प्रेषित मुहम्मद (स.) यांना आदेश दिला आहे की त्यांनी महत्त्वाच्या बाबींवर आपल्या सहकार्यांशी सल्लामसलत करावी. कुरआनोक्ती आहे,

"आणि धर्म-कार्यात यांनासुध्दा सल्लामसलतीत सहभागी ठेवा, मग जेव्हा एखाद्या मतावर तुमचा निश्चय दृढ होईल तेव्हा अल्लाहवर भरोसा करा, अल्लाहला ते लोकप्रिय आहेत जे त्याच्या भरवशावर काम करतात." *(३:१५९)*

(९) अशा व्यक्तीची खलीफा म्हणून नियुक्ती केली जाते जो सर्वात जास्त त्या योग्यतेचा आहे आणि ज्याची नियुक्ती बहुमताने मान्य केली जाते. खलीफा निवडणुकीने सत्तेवर येतो आणि आपले कर्तव्य पार पाडण्यास असमर्थ ठरला तर पदावरून निष्काशित केला जातो. त्याला पदावरून हाकलून दिले जाते.

(१०) इस्लामने खलीफा निवडीसाठी विशिष्ट निवडणूक पध्दतीचा स्वीकार केलेला नाही. उद्देश आणि त्यासंबंधीची मार्गदर्शक तत्त्वे घालून दिलेली आहेत. त्यानुसार कोणतीही निवडणूक पध्दत स्वीकारण्यास परवानगी आहे. निवडणूक उद्देश आणि मार्गदर्शक तत्त्वांनुसार स्वीकारलेली निवडणूक पध्दतीलाच इस्लामी निवडणूक पध्दत म्हटले जाते. जो लोकांमध्ये सर्वांत जास्त विश्वासु प्रामाणिक, ईशपरायण, सदाचरणी, ज्ञानी आणि कर्तव्यनिष्ठ आहे अशा व्यक्तीला निवडून देणे हाच निवडणुकीचा उद्देश आहे. मार्गदर्शक तत्त्वे निवडणुकीचा उद्देश प्राप्त करण्यासाठी आहेत. उमेदवार हुशार, धर्मनिष्ठ आणि योग्य निर्णयक्षमता असलेला असावा इ. मार्गदर्शक तत्त्वांपैकी आहेत.

(११) ज्याला खलीफा बनण्याची इच्छा आहे अथवा शासनात अधिकारपद प्राप्त करण्याची आकांक्षा बाळगतो अशांना ही पदे देवू नयेत.

"अल्लाह शपथ! आम्ही पद मागणाऱ्याला ते पद बहाल करणार नाही किंवा त्या पदाची इच्छा बाळगणाऱ्यालासुध्दा पदग्रहण करता येणार नाही." *(बुखारी)*

हे अशासाठी की इस्लामी शासनव्यवस्थेची व्याख्या सर्वसाधारण राज्यशासनाच्या व्याख्येपेक्षा अगदी वेगळी आहे. ही एक महत्त्वाची जबाबदारी आहे हक्क नव्हे. अल्लाहला ते शासन आणि शासनाध्याक्ष जबाबदार राहतात.

"खलीफा अथवा इमाम (अमीर) बनण्याची (शासनाध्यक्ष बनण्याची) अभिलाषा बाळगणे हा कलंक आणि मानहानी आहे, शिवाय त्या व्यक्तीव्यतिरिक्त ज्याने न्यायहक्काने ते पद ग्रहण केले आणि त्या पदाला न्याय दिला." *(मुस्लिम)*

याच कारणासाठी कोणताच विवेकी श्रध्दावंत ही जबाबदारी घेण्यास इच्छुक नसतो. अंतिम न्यायनिवाड्याच्या दिवशी त्याला अल्लाहसमोर उभे केले जाईल तेव्हा त्याला लोकांच्या हक्कांबद्दल जाब द्यावा लागेल. प्रेषितकथन आहे,

"यासाठी सर्वांत उत्तम व्यक्ती ती आहे ज्याला या पदाचा सर्वांत जास्त तिरस्कार वाटतो." *(मुस्लिम)*

एखादा मुस्लिम (श्रध्दावंत) या पदाला प्रयत्न करून प्राप्त करून घेतो आणि त्याला पदाच्या वरील जबाबदारींची जाणीव नसेल तर ती व्यक्ती आपले कर्तव्य व्यवस्थित पार पाडूच शकणार नाही. त्याला त्या इस्लामी शासनाध्यक्षाच्या (इमामच्या) जबाबदाऱ्यांची आणि कर्तव्यांची मुळीच जाणीव व ज्ञान नसते.

(१२) हे योग्य नाही की एखाद्याला नियमानुसार खिलाफतसाठी (शासन व्यवस्था चालवण्यासाठी) निवडून देण्यात आले तरीसुध्दा त्याने ती जबाबदारी

स्वीकारण्यास नकार द्यावा. अशी व्यक्ती इस्लामचा नव्हे तर अज्ञानाचा मार्ग स्वीकार करते, प्रेषित कथन आहे,

''जी व्यक्ती अशा स्थितीत मरण पावली की इमाम (नेता) ची आज्ञापालन करण्याची प्रतिज्ञा (बैत) त्याने घेतली नाही तर ती व्यक्ती अज्ञान (अंधकारमय) मृत्युला सामोरे गेली.'' *(मुस्लिम)*

त्याची ती अवज्ञा फक्त त्या एका इमाम, खलीफा अथवा अमीरपर्यंतच मर्यादित राहात नाही तर त्याने संपूर्ण इस्लामी शासनव्यवस्थेला धुडकावून दिले हे सिध्द होते. त्याच्याविरुध्द युध्द पुकारले जाते कारण त्याने आपल्या अमीरची अवज्ञा करून इस्लामी शासनव्यवस्थेविरुध्द युध्द अगोदर पुकारले.

(१३) प्रत्येक नागरिकाचे हे आद्य कर्तव्य आहे की त्याने आपल्या खलीफाच्या आदेशांचे पालन करावे. कुरआनमध्ये अल्लाहने स्पष्ट आदेश दिला आहे,

''हे श्रध्दावंतांनो! आज्ञापालन करा अल्लाहचे, आज्ञापालन करा पैगंबराचे आणि त्या लोकांचे जे तुमच्यापैकी आज्ञाधिकारी (अमीर) असतील. मग तुमच्या दरम्यान जर एखाद्याच्या बाबतीत वाद निर्माण झाला तर त्याला अल्लाह व पैगंबराकडे न्या. जर तुम्ही खरोखरच अल्लाह व अंतिम दिनावर श्रध्दा बाळगत असाल. हीच एक योग्य कार्यपध्दती आहे आणि शेवटाच्या दृष्टीनेदेखील अधिक चांगली आहे.'' *(४:५९)*

खलीफा किंवा अमीरचे आज्ञापालन न करणे म्हणजे अल्लाहच्या आदेशांचे पालन न करण्यासारखे आहे आणि त्याच्या प्रेषिताचे आज्ञापालन न करण्यासारखे आहे. प्रेषित मुहम्मद (स.) यांचे कथन आहे,

''जो कोणी आपल्या अमीरची अवज्ञा करील त्याने माझी अवज्ञा केली.'' *(मुस्लिम)*

खलीफा अथवा अमीर जर पापकृत्ये करण्याचे आदेश देत असेल तर त्याचे आज्ञापालन मुळीच करू नका. प्रेषितांनी स्पष्ट सांगितले आहे,

''जर अमीर अल्लाहची अवज्ञा करण्यास सांगत असेल तर त्याचे ऐकूही नका आणि त्याची आज्ञा धुडकावून द्या.'' *(मुस्लिम)*

प्रत्येक नागरिकाने खलीफाचे यश चिंतावे त्याचे भले होवो ही मनापासूनची सदिच्छा ठेवावी आणि त्याचे त्याचबरोबर आज्ञापालन करावे. हे धर्म कर्तव्य आहे. इस्लामचा एक अंग आहे. ही एक धर्मनिष्ठा आहे प्रेषितवचन आहे,

''दीन–धर्म हे एकनिष्ठतेचे दुसरे नाव आहे. विचारण्यात आले की एकनिष्ठा

कोणासाठी? *त्यावर प्रेषित मुहम्मद (स.) यांनी उत्तर दिले की एकनिष्ठा अल्लाहशी, त्याच्या प्रेषिताशी आणि खलीफाशी (शासनाध्यक्षाशी).''* (मुस्लिम)

(१४) हे प्रत्येक श्रध्दावंताचे कर्तव्य आहे की त्याने शासनाध्यक्षावर (खलीफा) कडक नजर ठेवावी. तो आणि त्याचे अधिकारी जिथे चूक करतील तेथे त्यांना धरावे. ते जर चुकीच्या मार्गाने जात असतील तर त्यांना सरळ मार्गावर आणावे. अबु बकर (र.) यांनी आपल्या प्रजेला स्पष्ट आदेश दिला,

''मी जर चुकत असेल तर मला सरळ मार्गावर आणा.'' (तबारी)

(१५) जर एखाद्या बाबतीत दिव्य प्रकटन नसेल तरच कायदा बनवता येतो. असे आदेश खलीफा आपल्या सल्लागार मंडळाबरोबर सल्लामसलत करूनच बनवतो.

(१६) इस्लामी राज्यशासन प्रत्येक नागरिकाच्या वित्त, जीव आणि इज्ज़तीच्या संरक्षणाला जबाबदार राहाते मग तो नागरिक कोणत्याही धर्माचा असो. प्रत्येक धर्माच्या नागरिकाला धर्मस्वातंत्र्य असते आणि विचारस्वातंत्र्य राहाते. हे स्वातंत्र्य एका अटीवर आहे की कोणीही राज्यशासनाविरुध्द बंड करू नये. राष्ट्रद्रोह करू नये. नैतिक अध:पतन आणि समाजात शांतता भंग होईल असे कृत्य करणे धर्मद्रोह आहे. कोणाचेही स्वातंत्र्य विनाकारण हिरावून घेतले जात नाही.

(१७) इस्लामी शासनव्यवस्था स्थापन करण्यामागचा हेतु अत्यंत उदार आहे आणि विस्तीर्ण आहे. इस्लामी शासनव्यवस्थेचे मूलतत्त्वांबद्दल आपणास आकलन खालील कुरआन संकेतवचनांवर चिंतन केल्यास होईल.

''आम्ही आपल्या प्रेषितांना अगदी स्पष्ट संकेतचिन्हे व सूचनेसहित पाठविले, आणि त्यांच्याबरोबर ग्रंथ आणि तुळा उतरविली जेणेकरून लोकांनी न्यायधिष्ठित व्हावे, आणि लोखंड उतरविले ज्यात मोठे बळ आहे आणि लोकांसाठी फायदे आहेत, हे अशासाठी केले गेले आहे की अल्लाहला माहीत व्हावे की कोण न पाहता त्याला व त्याच्या पैगंबरांना मदत करतो, निश्चितच अल्लाह मोठा बलवान आणि जबरदस्त आहे.'' (५७ : २५)

''हे दाऊद! आम्ही तुला पृथ्वीवर खलीफा (ईश्वराचा उत्तराधिकारी) बनविले आहे, म्हणून तू लोकांच्या दरम्यान सत्यानिशी राज्य कर आणि मनोवसानेच्या आहारी जाऊ नकोस. ती तुला अल्लाहच्या मार्गापासून दूर करील. जे लोक अल्लाहच्या मार्गापासून भटकतात, निश्चितच त्यांच्याकरिता कठोर शिक्षा आहे. कारण न्यायानिवाड्याचा (हिशोबाचा) दिवस ते विसरून गेले.'' (३८ : २५-२६)

"जर अल्लाह लोकांना एक दुसऱ्याकरवी हटवीत नसता तर मठ आणि चर्च व 'सिनेगॉग' आणि मस्जिदी ज्यात अल्लाहचे नाव मोठ्या प्रमाणात घेतले जाते. सर्व उद्ध्वस्त केली गेली असती. अल्लाह जरूर त्या लोकांना सहाय्य करील जे त्याला सहाय्य करतील. अल्लाह मोठा शक्तिशाली आणि जबरदस्त आहे. हे ते लोक आहेत ज्यांना आम्ही पृथ्वीवर सत्ता बहाल केली तर ते नमाज कायम करतील, जकात देतील, सत्कर्माचा आदेश देतील आणि वाईटाला प्रतिबंध करतील, आणि सर्व बाबींचा अंतिम परिणाम अल्लाहच्या अखत्यारित आहे." *(२२ : ४०-४१)*

वरील दोन आयती साधारणतः आणि तिसरी आयत विशेषकरून इस्लामी शासनव्यवस्था स्थापनेमागील हेतु स्पष्ट करतात. अगोदरच्या दोन आयती स्पष्ट करतात की शासन व्यवस्थेचे महत्कार्य समाजात न्याय प्रस्थापित करणे आहे (कायद्याचे राज्य) प्रत्येक शासनाचे कर्तव्य आहे. किंवा तसा ते दावा तरी करु शकतात. म्हणून शासनव्यवस्था आवश्यक आहे. या सर्वसाधारण हेतुमध्ये तिसरी आयत विशेष हेतुची भर घालत आहे. इस्लामी शासन व्यवस्थेचे कर्तव्य आहे ते नमाज कायम करतात, जकात देतात, सत्कर्माचा आदेश देतात आणि वाईटाला प्रतिबंध करतात. ते धर्मनिष्ठ बनतात हे शासनाध्यक्ष स्वतः आचरणात आणतो आणि प्रजेला हे सर्व करायला लावतो. याच विशेष हेतुमुळे इस्लामी राज्य हे इतर राज्यापेक्षा वेगळेपण राखून आहे. हे शासन व्यवस्थेचे वैशिष्ट्य कुठेही दुसरीकडे सापडणार नाही. बनावटी धर्म प्रदर्शन करून सुध्दा हे उद्देस साध्य होत नाही. इस्लामी राज्यशासनाच्या या विशेष उद्देशाचे एकूण चार वैशिष्ट्ये आहेत नमाज कायम करणे, जकात देणे, सत्कर्माचा आदेश देणे व दुष्कर्माचा प्रतिबंध करणे. या आयतीवर चिंतन केल्यास कळून येईल की हा उद्देश साध्य करणे म्हणजे धर्मस्थापना (अकामते दिन) पूर्णत्वाने करण्यासारखे आहे. तसेच अथक प्रयत्नांती धर्माच्या उदारतेचे क्षेत्र विस्तारित करून इस्लामच्या रंगात पूर्ण समाजाला रंगवून सोडण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा (जिहाद) करीत राहाणे इस्लामी शासनव्यवस्थेचे अंतिम ध्येय आहे.

(७) न्यायव्यवस्था

इस्लामी न्याय व्यवस्थेची खालीलप्रमाणे मूलतत्त्वे आहेत.

(१) इस्लामी कायद्याचे दोन मूळ स्रोत आहेत– कुरआन व हदीस. सर्व कायदेकानू दोहोंत स्पष्ट सांगितलेली आहेत, ती सर्व शाश्वत आणि अपरिवर्तनीय आहेत. ते सर्वकालिक आहेत आणि त्यांचे पालन करणे अत्यावश्यक आहे. क्षुल्लक बदलसुध्दा त्यात शक्य नाही. खलीफासुध्दा अशा मूलभूत कायद्यापासून पळ काढू शकत नाही. जो

कोणी असे करील तो धर्मद्रोही आहे. अल्लाहने कुरआनमध्ये स्पष्ट केले आहे,

"जे लोक अल्लाहच्या अवतरित केलेल्या कायद्याला अनुसरून न्यायनिवाडा करीत नसतील तेच द्रोही आहेत." (५:४४)

(२) ज्या प्रश्नांची उत्तरे कुरआन आणि हदीसमध्ये सापडणार नाहीत अशांच्या बाबतीत कायदेकानू बनविले जातात. सद्यस्थितीला अनुसरून बनविले जातात, परंतु हे फक्त योग्य व्यक्तीच करू शकतात. ईशपरायण, ज्ञानी, धर्मनिष्ठ आणि इस्लामी न्यायव्यवस्थेची पूर्ण माहिती असलेले आणि सद्यस्थितीशी सजग असलेल्या व्यक्ती हे कार्यकरू शकतात. हे विधीनियम करण्याचे कार्य काही साधारण कार्य नाही. ते धर्मशाखांच्या अधिन राहूनच बनविले जातात. कुरआन आणि हदीस या कायद्यांचे मूलभूत आधार आहेत. कायदे करण्याच्या या प्रक्रियेला "कियास" म्हणतात. स्वरुप हे ईशआदेशांपेक्षा वेगळे असू शकते कारण ईश्वरी कायदे (विधीविधान) हे शाश्वत, अपरिवर्तनीय, परिपूर्ण असे आहेत, परंतु मनुष्यनिर्मित कायदे त्या स्वरुपाचे नाहीत. हे मानवनिर्मित कायदे मनुष्याची बुध्दी–विचार, विवेकानुसार असतात त्यात मतभेद होतात. ते परिवर्तनीय आहेत कारण ते परिस्थितीसापेक्ष आहेत. परंतु परिस्थिती नेहमी बदलत असते. तज्ज्ञांद्वारे बहुमताने निर्मित कायदे हे शाश्वत कायद्यांची जागा घेऊ शकतात. तज्ज्ञ मंडळीच्या एकमताला पारिभाषिक शब्दावलीत "इज्मा" असे म्हणतात.

अशा प्रकारे इस्लामी कायद्याचे चार स्रोत आहेत– कुरआन, हदीस, कियास आणि इज्मा.

(३) कायदेमंडळ (विधीमंडळ) कार्यकारी मंडळापासून पूर्ण स्वतंत्र आहे. कार्यकारी मंडळाचे काहीएक नियंत्रण अथवा दबाव विधीमंडळावर नसतो. विधीमंडळावर ही नैतिक जबाबदारी असते की त्यांनी ईशविधीनियमांचा खुलासा करावा. अल्लाहसमोर हजर केल्यावर अल्लाह या प्रश्नाचे उत्तर कशा प्रकारे देईल ही भावना मनात ठेवून ईशपरायण मानसिकतेतूनच कायदेकानू तयार केले जातात.

(४) विधीमंडळाप्रमाणेच कार्यकारी मंडळ पूर्णतः स्वतंत्र आहे. काझी अथवा न्यायाधीशांच्या नेमणुका शासन प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे करते. अशा वेळी काझी अथवा न्यायाधीश हा शासनाचा उत्तराधिकारी (जबाबदार) नसतो तर ते अल्लाहला जबाबदार राहतात. तो काझी इस्लामी कायद्यांबद्दलच रूची दाखवतो. हेच त्याचे कार्यक्षेत्र कायमचे बनते. त्यांची बांधीलकी अल्लाह आणि त्याच्या दिव्य प्रकटनाशी होऊन जाते.

(५) विधीमंडळ अधिकारी हे अजिंक्य आहेत. कायद्याच्या वरचा कोणीही नाही. येथे, गरीब, श्रीमंत, सामान्य, सामान्येतर, खास इतर इत्यादि सर्व भेद नाहीसे होतात. कायद्यासमोर सर्व सारखे आहेत. खलीफासुध्दा कायद्यासमोर एखाद्या भिकाऱ्यासारखाच दुय्यम आहे. जर खलीफाला एखाद्या न्यायालयासमोर हजर होण्यास सांगितले गेले तर त्याने इतराप्रमाणे हजर होणे आवश्यक आहे. जर खलीफा दोषी आढळला तर त्याला शिक्षा भोगावीच लागते. आदरणीय प्रेषित मुहम्मद (स.) यांची खालील शिकवण जगातील न्यायसंस्थेतील अद्वितीय न्यायिक शिकवण आहे.

''फातेमा (प्रेषितांची मुलगी) ने जरी चोरी केली असती तर, अल्लाहशपथ! मी तिचे हाथ कलम (तोडले) केले असते.'' *(बुखारी)*

खलीफाला हा अधिकार नाही की त्याने कुरआन आणि हदीसमध्ये दिलेली शिक्षा रद्द अथवा स्थगित करावी. चोरी केल्यास हाथ कलम करावे. ज्याने व्यभिचार केला त्या दोघांना शंभर फटके मारावे अथवा मरेपर्यंत त्यांच्यावर दगडांचा वर्षाव करावा. आळ घेणाऱ्याला ऐंशी फटके द्यावेत. वारसाने खून करणाऱ्याला माफ केले नाही तर त्याला मृत्यूदंड द्यावा. या सर्व केसेसमध्ये खलीफा अथवा राज्याध्यक्षाकडे दयेची याचना करणे अशक्य आहे.

(६) गुन्हेगारी स्वरुपाच्या शिक्षा साधारण परिस्थितीत दिल्या जातात. परंतु असाधारण परिस्थितीत या शिक्षांना स्थगिती दिली जाते. चोरीबद्दलची शिक्षा खलीफा उमर (र.) यांच्या कारकिर्दीत स्थगित करण्यात आली होती, कारण त्या वेळी राज्यात भीषण दुष्काळ पडला होता.

(७) न्यायदानासाठी 'कोर्ट फी' वगैरे अजिबात नसते. इस्लामी न्यायव्यवस्थेत न्याय सर्वांसाठी मुक्त व मोफत आहे.

प्रकरण सातवे

धर्म आणि राजकारण

(आजचा ज्वलंत प्रश्न)

इस्लाम ही एक सर्वसमावेशक अशी परिपूर्ण जीवनपध्दती आहे. याबद्दलचा खुलासा आपण मागील प्रकरणांतून पाहिला आहे. राजकारण हा धर्मकारणाचा एक भाग कसा आहे? तसेच धर्मव्यवस्थेचे राजकीय व्यवस्था एक महत्त्वाचे अंग कसे आहे? याचे अद्याप स्पष्टीकरण पूर्णत: न झाल्यामुळे लोकमनात संभ्रम आहे. या दोघांच्या संबंधाचा येथे स्पष्ट खुलासा होणे गरजेचे आहे. राजकारणाला आपण क्षुद्र समजून त्याची अवहेलना करू शकत नाही. आधुनिक जगात तर त्याचे महत्त्व इतके वाढले आहे की अतिमहत्त्वाची खाजगी कामेसुध्दा आज राजकारणाच्या कक्षेत मोडतात. त्यामुळे मनुष्यजीवनावर राजकारणाचा स्वाभाविकपणे दूरगामी परिणाम होत आहे. डोळे उघडून पाहिल्यास कळून येते की सर्व तत्त्वज्ञान, आदर्श आणि श्रध्दा राजकारणाच्या एका फटक्यात नाहीसे होतात. दुसरीकडे असे मानले जाते की राजकारणाचा धर्माशी काहीएक संबंध नाही. या मान्यतेच्या समर्थनार्थ अनेक भ्रामक कल्पना पुढे आणल्या जात आहेत. अशी एक मान्यता (भ्रामक) आहे की धर्म हे एक माध्यम आहे देव आणि मानसामधील संबंध प्रस्थापित करण्याचे. हे एक अतिशय पवित्र आणि विनम्र कार्य आहे. या कार्याला (धर्माला, मजहबला) दुनियेच्या घाणेरड्या प्रकारात ओढू नये. पवित्र हे पवित्र स्थळीच राहिले पाहिजे. ही एक खोटी आणि भ्रामक कल्पना आहे. याच बनावट मानसिकतेच्या प्रभावामुळे लोक धर्माचा राजकारणाशी काही संबंध आहे हे मान्य करण्यास तयार नाहीत.

वरील चर्चेचा विचार न करता आपण या विरोधाभासाला स्पर्श न करता पुढे गेलो तर लक्षात येईल की या चुकीच्या धारणेला मुस्लिमांनी स्पर्श केलेला नाही. सद्यस्थिती ही आहे की अनेकजण असे आहेत की नावाने ते मुस्लिम नाहीत, परंतु ते खरे मुस्लिम आहेत. तें इस्लामचे खरे अनुयायी आहेत. त्यांच्यामते इस्लाममध्ये राजकारणाला दुय्यम महत्त्व आहे, किंबहुना राजकारणाची इस्लाममध्ये गरज नाही. मुस्लिमाने त्यांच्यामते प्रयत्नांची पराकाष्ठा करून इस्लामी राष्ट्र स्थापन करणे, हे धार्मिक कर्तव्य नाही. ते राजसत्तेला अल्लाहची दैवी देणगी समजात आणि जो गांभीर्यपूर्वक धर्माचरण करतो त्याला अल्लाह ही देणगी आपोआप देतो. त्यांच्यामते इस्लामी राज्य हे इस्लामसाठी

नव्हे तर त्यांच्या अनुयायींसाठी आवश्यक आहे.

वरील कारणांवरुन आजच्या या आधुनिक जगात इस्लाम आणि राजकारण यांच्या संबंधांचा उहापोह करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जर राजकारण इस्लामचे अंग आहे तर त्याचे महत्त्व आणि वैशिष्ट्ये कोणती आहेत? या प्रश्नाचे खोलात जाऊन उत्तर प्राप्त करणे आवश्यक आहे. इस्लामला पूर्ण जाणून घेणे अशक्य आहे जोपर्यंत हा प्रश्न अनुत्तरित राहील. राजकारणाव्यतिरिक्त इस्लामचे चित्र भुरकट आणि अस्पष्ट होते.

वरील प्रश्नाच्या उत्तरासाठी सर्व संबंधित घटकांचा विचार होणे आवश्यक आहे. आणि त्यामुळेच इस्लाम व राजकारण यांचा परस्पर संबंध योग्यरित्या आपण जाणून घेऊ शकतो.

अल्लाहवरील श्रध्दा आणि राजकारण

या कारणासाठी आपण सर्वप्रथम अल्लाहचे गुणधर्म पाहू या. अल्लाहचे हे स्वाभाविक आणि विशेष गुणधर्म मूळस्रोत आहेत ज्यातून सर्व धार्मिक संकल्पनांचा आणि दिव्य प्रकटनांचा उदय होतो. म्हणून धर्म आणि राजकारणाचा संबंध विषद करताना अल्लाहच्या विशेष गुणांना विशेष हक्क प्राप्त होतो.

दुसऱ्या प्रकरणात आपण हे पाहिले आहे की सार्वभौमत्व हे अल्लाहच्या मौलिक गुणधर्मांपैकी एक आहे. या संदर्भातील कुरआनच्या काही आयती पाहू या.

''सांगा, मी शरण मागतो मानवांच्या पालनकर्त्यापाशी, मानवांच्या बादशाहपाशी, मानवांच्या खऱ्या ईश्वरापाशी.'' (११४: १-३)

''वस्तुतः तुमचा पालनकर्ता अल्लाहच आहे ज्याने आकाशांना व पृथ्वीला सहा दिवसांत निर्माण केले, मग आपल्या सिंहासनावर (अर्श) विराजमान झाला. जो रात्रीला दिवसावर झाकतो व परत दिवस रात्रीच्या पाठीमागे धावत येतो. ज्याने सूर्य, चंद्र व तारे निर्माण केले, सर्व त्याच्या आदेशाच्या अधीन आहेत. सावध राहा, त्याचीच सृष्टी आहे व त्याचाच हुकूम आहे. फार समृध्दशाली आहे अल्लाह, सर्व विश्वाचा मालक व पालनकर्ता.'' (७ : ५४-५५)

''शासनाची सत्ता (सार्वभौमत्व) अल्लाहखेरीज इतर कोणासाठी नाही. त्याचा आदेश आहे की त्याच्याशिवाय तुम्ही इतर कोणाचीही भक्ती करू नका.'' (१२ : ४०)

वरील आयतींनुसार कळून येते की अल्लाह मानवांचा फक्त प्रभु आणि ईश्वर नाही, तर अल्लाह सर्व विश्वांचा आणि मानवांचा शासनकर्ता आणि राज्याध्यक्ष आहे. अल्लाह असा ईश्वर आणि प्रभु आहे ज्याच्या प्रभुत्व आणि ईशत्वामध्ये मालकत्व,

पालकत्व आणि शासकत्व यांचासुध्दा समावेश आहे. याचाच अर्थ आहे की अल्लाहच खरा शासनकर्ता, पालनकर्ता, आदेशकर्ता असा सार्वभौम राज्याध्यक्ष (बादशाह) आहे. ही सर्व त्याची गुणवैशिष्ट्ये आहेत. जोपर्यंत व्यक्तीची अल्लाहच्या या सर्व गुणवैशिष्ट्यांत दृढ आणि परिपूर्ण विश्वास व श्रध्दा नाही तोपर्यंत तो श्रध्दावान ठरत नाही.

अल्लाह मालक, पालक, शासक, आदेशक आहे तर मनुष्याचे राजकीय जीवन पूर्णत: अविभाजित अशा अल्लाहच्या सार्वभौमत्वावर आधारित आहे. राजकारणाचा मूलाधार राजसत्तेचे सार्वभौमत्व आहे आणि हा राजकारणाचा मूळ प्रश्न आहे. अल्लाहचे सार्वभौमत्व या प्रश्नाचे अचूक उत्तर आहे.

इस्लामी कायदे आणि राजकारण

अल्लाहच्या गुणवैशिष्ट्यांचा अभ्यास केल्यानंतर आपण आता इस्लामी कायद्याबद्दल विचार करू या. साधारणत: खालील बाबींचा समावेश राजकारण म्हणून होतो आणि त्यामुळे मनुष्याच्या राजकीय जीवनाचा साचा तयार होतो.

सामाजिक शिस्त कशासाठी आवश्यक आहे? समाज सार्वभौमत्व कोणाला बहाल करते? मनुष्याचे खरे स्थान काय आहे? नागरिकांचे मूलभूत हक्क कोणते? शासनाचे अधिकार कोणते आणि मर्यादा काय आहे? राज्यघटना कोण तयार करतो? कोणती राज्यघटना कार्यान्वित आहे? आपण आता पाहू या की या प्रश्नांची उकल कुरआन आणि हदीसमध्ये झालेली आहे का? या प्रश्नांचे उत्तर 'इस्लामची राजकीय व्यवस्था' या प्रकरणात देण्यात आले आहे. या प्रकरणात स्पष्ट करण्यात आले आहे की इस्लामने सर्व राजकीय प्रश्नांची उकल केलेली आहे आणि त्यासाठी दिव्य प्रकटने आलेली आहेत. यावरून हे सिध्द होते की इस्लामजवळ परिपूर्ण राजकीय जीवनव्यवस्था आहे.

धर्मपालन आणि शासन

इस्लामी आदेश असे अनेक आहेत की ज्यांचे पालन (इस्लामी कायद्याचे पालन) राजकीय व्यवस्थेशिवाय आणि शासनाधिकारा (राजकीय सत्ता) व्यतिरिक्त अशक्य आहे. उदाहरणार्थ,

(१) जर कोणी खून केला तर खून झालेल्या व्यक्तीच्या वारसाला बदला घेण्याचा अधिकार आहे. अल्लाहने कुरआनमध्ये आदेश दिला आहे,

''हे *श्रध्दावंतांनो! हत्येच्या बाबतीत तुमच्यासाठी हत्यादंडाचा आदेश नियत*

केला आहे." (२ : १७८)

(२) अल्लाहने कुरआनमध्ये चोराचे हाथ कापून टाकण्याचा आदेश दिला आहे,

"आणि चोर मग तो पुरुष असो अथवा स्त्री दोघांचे हाथ कापून टाका, हा त्यांच्या कर्माचा बदला आहे आणि अल्लाहकडून अद्दल घडविणारी शिक्षा!"

(५ : ३८)

(३) ज्याने व्यभिचार केला त्या व्यभिचारी व्यक्तीला शंभर फटके द्यावेत असा आदेश अल्लाहने दिला आहे. कुरआनोक्ती आहे,

"व्यभिचारी स्त्री व व्यभिचारी पुरुष दोहोंपैकी प्रत्येकास शंभर फटके मारा. आणि त्यांची कींव करू नका, अल्लाहच्या धर्माच्या बाबतीत जर तुम्ही सर्वश्रेष्ठ अल्लाह आणि अंतिम दिनावर श्रध्दा बाळगत असाल आणि त्यांना शिक्षा देतेवेळेस श्रध्दावंतांचा एक समूह उपस्थित असावा." (२४ : २)

(४) जर कोणी व्यभिचाराचा आळ घेत असेल तर त्यांला ऐंशी फटके मारण्याचा आदेश कुरआनमध्ये अल्लाहने दिला आहे,

"आणि जे लोक मर्यादाशील स्त्रियांवर आळ घेत असतील मग चार साक्षीदार घेऊन येत नसतील, त्यांना ऐंशी फटके मारा." (२४ : ४)

(५) इस्लामच्या शत्रुसंगे कुरआनमध्ये युध्द पुकारण्याचा आणि त्यांना चिरडून टाकण्याचा आदेश अल्लाह देत आहे.

"आणि त्यांच्याशी तोपर्यंत युध्द करा जोपर्यंत उपद्रव नाहीसा होईल आणि अल्लाहसाठीच धर्म होईल." (२:१९३)

अशा प्रकारे असे अनेक ईशआदेश आहेत की ज्यांचे कार्यान्वियन इस्लामी राज्यसत्तेविना शक्य नाही. उदाहरणार्थ,

(१) दांभिकांना कठोरतेने संपविण्याचा आदेश आहे.

"तुमच्यापैकी कोणी दुष्टकर्मीला पाहिले तर त्याला आपल्या हाताने रोखा."

(बुखारी)

(२) कुरआनने मुस्लिमांना न्यायावर अढळ राहण्यास सांगितले आहे,

"हे मुस्लिमांनो! न्यायावर अटळ राहा आणि अल्लाहसाठी साक्षीदार बना."

(४ : १३५)

(३) ही या जगातील क्षणिक न्यायालये (ऐहिक न्यायालये) पात्र नाहीत की

मुस्लिमांनी त्यांचे मामले न्यायनिवाड्यासाठी तिथे सुपूर्द करावेत. कुरआनोक्ती आहे,

"परंतु इच्छितात असे की आपल्या बाबींचा निवाडा करण्यासाठी तागूतकडे (विद्रोहीकडे) रुजू व्हावे. वस्तुतः त्यांना तागूतशी (विद्रोहींशी) द्रोह करण्याचा आदेश देण्यात आला होता." (४ : ६०)

(४) प्रजेच्या तक्रारींचे न्यायनिवाडे दिव्य प्रकटनानुसारच करावेत. कुरआनोक्ती आहे,

"तुम्ही अल्लाहने अवतरित केलेल्या कायद्यानुसार लोकांच्या मामल्यांचा न्यायनिवाडा करा." (५ : ४८)

(५) श्रध्दावंत (मुस्लिम) तयार करण्याचा मूळ उद्देश आहे की त्यांनी ईशधर्माची सत्यता सर्व जगापुढे मांडावी. कुरआनोक्ती आहे,

"आणि अशाच प्रकारे तर आम्ही तुम्हाला उत्तम समाज बनविले आहे, जेणेकरून जगातील लोकांवर तुम्ही साक्षी व्हा. आणि प्रेषित तुमच्यावर साक्षी असतील." (२ : १४३)

म्हणून वरील ईशदेशांचे पालन तेवढेच धार्मिक महत्त्वाचे आहेत जेवढे इतर धार्मिक आदेश आणि नियमांसारखेच ते धार्मिक विधीनियम आहेत. त्यांना कार्यान्वित करणे तेव्हढेच अनिवार्य आहे जेवढे इतर धार्मिक कार्य, अल्लाहने घालून दिलेल्या नियमांमध्ये आणि दिव्य प्रकटनांत भेदभाव करण्याची मुभा दिलेली नाही. जे आवडते आणि सोपे आहे त्या आदेशांचे पालन करावे आणि जे कठीण आणि नावडते आहे त्यांना सोडून द्यावे, अशा प्रकारचे स्वातंत्र्य अल्लाहने दिलेले नाहीत. अल्लाहने आपल्या दासांना आदेश दिला आहे की त्यांनी अल्लाहच्या सर्व आदेशांचे भेदभाव न करता पालन करणे आवश्यक आणि अनिवार्य आहे. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"लोक हो! जे काही तुमच्या पालनकर्त्याकडून तुमच्यावर अवतरले गेले आहे त्याचे अनुसरण करा आणि आपल्या पालनकर्त्याला सोडून अन्य पालकांचे अनुकरण करू नका, पण तुम्ही उपदेश कमीच मानता." (७ : ३)

आपण असे केले नाही आणि अल्लाहच्या आदेशांचे पालन करण्यात भेदभाव केला, आवडणारे आणि सोपे आदेशांचे पालन आणि कठीण आणि नावडणारे आदेशांकडे दुर्लक्ष, हे कृत्य व्यक्तीला श्रध्दावंत (मुस्लिम) ठरवित नाही तर अश्रध्दावंत सिध्द करते. यहुदी लोकांचे उदाहरण आमच्या समोर आहे जे ईशसंदेशांत अफरातफर करण्याचे दोषी आहेत. कुरआनोक्ती आहे,

''तर काय तुम्ही ग्रंथाच्या एका भागावर श्रध्दा ठेवता आणि दुसऱ्या भागाला नाकारता? तुमच्यापैकी लोकं असे करतील त्यांच्यासाठी याशिवाय अन्य कोणती शिक्षा असेल की या ऐहिक जीवनामध्येही कठोर यातनांकडे त्यांना नेले जाईल. अल्लाह त्या कारवायांपासून अनभिज्ञ नाही ज्या तुम्ही करीत आहात. हे तेच लोक आहेत ज्यांनी मरणोत्तर जीवनाचा सौदा करून हे नश्वर जीवन खरेदी केले आहे. न याची शिक्षा कमी होईल न यांना कोणती मदत लाभेल.'' (२ : ८५)

राजकारण धर्मकारणाचा अविभाज्य अंग

आता आपण हे सर्व घटक एकत्रित करून विचार करू या जेणेकरून आपणापुढे इस्लाम आणि राजकारण यांचे संबंध स्पष्ट होतील.

सार्वभौमत्व हा अल्लाहचा मौलिक विशेष गुण आहे आणि तो मनुष्याच्या राजकीय जीवनाचा मूलाधार सूचित करतो की अल्लाहच्या सार्वभौमत्वात कोणी दुसरा भागीदार नाही. हा या सत्याचा दाखला आहे की मनुष्याचे राजकीय जीवन धर्माच्या कक्षेतील आहे. धर्मापासून राजकारणाला वेगळे यामुळेच करणे अशक्य आहे. आपण जर धर्म आणि राजकारण वेगवेगळे ठरविले तर अल्लाहच्या सार्वभौमत्वाला काही अर्थ राहात नाही. दिव्य प्रकटनात राजकीय तत्त्वांचा समावेश आहे, तसेच इस्लामची एक परिपूर्ण राजकीय व्यवस्था आहे. धर्म आणि राजकारणाची फारकत करणे इस्लामविरोधी आहे. राजकीय व्यवस्थेविना खऱ्या आणि पूर्ण इस्लामची कल्पना करणेसुध्दा अशक्य आहे. आपण सदृढ माणसाची प्रतिमा डोळ्यापुढे उभी करताना त्याला पूर्ण रूपात पाहतो, त्याच्या शरीराचे दोन अवयव वेगळेवेगळे करून नव्हे.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट झाले की सार्वभौम सत्ते (राजकीय सत्ता) विना धर्माच्या अनेक आदेशांचे पालन होऊच शकत नाही. आणि आपण हेसुध्दा पाहिले आहे की इस्लामच्या एखाद्या भागाचे पालन करून इतर भागांकडे दुर्लक्ष करणे गैरइस्लामी कृत्य आणि महापाप आहे. काय याचा अर्थ असा होत नाही की राजनीती इस्लाम धर्माचा अंगभूत आणि अविभाजित भाग आहे? राजनीती राजकारणात तेव्हाच महत्त्वपूर्ण ठरते जेव्हा मानवी जीवन आणि इस्लामच्या आदेशांची उपयुक्तता राजकीय सत्तेवरच अवलंबून असते.

जेव्हा आपण इस्लाम धर्मात राजकारणाचे महत्त्व आणि त्याच्या कार्यक्षेत्राबद्दल माहिती करून घेतो तेव्हा माननीय उमर (र.) यांच्या त्या कथनातील सत्यतेची आपणास जाणीव होते. ते म्हणतात,

''इस्लामचे जमातविना (समाज) आणि राजकारण म्हणजेच समाजकारणविना अस्तित्व शक्य नाही आणि इस्लामी राष्ट्रा (जमात) चे अस्तित्व नेता (अमीर) विना अशक्य आहे.''

काब अलअहबार (र.) यांनी वरील सत्यवचन स्पष्ट करताना सांगितले,

''इस्लाम, राज्यशासन आणि प्रजा ही एका तंबूसारखी आहे. इस्लाम तंबू आहे, खांब राज्यशासन आहे आणि खुंटी प्रजा आहे. दोघाव्यतिरिक्त एक त्याच्या स्थितीत व्यवस्थित राहूच शकत नाही.'' (अल फरिद, खंड - १)

अशा प्रकारे इस्लामला जर राजकारणापासून आणि राज्य शासनापासून वेगळे केले तर शिल्लक राहते ते इस्लामचे विद्रुप आणि बनावटी स्वरुप! अल्लाहने अवतरित केलेला इस्लाम अजिबात शिल्लक राहात नाही. शिल्लक राहात नाही तो इस्लाम जो कुरआन बरहुकूम आहे! शिल्लक राहात नाही तो इस्लाम ज्याला प्रेषित मुहम्मद (स.) यांनी आपल्या आचरणात आणून आदर्श निर्माण केला होता. इस्लाम त्याच्या मूळ आणि खऱ्या स्वरुपात तेव्हाच पाहावयास मिळेल जेव्हा सार्वभौम राज्यसत्ता त्याच्या पाठीमागे असेल.

इस्लामचे दुसरे क्रांतिकारक स्वाभाविक गुणवैशिष्ट्य आहे त्याचे राजकीय सत्तेविषयीचे धोरण. इस्लामला राज्यसत्ता म्हणजे जगात मिळालेले फळ आहे असे मान्य नाही, तर धार्मिक कृत्य आहे अशी इस्लामची मान्यता आहे. राजकारण हे तिरस्कार आणि घृणा करण्यासारखे अथवा राजकाराणापासून अलिप्त राहाणे इस्लामला मान्य नाही. राजकारण एक हवीहवीशी व आवडीची आणि जवळची गोष्ट आहे. इस्लाम राजकारणाशी संबंध तोडत नाही तर इस्लामला राज्यसत्ता प्राप्त करण्याची प्रखर इच्छा असते. जोपर्यंत राज्यसत्ता आपल्या हातात नाही तोपर्यंत इस्लाम आपले अस्तित्व दाखवू शकत नाही. अशा प्रकारे इस्लाम आणि राजसत्तेचे अतुट नाते आहे.

इस्लामी शासन आणि मुस्लिम शासन

आता आपण या दोघांमधील फरक काय आहे ते पाहू या. इस्लाम काही जीवित प्राणी नाही की जो आपल्या प्रयत्नाने राज्यसत्ता हस्तगत करील आणि त्यास टिकून ठेवेल. इस्लाम तर त्याच्या अनुयायींच्या माध्यमातूनच सत्ता प्राप्त करू शकतो. इस्लामचे अनुयायी (मुस्लिम) आपल्या अथक प्रयत्नांनीच राजकीय सत्तेला आपलेसे करू शकतात. म्हणूनच इस्लामचे खरे अनुयायी ते आहेत ज्यांच्या हातात शासनाधिकार (सत्ता) आहे किंवा जे राजकीय सत्ता प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील राहतात. इस्लामच्या

या सच्च्या अनुयायींचा राजकीय सत्ता हस्तगत करण्याचा उद्देश मात्र फक्त इस्लामला वैभवशाली बनविण्याचा असतो. काहींचा उद्देश मात्र स्वत:ला प्रभुत्वशाली बनविण्याचा असतो. अशा प्रकारे इस्लामसाठी सत्ता प्राप्त करणे हे 'इस्लामी शासना'चे उदाहरण आहे तर स्वत:साठी सत्ता प्राप्त करणे हे 'मुस्लिम शासना'चे उदाहरण आहे. ईशआदेशानुसार पहिले उदाहरण धार्मिक तर दुसरे ऐहिक आहे. पहिली शासनव्यवस्था (इस्लामी) सदाचारी आहे तर दुसरी (ऐहिक) दुराचारी आहे. पहिल्या इस्लामी शासनव्यवस्थेने जगात शांती आणि समृध्दी नांदते तर दुसऱ्या ऐहिक शासनव्यवस्थेमुळे (मुस्लिम शासन) जगात अनर्थ ओढवतो. याच एकमेव कारणासाठी कुरआनने यास न्यायाचे प्रमाण ठरविले आहे. श्रध्दावंताची (मुस्लिम) व्याख्या करताना कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"ते मरणोत्तर जीवनाचे घर तर आम्ही त्या लोकांसाठी खास करू जे पृथ्वीवर आपली शेखी मिरवू इच्छित नाहीत आणि उपद्रवदेखील माजवू इच्छित नाहीत आणि शेवटी भले ईशपरायणांसाठीच आहे. जो कोणी भलेपणा घेऊन येईल त्याच्यासाठी त्यापेक्षा श्रेष्ठ भलाई आहे आणि जो वाईट घेऊन येईल तर अपकृत्ये करणाऱ्यांना तसाच मोबदला मिळेल जसे कृत्य ते करीत आहेत." *(२८ : ८३ - ८४)*

दुसऱ्या बाजूला कुरआन श्रध्दावंतांना (मुस्लिमांना) खुशखबर (शुभवार्ता) देत आहे,

"वैफल्यग्रस्त होऊ नका, दु:खी होऊ नका, तुम्हीच प्रभावी ठराल जर तुम्ही मुस्लिम असाल." *(३ : १३९)*

याचाच अर्थ असा की सत्ता आणि प्रभुत्व एखाद्याच्या व्यक्तिगत फायद्यासाठी आहे तर ते वास्तविकपणे उपद्रव, अत्याचार आणि द्रोह आहे. जगाला ही व्यवस्था उपद्रव, अत्याचारामुळे गळीतगात्र करून सोडते, याची श्रध्दावंत कल्पनासुध्दा करू शकत नाही. पण हीच सत्ता (राज्यसत्ता) इस्लामच्या सेवेसाठी आहे तर ती उदात्त, सद्‌गुणी आणि चांगली आहे. या राज्यसत्तेला आपलेसे करण्यासाठी श्रध्दावंत (मुस्लिम) मनोमन इच्छुक आणि प्रयत्नशील राहातो. अशा प्रकारे या दोन प्रकारच्या राज्यसत्ता एकमेकांपासून त्यांच्या मूळतत्वात आणि परिणामात वेगवेगळ्या आहेत. दृष्यस्वरुपात दोन्ही शासन व्यवस्था आहेत आणि दोन्ही मुस्लिमांसाठी आहेत, परंतु एक पवित्र विश्वास आणि जबाबदारीवर आधारित आहे तर दुसरी व्यक्तीगत फायद्यासाठी आहे. ज्यांना समज आहे, आणि जे आत्मज्ञानी आहेत असे लोक दोन पक्षी हवेत उडताना पाहतात परंतु त्यांना कळून चुकते की बहिरा ससाणा आणि गिधाडे या दोघांची विश्वे वेगवेगळी आहेत.

प्रेषित चळवळ आणि राजसत्ता

आपण वरील परिच्छेदात राजकारण आणि धर्म यांच्यातील निकटसंबंधाची आवश्यकता, स्वरुप आणि महत्त्व विचारात घेतले आहे आणि त्यावरून त्यांच्या संबंधाच्या उत्कृष्ठ महत्त्वाची सत्यता पटली. सत्य हे आहे की प्रेषितांना जे कार्य सोपविण्यात आले होते ते व्यावहारिकदृष्ट्या दुसरे तिसरे काही नसून धार्मिक आणि इस्लामी शासन स्थापन करण्याचे कार्य होते. प्रेषितांना धार्मिक आणि इस्लामी शासनव्यवस्था कायम करण्याचे महत्कार्य यासाठी सुपूर्द करण्यात आलेले होते की त्याव्यतिरिक्त इस्लाम (अल्लाहचा धर्म) पूर्णरूपेन कार्यान्वित होऊ शकतच नाही. सत्तेशिवाय ईशधर्माचे तंतोतंत पालन अशक्य आहे. हे आज जितके सत्य आहे तितकेच प्रेषितकाळातसुध्दा होते. याच एकमेव कारणासाठी ईशधर्मांनी आपली सर्व ताकत शासन– सत्ता प्राप्त करण्यात खर्ची घातली होती. ही दुसरी गोष्ट आहे की आजची स्थिती अनुकूल नाही. अतोनात कष्ट करूनसुध्दा फलश्रुती नाही, हे चित्र आहे. स्वाभाविकपणे, कार्यप्रणालीची यशाचे शिखर गाठण्याची असमर्थता ही एक बाब आणि त्याचे आंतरिक पूर्णत्व दुसरी बाब आहे. नि:संशय, प्रेषितांच्या कार्यप्रणालींचा इतिहास साक्ष आहे की त्यांच्यापैकी बरेच प्रेषित राजकीय सत्ता स्थापन करण्यात अयशस्वी ठरले. परंतु हे कुठेच निदर्शनात येत नाही की त्यांना राजकीय सत्ता प्राप्त करावयाचीच नव्हती. हे खरे आहे की प्रत्येक प्रेषिताने "अल्लाहशिवाय दुसरा ईश्वर नाही" (अल्लाह एकमात्र ईश्वर आहे) हेच आवाहन केले आहे. "अल्लाहशिवाय दुसरा कोणीही सार्वभौम नाही" असे कदापिही आवाहन केलेले नाही. परंतु हे खरे आहे की "अल्लाहशिवाय दुसरा ईश्वर नाही" या आवाहनामध्ये "अल्लाहशिवाय दुसरा कोणीही सार्वभौम नाही"चा समावेश आहे, कारण अल्लाहच्या स्वाभाविक मूलभूत गुणांमध्ये 'सार्वभौमत्व' एक गुण आहे. याचाच अर्थ असा होतो की जेव्हा असे सांगितले जाते की "अल्लाहशिवाय दुसरा ईश्वर नाही" तेव्हा अर्थ असाही होतो की अल्लाहशिवाय दुसरा कोणीही सार्वभौम नाही. परंतु अल्लाहला फक्त आणि फक्त सार्वभौमच समजणे निश्चितच चुकीचे आहे. परंतु यापेक्षासुध्दा भयानक चूक ही आहे की, अल्लाहच्या स्वाभाविक मूलभूत गुणांमधून सार्वभौमत्वाला वगळून टाकणे. कोणत्याही प्रेषिताने असे आवाहन केले नाही की "हे लोकांनो! अल्लाहचे सार्वभौमत्व कायम करा, कारण त्याच्याशिवाय दुसरा कोणीही सार्वभौम नाही." हे खरे आहे, परंतु याऐवजी प्रत्येक प्रेषिताने खालीलप्रमाणे आवाहन केले होते,

"अल्लाहची भक्ती करा, त्याच्याव्यतिरिक्त तुमचा कोणीही ईश्वर नाही."

(७ : ५९)

हे संकेतवचन (आयत) वाचून आणि त्यावर चिंतन मनन केल्यानंतर कोण असा दावा करील की आयतच्या दुसऱ्या भागात पहिल्या भागाचा अर्थ आणि आशय दडलेला आहे. हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा भक्तीचा अर्थ फक्त उपासनापध्दतींनाच लागू करेल. प्रत्यक्षात असे नाही. भक्ती हा शब्द उपासनापध्दतींसाठी (नमाज, रोज़ा, जकात, हज इ.) सुध्दा वापरला जातो आणि आज्ञाधारकतेसाठीसुध्दा वापरला जातो. म्हणून धार्मिक आदेश जीवनाचे प्रत्येक क्षेत्र व्यापून आहेत आणि ज्यांचे शेवटचे टोक राजनीती आणि शासनाधिकार आहे. या सर्वांना आपण भक्तीच्या व्याख्येतून बाहेर काढूच शकत नाही. म्हणून सर्व ईशआदेशांचे पालन करणे आणि त्याला आचरणात आणणे ही भक्ती आहे. तर सर्व प्रेषितांची कार्यप्रणाली आणि जीवनउद्देश हा राजकीय ईशआदेशांना पूर्णत्वास नेण्यासाठी प्रयत्नशील राहाणे हाच होता.

येथे हा प्रश्न विचारला जाऊ शकतो की कुरआनमध्ये प्रेषितांचे कार्य आणि कार्यप्रणालीचा उल्लेख आहे. त्यामध्ये कुठेही राजकीय आदेशांचा समावेश नाही. त्यांची कार्यश्रध्दा, नैतिकता आणि भक्ती त्या एकमेव ईश्वराची (अल्लाहची) फक्त याच बाबींवर केंद्रित आहे. "अल्लाहची भक्ती करा" हा ईशआदेश फक्त भक्ती करण्यासाठीच मर्यादित आहे असे वाटते. काही प्रेषित आवाहन करतात की "अल्लाहशिवाय दुसरा कोणीही ईश्वर नाही" आणि आदेश देतात की "अल्लाहचीच भक्ती करा." असे आवाहन करताना ते आपले आवाहन आणि आदेशांना त्यांच्या कथनी आणि करणीद्वारे व्यावहारिक रूप देतात. हे आपणास कुरआनमध्ये पाहावयास मिळते. वरील आवाहनात जर राजनीतीचा समावेश आहे तर त्याबद्दलचा स्पष्ट उल्लेख का आलेला नाही? त्यांनी राजकीय ईशआदेशांबाबत स्पष्ट खुलासा त्यांच्या अनुयायींना केलेला दिसत नाही, तरीपण प्रेषितांनी आपल्या अनुयायींना हे तर स्पष्ट सांगितलेच असते की ईशआदेशांनुसार पवित्र शासनव्यवस्था स्थापन करणे हे त्यांच्या कार्याचे अंतिम ध्येय होते. थोडक्यात राजनीती हे धर्माचे मूलभूत अंग आहे तर प्रत्येक प्रेषिताने "अल्लाहची भक्ती करा" या आवाहनाचे स्पष्टीकरण तसे का केलेले नाही की जेणेकरून आज धर्मात राजनीतीचे स्थान निश्चित झाले असते?

वरील प्रश्न तेव्हाच मनात येतो जेव्हा आपण ईशनियमांच्या सर्वांत महत्त्वाच्या दोन मूलतत्त्वांना विसरून जातो. प्रथम तत्त्व हे आहे की इस्लामी विधीनियमांचा कोणताही घटक अथवा भाग त्याच्या निश्चित वेळेपूर्वी अवतरित झालेला नाही. जेव्हा व्यावहारिक गरज भासली तेव्हाच संदर्भित ईशआदेश अवतरित झाला आहे. अल्लाहने दिव्य प्रकटन तेव्हाच अवतरित केले जेव्हा त्याची समाजाला गरज भासली आणि समाज

त्या आदेशाचे पालन करण्यास समर्थ होता. हे प्रथम मूलभूत तत्त्व आहे दिव्य प्रकटनाबाबतचे आणि त्याच्या अवतरणाबाबतचे. दुसरे महत्त्वाचे तत्त्व म्हणजे हा गैरसमज आहे की या प्रथम तत्त्वानुसार नंतर अवतरित झालेले ईशआदेश (दिव्य प्रकटन) हे दुय्यम महत्त्वाचे आहेत. या तत्त्वानुसार धार्मिक विधीनियम जीवनव्यवहाराच्या काही बाबींबद्दलचे अवतरित झालेले नाहीत. याचा अर्थ असे विधीनियम हे महत्त्वाचे नाहीत. याचमुळे त्यांना ईशनियम म्हणताच येणार नाही, असा निष्कर्ष काढणे अगदी चुकीचे आहे.

वरील दोन मूलभूत तत्त्वांचा खुलासा आणखी चांगल्या पध्दतीने खालील उदाहरणासह देण्यात येत आहे.

आदरणीय प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या शब्दांत– "अल्लाहच्या मार्गातील युध्द (जिहाद) हे इस्लामचे शिखर आहे आणि उच्चतम आचरण आहे." परंतु हिजरी सन २ पूर्वी हे असे संबोधन नव्हते आणि त्यास मनाई होती. असे का? कारण परिस्थिती आणि अटी धार्मिक युध्दासाठी पूरक नव्हत्या. तसेच व्याज निषिध्द आहे. हे अत्यंत हीन दर्ज्याचे पाप आहे. त्याचे वर्णन "अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताविरुध्द बंड" असे आले आहे आणि या कृत्यात (व्याज) जो अडकला त्याला अश्रध्दावंतासारखी शिक्षा परलोकात मिळेल. परंतु व्याज हे नंतरच्या काळात निषिध्द करण्यात आले. (हिजरी सन ९ मध्ये) यापूर्वी व्याज निषिध्द नव्हते. कारण हेच होते की यापूर्वीचा (हिजरी सन ९ पूर्वी) समाज या आदेशाचे पालन करण्यास सक्षम नव्हता. त्यापूर्वीच हा आदेश कार्यान्वित झाला असता तर तात्कालीन संपूर्ण अर्थव्यवस्था कोलमडली असती. हेच उदाहरण मद्यपान (दारू) चे आहे. याला सर्व पापांची जननी म्हणून संबोधले आहे. तरी मद्यपानाला नंतर निषिध्द घोषित करण्यात आले. ही सर्व उदाहरणे ईशआदेशांचे समर्थनार्थ पुरेपूर आहेत.

आपण ही दोन तत्त्वे लक्षात ठेवली तर प्रश्नांचा गुंता आपोआप उलगडत जातो. अल्लाहने काही प्रेषितांना राजकीय आदेश दिलेले नाहीत आणि त्यांचा व त्यांच्या अनुयायींना ईशआदेश (शासनसत्ता) पालन करण्यास सांगितले नाही. याचा अर्थ हा मुळीच नाही की अशी दिव्य प्रकटने गौण आहेत आणि ती ईशआदेशांचा भाग होऊ शकत नाहीत. वस्तुस्थिती ही आहे की तात्कालीन प्रेषितांची सामाजिक स्थिती राजकीय सत्ता स्थापन करण्यास अनुकूल नव्हती म्हणून त्या प्रकारचे आदेश त्या त्या काळी आलेले नव्हते. आपल्याला हे माहीत आहे की काही गोष्टी राजकीय व्यवस्था स्थापन करण्यासाठी अनिवार्य आहेत. त्यासाठी सामाजिक व्यवस्था, एकत्रितपणा आणि त्या

प्रकारचे वातावरण लोकांमध्ये असणे आवश्यक आहे. प्रेषितांच्या काळात अशा प्रकारचे वातावरण नव्हते तर त्यांना आणि त्यांच्या अनुयायींना राजनीतीबद्दलचे आदेश देण्यात आलेले नव्हते. ईशआदेशांच्या या प्रशस्त महालात या राजकीय ईशआदेशांचे स्थान हे छतावरचे प्लास्टरसारखे आहे. जोपर्यंत पाया भरला जात नाही, भिंती उभ्या राहत नाही आणि छत बांधले जात नाही. तोपर्यंत छताचे प्लास्टर करण्याची ऑर्डर (आदेश) दिलाच जाऊ शकत नाही किंवा त्याबद्दलची काही क्रिया होऊ शकत नाही. जर महालाच्या वरील बाबींची पूर्तता झालेली नाही म्हणून छताचे प्लास्टर करण्याचा आदेश देण्यात आला नाही आणि तशी कार्यवाहीसुध्दा झाली नाही म्हणून काय त्या महालाचा मूळ प्लॅन हा बिगर प्लॅस्टर छताचा होता काय? साहजिकच असा विचार मनात आणणेसुध्दा मूर्खपणाचे लक्षण आहे. कोणीही शहाणा मनुष्य हेच सांगेल की मूळ प्लॅन बिगर प्लॅस्टरच्या छताचा असूच शकत नाही. छताचे प्लॅस्टर प्लॅनमध्ये समाविष्ट आहे. परंतु जेव्हा छताचे प्लॅस्टर करण्याची वेळ येईल तेव्हाच प्लॅस्टर करण्याची ऑर्डर दिली जाईल आणि त्याप्रमाणे प्लॅस्टर करण्याची कार्यवाही होईल. म्हणजेच जेव्हा छत प्लॅस्टर करण्याची परिस्थिती उद्‌भवेल त्याचवेळी छत प्लॅस्टर केले जाईल अगोदर मुळीच नाही. हीच अट आणि स्थिती प्रेषितांच्या कार्यप्रणालीबाबत आहे. अशा कार्यप्रणाली ज्यांच्या काळात राजकीय सत्ता स्थापन करण्याची स्थिती उद्‌भवलेली नव्हती त्या त्या वेळी त्या प्रकारचे (राजनीती) आदेश अवतरित झालेले नाहीत म्हणूनच ते प्रेषित आणि त्यांचे अनुयायी हे 'ईश्वरी शासनव्यवस्था' स्थापन करण्यापासून मुक्त होते. 'ईश्वरी शासनव्यवस्था' स्थापन करण्यासाठीचा आदेश ''अल्लाहची भक्ती करा'' यात समाविष्ट आहे. याचा अर्थ असा आपण काढूच शकत नाही की शासन सत्ता प्राप्त करण्याबद्दलचा समावेश ''अल्लाहची भक्ती करा'' यात करणे गैर आहे. त्या त्या काळात तशी परिस्थिती नव्हती म्हणूनच शासनाधिकार प्राप्त करण्याचा समावेश 'अल्लाहची भक्ती करा' यात झाला नव्हता. ज्या ज्या प्रेषितांच्या कार्यप्रणालीमध्ये राजकीय सत्ता स्थापन करण्यासारखी परिस्थिती होती त्या वेळी राजकीय ईशआदेश विनाविलंब अवतरित झालेले आहेत. शासनव्यवस्था स्थापन करण्याचे आदेश आणि राजकीय नियमांचे पालन करण्याच्या व्यवस्थेसबंधीचे दिव्य प्रकटन त्या वेळी या ईशआदेशात ''अल्लाहची भक्ती करा'' समाविष्ट होती. इतर धार्मिक विधी आणि उपासनाबद्दलचा त्यात समावेश आलेलाच आहे. म्हणून ''ईश्वरी शासन व्यवस्था'' (इस्लाम) ची प्रस्थापना करणे हे तितकेच अनिवार्य कृत्य आहे जितके इतर धार्मिक कृत्ये आणि ईशआदेश अनिवार्य आहेत.

इस्लामचे आवाहन आणि शासन

संपूर्ण जगाला माहीत आहे की इस्लाम एक यशस्वी कार्यप्रणाली आहे. याचमुळे इस्लामचे धार्मिक कायद्यांमध्ये राजनीती आणि शासनाच्या तत्त्वांचा खुलासेवार तपशील आलेला आहे. इस्लामचे प्रेषित आदरणीय मुहम्मद (स.) यांनी फक्त सत्ता प्राप्त केली नाही आणि शासनव्यवस्थेबाबत नियम फक्त घालून दिले नाहीत तर त्यांनी राजसत्तेचे नेतृत्वसुध्दा केले आहे. त्यांच्या सहकाऱ्यांनी शासनव्यवस्थेचे कार्य हे धार्मिक कार्य मानून या कार्याला महत्त्व दिले होते. म्हणून इस्लामचा विचार केला तर आपण असे म्हणूच शकत नाही की ईशकायद्याचे राज्य (इस्लाम) स्थापन करण्याचा आदेश व मूळ दिव्य प्रकटन ''तुम्ही अल्लाहचीच भक्ती करा'' वेगळे आहेत. तसेच राजकारण हा धर्माचा भाग नाही. हे विधान इस्लामविरोधी आहे. अनेक कारणांपैकी हे एक कारण महत्त्वाचे आहे ज्यामुळे इस्लाम हा एक परिपूर्ण आणि खरा धर्म सिध्द झाला आहे. शाह वली उल्लाह (र.) इस्लाम या ईश्वरी धर्माबाबत म्हणतात,

''हे माहीत असू द्या की सर्वांत परिपूर्ण धार्मिक कायदा आणि ईशमार्गदर्शन अल्लाहच्या मार्गात जिहाद होय (धर्माची पूर्णतः स्थिती)'' (अलबलग)

''अल्लाहच्या मार्गात जिहाद करणे'' याचाच अर्थ असा होतो की इस्लामचे हे असे धार्मिक कायदे (धर्मयुध्दाचे) आणि त्यासंबंधीचे दिव्य मार्गदर्शन हे राजनीती आणि राज्यशासनासाठीच आहेत, कारण अल्लाहच्या मार्गात युध्द म्हणजेच धर्मयुध्द (जिहाद) हे राज्यशासनाशिवाय शक्य नाही.

इस्लाम फक्त याच ईशकायद्याचे नाव नाही की अल्लाहच्या मार्गात युध्द करा. हे अनेक दिव्य प्रकटनांपैकी (ईशकायदे) एक आहे ज्यांना इस्लामचे आदर्श मानले आहे. धर्माच्या अनेक परिमाणांपैकी ते एक परिमाण आहे. इस्लाम एक शाश्वत धर्म आहे. तसेच अल्लाहच्या मार्गात युध्द हेसुध्दा एक शाश्वत कार्य आहे (जिहाद). जिहाद (धर्मयुध्द) हे अल्लाहच्या भक्तीचा परमोच्च बिंदू आहे. हे एक अटळ सत्य आहे की राजनीती आणि शासन हे इस्लामच्या संकल्पनेपासून वेगळे नाहीत. जर इस्लामपासून राजनीती आणि शासनव्यवस्थेला वेगळे केले तर बाकी राहते ते लुळे–पांगळे इस्लामचे रूप! असा हा लुळा–पांगळा इस्लाम म्हणजे कुरआनमध्ये उल्लेखित परिपूर्ण धर्म (परिपूर्ण जीवनव्यवस्था) मुळीच नाही. याबाबत कुरआन स्पष्टोक्ती करीत आहे,

''आज रोजी मी तुमचा धर्म तुमच्याकरिता परिपूर्ण केला आहे आणि आपली कृपा तुम्हांवर परिपूर्ण केली आहे. आणि तुमच्यासाठी इस्लाम तुमचा धर्म म्हणून संमत केला आहे.'' *(५ : ३)*

प्रकरण आठवे

इस्लामी कायदा आणि उपासना

भक्तीचे स्वरुप

धर्म म्हणजे दुसऱ्या शब्दांत अल्लाहची भक्ती करणे आहे. अल्लाहची उपासना (ईबादत) म्हणजेच धर्म होय. भक्तीचे महत्त्व व स्वरुप लोकांना अल्लाहची भक्ती करण्यास सांगणे आहे. आज्ञाधारकता आणि भक्ती उपासनेमुळे मनुष्याचे मन शुध्द आणि उदात्त बनते आणि मनुष्य अल्लाहची प्रसन्नता आणि कृपा प्राप्त करण्यास योग्य बनतो. ही एक साधारण कल्पना आहे धर्माबद्दलची आणि त्याचे आपण खंडन करू शकत नाही. कुरआननुसार हे एक उघड सत्य आहे. प्रत्येक प्रेषिताचे जीवनध्येय हेच होते,

''अल्लाहची भक्ती करा आणि अनिर्बंध बनलेल्या (खोट्या ईश्वरांच्या) उपासनेपासून अलिप्त राहा.'' (१६ : ३६)

प्रेषित मुहम्मद (स.) यांनीसुध्दा हाच संदेश आणि शिकवण लोकांना दिली आहे. कुरानोक्ती आहे,

''लोक हो! उपासना (भक्ती) करा आपल्या पालनकर्त्याची ज्याने तुम्हाला आणि तुमच्या पूर्वीच्यांनाही निर्माण केले.'' (२ : २१)

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की मनुष्याला या जगात निर्माण करण्याचा एकमेव उद्देश हाच आहे की त्याने अल्लाहची भक्ती करावी. अल्लाहने कुरआनमध्ये स्पष्ट आदेश दिला आहे,

''मी जिन्न आणि माणसांना याशिवाय कोणत्याही अन्य कामासाठी निर्माण केले नाही की त्यांनी माझी भक्ती करावी.'' (५१ : ५६)

म्हणून मनुष्यजातीला निर्माण करण्याचा उद्देश अन्य कोणताही नसून अल्लाहची भक्ती करणे हाच आहे. याच कार्यासाठी अल्लाहने अनेकानेक प्रेषित पाठविले जेणेकरून त्यांनी या उद्देशाचे (अल्लाहची भक्ती करण्याचे) स्मरण लोकांना करून द्यावे. अशा प्रकारे या दोन गोष्टी एकमेकांत गुंफलेल्या आहेत. मनुष्यजातीच्या निर्मितीचा उद्देश स्पष्ट करण्यात आला आणि प्रेषितांचे कार्य उघड केले. त्यांचे कार्य अगदी सरळ आणि अन्य कोणतेही नव्हते. प्रत्येक प्रेषितांचे जीवनकार्य मनुष्यजातीला एकाच अल्लाहची भक्ती करण्याचे स्मरण करून देणे होते.

भक्तीचा अर्थ

भक्तीचे महत्त्व आणि स्वरुप लक्षात घेता हे स्पष्ट होते की भक्ती आणि इस्लाम एकमेकांशी संबंधीत आहेत. इस्लाम एक परिपूर्ण जीवनव्यवस्था आहे. ही जीवनव्यवस्था सर्वसमावेशक आहे. मनुष्याच्या पूर्ण जीवनाचे नियंत्रण ही व्यवस्था करते. धर्माच्या मर्यादित आणि चुकीच्या संकल्पनेमुळे धर्माला अनेक कप्प्यांमध्ये विभाजित करण्यात आले.

व्यावहारिक दृष्टिकोनातून विचार केला तर भावनाशील व्यक्तीला म्हणावे लागेल की ही एक असामान्य गोष्ट आहे. भक्तीचा इस्लामी कायद्याशी प्रत्यक्ष आणि जवळच्या संबंध आहे, भक्तीच्या इस्लामी संकल्पनेमुळे श्रध्दा, उपासना, श्रध्देची वैशिष्ट्ये याबद्दल जास्त गांभीर्याने आणि औत्सुक्याने ,लक्षपूर्वक आचरणात आणणे अल्लाहची खरी भक्ती आहे. याबद्दलचे अज्ञान मनुष्याला विनाशाकडे ढकलून देते. अज्ञानापोटी एखादी व्यक्ती त्याच्या मर्जीनुसार भक्तीकडे पाहते आणि त्याला जे आवडत नाही त्या विभागाकडे दुर्लक्ष करते.

भक्ती या शब्दाचा अर्थ आणि स्वरुप कुरआन व हदीसनुसार काय आहे? या प्रश्नाचे उत्तर सविस्तरपणे आपण पाहू या.

शब्दशः अर्थ

शब्दाचा कोशार्थ हा आहे की ''भक्ती म्हणजे लोटांगण घेणे'', ''भक्ती म्हणजे आज्ञाधारकता (लिसाने अरब)''. तो अल्लाहची प्रार्थना करतो म्हणजे अल्लाहची भक्ती करतो. भक्तीचा अर्थ एकाजवळ एक तर दुसऱ्याजवळ दुसरा असू शकतो, परंतु वास्तविकता तशी नाही. भक्तीचा खरा अर्थ वर नमूद केल्याप्रमाणेच आहे. उदा.- पूर्ण आज्ञाधारकता, नतमस्तक होणे, लोटांगण घेणे, दुसऱ्यांसमोर स्वतःला तुच्छ लेखणे इ. स्वाभाविकपणें नतमस्तक होणे अथवा लोटांगण घेण्यासाठी पूर्ण आज्ञाधारकता आवश्यक असते आणि पूर्ण आज्ञाधारकता म्हणजेच भक्ती होय. ज्या ईश्वराजवळ असीम दया आणि परम कृपा आहे त्याच्याचसमोर मनुष्य पूर्ण आज्ञाधारकता स्वीकारून स्वतःला तुच्छ लेखूनं लोटांगण घेतो. ही आज्ञाधारकता आणि नतमस्तक होणे अथवा लोटांगण घेणे भक्तीचाच एक प्रकार आहे. म्हणून स्वाभाविकपणे प्रार्थना, नमाज ही भक्तीच आहे.

वर नमूद केलेल्या खुलाशावर आपण विचार केला तर आपणास इस्लामला अपेक्षित भक्तीची पूर्ण कल्पना येईल. तसेच्र भक्तीचे स्वरुपसुध्दा स्पष्ट होईल. अल्लाहचा

भक्त कोण आहे? अल्लाह सार्वभौम आहे आणि मनुष्याचा खरा अन्नदाता आहे. म्हणून त्याच्यासमोर वरवरचे आणि दिखाव्याचे लोटांगण घेणे अथवा नतमस्तक होणे हे बुध्दीला न पटण्यासारखे आहे. ही खरी भक्ती नाही. हे असे आहे जसे अग्नीविना आग प्रज्वलित करणे होय. थोडक्यात अल्लाहसमोर पूर्ण आज्ञांकित होणे म्हणजे पूर्ण लोटांगण (नतमस्तक) घेणे, पूर्ण आज्ञाधारकता स्वीकारने हीच भक्ती होय.

धार्मिक संकल्पना

वरील विवेचनावरून भक्तीचा शब्दश: अर्थ आपण पाहिला. आता त्याचा धार्मिक अर्थ पाहू या. हे निर्विवादित सत्य आहे की प्रेषित या भूतलावर मनुष्याच्या मार्गदर्शनासाठी येत गेले. त्यांनी अल्लाहची भक्ती (इबादत) करण्यासाठी मनुष्यजातीला स्पष्टपणे बजावून सांगितले. मनुष्यजात अल्लाहची भक्ती करण्यासाठी निर्माण केली गेली आहे, तर मग सर्व प्रेषितांचे कार्य एकच एक असणार ते म्हणजे अल्लाहची भक्ती करण्याचा हुकूम मनुष्यजातीला देणे व स्मरण करून देणे आहे आणि त्याद्वारे मनुष्याला अल्लाहचा सच्चा सेवक (गुलाम) बनविणे. अशा प्रकारे सर्व प्रेषितांनी जे सांगितले आणि शिकवण दिली ती फक्त एक अल्लाहची भक्ती होती.

अशा प्रकारे प्रेषितांना मनुष्यजातीसाठी एकच एक उद्देश आणि कार्य सोपवून पाठविले गेले होते ते म्हणजे एका अल्लाहची भक्ती करणे आणि अल्लाहचा सच्चा गुलाम (दास) बनून राहाणे. कोणत्याही प्रेषिताने याव्यतिरिक्त दुसरे कार्य केले नाही. सर्वसामान्य मनुष्याला सोपवलेले कार्य तो पार पाडण्याचे प्रयत्न करतो आणि त्यापासून विमुख होत नाही. तर प्रेषितांना सोपविलेल्या कार्यापासून ते विमुख होणे अशक्यप्राय गोष्ट आहे. अल्लाहच्या आज्ञाधारकतेचे प्रेषित हे एक आदर्श उदाहरण आहेत. त्यांची दृष्टी त्यांच्या कार्यावर स्थितरावलेली होती. त्यांनी मनुष्यजातीला दिव्य संदेश दिला. त्यांनी स्वत:चे असे काहीच सांगितले नाही. अशा प्रकारे ते आपल्या ध्येयापासून कधीही विचलित होणारच नव्हते. जे काही सांगितले आणि शिकवण दिली ती दुसरे तिसरे काही नसून अल्लाहची भक्ती (इबादत) आहे. प्रेषितांनी दिलेली शिकवण मग ती श्रध्देविषयीची असो अथवा सामाजिक, सांस्कृतिक विषयांची असो, काहीएक फरक पडत नाही. नमाज अदा करण्यासाठी घालून दिलेल्या विधीनियमांचे पालन तंतोतंत करणे तितकेच महत्त्वाचे आहे जितके सामाजिक आणि वैयक्तिक जीवनासाठी घालून दिलेल्या विधीनियमांचे पालन करणे आहे. दुसऱ्या शब्दांत, भक्ती म्हणजे (अल्लाहची भक्ती) धर्माचे आणि सर्व इस्लामी कायद्यांचे परिपूर्ण पालन करण्याचे आदेश आहेत. याच कारणासाठी मनुष्यनिर्मिती करण्यात आली आणि प्रेषितांना या भूतलावर अल्लाहने

पाठविले. मनुष्य जितक्या जास्त प्रमाणात अल्लाहच्या आदेशांचे (इस्लामी कायद्याचे) पालन करील तितक्या जास्त प्रमाणात तो अल्लाहचा परिपूर्ण भक्त ठरेल. याच्या विरोधात जितक्या कमी प्रमाणात तो इस्लामी कायद्याचे पालन करील तितकाच कच्चा तो अल्लाहच्या भक्ती (इबादत) साठी सिध्द होईल.

मूलभूत सत्य आणि वैश्विक प्रामाणिक (धार्मिक) तत्त्वांनुसार भक्तीचा अर्थ वर नमूद केल्याप्रमाणेच आहे. कुरआननुसार मानवनिर्मितीचा मूळ उद्देश अल्लाहची भक्ती हाच आहे. म्हणून मनुष्याची प्रथम आणि शेवटची स्थिती अल्लाहच्या गुलामाचीच आहे. म्हणूनच या सत्याला कुरआन पुन्हा पुन्हा सांगत आहे. आता आपण गुलामाची वास्तविक स्थिती काय आहे ते पाहू या. गुलामाला एखादा मालक खरेदी करतो तेव्हा तो गुलाम त्याचा चोवीस तास गुलामच राहातो. तो गुलाम दिवसभर मालकाची सेवा करत राहातो. परंतु वस्तुस्थिती ही आहे की गुलामाचा मालक त्याचा खरा मालक नसतोच. त्याने तर त्या गुलामाच्या फक्त कार्यशक्तीलाच विकत घेतले आहे. परंतु मनुष्य ईश्वराचा परिपूर्ण गुलाम असतो की त्याच्या प्रत्येक अवयवावर, अणुरेणुवर ईश्वराचा ताबा असतो. त्याच्याकडे जे काही आहे ते ईश्वराचे आहे. मनुष्याचे सर्वकाही ईश्वराचेच असते, त्यात कुणाचीही भागीदारी नसते. खऱ्या मुस्लिमाचा विचार केला तर तो फक्त जन्मतःच अल्लाहचा गुलाम नाही तर साक्षीपूर्वक व शपथपूर्वक आश्वासन देऊन अल्लाहचा गुलाम बनतो. कुरआन या सत्यतेला स्पष्ट करीत आहे,

''अल्लाहने श्रध्दावंतांचे (मुस्लिमांचे) जीव आणि वित्त स्वर्गाच्या मोबदल्यात खरेदी केले आहेत.'' (९ : ३)

म्हणून एक श्रध्दावंत (मुस्लिम) अल्लाहचा गुलाम आहे. तो फक्त त्याच्या कार्यशक्तीनुसारच नाही तर सर्व दृष्टीने अल्लाहचा गुलाम आहे. तो अल्लाहची निर्मिती आणि खरेदी केलेला गुलाम आहे. हा सौदा त्याच्या स्वच्छेने झाला आहे. मनुष्यावर बळजबरी अत्याचार करून नव्हे. मुस्लिम (श्रध्दावंत) जन्मजात अल्लाहचा गुलाम असतो ज्याने स्वतःला पूर्णपणे अल्लाहपाशी विकून टाकले आहे. तो अल्लाहच्या आज्ञाधारकतेसाठी जे काही करतो त्या कृत्यास त्याच्या गुलामीच्या स्थितीपासून वेगळे करता येतच नाही. तो दुसरे तिसरे काही नसून गुलाम आहे म्हणून त्याचे प्रत्येक कृत्य आज्ञाधारकतेचेच असते. तो दैनंदिन लहानातील लहान कामे ईशआदेशानुसार करतो. ती सर्व कामे ईशभक्तीत मोडतात.

वरील सर्व चर्चा अनुमानिक स्वरुपाची आहे आणि मूलभूत धार्मिक तत्त्वांवर आधारित आहे. परंतु अनुमान स्वरुपाची चर्चा असूनसुध्दा पुढे ती ईशआदेशांचा आधार

आपोआप घेते आणि त्यास चर्चेसाठी आव्हान देणेसुध्दा अशक्य होते.

भक्ती आणि कुरआन

भक्ती हा शब्द कुरआनमध्ये कशा प्रकारे वापरला जातो हे पाहू या. भक्ती या शब्दाचा खरा अर्थ कुरआनने दिलेला हाच आहे. कुरआनमध्ये हा शब्द वेगवेगळ्या अर्थाने वापरला गेला आहे. त्याकडे आपण लक्ष देऊ या.

''तुम्ही ज्यांची भक्ती करता त्याच्या (अल्लाह) सह, ती सर्व नावे आहेत जी तुम्ही आणि तुमच्या वाडवडिलांनी ठेवलेली आहेत.''

''त्यांनी उत्तर दिले, काही मूर्ती आहेत ज्यांची आम्ही पूजा (भक्ती) करतो आणि त्यांच्याच सेवेत आम्ही लागलेलो असतो.'' (२६ : ७१)

वरील कुरआन आयतींनुसार इतर कुणाची (अल्लाहला सोडून) पूजा अर्चा करणे अथवा भक्ती करणे म्हणजेच त्याची (इतरांची) उपासना करणे आहे. अनेकेश्वरवादी आपल्या मूर्तीशी जो व्यवहार करतात त्यास पूजा (भक्ती) म्हणून येथे संबोधले आहे. म्हणूनच अनेकेश्वरवादी आणि त्यांच्या मूर्तींच्या दरम्यान जो संबंध प्रस्थापित होतो त्याला पूजा (भक्ती) असे म्हटले जाते.

''जे लोक खोट्या ईश्वरांच्या (तागूत) भक्ती (पूजा) पासून अलिप्त राहिले आणि अल्लाहकडे रुजू झाले त्यांच्यासाठी खूशखबर आहे.'' (३९ : १७)

''काय मी त्या लोकांचा निर्देश करु, ज्यांचा शेवट अल्लाहपाशी अवज्ञा करणाऱ्यांच्या शेवटापेक्षा अधिक वाईट आहे? ते अल्लाहने ज्यांचा धिक्कार केला. आणि ज्यांच्यावर त्याचा कोप कोसळला, ज्यांच्यापैकी माकड व डुक्कर बनविले गेले, ज्यांनी मूर्तींची (तागूत) ची भक्ती (पूजा) केली, त्यांचे स्थान आणखीनच वाईट आहे आणि ते सन्मार्गापासून दूरवर भरकटलेले आहेत.'' (५ : ६०)

कुरआनच्या या आयतींनुसार कुणा एकाला सार्वभौम मान्य करून त्याच्या आदेशांचे स्वेच्छेने आज्ञापालन करणे म्हणजेच त्याची पूजा (भक्ती) करणे होय. जे खोट्या ईश्वरांशी असा व्यवहार करतात त्याससुध्दा पूजा (भक्ती) असे संबोधले गेले आहे. वरील आयतीत ''तागूत'' या शब्दाचा प्रयोग झाला आहे. अरेबिक भाषेत तागूतचा अर्थ होतो ''मर्यादांचे उल्लंघन करणारा'' तसेच विद्रोह करणारा. तत्त्वत: तागूत म्हणजे असा समुदाय जो दुसऱ्यांना अल्लाहच्या भक्ती (पूजा) पासून दूर ठेवतो आणि विनाशाकडे ढकलतो. याच अर्थाने सैतान आणि मूर्तींना 'तागूत' म्हणून संबोधले गेले आहे. याचप्रमाणे ते राज्यप्रमुख, उच्चपदस्थ अधिकारी, राजकारणी मंडळी आणि

धार्मिक नेते ज्यांना अल्लाहच्या कोपचे भय नाही. तसेच जे अल्लाहच्या आदेशांची पायमल्ली करतात आणि जे आपले विचार व इच्छा यांना कायद्याचा दर्जा देतात असे सर्व लोक 'तागूत'च्या व्याख्येत मोडतात. जे लोक यांचे आज्ञापालन करतात आणि अशा तागूतांचा (द्रोहींचा) आदर सन्मान करतात, त्यांना कायदेकानू बनविणारे आणि निर्णय (न्यायनिवाडा) करणारे ठरवतात, ते सर्वजण तागूतांचे श्रध्दापूर्वक आज्ञापालन करून त्यांना ईश्वरस्थानी बसवतात. कुरआन याच कृतीला ''खोट्या ईश्वरांची पूजा'' म्हणून ठरवतो. अशा लोकांची कृती त्यांच्या खोट्या ईश्वरांची (तागूत) ची पूजा (भक्ती) च आहे. स्वेच्छेने आणि आनंदाने अशा 'तागूतांचे' आज्ञापालन करणे दूसरे तिसरे काहीच नसून त्यांची भक्तीच आहे. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

''परंतु त्यांनी गर्व केला आणि बडेजाव केला व म्हणू लागले, काय आम्ही आमच्याचसारख्या दोन माणसांवर श्रध्दा ठेवावी? आणि माणसेही ती ज्यांचा लोकसमूह आमचा गुलाम आहे? म्हणून त्यांनी दोघांना खोटे ठरविले आणि नष्ट होणाऱ्यांना जाऊन मिळाले.'' *(२३ :४७)*

''उरले तुझे उपकार ज्यांचा ठपका तू माझ्यावर ठेवला आहेस, तर त्याची वस्तुस्थिती अशी आहे की तू बनी इस्राईलांना गुलाम बनविले होते.'' *(२६ : २२)*

वरील कुरआनोक्तींनुसार हेच सिध्द होते की स्वेच्छेने आणि ,आनंदाने आज्ञाधारकता स्वीकारणेच फक्त भक्ती होत नाही तर अनेच्छेने, परंतु हेतुपुरस्सर आणि समजून–उमजूनसुध्दा ज्यांची आज्ञाधारकता स्वीकारली जाते तीसुध्दा भक्ती (पूजा) आहे. ज्यांची पूजा होते ते स्वत: मग सार्वभौम सत्तेत सहभागी समजत नसतील तरी ईश्वराचा दर्जा देऊन त्यांची भक्ती होते. (मग ती माणसं असोत (मृत अथवा जिवंत) की दगड–धोंडे, पशु–पक्षी, झाडे–झुडपे असोत) याचसाठी वरील कुरआनोक्तीमध्ये बनी इस्राईलांना गुलाम बनविले गेले असा उल्लेख आला आहे. कारण ते अल्लाहला सोडून इतरांची भक्ती करीत होते. तें स्वेच्छेने इतरांचे गुलाम बनले नव्हते. तात्कालीन राजकीय दबावामुळे आणि त्यांच्या कमकुवतपणामुळे त्यांना अत्याचारींच्या पुढे नतमस्तक व्हावे लागले. जो स्वत:ला सार्वभौम समजतो आणि त्याची आज्ञाधारकता सरळ सरळ होत असेल तर हे कृत्यसुध्दा त्या राजाचे अथवा राज्यप्रमुखाची पूजा (भक्ती) आहे. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

''आदमच्या मुलांनो, मी तुम्हाला आदेश दिला नव्हता काय की सैतानाची भक्ती करू नका, तो तुमचा उघड शत्रू आहे आणि माझीच भक्ती करा, हा सरळ मार्ग आहे ?'' *(३६ : ६१)*

"हे पित्या, आपण का त्या वस्तूंची उपासना करता ज्या ऐकतही नाहीत आणि पहातही नाहीत आणि आपले कोणतेही काम पार पाडू शकत नाहीत ?" *(१९ : ४२)*

"बाबा, सैतानाची भक्ती करू नये." *(१९ : ४४)*

वरील आयतींनुसार आणखी दुसऱ्या प्रकारच्या भक्तीचे स्वरूप स्पष्ट होते. म्हणजे एखाद्याची पूर्ण अनावधानाने पूर्ण आज्ञाधारकतासुध्दा भक्तीच ठरते. येथे कुरआनची ही संकेतवचनं सैतानाच्या अशा भक्तीला स्पष्ट करत आहेत की लोकांचे आचरण आणि विश्वास हा सैतानाच्या भक्तीशी तंतोतंत जुळतो. तसे पाहता त्यांच्यापैकी कोणीही सैतानापुढे नतमस्तक होत नाही अथवा सैतानाची उपासना करीत नव्हता. त्यांच्यापैकी कोणीही सैतानाला आपला पालनकर्ता किंवा मार्गदर्शक म्हणून स्वीकारले नव्हते आणि सैतानांबद्दल कुणालाही आदर नव्हता. दुसऱ्या लोकांप्रमाणेच या मंडळीच्या मनात सैतानाबद्दल तिरस्कारच होता. परंतु असे असतांनासुध्दा त्यांना 'सैतानाचे पुजारी अथवा भक्त' म्हटले गेले. वरील आयतीत त्यांना स्पष्ट आदेश दिला की "सैतानाची भक्ती करू नका." कुरआननुसार अनावधानाने जरी आज्ञाधारकता होत असेल आणि त्यांचे कृत्य आणि विश्वास सैतानाच्या किंवा त्याच्या चेल्यांसारखे असतील तर ती 'चुकून झालेली आज्ञाधारकता'सुध्दा सैतानाची भक्तीच ठरते.

कुरआनच्या वरील आयतींमध्ये भक्ती या शब्दाचा वापर रूपकात्मकरित्या झालेला आहे असे म्हणणे चुकीचे आहे. हे कुरआन, हदीस अथवा शब्दकोशाच्या अगदी विरुध्द आहे. भक्ती (उपासना) या शब्दाचा अर्थ फक्त पूजा-अर्चा असा होत नाही तर त्याचा अर्थ वरील आयतींनुसारच कुरआनमध्ये सर्वत्र आला आहे. वर नमूद केलेल्या भक्तीचे चार प्रकार हे त्याच शब्दाच्या व्यापक अर्थाचे प्रभाग आहेत. भक्ती आज्ञाधारकता आहे. जाणीवपूर्वक आणि अजाणतेने केलेली आज्ञाधारकतासुध्दा भक्ती आहे. आज्ञाधारकतेविना भक्ती काहीही नाही. कुरआननुसार आज्ञाधारकता भक्ती (पूजा, उपासना) आहे, तर याचाच अर्थ असा आहे की आज्ञाधारकतेचे इतर तीन प्रकारसुध्दा भक्ती आहे. कुरआननुसार आज्ञाधारकता त्याचा खरा अर्थ तेव्हाच प्राप्त करते जेव्हा भक्ती आणि आज्ञाधारकता हे दोन्ही शब्द एकत्र वापरले जातात. अशा प्रकारे आज्ञाधारकता हा शब्द व्यापक आहे. ज्यामध्ये भक्ती आणि आज्ञाधारकता दोन्हींचा समावेश होतो. त्याचे स्वरूप व व्याप्ती धार्मिक गरजांचे आणि इस्लामी आदेशांचे पालन आहे.

आज्ञाधारकता आणि कुरआन

अल्लाहची भक्ती (उपासना, पूजा) हा मानवनिर्मितीचा एकमेव उद्देश आहे. यासाठी प्रेषितांची नियुक्ती केली. असे कार्य (अल्लाहची भक्ती) अनिश्चित आणि अपरिपक्व स्वरूपाचे असू शकतच नाही. हे फक्त पूजापाठ अथवा उपासनापध्दतीपर्यंतच मर्यादित नाही किंवा फक्त आज्ञाधारकतेपुरतेच मर्यादितसुध्दा नाही. बुध्दीविवेक आणि कुरआननुसार हे सिध्द आहे. हे बुध्दीविवेकास धरून आहे की ज्या ईश्वराने मनुष्याची निर्मिती केली तोच ईश्वर मालक, पालक आणि शासक आहे आणि तोच एकमेव ईश्वर मानवासाठी पूजनीय आहे. सर्व प्रकारची भक्ती आणि उपासना फक्त त्या एकमेव ईश्वर (अल्लाह) साठीच आहे. कुरआनचा स्पष्ट निर्णय आहे की त्याच्या अनुयायींना ईशभक्ती आणि ईशआज्ञाधारकता एकसारखी आहे. कुरआन आयती मुस्लिमांना (आज्ञाधारकांना) स्पष्ट आदेश देत आहेत की त्यांनी एकाच ईश्वरापुढे (अल्लाह) नतमस्तक व्हावे. त्याचीच प्रशंसा आणि गुणगान करावे. त्याचेच श्रेष्ठत्व स्वीकारावे आणि उपासना त्याच्यासाठीच असावी. त्याच एकमेव ईश्वर (अल्लाह) ची मदत मागावी आणि नियमित त्याचे कृपाभिलाषी बनावे. कुरआन अशा एकमेव ईश्वरलाच फक्त शासक मानतो, तोच विधीनियमांचा आणि हुकूम देणारा शासक आहे. त्याचीच आज्ञा पाळली जावी आणि त्याच्या आदेशानुसारच जीवनयापन मनुष्याने करावे. अल्लाहने घालून दिलेल्या नियमांचेच पालन व्हावे. अल्लाहने वैध ठरविलेले आणि अवैध ठरविलेले आपल्यासाठीसुध्दा मनुष्याने तेच ठरवावेत. म्हणून भक्तीचा अर्थ कुरआननुसार तेव्हाच परिपूर्ण होतो जेव्हा मानवनिर्मितीचा एकमेव उद्देश आणि प्रेषितांच्या नियुक्तींचा उद्देश साध्य करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न मनुष्य करतो. अशा प्रकारे कुरआनप्रणित भक्ती (पूजा, उपासना) मध्ये भक्ती आणि आज्ञाधारकता दोघांचाही समावेश आहे. आपण हा मुद्दा आणखी स्पष्ट होण्यासाठी दुसऱ्या पध्दतीने त्याचे आकलन करू या. कुरआनने मानवनिर्मितीचा उद्देश स्पष्ट करताना खालील शब्दांचा उल्लेख केला आहे.

''ज्याने मृत्यू आणि जीवन निर्माण केले जेणेकरून तुम्हा लोकांना अजमावून पाहावे की तुमच्यापैकी कोण अधिक चांगले कृत्य करणारा आहे.'' (६७ : २)

दुसऱ्या ठिकाणी स्पष्टोक्ती आहे,

''जेव्हा तुमच्या पालनकर्त्याने दूतांना सांगितले की, ''मी पृथ्वीवर एक खलीफा (माझा प्रतिनिधी) बनविणार आहे.'' (२ : ३०)

मानवनिर्मितीचा उद्देश स्पष्ट करताना, निर्मात्याने भक्तीबरोबरच ''अधिक चांगले कृत्य करणारा'' आणि खलीफा (निर्मात्याचा प्रतिनिधी) हे शब्दप्रयोगसुध्दा केले

आहेत. हे जरी वेगवेगळे शब्द आहेत तरी त्यांचा मतितार्थ (खरा अर्थ) एकच आहे. कुरआननुसार अल्लाहची भक्ती, अधिक चांगले कृत्य करणे (सदाचरण) आणि निर्मात्याचे प्रतिनिधित्व करणे (खलीफा) हे एकाच ध्येयाची व उद्देशाची वेगवेगळी स्पष्टीकरणे आहेत. म्हणून तिन्हींचा मिळून भक्तीचा खरा अर्थ होतो. सदाचरण आणि निर्मात्याचे प्रतिनिधित्वाला सोडून भक्ती कुरआनच्या दृष्टीने अपूर्ण आहे. फक्त आज्ञाधारकता (भक्तीविना) हे सदारचण नव्हे. तसाच प्रकार निर्मात्याचे (अल्लाहचे) प्रतिनिधित्व करण्यासाठी आहे. येथे आज्ञाधारकता जरी अपेक्षित आहे तरी भक्तीचा त्यांत समावेश आवश्यक आहे. भक्तीच्या इस्लामी संकल्पनेत या दोन्ही गोष्टींचा (आज्ञाधारकता-पूजा) समावेश होतो आणि कोणतीही धार्मिक बाब यातून सुटूच शकत नाही. इमाम इब्ने तैमिया खालील कुरआनोक्तीचे स्पष्टीकरण देताना म्हणतात,

''लोकहो, उपासना (भक्ती) करा आपल्या पालनकर्त्याची,ज्याने तुम्हाला आणि तुमच्या पूर्वीच्यांनाही निर्माण केले.'' *(२ : २१)*

''भक्ती हा व्यापक शब्द आहे. त्यात जाहीर आणि गुप्त गोष्टी आणि अल्लाहच्या आवडत्या आणि प्रसन्नतेशी निगडीत शिकवणींचा समावेश आहे. उदा. उपासना (नमाज) रोजा, हज, चांगुलपणा, विश्वासुपणा, दयाळुपणा, आईवडिलांची सेवा, सदाचाराचा प्रसार आणि दुराचाराचा प्रतिकार, अल्लाहच्या मार्गात प्रयत्नांची पराकाष्ठा, शेजारधर्म, अनाथांची सेवा, कुरआन पठण, इ. भक्तीचेच अंग आहेत. त्याच प्रकारे अल्लाहशी प्रेम, अल्लाहच्या कोपचे भय, प्रेषितांशी प्रेम, ईशपरायणता, इ. गुप्त गोष्टीसुध्दा भक्तीचेच अंग आहेत.'' *(अल अबुदियात - २)*

याच भाषणात ते पुढे म्हणतात,

''भक्तीमध्ये धर्म व त्याच्या सर्व अंगांचा समावेश होतो. सर्व प्रेषित भूतलावर मानवाला ईशधर्माचे धडे देण्यासाठीच आलेले होते. या वस्तुस्थितीचा कुरआनमध्ये अनेक ठिकाणी उल्लेख आला आहे. प्रत्येक प्रेषिताने 'ईश्वरभक्ती करा' ही शिकवण दिली. यावरून हे स्पष्ट होते की धर्म आणि भक्ती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.''

यावरून हेच स्पष्ट होते की पूर्ण धर्मपालन म्हणजेच भक्ती होय. धर्माच्या एका अंगास भक्ती आणि दुसऱ्या अंगास भक्तीपासून दूर ठेवणे अशक्य आहे. धर्म हा एक घटक आहे त्याचे अनेक घटक करणे अशक्य आहे. ज्याप्रमाणे मानवी शरीर एक पूर्ण घटक आहे त्यास विविध घटकांत आपण विभागू शकत नाही.

इस्लामच्या आधारस्तंभांचे विशेष महत्त्व

मानवी शरीर अनेक अवयवांचे मिळून बनले असले तरी त्याच्या प्रत्येक अवयवाचे महत्त्व एकसारखे नाही. त्याचप्रमाणे भक्तीचे अनेक अंग आहेत आणि त्यांच्यापैकी प्रत्येक भागाचे महत्त्वसुध्दा एकसारखे नाही. जसे मानवी शरीरात मेंदू, हृदय यांचे विशेष महत्त्व आहे. त्याचप्रमाणे भक्तीमध्येसुध्दा इस्लामनुसार, नमाज, रोजा, हज यांचे विशेष महत्त्व आहे. हे इस्लामचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या विशेष महत्त्वाची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

(१) त्यांचा संबंध प्रत्यक्ष निर्मात्याशी आहे. ते सर्व अल्लाहसाठीच आहेत. या भक्तीत एकीकडे अल्लाह आणि दुसरीकडे मनुष्य (भक्त) असतात. दुसरीकडे मात्र परिस्थिती याविरुध्द असते. यातसुध्दा अल्लाहच्या प्रसन्नतेसाठीच भक्ती असते तरीपण अल्लाह आणि मनुष्याच्या दरम्यान दुसरा कुणीतरी (दलाल) असतो. त्या दलालांविना ती भक्ती अथवा पूजा पूर्ण होऊच शकत नाही. मनुष्य जेव्हा इस्लामचे आधारस्तंभ असलेले उपासनाविधी (नमाज, रोजा, हज, जकात) इ. पार पाडताना त्याचा अल्लाहशी प्रत्यक्ष संबंध येतो. जेव्हा तो न्यायाधीशाच्या भूमिकेत असतो तेव्हा इस्लामी आदेशांचे पालन आणि अल्लाहची प्रसन्नता त्याद्वारे प्राप्त करणे हेच ध्येय असते. हाच व्यवहार इतर ठिकाणीसुध्दा असतो. त्याच्या जीभेद्वारे, हात, पाय याद्वारे अशाच प्रकारचे कृत्य घडत असते.

(२) इस्लामचे या आधारस्तंभांचे स्वतंत्र असे स्वरूप आहे आणि त्यांच्यावर भक्तीचा शिक्का मारला गेला आहे. प्रथमदर्शनी असे वाटते की या उपासनापध्दती म्हणजे फक्त भक्ती (पूजा, उपासना) आहेत इतर काहीच नाही. इतर व्यवहार हे यां प्रकारात मोडत नाहीत. कारण त्यांच्यावर तो भक्तीचा शिक्का मारलेला नसतो आणि याचमुळे अशा या इतर कृत्यांना अल्लाहची भक्ती म्हणून संबोधले जात नाही.

(३) इस्लामच्या आधारस्तंभाचे स्वत:चे असे स्वरुप आहे आणि विशेष गुण आहेत ज्यामुळे आज्ञाधारकता आणि विनम्रता हे गुण मनुष्यात जोपासले जातात. परंतु दुसऱ्या कृतींमध्ये हा गुण त्या प्रमाणात नाही. इतर सदाचारांमध्ये हे गुण आहेत त्यांच्यामुळे स्वत:चे अंतकरण निर्मळ बनते. प्रार्थनेसाठीची इच्छा उत्कट बनते आणि अल्लाहच्या संबंधांना बळकटीसुध्दा प्राप्त होते. या इस्लामच्या आधारस्तंभाद्वारे आध्यात्मिक शक्ती जशी प्राप्त होते तशी इतर कृतींनी प्राप्त केली जाऊ शकत नाही. इस्लामच्या आधारस्तंभाव्यतिरिक्त ती आध्यात्मिक शक्ती प्राप्त होऊच शकत नाही ज्याद्वारे आपण खरी भक्ती करू शकू. याच कारणांमुळे इस्लामच्या या आधारस्तंभांना

(नमाज, रोजे, जकात, हज इ.) अनिवार्य ठरविले आहे. आणि त्याचे स्वरुप आणि नियमांना स्पष्ट करण्यात आले आहे जेणेकरून सर्व मुस्लिमांनी खरी भक्ती पार पाडून शक्तीस्रोत प्राप्त करून घ्यावा. इस्लामचे आधारस्तंभ निर्विवादपणे भक्तीचा महत्त्वाचा घटक आहे. त्यांच्यावर इतर घटकांचे अस्तित्व अवलंबून आहे.

इस्लाम आधारस्तभांचे हे महत्त्व लक्षात ठेवले तर आढळून येते की त्यांचा आणि अल्लाहच्या भक्तीचा विशेष संबंध आहे. हे संबंध त्याना विशेष महत्त्व देते ज्यामुळे प्रथमतः त्यांना भक्ती रूप फक्त दिले जाते आणि भक्तीचे दुसरे रूप इस्लामच्या या आधारस्तंभांना समजले जाते. हे काही अयोग्य आणि असंबंधित असे मुळीच नाही. हे मान्यताप्राप्त परिभाषा नियामांनुसारच आहे. इस्लाम ईशधर्म आहे आणि त्याच्या पूर्वीचे सर्व ईशधर्म इस्लाम होते. हे तत्त्व येथे कार्यान्वित आहे. धर्माच्या प्रत्येक कृत्याला पार पाडणे ही भक्ती आहे. जसे नमाज, रोजा, जकात आणि हज इ. उपासनाविधींना पार पाडणे होय. हे समजणे अयोग्य आहे की भक्ती म्हणजे फक्त नमाज, रोजा, जकात आणि हज आहेत आणि इतर कृती भक्ती बाह्य आहेत.

गैरसमजुती आणि त्यांची कारणे

भक्तीचा खरा आणि व्यापक अर्थ बुध्दीविवेकाच्या भक्कम पायावर तसेच कुरआन आयतींनुसार आणि धार्मिक विद्वानांच्या संशोधनांवर आधारित आहे. हे आपण वर पाहिले आहे, परंतु भक्ती म्हणजे फक्त पूजाअर्चा आणि आराधना, उपासना आहे. हा दुसरा दृष्टिकोन आजही प्रचलित आहे. उदा. नमाज, रोजा, हज, जकात इ. आणि याव्यतिरिक्त धर्मकारण हे भक्तीत मोडत नाही. त्यांच्यानुसार धर्माच्या अनेक शाखा आहेत त्यापैकी भक्ती एक शाखा आहे. हा गैरसमज फक्त सर्वसामान्यांच्या मनात घर करून राहिला आहे असे नाही तर विद्वान मंडळीसुध्दा या गैरसमजुतीला बळी पडली आहे. ही शुल्लक बाब आहे म्हणून त्याकडे कानाडोळा करून चालणार नाही. हा गैरसमज कसा पसरला याबद्दल विचार करणे आवश्यक आहे. भक्तीच्या बाबतीत ही घोडचूक कशी समाजात प्रचलित झाली जेव्हा सर्वकाही स्पष्ट केले गेले होते? याच प्रश्नाद्वारे भक्तीबाबतच्या गैरसमजुतीचे खंडन करणे आवश्यक ठरते.

या गैरसमजुतीची कारणे बौध्दिक नसून मानसिक आहेत, ती खालीलप्रमाणे,

१) ही भक्तीची मर्यादित कल्पना प्रचलित धर्मात आणि इस्लाममध्ये लोकप्रिय आहे. भक्ती आणि प्रार्थना सर्व धर्मांत (इस्लामला सोडून) समानार्थी वापरले जातात. यांच्यापैकी अनेकांमध्ये अयोग्य समजले जाते. जसे भक्ती आणि श्रध्देशी संबंधित कृत्य

धार्मिक हद्दीपलीकडचे पार पाडले जाणे आहे. या व्यापक संकल्पनेसाठी वर्चस्वासाठीचे गुण हवे आहेत. हे त्या मनासाठी (लोकांसाठी) आवश्यक आहे जे गैरसमजुतींना बळी पडले आहेत. इस्लामी इतिहासात अनेक अशी उदाहरणे आहेत. बौध्दिक आणि विचारवंताच्या जगात इस्लामचे वर्चस्व होते तोपर्यंत इस्लामेतर तत्त्वे त्यात घुसडली गेली नाहीत. जेव्हा ही परिस्थिती बदलून गेली तेव्हा इस्लामचे दरवाजे अनायासे इस्लामेतर (बनावटी) तत्त्वांसाठी खुले झाले. आता अशी स्थिती आहे की अनेकानेक बनावटी तत्त्वांना इस्लामी रंग दिला जात आहे. याचा अत्यंत वाईट प्रकार हा आहे की इस्लामच्या महत्त्वाच्या संकल्पना (परिभाषा) चा अर्थ यापासून अलिप्त राहू शकलेला नाही. ते शब्द आणि परिभाषा सारख्याच आहेत जशा ते अल्लाहने आणि प्रेषित मुहम्मद (स.) यांनी दिल्या होत्या. परंतु त्यांचे मूळ अर्थ बदलून गेले आहेत. अशा परिस्थितीत 'भक्ती' हा शब्दप्रयोगसुध्दा या बौध्दिक दिवाळखोरीच्या प्रक्रियेतून गेला आणि आपला मूळ अर्थ गमावून एक मर्यादित अर्थ धारण करून बसला. हा मर्यादित अर्थ बाहेरून इस्लामच्या या परिभाषेत (भक्ती) प्रवेश करीत झाला आणि मुस्लिमांनी नंतर त्याला मर्यादित अर्थात स्वीकारला.

२) इस्लामचे नमाज, रोजे आणि इतर उपासनापध्दती इतक्या आकर्षक आहेत की लोकांना इतर बाबींबद्दल विसर पडला आणि आपल्या खऱ्या स्वरूपापासून आणि खऱ्या अर्थापासून दूर भरकटत गेले. जर इस्लामी भक्तीचा व्यापक अर्थ घेतला गेला नाही तर या मर्यादित गोष्टींचाच समावेश भक्तीमध्ये कायमस्वरूपी होईल आणि इतर धार्मिक कृत्यांना आणि आदेशांना पूजा, भक्ती बाहेर कायमस्वरूपी ठेवले जाईल. हे असे व्यावहारिकपणे होतच राहील. हीच कारण आहेत भक्तीच्या गैरसमजुतीबद्दलची. याचे बौध्दिक कारण एकसुध्दा नाही.

प्रकरण नऊवे

इस्लाम आणि इतर धर्म

सर्वधर्म समभाव कल्पना -

आजकाल 'सर्व धर्म समभाव' हा विचार फार लोकप्रिय झाला आहे. या विचारामागे एक तत्त्व कार्यरत आहे की सर्व धर्म खरे आहेत. सर्व धर्म देवाकडेच नेतात आणि सर्व धर्म मनुष्याचे कल्याण करण्यास आणि त्याला मुक्ती देण्यासाठी प्रयत्नशील असतात. या विचाराने पुढे ही धारणा निर्माण केली की प्रार्थनेचे स्वरुप वेगवेगळे असू शकते, तसेच मार्ग वेगवेगळे आहेत. ईश्वरावर श्रध्दा बाळगणाऱ्यांची पध्दत व मार्ग वेगवेगळे असले तरी ते सारखेच महत्त्वाचे आहेत. बाह्याकार भक्तीचा महत्त्वाचा नसून भाव महत्त्वाचा आहे. म्हणून भक्तीचे अनेकानेक मार्ग असू शकतात. भक्तीचा हेतु महत्त्वाचा आहे. भक्त हा कुणाच्या भक्तीत मग्न झाला आहे हे महत्त्वाचे आहे. जर हिंदु, मुस्लिम, ख्रिश्चन, पारसी, बुध्द सर्वजन ईश्वराचीच भक्ती आपापल्या पध्दतीने करतात तरी सर्वांचे अंतिम ध्येय अल्लाह आहे. त्यांच्यात फरक फक्त भक्तीच्या बाह्य स्वरुपाचाच आहे. परंतु सर्वजण अल्लाहचीच भक्ती करतात म्हणून सर्वांचा मार्ग सत्य आहे.

ही धारणा धर्माचे स्वरूप ठरविते तसेच इस्लामचेसुध्दा! इस्लाम धर्माला ते सत्य धर्म मानतात, परंतु ते इस्लाम धर्मालाच फक्त खरा धर्म मानण्यास तयार नाहीत. इतर धर्मसुध्दा इस्लामसारखेच सत्य धर्म आहेत. ही स्थिती इस्लामला मान्य आहे काय? या प्रश्नाचे उत्तर देणे अतिमहत्त्वाचे आहे. हा सामान्य प्रश्न मुळीच नाही, ज्याकडे दुर्लक्ष केले जाईल. कारण या प्रश्नाच्या उत्तराने इस्लामचे स्वरुप स्पष्ट होईल आणि त्याचे दूरगामी परिणाम होतील. इस्लामचे योग्य ज्ञान तेव्हाच प्राप्त होईल जेव्हा आपण इस्लामचा दृष्टिकोन वरील संकल्पनेविषयी स्पष्ट जाणून घेऊ. हे ज्ञान प्राप्त करणे अत्यावश्यक आहे, कारण काही लोकांची धारणा आहे की प्रेषित मुहम्मद (स.) यांचा कुरआनमध्ये आलेला इतिहास हा वरील धारणाच स्पष्ट करतो. कुरआनला ही संकल्पना मान्य आहे असे या लोकांचे म्हणणे आहे. त्यांच्यानुसार, अल्लाहने प्रत्येक युगात आणि देशात प्रेषित पाठविले आणि त्या सर्वांचे धर्म तेच होते जे अल्लाहने पाठविले. ते सर्व धर्म इस्लामच होते. अशा स्थितीत जो कोणी जो मार्ग (धर्म) स्वीकारेल आणि ज्या प्रेषितांचे अनुयायीत्व पत्करेल तर तो अल्लाहचीच भक्ती करतो आणि हेच त्याच्या मुक्तीसाठी पर्याप्त कारण आहे. म्हणून प्रत्येकाने इस्लाम आणि कुरआन बरहुकूम आचरण केलेच पाहिजे असे नाही. अशी या लोकांची धारणा आहे.

प्रेषित मुहम्मद (स.) यांचे विशेष महत्त्व

हे अगदी स्पष्ट आहे की आदरणीय मुहम्मद (स.) यांच्या प्रेषित्वाची सर्वोत्कृष्टता ही त्यांच्या प्रेषित्व विषयाचा एकभाग आहे. या प्रेषित्व योजने अंतर्गत इस्लामचा स्वत:चा निर्णय या प्रेषित्वासंबंधीचा आहे आणि तो प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या प्रेषित्वास लागू आहे. जर त्यांच्या प्रेषित्वाची स्थिती पूर्वीच्या प्रेषितांच्या अगदी सारखी आहे तर कुरआन ही सत्यता पुरावे देऊन स्पष्ट पटवून सांगतो. जर स्थिती वेगळी असेल तर कुरआनपूर्वीच्या धर्मांची आणि इस्लामची स्थिती सारखी समजत नाही. म्हणून त्याचा निर्णय याबाबत वेगळा असेल. म्हणून आपण प्रथमत: याबाबत इस्लामची स्थिती पाहू या. ती स्थिती इतर धर्मांसारखी आहे की वेगळी आहे? कुरआन आणि हदीसच्या अभ्यासांती कळते की इस्लामची स्थिती इतर धर्मासारखी नाही. प्रेषित मुहम्मद (स.) अनेक गोष्टींत वैशिष्ट्यपूर्ण ठरतात.

(१) प्रथम वैशिष्ट्य हे आहे की प्रेषित मुहम्मद (स.) यांचे प्रेषित्व वैश्विक आहे. त्यांना एका देशासाठी अथवा समुदायासाठीच फक्त पाठविले गेले नव्हते. संपूर्ण जगासाठी आणि समस्त मानवतेसाठी त्यांचे प्रेषित्व आहे. ज्या अल्लाहने इतर सर्व प्रेषित पाठविले आणि प्रेषित मुहम्मद (स.) यांनासुध्दा नियुक्त केले आहे त्याची स्पष्टोक्ती आहे,

"(हे पैगम्बर (स.)), आम्ही तुम्हाला अखिल मानवजातीसाठी शुभवार्ता देणारा आणि सावधान करणारा बनवून पाठविले आहे, परंतु बहुतेक लोक जाणत नाहीत." *(३४ : २८)*

"हे मुहम्मद (स.) सांगा की, "हे मानवांनो, मी तुम्हा सर्वांकडे त्या अल्लाहचा प्रेषित आहे जो पृथ्वी व आकाशांच्या राज्यांचा स्वामी आहे." *(७ : १५८)*

मुहम्मद (स.) विषयी हे अतुलनीय आहे. त्यांच्या पूर्वीच्या प्रेषितांना हे वैशिष्ट्य प्राप्त नव्हते. त्यांच्यापैकी कोणीही संपूर्ण जगासाठी आणि समस्त मानवतेसाठी पाठविला गेला नव्हता. त्यांच्यापैकी प्रत्येकजण मर्यादित क्षेत्रापुरता होता. धर्मप्रचार जरी एखाद्याचा मोठ्या प्रमाणात नजिकच्या देशात झाला तरी तोसुध्दा इतर कारणांच्या आधारनेच! ते सर्व धर्म त्यांच्या अनुयायींसाठीच फक्त आहेत. परंतु प्रेषित मुहम्मद (स.) यांना अल्लाहने कुरआनमध्ये वरीलप्रमाणे स्पष्ट आदेश दिला आहे की ते सर्व जगासाठी आणि समस्त मानवतेचे प्रेषित आहेत. स्वत: प्रेषित मुहम्मद (स.) यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे,

''प्रत्येक प्रेषित जो माझ्यापूर्वी होऊन गेला तो फक्त आपापल्या लोकांसाठीच विशेषत: होता. मला मात्र समस्त मानवतेसाठी प्रेषित म्हणून पाठविण्यांत आले आहे.''

(२) दुसरे वैशिष्ट्य हे आहे की हे प्रेषित्व जसे वैश्विक आहे तसेच शाश्वतसुध्दा (बुखारी, मुस्लिम) आहे. प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यावर प्रेषित्वाची श्रृखंला आणि दिव्यप्रकटन या दोहोंचा शेवट झाला. आता दुसरा प्रेषित येणार नाही की दिव्यप्रकटन होणार नाही. अल्लाहने कुरआनमध्ये हे सत्य स्पष्ट केले आहे,

''लोक हो, मुहम्मद (स.) तुमच्या पुरूषांपैकी कोणाचे पिता नाहीत परंतु ते अल्लाहचे प्रेषित आणि अंतिम प्रेषित आहेत आणि अल्लाह प्रत्येक वस्तूचे ज्ञान राखणारा आहे.'' (३३ : ४०)

येथे 'खातिम' हा अरबी शब्द वापरला आहे. याचा अर्थ होतो शिक्कामोर्तब करणे. जेव्हा पाकीट सील (मोहरबंद) केले जाते, तेव्हा त्यात काही कमी जास्त होऊ शकत नाही. म्हणून अल्लाहने जेव्हा प्रेषित मुहम्मद (स.) यांना 'अंतिम प्रेषित' (प्रेषित्वाचा शेवट (सील)) म्हणून घोषित केले म्हणजेच प्रेषित्वाचा हा शेवट आहे. आता प्रेषित मुहम्मद (स.) हे प्रेषित्वाची अंतिम कडी आहे, ज्यांना दिव्यप्रकटन देऊन पाठविले आहे. प्रलयापर्यंत आता दुसरा प्रेषित येणार नाही. ही माहिती स्वत: प्रेषित मुहम्मद (स.) यांनीसुध्दा अनेकदा स्पष्ट शब्दांत दिली आहे.

''प्रेषित्वाची ही भव्य इमारत आता माझ्यामुळे पूर्णत्वास आली आहे. प्रेषित्वाचा श्रृंखलेचा मी अंतिम दुवा आहे (शेवटचे टोक)'' (बुखारी)

''नि:संशय, आता माझ्यानंतर कोणी दुसरा प्रेषित येणार नाही.''

(बुखारी, मुस्लिम)

वरील विवेचनावरून कळते की प्रेषित मुहम्मद (स.) यांची स्थिती इतर प्रेषितांपासून कशी वैशिष्ट्यपूर्ण आहे. हे अगदी स्पष्ट आहे की आणखी काही खुलासा करणे व्यर्थ आहे. प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या पूर्वीच्या प्रेषितानंतर इतर दुसरे प्रेषित येत गेले, परंतु प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यानंतर दुसरा कोणीही प्रेषित येणार नाही. म्हणजेच इतर प्रेषितांचे कार्य स्थान व काल मर्यादित होते. आणि प्रेषित मुहम्मद (स.) यांचे कार्य संपूर्ण जगासाठी आणि समस्त मानवतेसाठी अंतिम दिनापर्यंतचे शाश्वत असे आहे.

(३) मुहम्मद (स.) यांच्या प्रेषित्वाचे तिसरे वैशिष्ट्य आहे की त्यांच्याकरवी झालेला दिव्यसंदेश (इस्लाम) हा सर्व दृष्टीने परिपूर्ण आहे. त्यांच्या पूर्वीच्या प्रेषिताद्वारे

दिलेले दिव्य संदेश आणि धर्माच्या बाबतीत असे नाही. प्रत्येक ईशधर्म अल्लाहकडूनच होता. परंतु त्यांचे दिव्यप्रकटन अल्लाहने स्पष्टपणे केले आहे,

''आज रोजी मी तुमचा धर्म तुमच्याकरिता परिपूर्ण केला आहे आणि आपली कृपा तुम्हावर परिपूर्ण केली आहे. आणि तुमच्यासाठी इस्लाम तुमचा धर्म म्हणून संमत केला आहे.''

(५ : ३)

हे वैशिष्ट्य फक्त इस्लामचेच आहे. याचा अर्थ असा होत नाही की इतर धर्म हे अपूर्ण समजावेत अथवा त्यांच्या अनुयायींना मार्गदर्शन करण्यास ते अयोग्य आहेत. हा चुकीचा समज आहे. तसे पाहता प्रत्येक ईशधर्म समाजाला मार्गदर्शन करण्यासाठी आणि समाजाचे भले करण्यासाठी सक्षम होता. वरील दिव्यप्रकटनाचा हेतु हा आहे की जे दिव्य मार्गदर्शन मानवनिर्मितीच्या प्रारंभापासून म्हणजे आदम (अ.) यांच्या काळापासून सुरू झाले त्यात युगायुगात सुधारणा होत गेल्या आणि शेवटी त्या दिवशी अल्लाहने मानवी धर्म (इस्लाम) मानवांसाठी परिपूर्ण केला.

(४) मुहम्मद (स.) यांच्या प्रेषित्वाचें चौथे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे की त्यांना जो ईशग्रंथ– कुरआन देण्यात आला तो सुरक्षित आहे आणि तो ग्रंथ अंतिम दिनापर्यंत सुरक्षित राहील. त्यात कानामात्र्याचासुध्दा बदल होऊ शकणार नाही. अल्लाहने याबाबत आश्वासित केले आहे,

''उरले हे स्मरण (ग्रंथ) तर हे आम्ही अवतरले आहे आणि आम्ही स्वत: याचे संरक्षक आहोत.''

(१५ : ९)

कुरआन प्रत्येक मानवी ढवळाढवळीपासून सुरक्षित आहे, असे म्हणणे अंधश्रध्दा नाही. हे एक ऐतिहासिक सत्य आहे. फक्त पूर्ण कुरआन मुखोद्गत असणे किंवा त्याला अतिप्रमाणात वाचत राहाणे हे काही कुरआन सुरक्षित राहण्यासाठी एकमेव उपाय मात्र नाहीत. कुरआन एका जिवंत अशा अरबी भाषेत आहे जी भाषा जगभर बोलली, लिहिली आणि समजली जाते.

कुरआनची तुलना इतर धार्मिक ग्रंथांशी केली तर कळून येते की जगात दुसरा असा कुरआनसारखा एखादा ग्रंथ नाही ज्याची ही वैशिष्ट्ये आहेत आणि जो अशा भाषेत अवतरित आहे जी आजसुध्दा जिवंत आहे. इतर ईशग्रंथाची अवस्था तर अशी आहे की त्यांचा कोणताच भाग आज मूळ स्वरूपात उपलब्ध नाही. आज त्यांचे विकृत स्वरुप उपलब्ध आहेत. त्यांच्यात सतत बदल केला गेला. त्यांच्या अनुयायींनी त्या ग्रंथांची मूळ भाषासुध्दा बदलून टाकली कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"आता त्यांची दशा आहे की शब्दांत फेरफार करून गोष्ट कोठल्या कोठे नेतात. जी शिकवण (ग्रंथ) त्यांना दिली गेली होती त्याचा मोठा भाग ते विसरले आहेत." (५ : १३)

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या श्रेष्ठत्वाचे परिणाम

आपण मुहम्मद (स.) यांच्या प्रेषित्वाचे सर्वश्रेष्ठत्व लक्षात घेतले आणि त्यांची इतरांशी तुलना केली तर इस्लामच्या या स्थितीचे स्वाभाविक परिणाम आपणास कळून येतील. इस्लामला इतर धर्मासारखे समजावे काय? दुसऱ्या धर्मांना जसे विशेष हक्क आहेत तसे इस्लामला आहेत काय? बुध्दीविवेकाने आणि कुरआन व हदीसनुसार या प्रश्नांचे उत्तर नकारार्थी आहे. मुहम्मद (स.) यांचे प्रेषित्व अग्रणी असल्याचे स्वाभाविक परिणाम खालीलप्रमाणे आहेत.

इस्लाम फक्त आचरणयोग्य

इस्लाम एकमेव धर्म आहे ज्याला आचरणात आणले जावे. आता इस्लाम हाच एकमेव धर्म आहे ज्याला अल्लाहने मान्यता दिली आहे. अल्लाहने इतर सर्व धर्म रद्दबातल ठरविले आहेत. त्यामुळे सर्व युगांतील, देशांतील लोकांनी इस्लामला आचरणात आणावे. कारण हा धर्म आणि त्याचे प्रेषित समस्त मानवजातीसाठी आहेत. इतर प्रेषितांचे धर्म संपुष्टात आले आहेत. प्रेषित या पृथ्वीवर पाठविण्यात आले याचसाठी की त्यांना ईशप्रेषित मान्य करून त्यांचे आज्ञापालन विनाअट व्हावे. हे सर्वसमक्ष आहे,

"आम्ही जो कोणी प्रेषित पाठविला आहे याकरिताच की अल्लाहच्या आदेशांच्या आधारावर त्याची आज्ञा पाळली जावी." (४ : ६४)

इस्लामचे प्रेषित मुहम्मद (स.) यास अपवाद नाही. वरील तत्त्व सर्व प्रेषितांसाठी आहे. प्रेषित मुहम्मद (स.) हे समस्त मानवजातीसाठी प्रेषित आणि तेसुध्दा अंतिम प्रेषित आहे. याचा अर्थ असा आहे की सर्व मानवांची श्रध्दा त्यांच्यावर आहे आणि त्यांचे सर्व अनुयायी आहेत. कोणी त्यांचे प्रेषित्व स्वीकारित नसेल आणि त्यांचे आज्ञापालन (इस्लामचे) करत नसेल तर ती व्यक्ती प्रेषित मुहम्मद (स.) यांच्याशीच द्रोह करीत नाही तर विश्वनिर्मात्याशी द्रोह करते, ज्याने मुहम्मद (स.) यांना संपूर्ण जगासाठी त्याचा अंतिम प्रेषित आणि मार्गदर्शक म्हणून पाठविले.

कुरआनव्यतिरिक्त आज कोणताही दुसरा ईशग्रंथ सुरक्षित नाही किंवा त्याची मूळ भाषा जिवंत भाषा म्हणून आज अस्तित्वात नाही. मग दुसऱ्या ग्रंथाचा विश्वासपूर्वक स्वीकार कसा कराल? ही स्थिती इतर ईशग्रंथ आणि धर्मांना त्याज्य

करण्यास बळकटी देते कारण आज ते मूळ स्थितीत नाहीत आणि ते कालबाह्य झालेले आहेत. वरील सर्व विवेचन हे न्यायसंगत आणि सुबुध्दीने घेतलेला निर्णय आहे. आता इस्लामचा स्वत:चा निर्णय काय आहे ते पाहू या.

"अल्लाहजवळ धर्म केवळ इस्लामच आहे." (३ : १९)

"इस्लामशिवाय जो कोणी अन्य एखादा धर्म (जीवनपध्दती) अंगिकारत असेल, त्याची ती पध्दत कदापि स्वीकारली जाणार नाही व मरणोत्तर जीवनामध्ये तो अयशस्वी व विफल होईल." (३ : ८५)

वरील दोन्ही आयतींचे शब्द अगदी स्पष्ट आहेत आणि सर्वकाही स्पष्ट करतात. पहिल्या आयतीचा निर्णय "धर्म अल्लाहजवळ केवळ इस्लाम आहे." हे अगदी स्पष्ट आहे तर दुसऱ्या आयतीचा निर्णय आहे की इस्लामव्यतिरिक्त दुसरा धर्म जर कोणी अंगिकारत असेल तर त्याचा तो धर्म स्वीकृत होणार नाही आणि त्यास अल्लाहची भक्ती म्हणता येणार नाही. यापेक्षा अधिक स्पष्ट निर्णय दुसरा कोणता असू शकतो?

असे समजणे की या दोन आयतींमध्ये इस्लाम हा शब्द साधारण अर्थाने वापरला आहे आणि तो तांत्रिक अर्थाने वापरलेला नाही हे अगदी चुकीचे आहे. साधारण अर्थ म्हणजे सर्व ईशधर्म आणि त्यांचे आज्ञापालन करणे. परंतु हे चूक आहे, कारण कुरआनमध्ये वरील आयतीत (कुरआनवचन) 'इस्लाम' नव्हे तर 'अल्इस्लाम' हा शब्दप्रयोग आला आहे. अरबी भाषेच्या नियमानुसार, कुरआन जेव्हा 'अल्इस्लाम' हा शब्द वापरतो तेव्हा तो साधारण अर्थाने नव्हे तर तांत्रिक अर्थाने (पारिभाषिक) वापरला आहे. अल्लाहजवळ खरा आणि स्वीकार्य धर्म हा आहे की व्यक्तीने अल्लाहची पूर्ण आज्ञाधारकता स्वीकारावी आणि त्याला पूर्ण शरण जावे. म्हणून अंतिम प्रेषित मुहम्मद (स.) आल्यानंतर अल्लाहची पूर्ण आज्ञाधारकता पूर्ण शरणागती ही आहे की व्यक्तीने प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यावर श्रध्दा ठेवावी आणि त्यांचे आज्ञापालन करावे. अल्लाहने कुरआनमध्ये स्पष्ट केले आहे की प्रेषित मुहम्मद (स.) यांचे प्रेषित्व वैश्विक आणि शाश्वत असे आहे. जर एखाद्याला प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यावर श्रध्दा नसेल किंवा त्यांना ती व्यक्ती प्रेषित मान्य करीत असेल, परंतु त्यांचे आज्ञापालन करीत नसेल तर ही अल्लाहची पूर्ण आज्ञाधारकता होत नाही आणि असे कृत्य अल्लाहचा उघड उघड विरोध ठरते.

इस्लामची आज्ञाधारकता आवश्यक आहे. याचा पुरावा प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या आचरणात मिळतो. हा महत्त्वाचा पुरावा आहे आज्ञाधारकतेचा जी अनिवार्य आहे अन्यथा अशी व्यक्ती घोर अन्यायी आणि आत्मप्रेमप्रवण असते. ही संकल्पना की सर्व धर्म

खरे आहेत आणि सर्व प्रेषितांची आज्ञाधारकता एकसारखे कृत्य आहे तर हे वक्तव्य कुरआनविरोधी आहे. कुरआनने वरील विचारांना मान्य केले असते तर त्याचा तार्किक अर्थ हा झाला असता की प्रेषित मुहम्मद (स.) यांनी यहुदी आणि ख्रिश्चन लोकांना इस्लामचे आवाहन केले नाही व त्यांना इस्लामचे आमंत्रण दिलेच नाही की त्यांनी इस्लामचा स्वीकार करावा. हे त्यांनी केले नाही कारण यहुदी आणि ख्रिश्चन ईशग्रंथाचे अनुयायी होते. म्हणून त्याऐवजी प्रेषित मुहम्मद (स.) यांनी त्यांना तौराह आणि बायबलचे प्रामाणिकपणे अनुयायीत्व स्वीकारण्यास सांगितले. परंतु हे प्रमाणित सत्य आहे की प्रेषित मुहम्मद (स.) यांनी असे केलेलेच नाही. प्रेषित मुहम्मद (स.) यांनी त्यांना इस्लाम स्वीकारण्याचे आमंत्रण दिले ज्याप्रमाणे त्यांनी इतर मुस्लिमेतर अरब लोकांना आमंत्रण दिले होते. त्यांनी दोघांसाठी इस्लाम स्वीकारण्यासाठी आग्रहाचे आमंत्रण दिले होते.

''हे लोकहो, ज्यांना ग्रंथ दिला गेला होता! मान्य करा त्या ग्रंथाला जो आता आम्ही अवतरला आहे आणि जो त्या ग्रंथाची सत्यता प्रमाणित करतो व समर्थन करतो जो तुमच्याजवळ अगोदरपासूनच उपलब्ध होता. यावर श्रध्दा ठेवा या अगोदर की आम्ही चेहरे विद्रूप करून मागे फिरवावे किंवा त्यांना त्याच प्रकारे धि:कारित करावे.''

(४ : ४७)

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी त्यांना इस्लामचा स्वीकार करण्यासाठीच फक्त आमंत्रित केले असे नाही तर त्यांना सावधान केले की अन्यथा ते नरकाग्नीसाठी पात्र ठरतील. इस्लाम न स्वीकारण्याच्या त्यांच्या निर्णयाला कठोर श्रध्दाहीनता ठरविले. अशांना कठोर (अतिरेकी) श्रध्दाहीन लोक ठरविण्यात आले कुरआन स्पष्टोक्ती आहे,

''जे लोक अल्लाह आणि त्याच्या पैगंबराशी द्रोह करतात आणि इच्छितात की अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांच्या दरम्यान भेदभाव करावा आणि म्हणतात की आम्ही काहींना मान्य करू आणि काहींना मान्य करणार नाही. व अश्रध्दा व श्रध्दा यांच्या दरम्यानातून एक मार्ग काढण्याचा निश्चय करतात. ते सर्व पक्के अश्रध्दावंत आहेत आणि अशा अश्रध्दावंतांसाठी आम्ही अशी शिक्षा तयार करून ठेवली आहे की जी त्यांना अपमानित आणि तिरस्करणीय करून सोडणारी असेल.'' (४ : १५० - १५१)

ग्रंथधारकांना 'पक्के अश्रध्दावंत' असा या आयतीमध्ये उल्लेख करण्यामागे सबळ कारण हे आहे की ते इतर प्रेषितांना मान्य करतात परंतु मुहम्मद (स.) यांना अल्लाहचे प्रेषित म्हणून स्वीकारत नाहीत. इतर सर्व प्रेषितांप्रमाणेच मुहम्मद (स.) हेसुध्दा अल्लाहचे प्रेषित आहेत. ही त्या ग्रंथधारकांची मानसिकता 'श्रध्दा आणि अश्रध्दा यांच्या

दरम्यानातून एक मार्ग काढण्याचा निश्चय' आहे. एकीकडे ते इतर प्रेषितांवर श्रध्दा बाळगून अल्लाहवर श्रध्दा ठेवण्याची गरज पूर्ण करतात आणि दुसरीकडे मुहम्मद (स.) यांना अल्लाहचा प्रेषित अमान्य करून ते अल्लाहच्या ईशत्वाला आणि स्वामीत्वाला विरोध करतात. ही मानसिकता 'अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांशी द्रोह' आहे. कारण ही संकल्पना अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांशी द्रोह करण्यासारखे आहे. हे 'स्व'पुढे लोटांगण घेण्याससारखे आहे. ग्रंथधारक लोकांच्या या वृत्तीबद्दल कुरआन स्पष्टोक्ती आहे,

''जेव्हा त्यांना सांगितले जाते की अल्लाहने जे काही अवतरले आहे त्यावर ईमान धारण करा तेव्हा ते म्हणतात, आम्ही तर केवळ त्यावर ईमान धारण करतो जे आमच्याकडे (इस्राईलच्या संततीकडे) अवतरले आहे. त्याव्यतिरिक्त जे काही आले आहे ते मानण्याचे नाकारतात.'' *(२ : ९१)*

ग्रंथधारक लोक इस्लाम स्वीकार करण्याच्या आमंत्रणाला जे उत्तर देतात ते अधिक लक्ष देऊन पाहिले पाहिजे, हीच ती मानसिकता आहे आणि तत्त्वज्ञान आहे ज्यावर सर्व धर्म समभावचे तत्त्व आधारित आहे. ते युक्तिवाद करतात की आमचा धर्मसुध्दा ईशधर्म आहे, मग हे पूरेसे नाही की आम्ही त्याचे पालन करतो आणि त्यावर आमचा विश्वास आहे? हे असे का आहे की आमच्यावर दुसऱ्याची आज्ञाधारकता आणि अनुयायित्व लादले जात आहे जे आमच्या धर्मासारखेच सत्य धर्म आहे? अशा आमच्यासारख्याच धर्मावर आम्हाला श्रध्दा ठेवण्यास सांगितले का जात आहे? त्यांचे हे तत्त्वज्ञान अल्लाहने खोटे ठरविले, ज्यात त्यांच्या धर्मासारखेच इतर धर्मांना ते मानतात. अल्लाहने त्यांना (अशा ग्रंथधारकांना) 'पक्के अश्रध्दावंत' म्हणून घोषित केले आहे. ग्रंथधारक लोकांनी इस्लामचा स्वीकार करण्यास नकार देणे हे कुरआनच्या दृष्टिकोनातून अश्रध्दावंतांसारखे कृत्य आहे. दोघांचे दुष्परिणाम एकसारखेच आहेत. अल्लाहला त्यांच्या त्या धर्म आणि श्रध्देला चिकटून राहाणे मान्य नाही. प्रेषित मुहम्मद (स.) यांचे कथन आहे,

''मूसा (अ.) जिवंत असते तर त्यांच्यापुढे माझे अनुयायित्व स्वीकारण्याशिवाय दुसरा पर्यायच नव्हता.'' *(मिश्कात)*

वरील प्रेषितांचे कथन अगदी स्पष्ट आहे. जर इतर प्रेषित हे सर्वजण प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या काळात जिवंत असते तर सर्वांनी प्रेषित मुहम्मद (स.) यांचेच अनुयायित्व पत्करले असते. त्यांना त्यांच्या धर्मावर आचरण करण्याचा पर्याय शिल्लक राहिला नसता. अशा स्थितीत सर्वसामान्य माणसाला प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या आज्ञाधारकतेपासून सूट कशी देता येईल? प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यावर अवतरित

इस्लामच्या उपस्थितीत इतर धर्मांवर आचरण करणे कसे शक्य आहे?

इस्लाम मुक्तीसाठी आवश्यक

दुसरा महत्त्वाचा परिणाम या वैशिष्टपूर्ण गुणाचा हा आहे की पारलौकिक जीवनातील मुक्ती इस्लामवर अवलंबून आहे. प्रत्येकावर इस्लामचे आचरण करणे बंधनकारक आहे आणि इतर धर्म हे अल्लाहजवळ मान्य नाही आणि स्वीकार्यसुद्धा नाहीत. याचाच अर्थ असा आहे की इस्लाममध्येच मुक्ती आहे. आता आपण पाहू या की अल्लाह त्या लोकांना जे इतर धर्म पाळतात त्यांना अल्लाह अमान्य करत आहे. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

''इस्लामव्यतिरिक्त अन्य धर्म जो कोणी अंगिकारत असेल तर तो धर्म कदापि स्वीकारला जाणार नाही.'' *(३ : ८५)*

''मरणोत्तर जीवनात तो अयशस्वी आणि विफल होईल.'' *(३ : ८५)*

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी वरील कुरआनोक्तींना स्पष्ट करताना सांगितले आहे,

''अल्लाहची शपथ, ज्याच्या हातात मुहम्मद (स.) यांचा जीव आहे ज्या कोणाजवळ माझ्या प्रेषित्वाचा संदेश पोहचेल, मग तो यहुदी असो की ख्रिश्चन, जर त्यांनी माझा संदेश स्वीकार केला नाही तर तो नरकाग्नीचा भक्ष ठरेल.''

वरील हदीसमध्ये यहुदी आणि ख्रिश्चनांचे नाव उदाहरणाखातर घेण्यात आले आहे. वरील संदेश समस्त मानवजातीसाठी आहे हे अगदी स्पष्ट आहे. कोणताही समाज, कोणत्याही देशाला अथवा धार्मिक गटाला या संदेशापासून सुटका नाही. हा फक्त अनुमान नाही तर स्पष्ट आणि उघड सत्य आहे,

''जो कोणी मानवी समाजाची व्यक्ती.''

अर्थातच याचा अर्थ इस्लामकडे आमंत्रिक लोक असा आहे. हा तो लोकसमुदाय आहे ज्यात आदरणीय मुहम्मद (स.) यांना अल्लाहने प्रेषित म्हणून पाठविले आहे. येथे समस्त मानवजातीचा उल्लेख आला आहे. म्हणून हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे की त्याने प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यावर श्रध्दा ठेवावी. प्रत्येकजण मग तो हयात असेल अथवा पुढील पिढ्यांमध्ये जन्माला येत असेल. म्हणून हा निर्णय इतर सर्वांप्रमाणेच यहुदी आणि ख्रिश्चनांनासुध्दा सारखाच लागू आहे. जगातील समस्त मानवजातींपैकी यहुदी आणि ख्रिश्चनांनाच कुरआनने 'ग्रंथधारक लोक' म्हणून संबोधले आहे. त्यांनाच फक्त प्रेषितांचे अनुयायी आणि ईशधर्माचे अनुयायी म्हणून संबोधले गेले आहे. ज्याप्रमाणे मुक्तीसाठी ग्रंथधारकांनी प्रेषित मुहम्मद (स.) यांचे आज्ञाधारक बनणे आवश्यक आहे. तितकेच

इतर लोकांसाठीसुध्दा आवश्यक आहे. म्हणून आज्ञाधारकता ही इस्लामची अनिवार्यता आहे मुक्ती प्राप्त करण्यासाठी. ज्या माणसाला इस्लामचा संदेश मिळाला नाही त्यालाच या नियमातून वगळण्यात येईल. प्रेषित मुहम्मद (स.) यांनी याविषयी उल्लेख केला आहे,

"*जो कोणी मला ऐकले नसेल.*"

ही व्यवस्था यासाठी आहे की अशा स्थितीत एखादा निरपराध असतो. जोपर्यंत मनुष्य इस्लामचा संदेश प्राप्त करत नाही तोपर्यंत तो आज्ञाधारकतेपासून मुक्त असतो. अशा स्थितीत प्रत्येकाला जबाबदार धरणे हा घोर अन्याय आहे. परंतु ज्याला हा संदेश प्राप्त होऊनसुध्दा त्याने इस्लामवर श्रध्दा ठेवली नाही तर त्यास तो जबाबदार असेल. अशांना शिक्षेविना सोडून देणे न्यायविरोधी कृत्य ठरेल, कारण इस्लामची आज्ञाधारकता स्वीकारण्यास नकार देणे ही काही किरकोळ बाब नाही. सत्य धर्माला स्वीकारण्याला हा त्याचा नकार आहे. हे अल्लाहच्या सार्वभौमत्वाला नाकारणे आहे. अशा द्रोहींना शिक्षा देणे हे अन्यायकारक आणि गैरकृत्य ठरविणे हे सत्याचे विडंबन आहे. अशा बादशाहाची आपण कल्पना करू शकतो की तो आपल्या प्रजेला पूर्ण स्वातंत्र्य देतो की त्याने आज्ञापालन करू नये, त्याच्या सेनापतिचे ऐकू नये आणि ज्यांना बादशाहने काढून टाकले अशांचे आज्ञापालन करावे आणि अशा धर्माचे आज्ञापालन करीत जावे जो राजधर्म नाही? हे अगदी अशक्य आहे.

मग हे कसे शक्य आहे की निर्माणकर्त्या स्वामीने तुम्हाला शिक्षा करू नये जेव्हा तुम्ही प्रेषित मुहम्मद (स.) यांना नाकारता ज्यास अल्लाहने समस्त मानवतेसाठी पाठविले आहे? त्याचा धर्म ज्यास त्या ईश्वराने समस्त मानवतेसाठी मान्य केला, त्याला तुम्ही नाकारल्यानंतर तो ईश्वर तुम्हाला जाब का म्हणून विचारणार नाही? हे किती हास्यास्पद आहे की अल्लाहने 'अ' या व्यक्तीला प्रेषित म्हणून समस्त मानवजातींसाठी नियुक्त करावे की त्या प्रेषिताने सर्वांना मार्गदर्शन करावे. परंतु लोकांनी दुसऱ्या कुणाला या कामासाठी स्वत: नियुक्त करावे. हे किती हास्यास्पद आणि विचित्र आहे. जर कुणाचे हे अज्ञान असेल की त्यास 'अ' हे अल्लाहचे अधिकृत प्रतिनिधी आणि प्रेषित आहे हे माहीत नाही. परंतु ज्यांना हे माहीत आहे की ईश्वराचा अधिकृत प्रतिनिधी आणि प्रेषित कोण आहे तरी ते आपल्या मनोकामनांचेच बळी ठरतात? त्यांचे हे कृत्य क्षम्य कसे ठरवता येईल?

प्रकरण दहावे

मुस्लिमांची जबाबदारी - एक राष्ट्र या संदर्भात

इस्लामचे श्रेष्ठत्व

इस्लामच्या विशेष अशा अग्रगण्य स्थानाबद्दल आता आपण विचार करू या. इस्लामचा हा दावा आहे की तोच एकमेव परिपूर्ण असा धर्म आहे. तो सर्व मानवांसाठी आहे. इस्लाम एकमेव धर्म आहे आणि मानवाच्या मुक्तीसाठी इस्लामचे अनुकरण अनिवार्य आहे. इस्लाम हा सर्वोत्कृष्ट धर्म असल्यामुळे त्याच्या काही विशेष गरजा असणे स्वाभाविक आहे. या विशेष गरजांपैकी एक महत्त्वाची गरज ही आहे की इस्लामचा प्रसार-प्रचार जगाच्या कानाकोपऱ्यात व्हावा. प्रत्येक राष्ट्रात इस्लामची शिकवण सर्वदूर पोहचवावी आणि जगातील प्रत्येक माणसाला इस्लामसंदेश प्राप्त होणे अत्यावश्यक आहे. हे एक नियमित चालणारे कृत्य आहे. जर हे कार्य सदोष असेल तर जग इस्लामसंदेश त्याच्या पूर्ण रूपात जाणून घेऊ शकत नाही. समस्त मानवजातीला जोपर्यंत इस्लामसंदेश पोहचत नाही तोपर्यंत हे जग इस्लामी संघ (आज्ञाधारक लोकांचा संघ) बनू शकत नाही. इस्लाम वर श्रध्दा ठेवणे हे समस्त मानव जातीसाठी अनिवार्य आहे आणि इस्लामवर अश्रध्दा ठेवणे हे मानवतेच्या विनाशाला कारणीभूत ठरते. अशा स्थितीत जगाला इस्लामच्या शिकवणींपासून अनभिज्ञ ठेवणे हे अवैध आहे. इस्लामचे अनुकरण समस्त मानवजातीसाठी अनिवार्य आहे तर इस्लामची ओळख त्यांना करून देणे हेसुध्दा अनिवार्य आहे. हे कार्य पार पाडण्यात असफलता हा इस्लामवर घोर अन्याय आहे. ज्यामुळे इस्लाम जगाला अनभिज्ञ ठरतो आणि मानवतेसाठी अन्यायी कृत्य ठरते. कारण ईशकृपेला ते वंचित राहतात. जोपर्यंत इस्लामचे प्रेषित मुहम्मद (स.) जिवंत होते त्यांनी ही जबाबदारी प्रामाणिकपणे पूर्ण पाडली. आज त्यांच्या अनुपस्थितीत ही जबाबदारी तुम्हा–आम्हांवर आली आहे. जगाच्या अंतिम दिनापर्यंत ही जबाबदारी प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या अनुयायींवर आहे. कारण आता कोणी दुसरा प्रेषित या कामासाठी येणार नाही. इस्लामचे हे सर्वोत्कृष्ट स्थान त्याच्या प्रचार–प्रसारकार्याला अत्यावश्यक कर्तव्य सिध्द करते. हे कर्तव्य पार पाडलेच पाहिजे. हे कार्य कसे पार पाडावे हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. यासाठी इस्लामने घालून दिलेल्या नियमानुसार व्यावहारिक उपाय शोधले पाहिजेत. इस्लाम

एक ईशधर्म आणि शाश्वत धर्म असून तो संपूर्ण मानवजातीसाठी असल्याने या प्रश्नाचे समर्पक उत्तर त्याच्याकडे असणारच.

मुस्लिमांची कर्तव्ये

जेव्हा आपण या प्रश्नाची उकल करण्यासाठी कुरआनचा संदर्भ घेतो तेव्हा आपणास उत्तर त्वरित मिळते. अगदी सविस्तर उत्तर! प्रश्नासारखेच प्रशस्त उत्तर! कुरआननुसार उत्तर खालीलप्रमाणे आहे,

''अशाच प्रकारे तर आम्ही तुम्हाला उत्तम समाज बनविले आहे. जेणेकरून जगातील लोकांवर तुम्ही साक्षी व्हा. आणि प्रेषित तुमच्यावर साक्षी असतील.''

(२ : १४३)

हा दिव्य आदेश या प्रश्नाचे व्यावहारिक उपाय सुचवत आहे. ते खालीलप्रमाणे,

(१) समस्त मानवजातीपर्यंत इस्लामसंदेश वहनकार्य प्रेषित मुहम्मद (स.) यांनी आपल्या हयातीत पार पाडले आणि त्यांच्यानंतर आता हे कार्य करण्यास त्यांचे अनुयायी जबाबदार आहेत. अनुयायी जोपर्यंत या जगात हयात आहेत तोपर्यंत त्यांना हे कार्य पार पाडावेच लागणार आहे.

(२) सर्वसाधारण उपदेश पध्दतीद्वारा हा इस्लामसंदेश देता येत नाही. त्याला साक्षीपूर्वक देणे आवश्यक आहे.

(३) याचाच अर्थ असा आहे की प्रेषित मुहम्मद (स.) यांनी आपल्या हयातीत (जीवनात) इस्लामसंदेश जशा पध्दतीने सर्व दूर पोहचविला त्याच पध्दतीने त्यांच्या अनुयायींना प्रामाणिकपणे हा संदेश दुसऱ्यांपर्यंत पोहचवावा लागणार आहे.

इतिहास काळात लोकांना त्यांचा धर्म प्रामाणिकपणे पाळणे ही एकच जबाबदारी होती. तेव्हा मुस्लिमांची ही धार्मिक जबाबदारी आणखी वाढविण्यात आली. वाढीव जबाबदारी मुस्लिमांची ही आहे की त्यांनी इस्लामला जगापुढे उत्तमरीतीने प्रदर्शित करावे. यासाठी प्रेषित मुहम्मद (स.) यांनी मुस्लिमांसाठी एक आदर्श घालून दिला आहे. जसे प्रेषित मुहम्मद (स.) यांना अल्लाहने सर्वांसाठी आणि सर्वकाळ प्रेषित नियुक्त केले, तसेच एक व्यावहारिक योजना कार्यान्वित केली की इस्लामसंदेश वहनकार्य सतत चालत राहावे. प्रेषित मुहम्मद (स.) यांनी आपले

साथीदार या कामासाठी प्रशिक्षित केले. ते सर्वजण या कामी उत्तम तरबेज झाले होते की त्यांनी वरील दिव्य आदेशाची साक्ष दिली जशी साक्ष स्वतः प्रेषितांनी दिली होती. त्या 'उत्तम समाजात' उत्तम प्रशिक्षित समाजाने आपल्या भावी पिढीला या कार्यासाठी प्रशिक्षित केले जेणेकरून त्यांनी इस्लामसंदेश कार्य पुढे न्यावे. अशा प्रकारे हे कार्य सतत जगाच्या अंतापर्यंत चालूच राहणार आहे. अरबी लोक टोळया टोळ्याने जेव्हा इस्लाम स्वीकारू लागले आणि एक 'उत्तम समुदाय' प्रेषितांच्या साथीदारांचा पूर्ण प्रशिक्षित झाला होता. तेव्हा अल्लाहने प्रेषितकार्य संपुष्टात आणले. प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या मृत्युपश्चात हे कार्य त्या प्रशिक्षित सहकार्यांनी जगभर पसरविले. ते जगातील लोकांवर,साक्षी ठरले.

"अशा प्रकारे आम्ही तुम्हाला उत्तम समाज बनविले आहे जेणेकरून तुम्ही जगातील लोकांवर साक्ष व्हा आणि प्रेषित तुमच्यावर साक्षी असतील." (२ : १४३)

अशा प्रकारे हे जगजाहीर झाले की प्रेषित मुहम्मद (स.) हे अरब लोकांमध्ये कार्यरत राहिले तर जगातील इतर लोकसमुदायांमध्ये ते त्यांच्या प्रशिक्षित सहकाऱ्यांकरवी कार्यरत होते. अशा रीतीने प्रत्येक काळात मुस्लिमातील एक समुदाय या कार्यासाठी प्रशिक्षित केला जात असे. म्हणूनच प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या मृत्युपश्चात हे कार्य (धर्मप्रचार) मुस्लिमांची जबाबदारी बनली की त्यांनी जगात या सत्याचे साक्षी बनावे. हे कार्य त्याच धैर्याने आणि सचोटीने पार पाडले जावे जसे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी पार पाडले होते. मुस्लिम समुदाय हा प्रेषित मुहम्मद (स.) यांचा उत्तरदायी आहे आणि म्हणूनच प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या कार्याचासुध्दा तोच उत्तरदायी आहे. ही मुस्लिमांची जबाबदारी साधारण जबाबदारी नाही. ही अशी एकमेव श्रेष्ठ जबाबदारी आहे की त्यांच्या अस्तित्वाचा तो एकमेव हेतू आहे. खालील कुरआनोक्तीने हे सत्य आणखी स्पष्ट होते.

"आता जगात तो सर्वोत्तम जनसमुदाय तुम्ही आहात ज्याला मानवांच्या मार्गदर्शन व सुधारणेकरिता मैदानात आणले गेले आहे. तुम्ही सदाचारांचा आदेश देता आणि दुराचारांपासून प्रतिबंध करता आणि अल्लाहवर श्रध्दा बाळगता."

(३ : ११०)

वरील उक्ती स्पष्ट निर्देश करते की मुस्लिम इतरांप्रमाणे लोकसमुदाय (राष्ट्र) नाही. हे राष्ट्र (लोकसमुदाय) आहे ज्याला समस्त मानवजातीचा मार्गदर्शक आणि सुधारक बनवून पाठविले आहे. हा त्याचा पहिला आणि शेवटचा उद्देश आहे ज्यावर

त्याचे अस्तित्व अवलंबून आहे. हे सर्वमान्य सत्य आहे की एका ध्येयप्राप्तीसाठी कार्यरत राहणे तोपर्यंतच शक्य आहे जोपर्यंत त्या कार्याचे महत्त्व आहे. परंतु जेव्हा त्या ध्येयप्राप्तीचे लक्ष आपण गमावून बसतो तेव्हा त्या गोष्टीचे (कार्याचे) महत्त्व राहात नाही. म्हणूनच मुस्लिम समुदायाचे महत्त्व हे समस्त मानवजातीसाठी साक्ष बनून राहण्यात आहे. ते हे कार्य (धर्मप्रचार) जोपर्यंत करीत राहतील तोपर्यंत त्यांची ओळख 'उत्तम जनसमुदाय' म्हणून असेल. हे कर्तव्य पारपाडण्यास मुस्लिम समुदाय अपयशी ठरेल तेव्हा त्याची उपाधी हिसकावून घेतली जाईल. अशा स्थितीत तो मुस्लिमसुध्दा राहात नाही कारण मुस्लिम हे फक्त नाव नाही तर ते विशेषण आहे. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

''हे श्रध्दावंतांनो, झुका व नतमस्तक व्हा, आपल्या पालनकर्त्यांची भक्ती करा आणि सत्कृत्ये करा. यामुळेच अपेक्षा केली जाऊ शकते की तुम्हाला यश लाभेल. अल्लाहच्या मार्गात प्रयत्नांची पराकाष्ठा करा जशी ती करायला हवी. त्याने तुम्हाला आपल्या कार्यासाठी निवडले आहे आणि धर्मामध्ये तुमच्यावर कोणतीही अडचण ठेवली नाही. दृढ व्हा आपल्या पिता इब्राहीम (अ.) च्या परंपरे (मिल्लत) वर, अल्लाहने पूर्वीसुध्दा तुमचे नाव मुस्लिम ठेवले होते आणि या (कुरआन) मध्येसुध्दा (तुमचे असेच नाव आहे.) जेणेकरून पैगंबराने तुमच्यावर साक्षी राहावे. आणि तुम्ही लोकांवर साक्षीदार. म्हणून नमाज कायम करा, जकात द्या आणि अल्लाहशी दृढनिष्ठ व्हा. तो आहे तुमचा वाली, फारच चांगला आहे तो वाली आणि फारच चांगला आहे तो सहायक.''

(२२ : ७८)

मुस्लिमांचे अग्रगण्य स्थान आणि विशेष जबाबदारीचे वरील कुरआनोक्तीमध्ये स्पष्टीकरण आले आहे. ज्या शब्दाचा वापर 'इज्तबकूम' हा प्रेषित नियुक्तीसाठी कुरआनमध्ये आला आहे तोच शब्द मुस्लिम समुदायच्या नियुक्तीसाठीसुध्दा वापरला आहे. यावरून तो समुदाय हा उत्तम समुदाय सिध्द होतो. यानंतर खालील शब्दसमूहाचासुध्दा आपण विचार करू या. ''अल्लाहने पूर्वीसुध्दा तुमचे नाव मुस्लिम ठेवले होते.'' यावरून हे सिध्द होते की तो जनसमुदायाला (राष्ट्राला) मुस्लिम (आज्ञाधारक) म्हणून संबोधले आहे. ही उपाधी ऐतिहासिक काळात दिली गेली आहे. मुस्लिमांचे अग्रगण्य स्थान होण्याचा हा एक दुसरा महत्त्वाचा पुरावा आहे. याचाच अर्थ असा होतो की ऐतिहासिक काळात दिलेले नाव मुस्लिम आता प्रेषित मुहम्मद (स.) यांचे आगमन झाल्यानंतर पुन्हा दिले गेले. ही आनंदवार्ता कुरआन देत आहे. हा शब्द (मुस्लिम) आतुरतेने वाट पाहात बसला होता की त्याचे पुन्हा

व्यावहारिक स्वरुप स्पष्ट व्हावे. त्याचे स्वरुप, विशेषता आणि कर्तव्य पुन्हा स्पष्ट केले गेले. ही एक आनंदवार्ता प्रसारित करण्याची साधारण घोषणा नव्हती. त्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे जगापुढे आणखी एक पुरावा सादर केला गेला की मुस्लिम समुदाय एक उत्तम जनसमुदाय आहे.

आता आपण तिसऱ्या वैशिष्ट्यांकडे वळू या. वरील कुरआनोक्तीत 'या कुरआनमध्ये' हे शब्द त्या लोक समुदायाचे महत्त्व दर्शवितात ज्याला उत्तम समुदाय म्हटले आहे. ही एकमेव जबाबदारी त्यांच्यावर पुन्हा टाकण्यात आली आहे. या राष्ट्राची उभारणी अशा प्रकारे केली आहे की त्यामुळे हे महत्तम कार्य पार पाडण्यास सहज जावे. ज्यासाठी "प्रेषित तुमच्यावर साक्षी राहतील." या वाक्यामुळे प्रश्नाचे उत्तर आपोआप मिळते की या लोक समुदायाचे (राष्ट्राचे) हेतु काय आहे ज्यासाठी यांची नियुक्ती झाली आहे आणि तो हेतु कसा प्राप्त केला जाईल? अशा प्रकारे वरील कुरआनोक्ती फक्त मुस्लिम लोकसमुदायाचे वैशिष्ट्ये, महत्त्व आणि स्थितीचाच उल्लेख करीत नाही तर त्याचे समर्थनसुध्दा करीत आहे. त्यांनी जर त्यांचे कर्तव्य पार पाडले तर ते एक आज्ञाधारक (मुस्लिम) राष्ट्र ठरते अन्यथा ते फक्त इतरांसारखेच सामान्य राष्ट्र असते.

म्हणून खऱ्या धर्माचे अस्तित्व हे त्या राष्ट्राचा हेतु आणि ध्येय आहे तर ते अल्लाहसमोर त्याबद्दल जबाबदार आहेत. मुस्लिम हा व्यक्तिश: अल्लाहसमोर त्याच्या कृत्यांबद्दल जबाबदार आहे, तसेच एक मुस्लिम राष्ट्र सामुदायिक जबाबदारीला उत्तरदायी आहे. हे काही शुल्लक उत्तरदायित्व नाही. ही प्रेषितांसारखी जबाबदारी आहे. कुरआनोक्ती आहे,

"*म्हणून खचितच हे होणार आहे की आम्ही त्या लोकांना जाब विचारावे ज्यांच्याकडे आम्ही प्रेषित पाठविले आहेत. आणि प्रेषितांनादेखील विचारू (की त्यांनी संदेश पोहचविण्याचे कर्तव्य कितपत पार पाडले व त्यांना त्याचे काय उत्तर मिळाले.)*"

अशा प्रकारे सामान्य माणसाला जसे विचारले जाईल की त्यांनी प्रेषितांच्या आमंत्रणाला कसे उत्तर दिले आहे? तसेच प्रेषितांना विचारले जाईल की त्यांनी संदेश पोहचविण्याचे कर्तव्य कितपत पार पाडले व त्यांना त्याचे काय उत्तर मिळाले? हा जाब देणे अवघड जाईल जेव्हा त्यांनी इस्लामसंदेश पोहचविण्याचे कर्तव्य व्यवस्थित पार पाडले नसेल आणि त्याला जगातील लोकांपासून लपवून ठेवले असेल. अल्लाहने

या गुन्ह्याबाबत कुरआनमध्ये स्पष्ट समज दिलेली आहे,

"त्या व्यक्तीपेक्षा अधिक अत्याचारी कोण असेल की ज्याने ती साक्ष लपविली जी अल्लाहकडून त्याच्याकडे आली होती, आणि अल्लाह अनभिज्ञ नाही."

(२ : १४०)

इस्लामची साक्ष देणे

इस्लामची साक्ष काय आहे? हा एक समर्पक प्रश्न आहे. ज्याचे उत्तर हे इस्लामला जाणून घेण्यासाठी अत्यावश्यक आहे. इस्लाम हा धर्म सत्य धर्म पूर्वनियोजित आहे. तीच स्थिती 'इस्लामची साक्ष'च्या उत्तराची आणि त्याच्या व्यावहारिक स्वरुपाची आहे. हे नियोजन प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या व्यावहारिक जीवनाची देन आहे. याला आपण सविस्तर पाहू या.

सामान्यत: साक्षीला आपण एखाद्या व्यक्तीचे खरे दस्तऐवज (प्रतिज्ञापत्र) म्हणतो. इस्लामच्या धार्मिक दृष्टिकोनातून हे खरे दस्तऐवज म्हणजे प्रतिज्ञापत्र या जगापुढे सर्व लोकांना दाखविले पाहिजे. सत्याची साक्ष देण्याला दोन अंग आहेत एक शाब्दिक, तोंडी आणि दुसरे व्यावहारिक.

अ) तोंडी साक्ष

तोंडी साक्ष देणे म्हणजे इस्लामबद्दल त्याच्या मूलभूत तत्त्वांपासून ते सर्वकाही माहिती इस्लामच्या आदेशांपर्यंतची मुस्लिमेतर बांधवांना अतिशय योग्य पध्दतीने देणे. माहिती त्यांच्यासमोर अशा पध्दतीने मांडणे की जेणेकरून एक खुला ग्रंथ त्यांच्या पुढे राहावा आणि त्यांना त्यांच्या श्रध्देविषयीचा दोष जाणून घेण्यास व इस्लामचे उघड सत्य आत्मसात करण्यास काही एक अडचण राहू नये. या कार्यासाठी काही अत्यावश्यक बाबींचा उल्लेख खालीलप्रमाणे आहे.

(१) प्रथमतः चर्चा ही त्यांच्या मूलभूत तत्त्वांविषयी व्हावी जेणेकरून त्यांना त्यांच्या श्रध्देविषयी उघड उघड कल्पना येऊन जावी. इस्लामविषयी माहिती देताना अल्लाह एकमेव ईश्वर आहे (एकेश्वरत्व) प्रेषित्व आणि पारलौकिक जीवनावर उघड चर्चा व्हावी. इस्लामचे आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक इ.विषयींचे आदेश त्यांना स्पष्ट करून सांगावेत. इस्लाम मानवी जीवनाच्या समस्या कशा प्रकारे सोडवतो आणि इस्लामच्या आज्ञाधारकतेत या क्षणभंगूर जीवनाचे साफल्य दडून बसले आहे याची स्पष्ट माहिती (उकल) त्यांना करून द्यावी.

(२) **दुसरी** महत्त्वाची बाब म्हणजे इस्लाम आणि इस्लामेतर काय आहे याची बौध्दिक आणि तार्किक चर्चा करून गांभीर्याने त्यांना समजून सांगावेत. यासाठी आजचे प्रचलित धर्म तत्त्वज्ञान, संस्कृती आणि सामाजिक व्यवस्थेविषयी इतंभूत माहिती असणे अत्यावश्यक आहे. कारण त्यामुळे मुस्लिमेतरांविषयी एक तार्किक बैठक तयार होते आणि त्यामुळे इस्लामेतर तत्त्वांना मुळासकट उखडून टाकण्यास मदतच होते. हे अशा पध्दतीने व्हावे की त्यांच्या भावनांना स्पष्टपणे उघड केले जावे आणि त्यांच्या श्रध्देमुळे आणि धार्मिक आचरणांमुळे मानवतेची कशी हानी होते हे समजून दिले पाहिजे. मुस्लिमेतर श्रध्दा आणि तत्त्वे हे सर्व इस्लामची साक्ष देण्यासाठी अत्यावश्यक आहे. आणि त्यांच्याशिवाय साक्ष देणे पूर्ण होऊ शकत नाही. इस्लाम स्वीकारण्याचे आमंत्रण देणे म्हणजे नवीन इमारत बांधण्यासारखे आहे आणि नवीन इमारतीसाठी सर्वप्रथम नवीन पाया घालणे अत्यावश्यक आहे. पायाविना इमारत अशक्य आहे. पायाभरणी झाल्यानंतरच इमारत व भिंती उभ्या राहू शकतात. जनमानसात इस्लामचा पाया मजबूत व्हावा आणि त्यांच्या मनात आणि हृदयात घर करून राहावे यासाठी जमीन तयार करणे (पाया भरणे) अत्यावश्यक आहे. यासाठी जमिनीची मशागत तेव्हाच होईल जेव्हा आपण जमिनीत उगवलेले खोटे तत्त्व आणि श्रध्दांना उपटून त्यांचे मन निर्मळ बनवू शकू. जहाजात सामान तेव्हाच ठेवता येईल जेव्हा ते रिकामे असेल अन्यथा नाही. याच तत्त्वाने, इस्लाम मनुष्याच्या मनात तेव्हाच घर करून राहील जेव्हा ते इतर श्रध्दांपासून मोकळे आणि निर्मळ होईल. कुरआननुसार एकेश्वरत्व, प्रेषित्व आणि परलोकत्व यांनाच फक्त इस्लाम स्वीकारण्याचे आमंत्रण देण्यासाठी उपयोगात आणणे पुरेसे नाही. तर यासाठी अनेकेश्वरत्वाचा, असत्य धर्माचा स्वीकार करण्याचा आणि प्रेषित्वाविषयी आणि पारलौकिक तत्त्वाविषयी श्रध्दाहीनतेचा कडाडून निर्धारपूर्वक विरोध होणे अत्यावश्यक आहे. यासाठी अश्रध्देचे प्रकार आणि ही श्रध्दाहीनता त्यांच्या मनात कशी प्रवेशकरती झाली याचा ऐतिहासिक आढावा घेणे, तसेच त्यांच्या शिळ्या आणि खोट्या मनोकामनांना उघड करणे अत्यावश्यक आहे. यामुळे त्यांच्या तत्त्वांची निरर्थकता त्यांच्यासमोर उघड होते आणि त्यांना जमीनदोस्त करण्यास ते स्वत:हून तयार होतात. काबागृहातील ३६० मूर्तींना याच एकमेव पध्दतीने त्या लोकांनी स्वत: जमीनदोस्त केले होते. त्यानंतर जी परिस्थिती निर्माण झाली तिला कुरआन स्पष्ट करीत आहे,

''धर्माच्या बाबतीत कोणतीही जोरजबरदस्ती नाही. सत्य असत्यापासून

वेगळे केले गेले आहे. आता ज्याने कोणी तागूत (मूर्तींचा) इन्कार करून अल्लाहवर श्रध्दा ठेवली त्याने एक असा मजबूत आधार ग्रहण केला जो कधीही तुटणार नाही, आणि अल्लाह (ज्याचा आधार त्याने घेतला आहे) सर्वकाही ऐकणारा व जाणणारा आहे.''
(२ : २५६)

(३) **तिसरी** बाब आहे इस्लामचा प्रामाणिकपणा आणि चांगुलपणा तसेच इस्लामेतर श्रध्देचा खोटारडेपणा मित्रत्वाने, सौजण्याने आणि गोडीने अत्यंत व्यवस्थितपणे मांडला गेला पाहिजे. मृदुभाषेमध्ये लोकांना पटेल अशा प्रकारे तसेच सौहार्दपूर्ण चर्चेतून शास्त्रोक्त पध्दतीने उद्देश प्राप्ती सहज होते. कारण इस्लामचा प्रामाणिकपणा आणि इस्लामेतर श्रध्देचा खोटारडेपणा समोर आणणे ही काही फक्त शैक्षणिक बाब नाही. एक सत्यधर्म प्रचार आणि प्रसारकार्य आहे. बुध्दीविवेकास आवाहन करून श्रोत्याच्या मनात आणि हृदयावर इस्लामसंदेशाची खोलवर छाप पडणे आवश्यक आहे, अन्यथा सर्व व्यर्थ. यासाठी समोरच्या श्रोत्याच्या मानसिक स्थितीचा विचार करूनच त्याच्याशी संभाषण व्हावे. आमंत्रण देण्याची पध्दत, भाषा आणि तंत्र कुरआननुसार असणे अत्यंत आवश्यक आहे. कुरआनची पध्दत प्रभावशाली असून कुरआनची भांषाशैलीसुध्दा सुसंगत अशी आहे. कुरआनचा संवाददेखील गोड आहे. गैरसमज निर्माण होईल अशी कुरआन संवादाची भाषाशैली मुळीच नाही. कुरआनची स्पष्ट शैली आहे आणि ती स्फूर्तीदायक आणि आकर्षक भाषणशैली आहे. कारण अरबांना ही शैली फार आवडत होती. दुसरीकडे वैश्विक तत्त्वे, नैसर्गिक नियम आणि दररोजच्या घटनांचा उल्लेख अत्यंत प्रभावीपणे आणि अनुकूल चर्चेतून मांडला गेला आहे. लोकांना इस्लामकडे आमंत्रिक करण्यासाठी अल्लाहने प्रेषित मुहम्मद (स.) यांना खालीलप्रमाणे उपदेश केला,

''हे पैगम्बर (स.) आपल्या पालनकर्त्याच्या मार्गाकडे आमंत्रित करा मुत्सद्देगिरीने व उत्तम उपदेशासहीत, आणि लोकांशी विवाद करा अशा पध्दतीने जी उत्तम असेल.''
(१६ : १२५)

वरील तिन्ही गरजा या मूलाधाराचे व्यावहारिक स्वरूप आहे.

(४) **चौथी बाब** इस्लामकडे आमंत्रण कार्य – हे एखाद्या सहानुभूतीमुळे अथवा राष्ट्राभिमानाने अथवा भाषणकौशल्याच्या प्रेरणेने प्रवृत्त झालेले मूळीच नसावे. जे काही सांगितले गेले ते गांभीर्यपूर्वक, श्रध्दापूर्वक आणि अल्लाहच्या प्रेमातून बाहेर पडले पाहिजे. ते मानवतेच्या कल्याणासाठी असले पाहिजे. हृदयातून आपले म्हणणे

इतरांच्या चुकांसाठी शोक करण्यासाठी बाहेर पडले पाहिजे. श्रोत्यांची ही भावना झाली पाहिजे की सांगणारा (प्रचारक) आपणास काही नवीन देत आहे: आपणाकडून काहीही न घेता एक उघड सत्य आपणापुढे मांडत आहे. लोकांना इस्लामच्या कृपाछत्राखाली आणण्यासाठी प्रेषित मुहम्मद (स.) यांची जी चिंता आणि प्रबळ आकांक्षा होती त्याला कुरआनने खालील शब्दांत वर्णन केले आहे,

''बरे तर हे पैगम्बर (स.) ! कदाचित तुम्ही यांच्यामागे दुःखापायी आपले प्राण गमावणार आहात, जर यांनी या शिकवणुकीवर श्रध्दा ठेवली नाही ?''

(१७ : ६)

ब) व्यावहारिक साक्ष

व्यावहारिक साक्ष अथवा पुरावा तो आहे जो इस्लामचा प्रचारक आपल्या प्रत्यक्ष जीवनातून देतो. प्रत्येक मुस्लिम व्यक्तीशः आणि मुस्लिम राष्ट्राने इस्लामचे खरे रूप प्रदर्शित केले पाहिजे. त्यांची अल्लाहच्या एकेश्वरत्वावर गाढ श्रध्दा पाहिजे. तसेच प्रेषितवाद आणि परलोकत्वाची श्रध्दासुध्दा अटळ पाहिजे आणि जीवनकार्यात त्याचे प्रतिबिंब पडले पाहिजे. त्यांचा स्वभाव आणि वर्तणूक ही इस्लामच्या आदेशाबरहुकूम पाहिजे. त्यांचे संपूर्ण जीवनकार्य कुरआन आणि हदीसनुसार नियंत्रित असणे अत्यावश्यक आहे.

त्यांचे सामाजिक, आर्थिक, राजकीय कार्य अर्थात संपूर्ण जीवन अल्लाह आणि प्रेषित (स.) यांनी घालून दिलेल्या नियमांनुसारच नियंत्रित आणि संचलित असणे अत्यावश्यक आहे. ह्या प्रकारची आज्ञाधारकता इस्लामचे खरे रुप दर्शविते. ह्या आज्ञाधारकते मुळे जगाला कळून येते की कशा प्रकारचे नागरिक, कशा प्रकारचा समाज आणि सामाजिक व्यवस्था इस्लामला अभिप्रेत आहे.

व्यावहारिक साक्षीची स्थिती ही नैतिक किंवा तोंडी साक्षी पेक्षा अत्यंत महत्वाची आहे. की ज्यांत प्रचारकाचे व्यावहारिक रूप लोकांसमोर येत नाही. तसेच नव्वद टक्के लोकांना धर्म प्रचाराचे प्रभावी साधन म्हणून व्यावहारिक साक्ष अथवा पुरावाच अपेक्षित आहे. बौध्दिक आव्हान अथवा भावनात्मक आवाहन त्यांच्या आकलनापलिकडचे असते. ह्या संदर्भात येथे प्रेषित मुहम्मद (स.) यांचे जीवन चरित्राचा पुरावा अपेक्षित आहे जो एक आदर्श आहे. त्यांनी लोकांना इस्लाम स्वीकारण्याचे आवाहन केले तेव्हा ते स्वतः इस्लामचे पाईक म्हणूनच. त्यांनी जेव्हा दुसऱ्यांना इस्लामच्या आदेशांचे पालन करण्यास सांगितले तत्पूर्वी ते स्वतः त्या

आदेशा बरहुकूम आचरण करीत राहिले.

इस्लामचे हे खरे स्वरुप आहे. इस्लामचा खरा अर्थ हा आहे जो प्रमाण आहे. ज्यामुळे व्यक्तीच्या इस्लामसाठीच्या प्रयत्नांचे मोजमाप करता येते. ह्या प्रमाणाच्या जितक्या जवळ व्यक्ती (मुस्लिम) असेल तितके ते ह्या कामी (इस्लाम प्रचार) यशस्वी ठरतात. ह्या ध्येयापासून दूर तेच राहतात जे ह्या 'प्रमाणापासून (स्टँडर्ड) पासून अथवा आदर्शापासून दूर राहतात.

प्रकरण अकरावे

जिहाद

(अडथळे आणि त्याचे परिणाम)

हे जग चांगले आणि वाईटाचे घर आहे. दोन्ही चांगल्या आणि वाईट शक्तींना या जगात स्वातंत्र्य आहे. परिणामत: दोघेही निरंतर लढाई लढत आहेत. एकमेकांवर वर्चस्व स्थापन करण्याचे प्रयत्न सतत दोघांकडूनही होत असतात. याचमुळे स्वाभाविकपणे इस्लामपुढे या जगात अडथळे निर्माण केले गेले आहेत. इस्लामच्या अनुयायींचे अस्तित्व स्वीकारले जात नाही आणि सहनसुध्दा केले जात नाही. प्रत्येक धर्माच्या इतिहासात आपणास हे पाहावयास मिळेल. मुस्लिमांनी हे अडथळे दूर कसे करावेत? इस्लाम या स्थितीला तोंड देण्यास समर्थ आहे. या अडथळ्यांना दूर करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करणे म्हणजेच 'जिहाद' आहे. यास अल्लाहच्या मार्गात प्रयत्नांची पराकाष्ठा करणे (जिहाद करणे) असे म्हणतात.

जिहादचा शब्दश: अर्थ होतो एखादे ध्येय गाठण्यासाठी जीवापाड प्रयत्न करणे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊनच प्रयत्नांचे स्वरुप ठरते. यास संधीसाधूपणा म्हणणे चुकीचे आहे. हे कार्य अगदी नैसर्गिक आणि स्वाभाविक आहे. प्रत्येक प्रयत्न करण्यामागे काही विशिष्ट हेतु असतो. हे साध्य प्राप्त करण्याचे साधन असते साध्य नव्हे. प्रचलित स्थितीच्या स्वरुपास आणि गांभीर्यास अगोदरच समजून घेतले तर अपेक्षित साध्य प्राप्त करणे सोईस्कर जाते. हे तत्त्व आत्मसात न केल्यास कठीण परिश्रमही वाया जातात. हे मूर्खपणाचे प्रयत्न सिध्द होते आणि ते अस्वाभाविक ठरते. अल्लाहच्या मार्गात प्रयत्नांची पराकाष्ठा करणे (जिहाद) हे त्या त्या स्थितीनुरुप ठरते. इस्लामने तीन प्रकार जिहादचे सांगितले आहेत ज्यांना परिस्थितीनुसार उपयोगात आणले जाऊ शकते.

१) आंतरिक जिहाद २) ज्ञानासाठी व धर्म प्रचारासाठी जिहाद ३) लढाईद्वारा (युध्द) जिहाद.

आंतरिक जिहाद

मुस्लिम समाजाच्या दुष्ट प्रवृत्तींचा नायनाट करण्यासाठी छेडलेले युध्द हा आंतरिक जिहाद आहे, कारण या दुष्ट प्रवृत्तींमुळे इस्लामच्या अस्तित्वालाच मोठा

धोका निर्माण होतो. हा फार गंभीर धोका आहे आणि प्रेषित मुहम्मद (स.) यांनी याविरुध्द खालील शब्दांत चेतावणी दिली आह,

''माझ्यापूर्वी जे काही प्रेषित अल्लाहने या भूतलावर पाठविले होते त्यांचे अनुयायी प्रामाणिक होते. त्यांनी त्यांच्या प्रेषितांच्या शिकवणींना श्रध्दापूर्वक स्वीकारले. परंतु त्या अनुयायींनंतरचे अश्रध्दावंत आणि अप्रामाणिक अनुयायीं होते. त्यांचे कृत्य त्या प्रेषितांच्या शिकवणींविरुध्द होते. जो अशा अप्रामाणिक लोकांविरुध्द भांडत राहिला तोच खरा अनुयायीं होता. ज्यांनी तोंडी विरोध केला तेसुध्दा खरे श्रध्दाळू होते. इतरजन आपल्या मनात अशा गोष्टींना वाईट समजून गप्प बसत असत. परंतु ही श्रध्दाशीलता अगदी शेवटच्या थरातील आहे आणि यानंतर श्रध्देच्या एक अणुचेही अस्तित्व शिल्लक राहत नाही.'' (मुस्लिम)

अर्थातच वरील हदीस हे फक्त बातमी अथवा कथन नाही. हा एक आदेश आहे. एक दिव्य आदेश! याद्वारे मुस्लिमांना सावधान करण्यात आले आहे की अशा परिस्थितीला त्यांनासुध्दा सामोरे जावे लागणार आहे. अशा स्थितीत कोणती कृती करावी हे सूचित करण्यात आले आहे. या हदीसीद्वारे दोन गोष्टी स्पष्ट होतात.

(१) कोणत्याही प्रकारचे दुष्कर्म अथवा दुष्प्रवृत्ती मुस्लिम समाजात बोकाळली तरी तिचा नायनाट करण्यासाठी 'जिहाद' (अथक प्रयत्न) आवश्यक आहे.

(२) दुष्प्रवृत्तीचा नायनाट करण्यासाठीचे उपाय आणि त्यासाठीचा (श्रध्दाशीलतेचे) अग्रक्रम.

दुष्प्रवृत्तींचा नाश करण्यासाठी उत्तम उपाय त्याविरुध्द आमनेसामने आरपारची लढाई करणे हा आहे. आरपारची लढाई करण्याची हिंमत नसेल तर तोंडी सामना प्रचलित दुष्प्रवृत्तींविरुध्द करणे आवश्यक आहे. त्या दुष्प्रवृत्तींचा तोंडी धिक्कार केला पाहिजे. लोकांमध्ये त्याविरुध्द जागृती निर्माण केली पाहिजे. अल्लाहच्या कोपचे भय लोकांना दाखविले पाहिजे. यानंतरसुध्दा लोकांनी ऐकले नाही तर त्यांना कडक शब्दांत तंबी दिली पाहिजे.

जर तोंडी स्पष्टपणे जाहीररित्या दुष्प्रवृत्तींचा धिक्कार करणेसुध्दा अशक्य असेल तर लोकांनी प्रचलित दुष्प्रवृत्तींचा मनातल्यामनात धिक्कार केला पाहिजे. तो या दुष्प्रवृत्तींविरुध्द इतका संवेदनशील बनतो की त्यांचा विचारसुध्दा त्याला अस्वस्थ करुन सोडतो. दुष्प्रवृत्ती त्याच्यासाठी मनाला क्लेष देणारी ठरते. त्याची प्रखर इच्छा

असते की दुष्प्रवृत्तींचा नायनाट लवकर व्हावा. त्याची मनोमन प्रार्थना असते की जे कोणी दुष्प्रवृत्तींने ग्रस्त आहेत त्यांना सन्मार्ग प्राप्त व्हावा. त्याला दुष्प्रवृत्तींच्या परिणामांची जाणीव असते आणि त्या दुष्प्रवृत्तींपासून स्वत:ला वाचविण्याचा प्रयत्न करतो. श्रध्दाशीलतेचा हा सर्वांत शेवटचा टप्पा आहे. अशा प्रकारे या तीन पध्दतींद्वारा मुस्लिम समाज सर्व प्रकारच्या दुष्प्रवृत्तींपासून शुध्द होऊ शकतो. याव्यतिरिक्त दुसरा कोणताही मार्ग नाही. या तिन्ही पध्दती म्हणजे जिहाद होय. या तीन प्रकारांतील प्रत्येक प्रकार हा सत्य प्रस्थापनेसाठीचा लढा आहे आणि इस्लामची साक्ष देणारा आहे. सत्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा म्हणजे दुसरे तिसरे काही नसून 'जिहाद' आहे हाच अल्लाहच्या मार्गातील जिहाद (जिहाद फीसबिलिल्लाह) आहे.

समाजातील दुष्प्रवृत्तींचा नायनाट करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे यास अल्लाहच्या मार्गात जिहाद करणे (जिहाद फीसबीलिल्लाह) असे वरील हदीसमध्ये म्हटले आहे. काही ठिकाणी या प्रयत्नास दुष्प्रवृत्तींचे परिवर्तन करणे असे म्हटले आहे.

''ज्यानी दुष्प्रवृत्ती पाहिली तर त्याने तिला आपल्या हाताने बदलले पाहिजे जर ती व्यक्ती असे करू शकत नाही तर तोंडी रोखले पाहिजे. जर ती व्यक्ती तोंडी प्रतिकारसुध्दा करू शकत नसेल तर मनातल्या मनात दुष्प्रवृत्तीस वाईट समजले गेले पाहिजे आणि ही अगदी खालच्या दर्ज्याची श्रध्दा आहे.'' (मिश्कात)

दुसऱ्या ठिकाणी या कृत्यास 'निषिध्द मानणे' असे म्हटले आहे कुरआनोक्ती आहे,

''सत्कृत्यांचा आदेश द्या आणि दुष्कृत्यांचा नायनाट करा.'' (३१ : १७)

''सत्कृत्यांसाठी एकमेकांचे अनुकरण करा आणि दुष्कृत्यांविरुध्द एकमेकांची मने वळवा.'' (तिरमीजी)

वरील संदर्भावरून आपण या निर्णयाप्रत येतो की ''प्रयत्नाची पराकाष्ठा समाजातील दुष्प्रवृत्तींविरुध्द करणे'' तसेच ''समाजातील दुष्कृत्यें आणि दुष्प्रवृत्तींमध्ये परिवर्तन घडवून आणणे'' आणि ''समाजातील लोकांची मने दुष्प्रवृत्तीविरुध्द तयार करणे'' इ. सर्व एकाच प्रयत्नाची (जिहाद फीसबिलील्लाह) रूपे आहेत. आपण ज्याची निवड कराल तर ते ध्येयप्राप्तीकडे आपणास काही बदल न होता प्रवृत्त करते.

वरील हदीसींद्वारे (प्रेषितवचन) हेच सिध्द होते की जिहाद 'ही सामुदायिक

जबाबदारी आहे. मुस्लिम समाजाचे 'जिहाद' हे सामूहिक कर्तव्य आहे. व्यक्ती, समाज व राष्ट्र यापासून वेगळे जाऊ शकत नाही. प्रत्येकाचा या 'जिहाद'मध्ये वाटा असतोच. जिहाद ह्या महत्त्वाच्या जबाबदारीत मात्र प्रत्येकाच्या कुवतीप्रमाणे त्याचा वाटा त्याने उचलावा हे त्याचे कर्तव्य ठरते. कुरआनने या मुद्यास स्पष्ट करताना खुलासा केला आहे,

"श्रध्दावंत पुरुष व श्रध्दावंत स्त्रिया हे सर्व एक दुसऱ्याचे मित्र आहेत, भलेपणाचा आदेश देतात व वाईट गोष्टींपासून रोखतात, नमाज कायम करतात, जकात देतात आणि अल्लाह व त्याच्या पैगम्बराचे आदेश पाळतात, हे ते लोक आहेत ज्यांच्यावर अल्लाहचा कृपावर्षाव होणारच." (९ : ७१)

याचाच अर्थ असा होतो की भलेपणाचा आदेश देणे व वाईट गोष्टींपासून रोखणे ही मुस्लिमाची शाश्वत ओळख आहे. इस्लामचे हे प्रमुख वैशिष्ट्य आहे. जिथे जिथे मुस्लिम आहे तिथे तो हे कर्तव्य पार पाडतच असतो. जो मुस्लिम आहे त्याला हे कार्य करणे अत्यंत आवश्यक आहे. इस्लामी शासनासंबंधी कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"अल्लाह मोठा शक्तिशाली आणि जबरदस्त आहे. हे ते लोक आहेत ज्यांना आम्ही जर पृथ्वीवर सत्ता बहाल केली तर ते नमाज कायम करतील, जकात देतील, सत्कर्मांचा आदेश देतील. आणि वाईटाला प्रतिबंध करतील, आणि सर्व बाबींचा अंतिम परिणाम अल्लाहच्या अखत्यारित आहे." (२२ : ४१)

वरील कुरआन आयतीनुसार हेच स्पष्ट होते की मुस्लिम व्यक्तिशः आणि सामान्यतः वाईट कृत्यांना (दुराचार) बहर आलेला पाहूच शकत नाही. मुस्लिम सत्तेत आला तर प्रथम वाईटाला प्रतिबंध करतो. दुराचाराचा समूळ नायनाट हे त्याच्या शासनाचें ध्येय ठरते.

जिहाद – बौद्धिक आणि आवाहनात्मक

या जिहादच्या प्रकारामध्ये इस्लामवर घेतलेले आक्षेप, शंकाकुशंका आणि इस्लामाविरुध्द प्रचलित चर्चेला आणि दुष्प्रचाराला चोख उत्तर देऊन इस्लामबद्दलचे आक्षेप, शंकाकुशंका आणि दुष्प्रचार समूळ नाहीसे करणे आहे. प्रेषित मुहम्मद (स.) यांचा मक्का शहरातील कार्यकाल हा याच प्रकारच्या जिहादचा कार्यकाल होता. अल्लाह कुरआनमध्ये आदेश देत आहे,

"तर हे पैगम्बर (स.) अश्रध्दावंतांचे म्हणणे मुळीच ऐकू नका आणि या कुरआननिशी त्यांच्याबरोबर जबरदस्त प्रयत्नांची पराकाष्ठा करा." (२५ : ५२)

त्यांच्याबरोबर (अश्रध्दावंतांच्या) कुरआननिशी प्रयत्नांची पराकाष्ठा करा म्हणजे तुम्ही अश्रध्दावंतासमोर कुरआनच्या त्या तपशीलास ठेवा ज्यामध्ये इस्लामची सत्यता उघड केली आहे. याद्वारे त्यांच्या श्रध्दाहीनतेच्या निष्फळ चर्चेला रोखू शकता. कुरआनचे दाखले देऊन तुम्ही त्यांचे वादग्रस्त मुद्दे खोडून काढू शकता. तुम्ही हे नियमित करत राहा. शेवटी ते त्यांचे खोटे पुरावे घेऊन पळ काढतील. यासाठी कृतीत सातत्य आणि स्वभावात संयम आवश्यक आहे.

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी अशा प्रकारच्या जिहादला जिभेचा जिहाद (तोंडी जिहाद) म्हटले आहे. त्यांचे कथन आहे,

"श्रध्दाहीन लोकांविरुध्द तुमच्या धनाने, तुमच्या तनाने आणि तुमच्या संभाषणाद्वारे जिहाद करा." (अबू दाऊद)

या प्रकारच्या जिहादमध्ये व्यक्ती आपल्या बुध्दीचातुर्याने सुसज्ज होऊन शत्रूचा मुकाबला करतो. हे युध्द शत्रुच्या बुध्दीचातुर्याचा आणि तात्त्विकतेचा किल्ला जमीनदोस्त होईपर्यंत चालूच राहते. ज्ञानाची प्रत्येक शाखा या कामासाठी उपयोगात आणली जाते. भौतिकशास्त्र, इतिहास, संस्कृति, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, विज्ञान, दर्शनशास्त्र; थोडक्यात सर्व प्रकारच्या ज्ञानशाखांचा उपयोग केला जातो. कुरआन ज्या पध्दतीने आक्षेपांना आणि वादग्रस्त मुद्यांना सडेतोड उत्तर देतो ते सर्व अद्वितीय आहे. यासंदर्भातील खालील दिव्य प्रकटन पाहू या.

"आणि (यात हा गर्भित उद्देशही आहे) की जेव्हा कधी ते तुमच्यासमोर एखादी निराळी गोष्ट (अथवा चमत्कारिक प्रश्न) घेऊन आले त्याचे योग्य उत्तर वेळीच आम्ही तुम्हाला देऊन टाकले आणि उत्तम प्रकारे गोष्टीची उकल केली." (२५ : ३३)

या प्रकारच्या जिहादसाठी कुरआनने खालीलप्रमाणे मूलतत्त्व सांगितले आहे,

"हे पैगम्बर (स.) आपल्या पालनकर्त्याच्या मार्गाकडे आमंत्रित करा मुत्सद्देगिरीने व उत्तम उपदेशासहित, आणि लोकांशी विवाद करा अशा पध्दतीने जी उत्तम असेल." (१६ : १२५)

या पध्दतीच्या यशात त्याचे गुण दडून बसले आहेत. उत्तम पध्दत आणि चर्चेची कुरआनची पध्दतीद्वारे इस्लाम संदेश लोकांना दिल्यास ते तुमच्या जवळ येऊ

लागतात. लोक त्यांच्या वादग्रस्त मुद्यांची सत्यता पडताळून पाहू लागतात आणि इस्लामसाठी (सत्यासाठी) त्यांची मने उघडी करू लागतात. हे तेव्हाच घडू शकते जेव्हा तुमचा एक न् एक शब्द बुध्दीविवेकपूर्ण असेल आणि श्रोत्यांचा समजण्यासाठी सहज सुलभ असेल. भाषाशैली आणि वक्त्याचे खरे भावनिक गांभीर्यसुध्दा आवश्यक आहे.

या बौध्दिक अथवा तोंडी जिहादची दुसरी आवश्यकता आहे. संयम आणि दृढता. वरकरनी हे जरी गुण सहाय्यभूत दिसत असले तरी त्यांची जिहादच्या सफलतेसाठी निकडीची गरज आहे. हे सर्वश्रुत आहे की इस्लामच्या आमंत्रणास चांगला प्रतिसाद कधीच मिळत नाही. अश्रध्दावंतामध्ये इस्लामचा प्रसार करताना त्यांच्यापासून प्रामाणिकपणाची आणि गांभीर्यपूर्वक ऐकून घेण्याची अपेक्षा करणे चुकीचे आहे कारण अश्रध्दावंत हे खुल्या मनाचे कधीच नसतात. इस्लामचा प्रसार करताना आपणास नेहमीच अनुभव येतो की अश्रध्दावंत हे पूर्वग्रहदूषित आणि भावनाशील असतात, तसेच भ्रामक आणि चुकीच्या प्रतिष्ठेच्या कल्पनांनी ते ग्रासलेले असतात. गंभीर चर्चेला ते लबाड बुध्दीने आणि कठोर शब्दांत धक्कादायक अविर्भावात उत्तर देतील. अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या सहकाऱ्यांपेक्षा मृदुवाणी, अधिक श्रध्दापूर्वक, गांभीर्यपूर्वक आणि विवेकपूर्वक आवाहन दुसरे कोण करू शकेल? तरी त्यांना अशा वेळी असहाय परिस्थितीला तोंड द्यावेच लागत होते. अल्लाहने त्यांना खालील शब्दांत सचेत केले आहे,

"मुस्लिमांनो, तुम्हाला प्राण व वित्त या दोहींच्या परीक्षा द्याव्याच लागतील, आणि तुम्ही ग्रंथधारक व अनेकेश्वरवादींकडून पुष्कळशा त्रासदायक गोष्टी ऐकता. जर या सर्व स्थितीत तुम्ही संयम आणि ईशपरायणतेच्या वर्तनावर दृढ राहाल तर हे मोठे धाडसाचे कार्य होय." (३:१८६)

हे अगदी साहजिक आहे की ही मौखिक इस्लामची साक्ष (मौखिक जिहाद) व्यक्तीपुढे संकटांचे वावटळ उभे करते. या स्थितीला त्याला नियमित तोंड द्यावेच लागते. असे नेहमीच घडते की शुभेच्छा कठोर टीकेला शीघ्र घेऊन येतात तर शुभ संदेशाच्या मागे शिव्या खाव्या लागतात. चर्चा करताना दगड खावे लागतात. किस्सा येथेच थांबत नाही तर इस्लाम प्रचारकाला चीरनिद्रा (खून) दिली जाते. परंतु इस्लामची साक्ष अशा घटनांकडे दुर्लक्ष करून समस्त मानवजातीला तिच्या निर्माणकर्त्याच्या उपासनेकडे आमंत्रित करण्यास प्रवृत्त करते. हे कार्य अशा संकटांसह आणि नकारांसह चालूच राहिले पाहिजे. परिस्थिती कितीही बिकट असो

मुस्लिमाने त्या परिस्थितीशी समझोता करण्याचा विचारसुध्दा मनात आणू नये. अल्लाहने असा परिस्थितीत प्रेषित मुहम्मद (स.) यांना बजावून सांगितले,

"तर हे पैगम्बर (स.) तुम्हाला ज्या गोष्टीची आज्ञा दिली जात आहे ती पुकारून सांगा, हाक देऊन सांगा (जाहीररित्या) आणि अनेकेश्वरवादींची अजिबात पर्वा करू नका." (१५:९४)

इस्लामचे आमंत्रण देणे हे तेव्हाच जिहाद सिध्द होईल जेव्हा विरोधांच्या आणि संकटांच्या वावटळामध्ये इस्लामची साक्ष देणे अविरत चालत राहील.

सशस्त्र जिहाद (शरीराने केलेला जिहाद)

शारीरिक सामर्थ्यासिह जिहाद त्यांच्याविरुध्द असतो जे इस्लामच्या मार्गात अडथळे निर्माण करतात. जोपर्यंत अडथळा दूर होत नाही तोपर्यंत जिहाद सुरूच राहतो. जिहादची ही शेवटची पायरी आहे. यास किताल (युध्द) सुध्दा म्हणतात. व्यावहारिकत: हा प्रकार कठीण परंतु धर्मासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. याचे निकडीचे महत्त्व कुरआनने प्रखर केले आहे,

"तुमच्यावर युध्द नियत केले आणि तुम्हाला ते योग्य वाटत नाही. परंतु शक्य आहे की जी गोष्ट तुम्हाला नापसंत असेल तीच तुमच्यासाठी अधिक चांगली असेल आणि हेही शक्य आहे की जी गोष्ट तुम्हाला पसंत असेल ती तुमच्यासाठी वाईट असेल. अल्लाह जाणतो तुम्ही जाणत नाही." (२ : २१६)

युध्द मुस्लिमांसाठी आणि इस्लामसाठी कसे चांगले आहे याचा खुलासा खालील कुरआनोक्तीमध्ये युध्दाचा हेतु सांगताना केला आहे,

"आणि त्यांच्याशी तोपर्यंत युध्द करा जोपर्यंत उपद्रव शिल्लक राहील आणि अल्लाहसाठीच धर्म होईल. नंतर जर ते परावृत्त झाले तर लक्षात ठेवा की अत्याच्याऱ्यांशिवाय कुणाशीही शत्रुत्व ठेवू नका." (२ : १९३)

युध्द करण्याची परवानगी यासाठी देण्यात आली की उपद्रव भूतलावर शिल्लक राहू नये आणि अल्लाहच्या मर्जीनुसार आणि आदेशानुसार जीवन व्यतीत करण्यासाठी मार्ग सुकर व्हावा. कुरआनमध्ये उपद्रवासाठी 'फितना' हा शब्द वापरात आला आहे ज्याचा अर्थ होतो की लोकांना इस्लामपासून रोखणे आणि आपल्या निर्माणकर्त्याच्या उपासनेपासून परावृत्त करणे हा असा गुन्हा आहे ज्याचा समकक्ष गुन्हा दुसरा कोणताही नाही. एखाद्या निरपराध व्यक्तीचा खून करण्यापेक्षा हा भयंकर गुन्हा

'उपद्रव' (फितना) आहे. कारण व्यक्तीचा खून केला तर त्याला या क्षणिक ऐहिक जीवनापासून वंचित ठेवले जाते, परंतु व्यक्तीला जर अल्लाहच्या उपासनेपासून परावृत्त केले तर त्या व्यक्तीला अल्लाहचा खरा दास बनण्यापासून रोखले जाते आणि त्याच्या खऱ्या जगाचा सर्वनाश करून परलोकातील देणग्यांपासून वंचित केले जाते. अर्थातच दोन्ही कृत्ये निंदनिय आहे. परंतु दोघांतून एकाची निवड करावयास सांगितले तर एखादा वेडा मनुष्य पहिल्यास दुसऱ्यावर प्राधान्य देईल. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"उपद्रव माजविणे (फितना) हत्या करण्यापेक्षा वाईट आहे." (२ : १०१)

याबाबत दोन पर्याय असूच शकत नाही. अल्लाहच्या आज्ञाधारकतेला सर्व गोष्टींवर प्राधान्य दिले तर इस्लामच्या मार्गातील अडथळे दूर करण्याच्या प्रयत्नांना आव्हान देऊच शकत नाही. स्वत:चे अथवा दुसऱ्याचे जीव या कामी लागले तरी बेहत्तर! कुरआन जिहादच्या महत्त्वाबद्दलचे वर्णन खालीलप्रमाणे करीत आहे,

"जर अल्लाह लोकांना एक दुसऱ्याकरवी हटवीत नसता तर मठ आणि चर्च व सिनेगॉग आणि मशिदी ज्यात अल्लाहचे नाव मोठ्या प्रमाणात घेतले जाते, सर्व उद्ध्वस्त केली गेली असती. अल्लाह जरूर त्या लोकांना सहाय्य करील जे त्याला सहाय्य करतील. अल्लाह मोठा शक्तिशाली आणि जबरदस्त आहे." (२२:४०)

वरील कुरआनोक्तीने आणखी स्पष्ट होते की जर धर्मासाठी शस्त्रांचा वापर केला गेला नाही तर उपद्रव मुळासकट नाहीसे केले जाऊ शकत नाहीत आणि धर्म लयास जातो. दुराचारी धार्मिक आचरणास विरोध करतात आणि धार्मिक स्थळांना उद्ध्वस्त करू लागतात.याच एकमेव कारणामुळे बळाचा वापर धर्माला अखंड करण्यासाठी अनिवार्य आहे.

जिहादचे प्रकार

बळाचा वापर करून धर्माच्या मार्गातील अडथळे दूर करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यास सशस्त्र जिहाद म्हणतात. सशस्त्र जिहादचे स्वरुप वेगवेगळे आहेत म्हणून त्यांचा सामना करण्यासाठीचे उपाय एकसारखे असू शकत नाहीत. त्यांचे दोन प्रकार आहेत–

(१) पहिल्या प्रकारात ते अडथळे आणि संकट येतात जी नवमुस्लिमांना भेडसावतात. नवमुस्लिमांना त्रास दिला जातो आणि अनेक प्रकारे मानहानी केली

जाते. त्यांना त्यांचा नवीन धर्म सोडून पुन्हा जुन्या धर्माकडे बळजबरीने आणले जाते.

(२) मुस्लिमांना इस्लाम धर्माची शिकवण मुस्लिमेतरांना न देण्यास भाग पाडले जाते किंवा त्यांना इस्लामच्या ज्ञानापासून दूर अतिदूर ठेवण्याचे षडयंत्र रचले जाते.

वरील दोन प्रकारच्या अडथळ्यांना तोंड देण्यासाठीसुध्दा दोन प्रकारच्या जिहादचा वापर केला जातो. पहिला प्रकार हा कठीण आणि फक्त निराशादायीच नसून तो अत्यंत आव्हानात्मकसुध्दा आहे. या आक्रमणाला बचावात्मकरित्या सामोरे जावे लागते. हे बचावात्मक युध्दच म्हणावे लागेल. अल्लाहने या प्रकारचे युध्द करण्यास खालील दिव्य आदेशाने अनुमती दिली आहे,

"परवानगी दिली गेली युध्द करण्याची त्या लोकांना ज्यांच्याविरुध्द युध्द सुरू आहे, कारण ते अत्याचारपीडित आहेत. आणि अल्लाह निश्चितपणे त्यांच्या मदतीस समर्थ आहे. हे ते लोक आहेत जे आपल्या घरातून नाहक बाहेर काढले गेले, केवळ या अपराधापायी की ते म्हणत होते, आमचा पालनकर्ता अल्लाह आहे."

(२२:३९-४०)

वरील दिव्य प्रकटन प्रेषित मुहंम्मद (स.) यांच्या मदीना कालखंडात अवतरित झाले. दिव्य आदेशाचे त्यात समर्थन दिले आहे. मुस्लिमांना मक्केतील आक्रमक कुरैश जमातीविरुध्द शस्त्र हातात घेण्याची परवानगी दिली गेली. त्यांच्यावर कुरैश सैन्याने आक्रमण केले होते. म्हणून त्यांच्याविरुध्द युध्द पुकारण्याचा आदेश देण्यात आला. जेव्हा जेव्हा कुरैशांनी आक्रमण केले तेव्हा त्यांच्याविरुध्द युध्द पुकारले गेले. हे युध्द बचावात्मक स्वरुपाचे होते.

दुसऱ्या प्रकारच्या जिहादवर चर्चा करण्याअगोदर आपण त्याच्या स्वरुपाविषयी तपशीलात जाऊ या. मागील प्रकरणात मुस्लिमांचे कर्तव्याविषयी आपण चर्चा केली आहे. आपण पाहिले आहे की इस्लाम धर्म समस्त मानवजातीसाठी आहे. इस्लाम हे एकमेव सत्य आहे. पारलौकिक मुक्तीसाठी इस्लाम ही पूर्वअट आहे. इस्लामव्यतिरिक सर्व असत्य आहे आणि अल्लाहजवळ अमान्य आहे. मुस्लिमांना इस्लामच्या या स्थितीला सुरक्षित आणि शाबूत ठेवण्याची जबाब्रदारी देण्यात आलेली आहे. इस्लाम संदेश समस्त जगाला देण्यासाठी मुस्लिम जबाबदार आहेत. ते सत्याचे साक्षी आहेत. मुस्लिमांनी लोकांना अल्लाहचे आज्ञाधारक बनवून त्यांना पारलौकिक जीवनाचा सर्वनाश करण्यापासून वाचवण्यासाठी प्रयत्नांची

पराकाष्ठा करणे अनिवार्य आहे. या दोन वैशिष्ट्यांमुळे मुस्लिमांनी फक्त त्यांच्याच समाजात घुटमळत न बसता सर्व जगाच्या भल्यासाठी जगाच्या कानाकोपऱ्यात इस्लाम संदेश पोहचविला पाहिजे. असे करताना ज्यांची हृदये इस्लामसाठी खुली नाहीत, त्यांच्यावर बळजबरी करता येणार नाही. दुसऱ्यांवर या बाबतीत पहारेकरी बनून राहण्याची परवानगी इस्लाम देत नाही. जोरजबरदस्तीच्या वातावरणात इस्लामला जवळून पारखणे शक्य होत नाही. शासनव्यवस्थेचा परिणाम जनमानसावर होत असतो. अशा स्थितीत इस्लामी समाजव्यवस्थेला जनमानसात रुजविण्यासाठी शासनव्यवस्था इस्लामी असणे क्रमप्राप्त ठरते. कारण प्रचलित व्यवस्था ही दुसऱ्या व्यवस्थेला आपल्या समाजात शिरकाव करू देत नाही. म्हणून जोपर्यंत गैरइस्लामी व्यवस्था समाजात प्रभावी आहे तोपर्यंत इस्लामी तात्त्विक आणि राजकीय व्यवस्था जनमानसात रूजत नाही. इस्लामच्या प्रगतीतील हा मोठा अडथळा आहे. जगातील प्रचलित सर्व समाजव्यवस्था इस्लामच्या मार्गातील प्रमुख अडथळे आहेत. याउपर ठपका हा ठेवला जातो की इस्लामी शासनव्यवस्था इतर शासन अथवा समाजव्यवस्थेला सामावून तर घेत नाही. परंतु पूर्ण सत्ता मुस्लिम राज्यकर्त्यांचा हातातसुध्दा न देता स्वत:कडे ठेवते. अशा स्थितीत इस्लामच्या सार्वभौमत्वालाच आव्हान दिले जाते. मग अशा परिस्थितीत बचावात्मक पवित्रा न घेता बळाचा वापरच योग्य ठरतो. याच कारणाने कुरआनने बचावात्मक पवित्र्याचे समर्थन फार काळ केल्यानंतर परिस्थितीनुरूप बळाचा वापर करण्यास अनुमती दिली आहे,

"तो अल्लाहच आहे ज्याने आपल्या पैगंबराला मार्गदर्शनासह आणि सद्‌धर्मासह पाठविले आहे की त्याचे इतर सर्व धर्मांवर सर्व प्रकारे वर्चस्व प्रस्थापित करावे. मग अनेकेश्वरवादींना हे कितीही असह्य का होईना!" (९:३३)

"इतर सर्व धर्मांवर सर्व प्रकारे वर्चस्व प्रस्थापित करावे" याचा अर्थ इस्लामने तात्त्विक आणि राजकीयदृष्ट्या सर्व धर्मांवर वर्चस्व स्थापित करावे. याचमुळे अल्लाह पुढे आदेश देतो,

"व सर्व मिळून अनेकेश्वरवादींशी लढा द्या, जसे ते सर्व मिळून तुमच्याशी लढतात. आणि समजून असा की अल्लाह ईशपरायणांच्या समवेत आहे." (९ : ३६)

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी या जिहादला सतत चालणारी प्रक्रिया म्हटले आहे. ही मुस्लिमांची न संपणारी गरज आणि जबाबदारी आहे. त्यांनी मुस्लिमांना

बजावून सांगितले की "जिहाद माझ्या काळापासून जो सुरू झाला तो तसाच शेवटपर्यंत म्हणजे दज्जालशी माझा शेवटचा अनुयायी लढेपर्यंत चालूच राहणार आहे. (कयामतपर्यंत) हा जिहाद क्रूर शासकाच्या क्रूर कारवायांना पाहून स्थगित होणार नाही की एखाद्या न्यायाधीशाच्या तथाकथित निवाड्यानेसुध्दा थांबू शकणार नाही."

आदरणीय प्रेषित मुहम्मद (स.) आणि चार आदर्श खलीफा (शासक) यांनी परदेशातील शासनकर्त्यांना इस्लामचे आमंत्रण दिले होते. जेव्हा त्यांच्याकडून हे आमंत्रण स्वीकारले गेले नाही तेव्हा त्यांना बळाने इस्लामच्या प्रभुत्वाखाली आणले गेले. त्यांना इस्लामच्या व्यवस्थेच्या अंकित ठेवणे हे वरील उद्देशाला धरूनच होते. ("इतर धर्मांवर सर्व प्रकारे इस्लामचे वर्चस्व स्थापिक करावे") म्हणून हा जिहाद बचावात्मक प्रकारचा नव्हता तर सकारात्मक कार्यवाही होती. म्हणून यास सकारात्मक जिहाद म्हणू या. या प्रकारच्या जिहादला समजून घेण्यासाठी दोन गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहेत.

प्रथमत: इस्लामला जबरदस्तीने स्वीकारण्याचा हेतु या जिहादचा मुळीच नाही. इस्लामचा स्वीकार करणे याचा संबंध मनाशी आहे की ज्यामुळे बळाने काहीच करता येत नाही. म्हणून इस्लाम बळजबरीने कोणावरही थोपवता येत नाही. कुरआनमध्ये वारंवार सांगितले गेले आहे की अल्लाहची इच्छा आहे की मनुष्यजातीमध्ये जगात कोणीही अश्रध्दावंत राहू नये. अल्लाहने सर्वांना मुस्लिम (आज्ञाधारक) म्हणून जन्माला घातले आहे आणि त्यांना (समस्त मानवजातीला) अल्लाहने इच्छिले असते तर त्याच्या या निर्मितीला मुस्लिम बनवले असते. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"जर अल्लाहने इच्छिले असते तर सर्व मानवांना बोध दिला असता." (१३:३१)

मग त्याने (अल्लाहने) प्रेषित मुहम्मद (स.) आणि त्यांच्या अनुयायींमध्ये बळाने मुस्लिम बनविण्यासाठी भेदभाव केला नसता. अशा प्रकारची अट ही मानवनिर्मितीच्या उद्देशाविरुध्द आहे म्हणून त्याला अस्वीकार्य केले गेले. अल्लाहने स्पष्टपणे सांगितले आहे की मनुष्य हा धर्माच्या बाबतीत स्वतंत्र आहे. त्याच्यावर या बाबतीत जोरजबरदस्ती करू नये.

"धर्माच्या बाबतीत जोरजबरदस्ती नाही." (२:२५६)

अशा परिस्थितीत, अल्लाह इस्लामविषयी जोरजबरदस्तीला योग्य कसे ठरवील? आणि प्रेषित मुहम्मद (स.) त्यांच्या अनुयायींना इस्लाम धर्मासाठी जोरजबरदस्ती करण्याची परवानगी कसे बरे देतील?

(१) याचा अर्थ असा होत नाही की एखाद्या देशातील मुस्लिमांनी जर त्यांच्यावर अत्याचार होत असेल तर त्यांनी बचावात्मक पवित्रा घेऊन त्या अत्याचाराचा प्रतिकार करू नये. अत्याचाराविरुध्द दोन हात करणे हे धर्मकार्य आहे आणि त्यात ती व्यक्ती मारली गेली तर शहीद (हुतात्मा) बनते.

अनुमती कशी मिळेल? वरील दिव्योक्तीने हेच सिध्द होते की कोणालाही इस्लामचा स्वीकार करण्यासाठी बळजबरी केली जाणार नाही. प्रत्येकाला धर्माबाबतचे स्वातंत्र्य आहे. त्याला पसंत पडले तर इस्लामच्या स्वीकार करील अन्यथा अस्वीकार करील.

(२) जिहाद ही काही मोहिम अथवा चळवळ नाही की शासकवर्गाला बळाने दासत्वाच्या स्थितीत परिवर्तीत करावे. जिहाद वसाहतवाद आणि साम्राज्यवादाच्या विरोधी आहे. होय जिहाद ही मानवजातीचे कल्याण करण्यासाठीची मोहीम जरूर आहे. सत्याला या भूतलावर स्थापित करून मानवाचे लौकिक आणि पारलौकिक दोन्ही जीवनात कल्याण करणे हेच एकमेव ध्येय जिहादचे आहे. अल्लाहच्या दासत्वात पूर्णपणे आलेला समाज इतरांचे दासत्व कसे बरे स्वीकार करील? असा समाज दुसऱ्यांपासून काही लाभ प्राप्त करण्यासाठी धडपड करत नाही तर दुसऱ्यांच्या फायद्यासाठीच (लोक परलोकचा फायदा) प्रयत्नशील राहतो.

सशस्त्र जिहादसाठी अटी

सशस्त्र जिहाद मग तो बचावात्मक अथवा सकारात्मक असो स्वच्छंदपणे करता येत नाही. काही अटींअंतर्गतच त्यास परवानगी दिली आहे. अटींची पूर्तता केल्यानंतरच या जिहादला धर्ममान्यता असते. अटीविना याचे महत्त्व नाही. हा मुळात जिहादच नाही. अल्लाहची अप्रसन्नता या जिहादमुळे पदरी पडते.

सशस्त्र जिहादच्या अटी खालीलप्रमाणे आहेत.

(१) स्वतंत्र आणि स्वावलंबी मुस्लिम व्यक्तीच या जिहादसाठी पात्र आहे आणि अमीरच्या (प्रमुख) नेतृत्वात जिहादला मान्यता आहे. सामाजिक व्यवस्थेशिवाय (शासनव्यवस्था) आणि प्रमुखाविना (अमीर) जिहाद अयोग्य आहे.

बचावात्मक जिहादसाठीसुध्दा ही अट आहे. मक्का शहरात प्रेषित मुहम्मद (स.) यांचे वास्तव्य प्रारंभी असताना ही अट पूर्ण होत नव्हती म्हणून तर जिहादची परवानगी दिली गेली नाही. त्या काळी कुरैश समुदायाचे प्रेषित मुहम्मद (स.) आणि त्यांच्या अनुयायींवर अत्याचार परम सीमेला पोहचले होते आणि ते इस्लाम प्रचारकार्य गुप्तपणे करीत होते. त्यांनी मदीना शहरी स्थलांतर केल्यानंतर तेथे ते स्वतंत्रपणे आपले कार्य करीत होते आणि तेथे एक स्वतंत्र इस्लामी व्यवस्था स्थापित झाली होती, तेव्हाच जिहादची अनुमती दिली गेली. स्वत: प्रेषित तत्कालिन इस्लामी शासनव्यवस्थेचे अमीर (प्रमुख) होते. हीच परिस्थिती इतर प्रेषितांचीसुध्दा होती.

(२) पुरेसे सैन्यबळ आणि सामरिकबळ उपलब्ध असणे आवश्यक आहे. शत्रुविरुध्द युध्द (सशस्त्र जिहाद) अन्यथा अयोग्य ठरते. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

''*कुणावरही त्याच्या कुवतीपेक्षा जास्त ओझे टाकू नये.*'' (२ : २३५)

याच तत्त्वांवर कुरआनमध्ये दिव्यादेश आहे,

''*तुमच्या कुवतीप्रमाणे तुमच्यावरील अल्लाहचे कर्तव्य पार पाडत जा.*'' (४:१६)

(३) जिहाद फक्त आणि फक्त अल्लाहसाठीच पाहिजे आणि त्याचा एकमेव उद्देश धर्माची सेवा करणे आणि अल्लाहची प्रशंसा आहे. जिहादीचा एकमेव उद्देश दुराचाराचे निराकरण आणि सदाचाराचा फैलाव करणे आहे. अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करण्यासाठीच जिहाद केला जातो. याव्यतिरिक्त दुसरा कोणताही उद्देश या पवित्र युध्दाचा नसावा. जेव्हा प्रेषित मुहम्मद (स.) यांना विचारले गेले की वेगवेगळ्या उद्देशाला समोर ठेवून लोक युध्द करीत आहेत. कोणी धनसंपत्तीसाठी, कोणी नावासाठी, कोणी देशासाठी, कुणाचे युध्द जिहाद आहे? यावर प्रेषितांनी उत्तर दिले,

''*जो अल्लाहच्या नावाचा महिमासाठी युध्द करतो त्याचेच युध्द हे अल्लाहसाठी असते.*'' (मुस्लिम, बुखारी)

दुसऱ्या एका प्रसंगी प्रेषित मुहम्मद (स.) यांना विचारण्यात आले की, ''जर एखाद्याने अल्लाहसाठी संघर्ष करण्याचे ठरविले परंतु त्याबरोबर ऐहिक फायदे मिळण्याची इच्छासुध्दा आहे, तर अशासाठी आपले काय मत आहे?'' प्रेषितांनी उत्तर दिले,

''*त्याला काहीही मोबदला मिळणार नाही.*'' (अबु दाऊद)

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी खालील तत्त्व मांडले,

"जो कोणी आपली पूर्वग्रहदूषितता ठेवून संघर्ष करीत असेल तर तो आपल्यातला नाही. तसेच जर कोणी पूर्वग्रहदूषिततेसाठी मरण पावला तर तोसुध्दा आपल्यापैकी नाही." (अबु दाऊद)

वरील दोन अटी या अगदी स्पष्ट आहेत परंतु तिसऱ्या अटीसंदर्भात थोडा खुलासा आवश्यक आहे. तो खालील प्रमाणे -

इस्लाममध्ये दुराचाराचा नायनाट करण्यासाठी जिहादची आवश्यकता सांगितली आहे. दुराचाराचा नायनाट आणि सदाचाराला प्रस्थापित करणे हा जिहादचा उद्देश आहे. अल्लाहची उपासना आणि सदाचाराचा फैलाव काय दुराचारी माणसांपासून अपेक्षित आहे की त्यासाठी संघर्ष ते करतील? कधीही नाही. या परिस्थितीत एक दुष्प्रवृत्तीचा अथवा दुराचारांचा नाश करून दुसरे दुराचार अथवा दुष्प्रवृत्ती पहिल्याची जागा घेईल. ही प्रवृत्ती इस्लामला लाभदायक मुळीच नाही तर ती हानीकारक आहे. ते इस्लामच्या नावाखाली हा दुष्प्रवृत्त खेळ खेळतील तर परिणामत: लोक इस्लामपासून दूर जातील.

धर्मात जिहादचे महत्व

जिहादवर धर्माचे आयुष्य अवलंबून आहे. जिहाद इस्लामसाठी स्वाभाविक आहे. धर्मात जिहादचे स्वरुप साधारण नाही. कुरआन ज्या वेळी श्रध्दावंताची गुणवैशिष्ट्ये स्पष्ट करतो त्या वेळी जिहाद त्यापैकी एक महत्त्वाचे गुणवैशिष्ट्य आहे. कुरआनोक्ती आहे,

"ज्या लोकांनी श्रध्दा ठेवली आणि ज्यांनी अल्लाहच्या मार्गात घरादारांचा त्याग केला, संघर्ष केला (जिहाद) व ज्यांनी आश्रय दिला व मदत केली तेच खरे श्रध्दावंत आहेत, त्यांच्यासाठी अपराधांची क्षमा व सर्वोत्तम उपजीविका आहे." (८ : ७४)

"हे लोकहो, ज्यांनी श्रध्दा ठेवली आहे, मी दाखवू तुम्हाला तो व्यापार जो तुम्हाला यातनादायक प्रकोपापासून वाचवील? श्रध्दा ठेवा अल्लाह आणि त्याच्या पैगंबरावर आणि प्रयत्नांची पराकाष्ठा (जिहाद) करा अल्लाहच्या मार्गात आपल्या द्रव्यांनिशी आणि आपल्या प्राणानिशी. हेच तुमच्यासाठी उत्तम आहे जर तुम्ही समजून घेतले." (६१ : १०-११)

कुरआनच्या दृष्टिकोनातून खरा धर्म आणि खरी श्रध्दा जिहादशिवाय अशक्य आहे. पारलौकिक जीवनात मुक्ती जिहादव्यतिरिक्त प्राप्त होऊ शकत नाही. वरील कुरआनोक्ती फक्त सशस्त्र जिहादचाच उल्लेख करीत आहे. परंतु इतर प्रकारच्या जिहादचासुध्दा उल्लेख कुरआनात आलेला आहे. परिस्थितीनुरूप संघर्ष हे श्रध्देचे प्रमाण आहे. तन, मन, धनाने अल्लाहच्या मार्गात जिहादचे आपण स्पष्टीकरण पाहू या.

आंतरिक जिहाद

कुरआनने आंतरिक जिहादला श्रध्दा आणि अश्रध्देदरम्यानची सीमारेषा ठरवले आहे. प्रेषित मुहम्मद (स.) यांनी आंतरिक जिहादला श्रध्देची ओळख म्हटले आहे. ज्या हृदयात सदाचाराचा फैलाव करण्याची आणि दुराचाराचा नायनाट करण्याची प्रकट इच्छा शिल्लक नसेल तर असे हृदय हे अश्रध्देच्या अंधकाराने काळेकुट्ट झालेले असते. ही खऱ्या श्रध्दावंताची ओळख आहे की त्याला दुराचार सहन होत नाही. तो वाणीने त्यांचा धिक्कार करू शकत नसेल तर मनाने त्यास वाईट समजून धिक्कार करतो. अर्थातच ही श्रध्देची शेवटची पायरी आहे. मुस्लिमांमध्येही शेवटच्या पायरीची श्रध्दासुध्दा नसेल तर अल्लाह आणि प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या नजरेत तो मुस्लिम नाही.

आंतरिक जिहाद हा श्रध्देशी निगडीत अशा प्रकारे आहे की त्याला श्रध्दावंताचे, श्रध्दावंत लोकसमूहाचे आणि राष्ट्राचे प्रमाण ठरविण्यात आले आहे. ज्या राष्ट्राचे धार्मिक लोक सदासर्वकाळ त्यांच्या धर्मनिष्ठेचाच विचार करतात आणि दुराचाराकडे त्यांचे डोळे बंद करून ठेवतात तेव्हा त्यांची धर्मनिष्ठा मूल्यहीन ठरते. असे राष्ट्र वाळलेल्या गवताच्या जंगलासारखे जळत राहाते. जेव्हा अशा राष्ट्रावर प्रकोप येतो तेव्हा दुष्ट आणि धार्मिक लोक दोन्ही नष्ट होतात. थोडे काही यासाठी बचावतात की त्यांनी त्यांच्या परिने दुराचाराला नष्ट करण्याचा प्रयत्न केला आणि लोकांना विनाशापासून वाचविण्यासाठी प्रयत्नशील राहिले होते. या दिव्योक्तीची साक्ष मानवी इतिहास देत आहे. कुरआन या संदर्भात स्पष्ट मार्गदर्शन करीत आहे,

''त्या लोकांत जे तुमच्यापूर्वी होऊन गेले आहेत, असली भली माणसे का शिल्लक राहिली नाहीत ज्यांनी लोकांना जमिनीत हिंसाचार माजविण्यापासून प्रतिबंधित केले असते? असले लोक निघाले तरी फारच थोडे ज्यांना आम्ही त्या लोकांमधून वाचविले.'' (११:११६)

प्रेषित मुहम्मद (स.) यानी मुस्लिमांना बजावून सांगितले आहे,

"शपथ आहे त्याची ज्याच्या मुठीत माझा प्राण आहे तुम्ही सदाचाराचा आदेश द्या आणि दुराचाराचा नाश करा अन्यथा अल्लाह निश्चितच कठोर शिक्षा देईन आणि तुम्ही प्रार्थना करा तर ती कबूल होणार नाही."

वरील हदीस (प्रेषित कथन) आणि इतर आणखी काही प्रेषितवचने खालील दिव्योक्तीला अधिक स्पष्ट करतात.

"आणि सावध राहा त्या उपद्रवापासून ज्याचा दुष्परिणाम प्रामुख्याने फक्त त्याच लोकांपर्यंत मर्यादित राहणार नाही. ज्यांनी तुमच्यापैकी पाप केलेले असेल आणि जाणून असा की अल्लाह कठोर शिक्षा देणारा आहे." (८ : २५)

कठोरतम शिक्षा इस्राइलच्या संततीवर कोसळली जेव्हा ते त्यांच्या आंतरिक जिहादच्या कर्तव्याला पूर्ण विसरले. त्यांचा समाज इतक्या खालच्या स्थितीला जाऊन पोहचला की दुराचार तेथे काँग्रेस गवतासारखा फोफावत गेला आणि दुराचाराचा नाश करण्यासाठी काहीच प्रयत्न झाले नाही. दिव्य कुरआन त्यांच्या स्थितीला स्पष्ट करीत आहे,

"इस्राईलपैकी ज्या लोकांनी अश्रध्देचा मार्ग अवलंबिला ते दाऊद (अ.) आणि मरयमपुत्र येशू यांच्या वाणीद्वारे धिक्कारले गेले कारण ते दुराचारी झाले होते व मर्यादा भंग करू लागले होते, त्यांनी एकमेकांना अपकृत्यापासून परावृत्त करण्याचे सोडून दिले होते, वाईट आचरण होते त्यांचे जे त्यांनी अंगिकारले." (५ : ७८-७९)

या प्रकारचा जिहाद (आंतरिक जिहाद) अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे श्रध्दा (ईमान) टिकून राहते. धर्माची साक्ष ही साक्ष देण्याच्या प्रक्रियेत सहभाग घेण्यावर अवलंबून असल्याने आंतरिक जिहादवर त्याची सफलता अवलंबून आहे. जर इस्लामची साक्ष देण्यास असफल ठरलात आणि दुसरीकडे इस्लामवर प्रेम प्रदर्शित करण्यासाठी जीवापाड प्रयत्न केले तर त्यांची अशी साक्ष परिणामहीन ठरते. अशा प्रकारचे अनुयायी इस्लामचे नव्हे तर अश्रध्देचे साक्षी बनून राहतात. अशा स्थितीत जगाला वाटते की हा इस्लामच्या श्रेष्ठत्वाचा आणि अभिमानाचा फक्त देखावा आहे. जगाची इस्लाम आणि त्याच्या अनुयायींबद्दलची हीच धारणा बनते. म्हणून जगाला इस्लामची साक्ष देण्याअगोदर त्याने आपला आंतरिक जिहाद स्वत:शी करून प्रथमत: आपल्यातील दुष्प्रवृत्तींचा नाश करून जगापुढे इस्लामी आदर्श बनले पाहिजे.

आपण आता या प्रकाराच्या जिहादबद्दल विचार करू या. राष्ट्र म्हणून प्रत्येक मुस्लिमाचे जीवन हे इस्लामची साक्ष देण्यासाठी आहे. म्हणून या प्रकारचे जिहादचे महत्त्व अत्याधिक आहे. साक्ष देण्याच्या पुराव्यापेक्षा या जिहादचे महत्त्व अधिक आहे. जोपर्यंत इस्लामला दुसऱ्यापर्यंत योग्यरित्या पोहचविला जात नाही तोपर्यंत इस्लामची साक्ष देण्याचे कार्य पूर्णत्वाला पोहचत नाही. म्हणून साक्षीच्या सर्व आवश्यकतेनुसार इस्लाम दुसऱ्यापर्यंत पोहचला पाहिजे. इस्लामबद्दलचे गैरसमज आणि अप्रचारांना समर्पक उत्तरे दिली पाहिजेत. इस्लामची साक्ष देणे हे काही गुपित कावा अथवा गुप्त कार्य अजिबात नाही. इस्लाम जरी एक आहे तरी त्याचे विरोधक अनेक आहेत. इस्लामच्या तोंडओळखीसाठी एखादे व्याख्यान अथवा संभाषण पुरेसे आहे. परंतु इस्लामची साक्ष देणे हे यापेक्षा वेगळे आहे. त्याचे महत्त्व इस्लामची औपचारिकरित्या तोंडओळख करून देण्यापेक्षा अधिक पटीने जास्त आहे. ज्यांच्यासमोर इस्लामची साक्ष देण्यात येते ते लोक परधर्मिय असतात. त्यांची श्रध्दा वेगळ्या तत्त्वांवर, धर्मांवर, परंपरांवर आणि वेगळ्या राजकीय पध्दतीवर असते आणि मुस्लिमांना त्यांच्यासमोर इस्लामची साक्ष द्यावी लागते. इस्लामची साक्ष निरनिराळ्या आघाड्यांवर देणे जिकीरीचे आणि त्रासदायक कार्य आहे. या युध्दात कोणकोणत्या प्रकारची शस्त्र, अस्त्र वापरावयाची! किती कठीण आहे ही मोहीम सर करणे! शारीरिक अथवा सशस्त्र जिहाद एका विशिष्ट स्थितीत लढले जाते. परंतु या प्रकारच्या जिहादमध्ये विशिष्ट प्रकारचे वातावरण, वेळ–काळ अथवा परिस्थिती मुळीच नसते. हा अविरत चालणारा संघर्ष आहे. हे असे कर्तव्य आहे जे सदासर्वकाळ आणि कोठेही व कधीही पार पाडावे लागते. हे अंतहीन कार्य आहे. या कार्याला शेवट कधीच नसतो. जोपर्यंत सशस्त्र जिहाद करण्याची वेळ येत नाही तोपर्यंत हा जिहाद सतत चालू राहतो.

इतिहास साक्ष आहे की अनेक प्रेषितांचे आयुष्य या प्रकारच्या जिहाद करण्यातच पार पडले परंतु सशस्त्र जिहाद करण्याची वेळ त्यांच्यावर आली नाही. या प्रकारचा जिहाद हा खरा जिहाद आहे. यात बाहेरच्या जगाशी अविरत वैचारिक, बौध्दिक संघर्ष चालूच राहतो. सशस्त्र जिहाद हा विशिष्ट निकडींचा परिणाम आहे. इस्लामचे निमंत्रण देणे आणि इस्लामची साक्ष देणे यांचा मुख्य उद्देश लोकांमध्ये अल्लाहच्या श्रेष्ठत्वाची आणि सार्वभौमत्वाबद्दलची जागृती निर्माण करणे आहे. तसेच लोकात श्रध्देला प्रज्वलित करणे आहे. श्रध्देला दुसऱ्यामध्ये प्रज्वलित करण्यासाठी

आपापसातील सुसंवाद, बुध्दीविवेकाची गरज आहे तलवारीची नव्हे! इस्लामच्या निमंत्रण मार्गातील अडथळे दूर करण्यासाठीच तलवार उगारली जाते.

या प्रकारचा जिहाद अल्लाहला अतिप्रिय आहे. अल्लाहने यास ''माझी मदत'' म्हणून संबोधले आहे आणि जे त्या जिहादमध्ये सामील आहेत त्यांना ''माझी मदत करणारे'' म्हणून संबोधले आहे. कुरआन दिव्योक्ती आहे,

''हे लोक हो ज्यांनी श्रध्दा ठेवली आहे, ''अल्लाहचे सहाय्यक'' बना ज्या प्रकारे मरयमपुत्र ईसाने हवारींना उद्देशून सांगितले होते, ''कोण आहे अल्लाहकडे (बोलविण्यात) माझा सहायक?'' आणि हवारींनी उत्तर दिले होते, ''आम्ही आहोत अल्लाहचे सहाय्यक.'' त्या वेळी बनी इस्त्राईलच्या एका गटाने श्रध्दा ठेवली आणि दुसऱ्या गटाने इन्कार केला. मग आम्ही श्रध्दावंतांचे त्यांच्या शत्रुविरुध्द समर्थन केले आणि तेच विजयी ठरले.'' (६१ : १४)

हे सर्वश्रुत आहे की येशुचे आमंत्रण कार्य शारीरिक अथवा सशस्त्र जिहाद करण्याच्या स्थितीत कधीच पोहचले नाही. त्यामुळे ते आमंत्रण फक्त प्रचार आणि बुध्दीविवेकास आवाहन करण्यापर्यंत सीमित होते. तरीपण त्यांच्या त्या अविरत संघर्षामुळे येशूचे अनुयायींना (हवारी) अल्लाहचे सहाय्यक म्हणून संबोधले गेले आहे. याचाच अर्थ हा होतो की ही अत्यंत नामांकित उपाधी त्यांना याच कारणाने बहाल केली गेली की त्यांनी अल्लाहच्या धर्माचा प्रचार प्रसार करण्यास अविरत प्रयत्न केला. त्यांनी या कार्यास पूर्ण न्याय दिला. 'अल्लाहचे सहाय्यक' ही अत्यंत नामांकित उपाधी त्यांना त्याच वेळी बहाल करण्यात आली जेव्हा त्यांनी आपल्या पूर्ण शक्तीनिशी, संधी आणि बुध्दीनिशी दुसऱ्यापर्यंत अल्लाहचा धर्म विपरित स्थितीत मोठ्या धैर्याने आणि संयमाने पोहच केला आणि संकटांच्या वावटळांना न घाबरता अथवा शांत न बसता अविरत प्रयत्नशील राहिले. हा काही मानवी बुध्दीचा अनुमान अथवा कल्पना नाही तर ही उपाधी अल्लाहच्या दिव्य प्रकटनाद्वारे कुरआनने बहाल केलेली आहे. कुरआनचा अध्याय 'आले ईमरान' मध्ये यावर आणखी खुलासा आलेला आहे. प्रेषित येशू (अ.) यांनी तेव्हाच हे शब्द उच्चारले आहेत जेव्हा त्यांच्या श्रोतेगणांना बनीइस्त्राईलच्या लोकांनी शेवटी नाकारले आणि येशूविरुध्दच्या यांच्या कारवाया शिगेला पोहचल्या. कुरआनोक्ती आहे,

''जेव्हा ईसा (अ.) ला जाणवले की बनी इस्त्राईल नाकारण्यामध्ये तत्पर आहेत तेव्हा त्याने सांगितले, कोण अल्लाहच्या मार्गात माझा सहायक बनेल?

हवारीनी उत्तर दिले, आम्ही अल्लाहचे सहाय्यक आहोत, आम्ही अल्लाहवर श्रध्दा ठेवली, साक्षी राहा की आम्ही मुस्लिम (अल्लाहच्या आज्ञेपुढे नतमस्तक होणारे) आहोत. स्वामी! जे फर्मान तू अवतरले आहेस, आम्ही त्याला मानतो आणि प्रेषिताचे अनुसरण स्वीकारतो. आमची नावे ग्वाही (साक्षी) देणाऱ्यांत समाविष्ट कर." (३:५३-५४)

वरील दिव्य प्रकटनावरून हेच सिध्द होते की "अल्लाहचे सहाय्यक" बनण्याचा निर्णय तेव्हाच घेतला जातो जेव्हा इस्लामचे निमंत्रण आणि साक्ष देण्याचे कार्य हे प्रचार प्रसार आणि बुध्दी विवेकांपर्यंत सीमित न राहता अशा स्थितीत पोहचते की संकटांवर संकटे कोसळणे सुरू होते. श्रध्दावंत तेव्हा तोंड बंद करून बसलेले नसतात परंतु संयमाने आणि धैर्याने अल्लाहचा संदेश (इस्लाम) लोकांपर्यंत पोहचवितात. तेव्हाच त्यांना 'अल्लाहचे सहाय्यक' म्हटले जाते. कारण अल्लाहच्या मार्गात अविरत संघर्ष हाच खरा जिहाद आहे. आणि यालाच "अल्लाहच्या धर्माला मदत" असे संबोधले आहे.

सशस्त्र जिहाद

कुरआन आणि हदीसमध्ये याबद्दलच्या जिहादचे फायदे आणि वैशिष्ट्यांचा उल्लेख अनेकदा आलेला आहे. त्यांचे आकलन केल्यानंतर कळते की उपासनेनंतर जिहाद अल्लाहला प्रिय आहे. जो विरोधकांच्या गराड्यात लोकांना सत्याकडे आमंत्रित करतो. अशा श्रध्दावंताना अल्लाहने "त्याचे सहायक" म्हटले आहे. जो या कार्यात आपल्या संपत्तीचा शेवटचा पैसासुध्दा खर्च करतो त्या व्यक्तीला अल्लाहने "त्याचे सहाय्यक" म्हणून न संबोधता 'त्याचे प्रियजन' म्हणून संबोधले आहे. कुरआनोक्ती आहे,

"अल्लाहला तर प्रिय लोक ते आहेत जे त्याच्या मार्गात अशा प्रकारे फळी बांधून लढतात जणू काय ते शिसे पाजलेली भींत असावेत." (६१ : ४)

या प्रेमाबद्दलचा खुलासा हदीस ध्ये आलेला आहे,

"सीमेचे रक्षण रात्रंदिवस करणारे महिनाभर उपवास व नमाज अदा करणाऱ्यांपेक्षा अधिक महत्त्वाचे आहेत."

"स्वतःचे कर्तव्य आपल्या मृत्युपश्चात संपुष्टात येते परंतु त्या व्यक्तीचे उदाहरण वेगळे आहे जो युध्दात भाग घेताना मृत्यू पावतो. तो अल्लाहसाठी युध्द करत होता. त्याचे हे कर्तव्य कयामतपर्यंत वृधिंगत होणार." (तिरमीजी)

''ते जे जिहादमध्ये भाग घेतात आणि ते जे सतत उपवास ठेवतात, नमाज अदा करतात आणि कुरआन पठण करतात दोघांचे कृत्य सारखेच आहे जोपर्यंत धर्मयोध्दा युध्दातून परत येत नाही.'' (मुस्लिम, बुखारी)

अल्लाहच्या मार्गात जिहाद करणारेच फक्त त्याच्या प्रसन्नतेचे, कृपेचे पात्र ठरतात, असे नाही तर अशा व्यक्तींनासुध्दा चांगले स्थान प्राप्त होते जे अप्रत्यक्षरित्या जिहादला मदत करतात. प्रेषितकथन आहे,

''जो कोणी मुजाहिदला (धर्मयोध्दा) सहाय्य करील जणूकाही तो स्वत: जिहादमध्ये भाग घेत आहे आणि जो कोणी मुजाहिदच्या कुटुंबाकडे लक्ष देईल तर तोसुध्दा जणूकाही जिहादमध्ये प्रत्यक्ष भागच घेत आहे.'' (मुस्लिम, बुखारी)

''एका धनुष्यबाणामुळे अल्लाहने तीन लोकांचा स्वर्ग प्रवेश निश्चित केला. एक तो जो धनुष्यबाण अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करण्यासाठी बनवतो, दुसरा तो जो प्रत्यक्ष युध्दात त्याचा वापर करतो आणि तिसरी व्यक्ती धनुष्यबाण योध्याला पुरविणारी आहे.'' (अबुदाऊद)

जर कोणी धनुष्यबाण (युध्दसामग्री) बनवून जिहादसाठी पुरवठा करत आहे अशा व्यक्तीस अल्लाह उत्तम मोबदला देतो तर ती व्यक्ती जो प्रत्यक्ष युध्दात आपले घरदार सोडून भाग घेतो आणि अल्लाहसाठी आपले रक्त सांडतो आणि शेवटी अल्लाहसाठी मरण पत्करतो त्याच्यासाठी किती महान मोबदला असेल? कुरआन स्पष्टोक्ती आहे,

''जे लोक अल्लाहच्या मार्गात ठार झाले त्यांना मृत समजू नका, ते तर खरे पाहता जिवंत आहेत, आपल्या पालनकर्त्यापाशी उपजीविका प्राप्त करीत आहेत, जे काही अल्लाहने आपल्या कृपेने त्यांना दिले आहे त्यावर ते फार खूष आहेत आणि समाधानी आहेत.'' (३ : १६९-१७१)

येथे हे स्पष्ट केले पाहिजे की कुरआनने त्या मनमोहक वाक्यरचना आणि उपाधी उल्लेख त्यांच्यासाठी केला आहे जे अल्लाहच्या मार्गात हुतात्मे बनले आहेत. कुरआनची ही खास शैली आहे. प्रेषित मुहम्मद (स.) यांचे कथन आहे,

''जे स्वर्गात दाखल होतील नंतर ते पृथ्वीवर परत येण्याचे विचारसुध्दा मनात आणणार नाहीत जरी त्याला पृथ्वीवरील सर्वकाही त्याचे मालकीचे करून दिले तरी! परंतु हुतात्मा (शहीद) ची ही स्थिती नसणार. जेव्हा त्यांच्यावर अल्लाहची कृपादृष्टी होईल आणि त्याला बहुमानित केले जाईल तेव्हा त्याला वाटेल की दहा

वेळा पृथ्वीवर परत जावे आणि दहावेळा अल्लाहच्या मार्गात शहीद व्हावे."

(मुस्लिम, बुखारी)

परलोकात हुतात्मा (शहीद) विशेष प्राविण्य आणि बहुमान प्राप्त करील. जो मृत्युपावतो त्याला आंघोळ घातली जाते व शुभ्रवस्त्र परिधान केले जाते. परंतु हुतात्म्याला (शहीद) आंघोळ घातली जात नाही की पांढरे शुभ्रवस्त्र गुंडाळले जात नाही. त्यांना त्याच रक्ताने माखलेल्या कपड्यात दफन केले जाते. माननीय अब्बास (रजि.) यांनी माहिती दिली आहे,

"प्रेषित मुहम्मद (स.) यांनी आदेश दिला की हुतात्म्याजवळून शस्त्र काढून घ्यावे. आणि त्यास जसे आहे त्या स्थितीत दफन करावे रक्ताने माखलेल्या कपड्यानिशी आणि रक्तबंबाळ शरीरासह." (अबुदाऊद)

अशीच दुसरी हदीससुध्दा आहे. शहीदचे रक्त हे काही साधे रक्त नसते. याशिवाय इतर काहीही इतके पवित्र असूच शकत नाही. हे ते रक्त आहे की पावित्र्य आणि स्वच्छतेपेक्षा ते अधिक चांगले आहे. अल्लाहने त्यास मश्क अत्तराहून अधिक सुगंधित म्हटले आहे,

"त्याचा रंग केसरसारखा आणि सुगंध 'मश्क' सारखा आहे." (तिरमिजी)

कुरआन आणि हदीसनुसार हुतात्मा लोकांचा दर्जा परलोकात उच्च असतो.

शारीरिक आणि सशस्त्र जिहाद हा उत्तम जिहाद आहे. ते एक श्रेष्ठतम धर्मनिष्ठेचे कृत्य आहे आणि अल्लाहच्या उपासनेचे उत्तम प्रकार आहे. जेव्हा प्रेषित मुहम्मद (स.) यांना विचारण्यात आले की जिहादचा उत्तम प्रकार कोणता आहे? त्यावर त्यांनी उत्तर दिले,

"उत्तम जिहाद ते आहे जे अश्रध्दावंतांशी तन, मन, धनासह संघर्ष केला जातो." (अबुदाऊद)

तसेच प्रेषित मुहम्मद (स.) यांना विचारण्यात आले की उत्तम व्यक्ती कोण आहे? त्यावर त्यांनी उत्तर दिले,

"श्रध्दावंतांपैकी उत्तम तो आहे जो अल्लाहच्या मार्गात तन, मन, धनाने संघर्ष करतो." (बुखारी)

जो आपल्या तन, मन, धनाने अल्लाहच्या मार्गात संघर्ष करतो तो उत्तम श्रध्दावंत आहे. हे एक पवित्र आणि उत्तम कृत्य आहे आणि त्याचा मोबदला पुरेपूर

दिला जातो. खालील हदीस स्पष्ट करीत आहे,

"नरकाग्नी दोन प्रकारच्या डोळ्यांना स्पर्श करणार नाही. जो डोळा अल्लाहच्या कोपच्या भयाने अश्रु ढाळत राहते आणि दुसरे ते जे अल्लाहच्या मार्गात रात्रभर पहारा करतो." (तिरमिजी)

"जिहाद करताना जो धुराडा उडतो तो आणि नरकाचा धुर एकमेकात कधीच एकत्रित होणार नाहीत." (तिरमिजी)

हुनैनच्या युध्दात अनस बिन अबी (रजि.) यांनी रात्रभर खिंडीकडे टकलावून पहारा केला. जेव्हा दुसऱ्या दिवशी सकाळी ते प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या समोर हजर झाले. तेव्हा प्रेषितांनी सांगितले,

"तुम्ही स्वर्गाला तुमच्यासाठी आवश्यक बनवले. याच्यानंतर तुम्ही काहीसुध्दा सदाचार केला नाही तरी." (अबु दाऊद)

बदरच्या युध्दात ज्यांनी भाग घेतला होता त्यांच्याविषयी प्रेषित मुहम्मद (स.) उमर (रजि.) यांचेजवळ म्हणाले,

"तुम्हाला याची कल्पना नाही की अल्लाहने बदरच्या योद्ध्यांकडे पाहिले आणि म्हणाला जा आणि तुम्हाला जे आवडेल ते करा. मी तुम्हाला प्रसन्न झालो." (बुखारी)

शारीरिक आणि सशस्त्र जिहाद अल्लाहजवळ अत्युच्च दर्जाचे कृत्य आहे. जर अल्लाहची भक्ती करणे हेच मुस्लिमांचे जीवनाचे ध्येय असेल आणि मुस्लिम राष्ट्राची उभारणी फक्त एकमेव उद्देशासाठी झाली आहे की त्याने संपूर्ण जगापुढे सत्याची साक्ष द्यावी. अशा स्थितीत या दास्यत्वापेक्षा चांगले दास्यत्व कोणते आणि या साक्षीपेक्षा जास्त चांगली साक्ष कोणती की ज्यात मुस्लिम आपला जीव पणाला लावतो? म्हणून हे अगदी उघड सत्य आहे की हेच श्रेष्ठतम दास्यत्व आणि अति मूल्यवान साक्ष आहे. दुसऱ्या शब्दांत जिहाद हे अगदी योग्य साधन आहे मुस्लिमांपुढील ध्येयप्राप्तीचे! जेव्हा मुस्लिम आपले आयुष्य ध्येयासाठी वेचतो तेव्हा त्याची अल्लाहसाठीची अत्युच्चतम आज्ञाधारकता आणि सत्याची साक्षी देण्याचे कर्तव्य पूर्णपणे पार पाडले जाते. स्वत:चे आयुष्य वेचून जीव पणाला लावणे हे शेवटचे कृत्य ध्येय प्राप्तीसाठीचे आहे. अशीच व्यक्तीही सत्याचा ध्वज वाहक आणि अत्यंत आज्ञाधारक सेवक ठरतो. याच कारणामुळे प्रत्येक मुस्लिम जो सत्याची साक्ष त्याच्या आचरणाने आणि व्याख्यानाने (कथनी आणि करनी) देतो तो धर्माचा साक्षी (शाहीद) असतो. परंतु उपाधी आणि

उत्कृष्ट नावे यांचा मात्र फक्त त्याच लोकांशी संबंध आहे जे आपले जीव अल्लाहच्या धर्मासाठी पणाला लावतात. कारण ते आपली अंतिम गोष्ट (प्राण) सुध्दा इस्लामच्या साक्षीसाठी त्याग करतात. याच कारणामुळे धर्माची साक्ष देणारे ''शाहीद'' ही उपाधी अशा हुतात्म्यांनाच (शहीद) शोभून दिसते.

येथे हेसुध्दा स्पष्ट केले पाहिजे की धनसंपत्तींचा आणि जीवनाचा त्याग अल्लाहच्या मार्गात करणे हे व्यक्तीच्या श्रध्देचा अत्युच्च बिंदू आहे. जेव्हा एखादी व्यक्ती अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी मृत्युला कवटाळतो तेव्हा श्रध्देचा कोणताही उच्चबिंदू सर करण्याचा शिल्लक राहत नाही. यानंतर फक्त एकच बिंदू (जागा) शिल्लक राहते ते म्हणजे प्रेषितांचे स्थान! उत्बा इब्ने अबुस सलमी (रजि.) यांच्यानुसार ''प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले की जिहादमध्ये श्रध्दावंत हौतात्म्य पत्करतात त्यांचे तीन प्रकार आहेत. प्रथम जो आपल्या धनसंपत्ती आणि प्राणानिशी जिहादमध्ये शत्रुशी लढत राहतो आणि अंततः हौतात्म्य पत्करतो. अशा हुतात्म्यासाठी प्रेषित मुहम्मद (स.) यांनी म्हटले आहे,

''हा खरा आणि शाश्वत हुताम्या (शहीद) आहे. हा शहीद अल्लाहच्या राजसिंहासनाखालील छतामध्ये वास्तव्य करील. प्रेषित याच्यापेक्षा वेगळे फक्त त्यांच्या प्रेषित्वामुळेच असतील.'' (दारीमी)

शारीरिक जिहादच्या धार्मिक महत्त्वाचा एक पैलू अद्याप अस्पष्ट आहे. कुरआनमध्ये शारीरिक जिहादबद्दल जो उल्लेख आला आहे त्यावरून हे कळते की या प्रकारच्या जिहादचे धार्मिक आणि राष्ट्रीय महत्त्व प्रत्येक वेळी एकसारखे नसते. एक वेळ हे फक्त शौर्याचे आणि श्रेष्ठ कार्य आहे तर दुसऱ्यावेळी हे कृत्य धार्मिक आणि श्रध्देची निशाणी ठरते. जर जिहादची घोषणा करण्याची आवश्यकता नाही त्या वेळी आणि काही लोक त्यासाठी पुरेसे असतात. अशी ही मिलेटरी सेवा अशा वेळेस श्रेष्ठ कार्य ठरते. जर कोणी इतर भाग घेत नसेल तर त्याला दोषी ठरविले जात नाही. कुरआनोक्ती आहे,

''मुसलमानांपैकी ते लोक की जे एखाद्या निमित्ताविना घरी बसून राहतात व जे अल्लाहच्या मार्गात प्राण व संपत्तीनिशी जिहाद करतात, दोघांची स्थिती एकसारखी नाही. अल्लाहने बसून राहणाऱ्यांपेक्षा प्राण व संपत्तीनिशी युध्द करणाऱ्यांचा दर्जाश्रेष्ठ ठेवला आहे. असे अल्लाहने प्रत्येकासाठी भलाईचेच वचन दिले आहे परंतु त्याच्याजवळ जिहाद करणाऱ्यांच्या सेवेचा मोबदला बसून राहणाऱ्यांपेक्षा

फार जास्त आहे. त्याच्यासाठी अल्लाहकडून मोठे दर्जे आहेत आणि क्षमा व कृपा आहे आणि अल्लाह मोठा माफ करणारा व दया करणारा आहे." (४:९५-९६)

मुस्लिम राजाने अथवा नेत्याने (अमीर) जिहादची घोषणा केली तर ते अनिवार्य धार्मिक कृत्य आणि श्रध्देचे प्रमाण ठरते. प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या काळात जेव्हा काहींनी जिहाद घोषित झाल्यानंतरसुध्दा जिहादमध्ये सामील होण्यास आळस केला अशांना कुरआनमध्ये तंबी देण्यात आली आहे,

"हे श्रध्दावंतांनो! तुम्हाला झाले तरी काय की जेव्हा तुम्हाला अल्लाहच्या मार्गात निघण्यासाठी सांगण्यात आले तेव्हा तुम्ही जमिनीशी खिळून राहिलात? तुम्ही पारलौकिक जीवनाच्या तुलनेत या जगातील जीवनाला पसंत केले आहे का? असे असेल तर तुम्हाला माहीत असावे की ऐहिक जीवनाचा हा सर्व सरंजाम पारलौकिक जीवनामध्ये फारच थोडा भरेल. तुम्ही उठणार नाही तर अल्लाह तुम्हाला दु:खदायक शिक्षा देईल आणि तुमच्या जागी दुसऱ्या एखाद्या समूहाला उभे करील."

(९ : ३८-३९)

तसेच ज्यांनी बहाणा केला आणि जिहादमध्ये भाग न घेण्यासाठी अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांचेकडे विनंती केली अशा लोकांना उद्देशून कुरआनने तंबी दिली आहे,

"हे पैगंबर (स.), अल्लाह तुम्हाला क्षमा करो, तुम्ही त्यांना परवानगी का दिली? (तुम्ही खुद्द त्यांना परवानगी द्यावयास नको होती) जेणेकरून कोण खरे आहेत, हे तुम्हावर उघड झाले असते व खोट्यांनादेखील तुम्ही ओळखले असते. जे लोक अल्लाहवर व अंतिम दिनावर श्रध्दा ठेवतात ते तर कदापि तुमच्याकडे अशी विनंती करणार नाहीत की त्यांना आपल्या जीवित व वित्तानिशी युध्द करण्यापासून माफ केले जावे. अल्लाह ईशपरायण लोकांना चांगल्या प्रकारे जाणतो. अशी विनवणी तर तेच लोक करतात जे अल्लाह आणि अंतिम दिनावर श्रध्दा ठेवत नाहीत, त्यांच्या हृदयात शंका आहेत आणि ते आपल्या शंकेतच द्विधाग्रस्त झाले आहेत."

(९:४३-४५)

वरील आयतींवरून हे सिध्द होते की जिहाद जेव्हा अनिवार्य कार्य ठरते तेव्हा त्यात भाग न घेणे हे श्रध्दाहीनतेचे लक्षण आहे. या आयतींवरून हेसुध्दा कळून येते की अल्लाहच्या मार्गात जिहादसाठी प्रोत्साहित करणेसुध्दा श्रध्देचाच एक अंग आहे. युध्दाचा प्रसंग कधी येईल हे भाकित कोणीही करू शकत नाही. श्रध्दावंत त्यासाठी

सतत तयार राहतो. तरी त्याची आंतरिक इच्छा ही प्रतिक्षा करू शकत नाही. मुस्लिम जर खरा श्रध्दावंत असेल तर तो नेहमीच जिहादसाठी तयारीत राहतो. जर परिस्थिती तशी उद्‌भवली आणि जिहाद पुकारले गेले तर असा मुस्लिम घरात स्वस्थ बसून राहत नाही. जिहाद (शारीरिक) आणि श्रध्देमधील नैसर्गिक संबंधांविषयी खालील हदीस स्पष्ट आहे,

''जो व्यक्ती धर्मासाठी संघर्ष (जिहाद) करू शकला नाही किंवा त्याविषयी मनात कधीही विचार आणला नाही तर तो अश्रध्देच्या स्थितीत मरण पावला.''

(मुस्लिम)

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या वरील निर्णयानुसार मुस्लिम समाज त्याच्या इच्छेनुसार जीवन जगू शकत नाही जसे दुसरे जगतात. त्याची निर्मिती खास उद्देशासाठी झाली आहे. या उद्दात्त हेतुसाठी त्या समाजातील व्यक्तीने सर्वस्व पणाला लावणे अपेक्षित आहे. अशी व्यक्ती आपल्या ध्येयप्राप्तीपुढे सर्व काही किंबहुना स्वतःचा जीवसुध्दा क्षुल्लक समजतो. खरा मुस्लिम समुदाय हा अशा लोकांचा समुदाय असतो जो समर्पणाची भावना उरी बाळगून असतो. अशा वैशिष्टयाशिवाय हा समाज इतर समाजासारखाच गणला जातो. तो मुस्लिम समाज नसतोच मुळी! ज्याच्यासाठी त्याची निर्मिती झाली आहे ते कर्तव्य पार पाडण्यास हा समाज असमर्थ ठरतो. कुरआनच्या निर्णय अशा समाजाविषयी या जगासमोर आहे,

''हे श्रध्दावंतांनो! जर तुमच्यापैकी कोणी आपल्या धर्मापासून पराङ्‌मुख होत असेल (तर खुशाल व्हावे) अल्लाह आणखी कित्येक लोक असे निर्माण करील जे अल्लाहला प्रिय असतील आणि अल्लाह त्यांना प्रिय असेल. जे श्रध्दावंतांसाठी मृदू आणि अश्रध्दावंतांसाठी कठोर असतील, जे अल्लाहच्या मार्गात प्रयत्नांची पराकाष्टा (जिहाद) करतील आणि कोणत्याही निर्भर्त्सना करणाऱ्यांच्या निर्भर्त्सनेला भिणार नाहीत. ही अल्लाहची कृपा आहे, तो ज्याला इच्छितो त्याला प्रदान करतो. अल्लाह सर्वव्यापी आहे आणि सर्वकाही जाणतो.'' (५:५४)

वरील दिव्य प्रकटणाचा अर्थ अगदी स्पष्ट आहे. विशिष्ट गुणसंपन्न लोक अल्लाहला त्याच्या धर्मासाठी आवश्यक आहेत. त्यापैकी एक गुणविशेष आहे अल्लाहच्या मार्गात जिहाद करणे. ज्याच्याजवळ हा गुणविशेष नाही तो धर्माची सेवा आणि धर्माला सहाय्य करू शकत नाही आणि धर्माची साक्ष देऊ शकत नाही. जो मुस्लिम हे कर्तव्य पार पाडणार नाही. तो मुस्लिम राहूच शकत नाही याच

कारणामुळे "धर्मात कर्तव्यपरायण" न राहणे म्हणजे "धर्मापासून तोंड फिरविणे" आहे. कुरआनने हा निर्णय सुरे तौबा मध्ये दिला आहे,

"तुम्ही उठणार नाही तर अल्लाह तुम्हाला दुःखदायक शिक्षा देईल, आणि तुमच्या जागी दुसऱ्या एखाद्या समूहाला उभे करील." (९:३९)

मनुष्य अथवा समुदाय तेव्हाच आपल्या पदावरून दूर हटविला जातो जेव्हा तो त्या पदाची जबाबदारी पार पाडण्यास असमर्थ ठरतो.

प्रकरण बारावे

इस्लामचे ऐहिक लाभ

भौतिक समृद्धी

इस्लामच्या वरील विवेचनावरून हेच स्पष्ट होते की इस्लाम नाव आहे अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी जगणे आणि मरणे. फक्त मुस्लिम तोच आहे जो पारलौकिक जीवाकडे टक लावून असतो आणि भौतिक जीवनाला पारलौकिक जीवनावर कधीच प्राधान्य देत नाही. तर प्रश्न उभा राहतो की पूर्णत: धर्माच्या अधीन राहून जीवन जगण्यासाठी कोणत्या प्रकारचे जीवन त्याने जगावे? काय जगाचा त्याने त्याग करावा? वैयक्तिकरित्या तो समृध्दी प्राप्त करू शकतो आणि आदरसन्मान आणि सत्ता एक समुदाय म्हणून मिळवू शकतो काय? हा एक सर्वसाधारण प्रश्न आहे आणि फक्त इस्लामच्यासाठीच निर्माण होत नाही. तो इतर ईशधर्माबद्दलसुध्दा निर्माण होतो. इस्लामप्रमाणेच इतर धर्मसुध्दा अल्लाहची आज्ञाधारकता आणि पारलौकिक जीवनावर विश्वास या बाबींना धर्माचा केंद्रबिंदू मानतात. म्हणून आपण इतर धर्मांच्या उत्तराबद्दल विचार करू या.

आपण जर इतर धर्मांचा अभ्यास केला तर आपणास वरील प्रश्नाची उत्तरे मिळत नाहीत. त्यांच्या प्रेषितांनी त्या लोकांना ईशधर्माकडे निमंत्रण दिले आणि त्या लोकांना आश्वस्त केले की माझे (प्रेषिताचे) अनुयायित्व पत्करून तुम्हा लोकांना पारलौकिक जीवनातच फक्त सफलता मिळणार नाही तर या जगातसुध्दा तुम्ही सफल व्हाल. प्रेषित नूह (अ.) त्यांच्या लोकांना म्हणाले,

''आपल्या पालनकर्त्याची क्षमा मागा, नि:संदेह तो मोठा क्षमाशील आहे. तो तुमच्यावर आकाशातून खूप पावसाचा वर्षाव करील. तुम्हाला मालमत्ता आणि संततीने उपकृत करील. तुमच्यासाठी बागा निर्माण करील आणि तुमच्यासाठी कालवे प्रवाहित करील.'' (७१:१०-१२)

प्रेषित हूद (अ.) यांनी दिलेले निमंत्रण खालीलप्रमाणे,

''हे माझ्या देशबंधुंनो, आपल्या पालनकर्त्याकडे माफी मागा, नंतर त्याच्याकडेच परतणार आहोत. तो तुमच्यावर आकाशाची दारे उघडी करील आणि तुमच्या शक्तीमध्ये अधिक शक्तीची वाढ करील, गुन्हेगार बनून (भक्तीपासून) तोंड फिरवू नका.'' (११:५२)

ईशआश्वासनांचा तपशील आणि त्याबद्दलचे पुरावे आपण बनीइस्राईलच्या इतिहासात पाहू शकता ज्याचा कार्यकाळ प्रेषित मूसा (अ.) यांच्या जन्माच्या किंचित अगोदर सुरू होतो. तेव्हापासून तर प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या आगमनापर्यंतचे त्यांचे जीवन किंव करणारे होते. जेव्हा ते आपल्या निर्माणकर्त्याकडे झुकले तेव्हा त्यांचे जीवन सावरले गेले कुरआनोक्ती आहे,

''आणि त्यांच्या जागी आम्ही त्या लोकांना ज्यांना दुबळे करून सोडले गेले होते, त्या भूमीच्या पूर्व व पश्चिमेचे वारस बनविले जिला आम्ही समृध्दीने संपन्न केले होते. अशा प्रकारे बनी-इस्राईलच्या बाबतीत तुझ्या पालनकर्त्यांचे इष्ट वचन पूर्ण झाले कारण त्यांनी संयमाची कास धरली होती आणि आम्ही फिरऔन व त्याच्या लोकांचे ते सर्वकाही नष्ट करून टाकले जे ते बनवीत होते व उभारीत होते.''

(७:१३७)

अल्लाहकडे त्यांचा (बनीइस्राईल) झुकाव असल्याने आणि सत्यमार्गातील धैर्यशीलतेमुळे त्यांच्या दुर्दशेला समृध्दीमध्ये परिवर्तित करण्यात आले. एवढेच नव्हे तर त्यांच्या आज्ञाधारकतेमुळे त्यांना आणखीन ईश मोबदला मिळेल अशी ग्वाही देण्यात आली होती. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

''स्मरण करा जेव्हा मूसा (अ.) ने आपल्या लोकांना सांगितले, अल्लाहच्या त्या उपकाराचे स्मरण ठेवा जे त्याने तुम्हावर केलेले आहे. त्याने तुम्हाला फिरऔन समर्थकपासून सोडविले जे तुम्हाला कठोर यातना देत होते. ते तुमच्या मुलांची हत्या करीत असत आणि तुमच्या मुलींना जिवंत ठेवीत असत, यात तुमच्या पालनकर्त्याकिडून तुमची मोठी परीक्षा होती. आणि स्मरण ठेवा, तुमच्या पालनकर्त्यांने सावध केले होते की जर कृतज्ञ बनाल तर मी तुम्हाला आणखीन जास्त उपकृत करीन आणि जर कृतघ्नता दर्शवाल तर माझी शिक्षा फारच कठोर आहे.''

(१४:६-७)

जोपर्यंत ते (बनीइस्राईल) अल्लाहशी कृतज्ञ होते जगाने पाहिले की इष्ट वचन पूर्ण होत गेले. त्यांनी प्रगतीचें शिखर गाठले आणि त्यांचे राष्ट्र एक समृध्दशाली राष्ट्र म्हणून जगासमोर आले होते. संपूर्ण जग त्यांच्याकडे आदराने आणि प्रतिष्ठितपणे पाहात होते. त्यांच्या त्या समृध्दशाली काळाचे स्मरण देऊन अल्लाह त्यांना सावध करीत आहे,

''हे इस्राईलच्या संततीनो, आठवण करा माझ्या अनुग्रहाची ज्याने मी

तुम्हाला उपकृत केले होते. आणि जगातील सर्व जनसमूहावर श्रेष्ठत्व प्रदान केले होते. आणि त्या दिवसाचे भय बाळगा जेव्हा कुणीही कुणाच्या यत्किंचितही उपयोगी पडणार नाही.'' (२:४७)

जेव्हा कृतघ्नता ते करू लागले आणि धर्माकडे दुर्लक्ष केले तर अल्लाहने त्यांना दिलेले मोबदले त्यांच्यापासून काढून घेतले. प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या आगमनापर्यंत बनीइस्राईलची स्थिती अत्यंत बिकट बनली होती. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

''तोराह आणि इंजिल तसेच त्यांच्या निर्माणकर्त्याने त्यांच्यावर अवतरित केलेले दिव्य प्रकटनांचा त्यांनी जर स्वीकार केला असता तर त्यांना जमिनीखालून तसेच आकाशातून उपजीविका मुबलक प्रमाणात उपलब्ध झाली असती.'' (५:९६)

वरील आयतींमध्ये एका खास समूहाला उद्देशून दिव्य प्रकटने आलेली आहेत. किंवा विशिष्ट राष्ट्राला उद्देशून दिव्योक्ती झालेली आहे. आता आपण पाहू या की समस्त राष्ट्रांना उद्देशून काय दिव्य प्रकटने कुरआनमध्ये आलेली आहेत.

''जर राष्ट्रांतील लोकांनी श्रध्दा ठेवली असती व त्यांनी ईशपरायणतेचे वर्तन अंगिकारले असते तर आम्ही त्यांच्यावर आकाश व पृथ्वीतील समृध्दीची दारे उघडले असती.'' (७:९६)

हे त्यांच्यासाठी स्मरण आहे ज्यांनी सत्याचा मार्ग सोडलेला होता. त्यांनी ईशपरायणतेचे वर्तन अंगिकारले नव्हते अन्यथा अल्लाहच्या इष्टवचनाला ते पात्र ठरले असते ज्यानी सत्यमार्ग अवलंबिला त्यांना अल्लाहने विपुल मोबदला दिला कुरआनोक्ती आहे,

''सरतेशेवटी अल्लाहने त्यांना जगातील लाभ देखील दिले व त्याहून श्रेष्ठतर पारलौकिक जीवनातील लाभदेखील प्रदान केले. अल्लाहला असेच सत्कर्मी लोक पसंत आहेत.'' (३:१४८)

प्रेषित्वाचे कार्य आज जगापुढे आहे, त्यांनी अल्लाहचा आदेश आणि त्याच्या मार्गदर्शनाचे स्पष्ट प्रमाण जगाला घालून दिले. अल्लाहच्या आज्ञाधारकतेत पारलौकिक जीवनाचीच सफलता प्राप्त होते असे नाही तर या इहलोकात आदर, सन्मान, समृध्दी, सत्ता प्राप्त होते. जेव्हा जेव्हा राष्ट्रांनी अल्लाहची आज्ञाधारकता स्वीकारली होती तेव्हा अल्लाहने आपले वचन पाळले होते. त्यांचे पारलौकिक जीवन फक्त सफल झाले नाही तर या जगातसुध्दा त्यांची सर्वांगीण प्रगती झाली होती. हे

ऐतिहासिक सत्य आहे.

भौतिक समृद्धी आणि इस्लाम

भौतिक सुखसमृध्दीसाठी दिलेले वचन हे मुस्लिम आणि इतर सर्व राष्ट्रांसाठी आहे. हे वचन प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या मक्का कालखंडातील विपरीत स्थितीत दिले गेले आहे. तसेच मदीना कालखंडातील खडतर स्थितीतसुध्दा याच वचनांची पुनरावृत्ती झाली आहे. ज्यांनी इस्लामचा स्वीकार केला नव्हता आणि ज्यांनी इस्लाम स्वीकारलेला होता अशा सर्वांनाच हे वचन अल्लाहने दिले होते. मक्कावासियांना जेव्हा इस्लाम स्वीकारण्याचे आवाहन केले त्या वेळी कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"आणि तुम्ही आपल्या पालनकर्त्यापाशी क्षमायाचना करा आणि त्याच्याकडे परतून या तर तो तुम्हाला एका विशिष्ट मुदतीपर्यंत चांगली जीवनसामग्री देईल आणि प्रत्येक श्रेष्ठीला त्याचे श्रेष्ठत्व प्रदान करील." (११:३)

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी मक्कावासियांना आश्वस्त केले,

"जर तुम्ही मार्गदर्शनाचा स्वीकार केला तर हे तुमच्या ऐहिक जीवनाच्या आणि पारलौकिक जीवनाच्या भल्यासाठी आहे." (इब्ने हिशाम खंड १ ला)

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी आपल्या चुलत्यासमोरसुध्दा ईशसंदेश ठेवताना खुलासा केला,

"मी त्यांना (कुरैश) बजावून सांगितले एका गोष्टीसाठी फक्त की ज्याच्या प्रभावाखाली संपूर्ण अरब त्यांच्यापुढे लोटांगण घेईल आणि अरबेतर लोक त्यांना आदराने पाहतील." (मसनद अहमद खंड १ ला)

कुरैश लोकांना (मक्कावासी) त्यांच्या भल्यासाठी आश्वासन देताना कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"वैफल्यग्रस्त होऊ नका दुःखी होऊ नका, तुम्हीच प्रभावी ठराल जर तुम्ही श्रध्दावंत असाल." (३:१३९)

श्रध्दाशीलतेच्या अटी पूर्ण केल्यानंतर आणि सदाचारी बनून राहिल्यानंतर अल्लाहने आपले ईष्टवचन पूर्ण केले त्याला उघड्या डोळ्याने संपूर्ण जगाने पाहिले आहे. हे ऐतिहासिक उघड सत्य आहे की इस्लामने मुस्लिमांना या जगात सर्व काही दिले जे त्यांना पाहिजे होते.

इस्लामने त्याच्या अनुयायींना भौतिक समृध्दी विपुल प्रमाणात दिली. परंतु ही समृध्दी कोणत्या मार्गाने आणि कशी आली हे पाहणे आवश्यक आहे. जर धर्म फक्त आणि फक्त पारलौकिक जीवनासाठीच प्रशिक्षित करीत असेल आणि या जगाशी संबंध तोडत असेल तर या जगात यशप्राप्ती कशी होणार? एक व्यक्ती धर्मावर पूर्ण आचरण करतो आणि त्याच वेळी या जगाच्या सुखांचासुध्दा उपभोग घेतो हे कसे शक्य आहे? या प्रश्नांचे उत्तर देण्यासाठी आणि या जटीलतेची उकल करण्यासाठी आपणास इस्लाम धर्माच्या मूलतत्त्वांचाच आधार घ्यावा लागेल.

(१) धन संपत्ती, सत्ता, आदरसन्मान इ. या भौतिक जगाच्या समृध्दीचे द्योतक आहेत. हे सर्व अल्लाहच्या देणग्या आहेत. बनी इस्राईलनी जे भौतिक सुख उपभोगले होते तेसुध्दा अल्लाहच्या देणग्या होत्या. कुरआनोक्ती आहे,

"आठवा तो प्रसंग जेव्हा मूसा (अ.) यांनी आपल्या लोकांना सांगितले होते की, हे माझ्या बांधवांनो! अल्लाहच्या त्या देणग्या ध्यानात घ्या जे त्याने तुम्हाला प्रदान केले. त्याने तुमच्यात नबी (प्रेषित) निर्माण केले. तुम्हाला सत्ताधारी बनविले आणि तुम्हाला ते सर्व काही दिले जे या जगात कोणालाच दिले नव्हते."

(५:२०-२१)

याचप्रमाणे अध्याय क्रमांक १६ (सूरे नहल) मध्ये जीवनाच्या साधनसामुग्रीला आणि समृध्दीला अल्लाहची कृपा म्हणून कुरआन संबोधन करीत आहे,

"अल्लाह एका वस्तीचे (राष्ट्राचे) उदाहरण देत आहे. ती सुखासमाधानाचे जीवन व्यतीत करीत होती आणि चहुकडून तिला विपुल उपजीविका पोहचत होती की तिने अल्लाहच्या देणग्यांशी कृतघ्नता दर्शविण्यास प्रारंभ केला." (१६:११२)

तसेच सुरह जुमा आणि इतर ठिकाणी या गोष्टींना कुरआन अल्लाहच्या देणग्या (कृपा) म्हणून संबोधत आहे,

"मग जेव्हा नमाज पूर्ण होईल तेव्हा भूतलावर पसरले जा आणि अल्लाहच्या कृपा प्रसादाचा शोध घ्या. आणि अल्लाहचे मोठ्या प्रमाणात स्मरण करीत राहा कदाचित तुम्हाला सफलता प्राप्त होईल." (६२:१०)

(२) मनुष्याची निर्मिती ह्या भूतलावर अल्लाहचा प्रतिनिधी या रूपात झाली आहे. या जगाची व्यवस्था त्याने आपल्या हातात घेऊन अल्लाहच्या म्हणजेच

आपल्या निर्माणकर्त्याच्या मार्गदर्शनानुसार चालवावी. जर हे लक्षात ठेवले तर आपल्याला कळून येईल की धनसंपत्ती, आदरन्मान आणि सत्ता या गोष्टी धर्माविरूध्द नाहीत. कारण ज्या गोष्टी अल्लाहच्या देणग्या आणि कृपाप्रसाद आहेत त्या धर्मनिष्ठ माणसांसाठीच आहेत. त्यांना त्यापासून कोणीही दूर ठेऊ शकत नाही. कुरआनोक्ती आहे,

"हे पैगंबर (स.) यांना सांगा की कोणी अल्लाहच्या त्या भूषणाला अवैध करून टाकले ज्याला अल्लाहने आपल्या भक्तांसाठी निर्मिले होते आणि कोणी अल्लाहने प्रदान केलेल्या विशुध्द वस्तूंना प्रतिबंध केला? सांगा, या साऱ्या वस्तू ऐहिक जीवनातसुध्दा श्रध्दावंतांसाठी होत आणि मरणोत्तर जीवनात तर खास त्यांच्यासाठीच असतील. अशा प्रकारे आम्ही आपल्या गोष्टी स्पष्टपणे मांडतो त्या लोकांसाठी ज्यांना ज्ञान आहे." (७:३२)

याचाच अर्थ हा आहे की जगाची साधनसंपत्ती, समृध्दी सर्वकाही अल्लाहच्या आज्ञाधारक लोकांसाठी (श्रध्दावंतांसाठी) आहेत. मग अशा वेळी श्रध्दावंतांना या गोष्टीपासून अलिप्त कसे राहता येईल? भौतिक जगाची सुखसमृध्दी, साधनसामुग्री तर अल्लाहच्या देणग्या आणि कृपाप्रसाद आहेत. मानवनिर्मितीचा उद्देश डोळ्यापुढे ठेवला तर लक्षात येईल की अल्लाहने मनुष्याला या जगात त्याचा प्रतिनिधी म्हणून पाठविले आहे. जगात मनुष्याने अल्लाहच्या मार्गदर्शनानुसार जीवन व्यतीत करावे आणि अल्लाहची इच्छा या जगात मनुष्याने पूर्ण करावी. जोपर्यंत अशी माणसे अल्लाहचे खरेखुरे प्रतिनिधी या जगात आहेत त्यांना अल्लाहच्या देणग्यांपासून दूर कोणीच ठेवू शकत नाही.

ही सत्ता आणि जबाबदारी अशा माणसांच्या सुपूर्द करावी जे प्रतिनिधीचे कार्य स्वीकारत नाही आणि अल्लाहची आज्ञाधारकता न स्वीकारता इतर कुणाच्या सार्वभौमत्वाला स्वीकारतात. हे अगदी अतार्किक असे कृत्य आहे. अशा विद्रोही लोकांच्या हातात जगाची सत्ता आणि जबाबदारी अल्लाह देत नाही. कुरआनोक्ती आहे,

"आम्ही हे लिहून ठेवले आहे की पृथ्वीचे वारस आमचे सदाचारी दास ठरतील. यात एक मोठी वार्ता आहे भक्तीमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी." (२१:१०५)

दुसरीकडे अल्लाहच्या आज्ञाधारक आणि सदाचारी दासांना हे शोभत नाही की त्यांनी सत्तेला दुर्लक्षित करून त्यापासून दूर राहावे कारण सत्तेविना ते आपले

अल्लाहच्या प्रतिनिधीचे कर्तव्य पार पाडूच-शकत नाहीत. त्यांच्या जीवनाचे खरे ध्येय हे करमणूक नाही तर एक अनिवार्य असे कार्य आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर स्पष्ट होते की मुस्लिम फक्त पारलौकिक जीवनातील कल्याणाचाच इच्छुक नाही. त्याला अधिकार आहे या जगातील समृध्दीला प्राप्त करण्याचा! याचमुळे एक मुस्लिम अल्लाहपुढे नेहमीच प्रार्थना करतो,

''हे आमच्या पालनकर्त्या, आम्हाला या या जगातील सुद्धा चांगले फळ दे आणि पारलौकिक जीवनामध्ये सुद्धा चांगले फळ दे आणि नरकाग्नीच्या यातनांपासून आम्हाला वाचव.'' (२:२०१)

ही प्रार्थना अल्लाह जरूर स्वीकारतो जेव्हा मुस्लिम हे सिध्द करून दाखवितो की तो इस्लामची साक्ष देण्यास पात्र आहे.

आता वरील प्रश्नाच्या उत्तरातील एक भाग येथे स्पष्ट करणे बाकी आहे. जर मुस्लिम पात्र आणि योग्यता सिध्द करून पारलौकिक जीवनातील आणि या जगातील कल्याणाची मागणी करतो तरी दिव्य कुरआन आणि हदीस या मागणीला वारंवार रद्द का करतो? मुस्लिमेतर आपले डोळे सतत पारलौकिक जीवनाकडे लावून बसतो आणि भौतिक सुखांना पारलौकिक जीवनाच्या तुलनेत तुच्छ समजतो.

ज्या जगाचा इस्लाम धिक्कार करतो ते जग अगदी वेगळे जग आहे आणि ज्या जगाच्या कल्याणाची एक मुस्लिम मागणी करतो ते जग वेगळे आहे. जे जग व्यक्तीला आपल्या निर्माणकर्त्याचा विसर पाडतो आणि त्याबद्दल निष्काळजी बनवतो अशा जगाचा इस्लाम धिक्कार करतो. कुरआन आणि हदीसमध्ये ज्या जगाचा धिक्कार केला आहे ते हे जग आहे ज्यात अल्लाहचा विसर पडतो आणि मनुष्य अल्लाह आणि त्याच्या धर्माबद्दल निष्काळजी बनून राहतो. ज्या विश्वात अल्लाहचा विसर पडला जात नाही आणि त्याला आणि त्याच्या धर्माबद्दल निष्काळजीपणा दाखविला जात नाही किंबहुना या कामी मदतच केली जाते अशा विश्वाला रद्द करणे अथवा त्याचा धिक्कार इस्लाम मुळीच करत नाही. धर्मसुध्दा अशा विश्वाला अवैध ठरवत नाही. अशा प्रकारचे विश्व हे मान्यताप्राप्त (धर्मसंमत) आणि मुस्लिमांच्या प्रार्थनेत अपेक्षित असते. कुरआन अशा विश्वाला रद्द करत नाही तर 'जगाचा चांगुलपणा', 'चांगले जीवन' आणि 'जगाचा मोबदला' अशा उपाधी देऊन त्या विश्वाला अलंकृत करतो. जेव्हा मुस्लिमांसाठी 'जगाचे कल्याण' हा शब्दप्रयोग कुरआन करतो त्या वेळी वरीलप्रमाणे जग अपेक्षित असते. एखादा म्हणू शकतो की 'अल्लाहचा विसर' आणि 'धर्मकर्तव्याबद्दल निष्काळजीपणा' हे मनुष्यसापेक्ष आहे, त्यांचा भौतिकतेशी

काही एक संबंध नाही. अल्लाहचा विसर एखाद्याला एखाद्या गोष्टीपासून झाला तर दुसऱ्या व्यक्तीला तसा परिणाम होणारसुध्दा नाही. सर्वसाधारण मनुष्य थोड्याशा धनसंपत्तीमुळे स्वतःचा तोल सोडतो परंतु उमर बिन अब्दुल अजीज (रजि.) यांच्यासारखी माणसे सर्वसत्ताधारी असूनसुध्दा एक क्षण अल्लाहचा विसर पडू देत नाही. म्हणून प्रत्यक्षात मनुष्यसापेक्षता सर्रास याविषयी लागू पडत नाही. वस्तूस्थिती अशी आहे की धनसंपत्ती, आदरसन्मान, सत्ता या गोष्टी मूलतः वाईट नाहीत तर व्यक्तीचे विचार आणि या गोष्टींचा वापर त्यांना मनुष्यासाठी हानिकारक बनवतात. इस्लामची ही धारणा आहे की मुस्लिम या गोष्टींचा गैरवापर करत नाही. कारण त्यांना अल्लाहने मनुष्यांसाठी प्रदान केले आहे आणि त्यांचा वापर अल्लाहच्या मर्जीप्रमाणे तो करतो. अशा स्थितीत या भौतिकतेचा अल्लाह धिक्कार करतो हा प्रश्नच उद्‌भवत नाही. या स्थितीत मुस्लिम या जगाला एक सुंदर जग बनवतो.

दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर हे आहे की पारलौकिक जीवनास या नश्वर जगावर प्राधान्य देणे म्हणजे हे भौतिक जग सोडून देणे असा होत नाही. याचा वास्तविक अर्थ हा होतो की भौतिक लाभप्राप्तीमागे लागून एखाद्याने धर्माबाबत निष्काळजी बनू नये आणि पारलौकिक जीवन नष्ट करू नये. पारलौकिक जीवाचे कल्याण प्राप्त करण्यासाठी मनुष्याला आपल्या आशा–आकांक्षांना लगाम लावून भौतिक सुखाचा त्यागसुध्दा करावा लागतो. याचा अर्थ भौतिक जीवनाचाच त्याग हा होत नाही. उदा. एका घोड्याला कसून बांधणे की त्याला हालचालसुध्दा करता येऊ नये आणि दुसऱ्या घोड्याला बांधून ठेवले तर असा घोडा घास खाऊ शकतो आणि आजूबाजूला जाऊन फिरून घास खाऊ शकतो. परंतु पहिल्या प्रकारचा घोडा यापासून वंचित राहतो. या उदाहरणावरून हे स्पष्ट होईल की दुसऱ्या प्रकारच्या घोड्याला जसे सीमित स्वातंत्र्य आहे त्याचप्रमाणे एक मुस्लिम पारलौकिक जीवनाला या भौतिक जीवनावर प्राधान्य देतो. जगातील सीमित सुख–समाधान, धनसंपत्ती त्याच्यासाठी वैध असते. पारलौकिक जीवनाच्या कल्याणासाठी भौतिक जीवनाचा त्याग इस्लामला अपेक्षित नाही. वरील 'सुरे आले इमरान'ची आयत आपण गांभीर्याने विचारात घेतली तर लक्षात येईल की जे खरे श्रध्दावंत आहेत आणि सदाचारी आहेत त्यांना पारलौकिक जीवनातच फक्त मोबदला दिला जातो असे नाही तर या जगातसुध्दा त्यांना अल्लाहचा कृपाप्रसाद प्राप्त होतो. जो मनुष्य अल्लाहचा दास आहे आणि तो पारलौकिक जीवनाला या जगावर प्राधान्य देतो अशा माणसाला या जगात मोबदला मिळाला तर ते एक प्रमाण आहे अल्लाहच्या ईष्टवचनाचे म्हणजेच

पारलौकिक जीवनाला या जगावर प्राधान्य देणे म्हणजे या जगाचे कल्याण साधणे होय. या जगाच्या कल्याणापासून वंचित मग तो मनुष्य राहणार नाही.

भौतिक समृध्दीसाठी अटी

श्रध्दाशीलता आणि सदाचरण हे फक्त पारलौकिक जीवनाच्या कल्याणासाठीच आवश्यक आहेत असे नाही तर या जगातील कल्याण साधण्यासाठीसुध्दा तितकेच आवश्यक आहेत. याचाच अर्थ असा आहे की या जगाच्या कल्याणाचे द्वार हे श्रध्दाशील आणि सदाचरणी माणसासाठी खुले आहेत. या सत्याला पुराव्याची गरज नाही. म्हणून राष्ट्रांच्या भलाई आणि कल्याणासाठीसुध्दा हीच अट आहे आणि होती. जेव्हा मुस्लिमांना अनेकेश्वरवादींवर विजय प्राप्त होत असे तेव्हा "तुम्ही खरे श्रध्दाशील आहात" आणि त्यांना राजसत्तेचे आश्वासन दिले जात, ते याच अटीवर की ते मुस्लिम राष्ट्र एक श्रध्दाशील आणि सदाचारी राष्ट्र आहे. कुरआनोक्ती आहे,

"अल्लाहने वचन दिले आहे तुमच्यापैकी त्या लोकांना जे श्रध्दा ठेवतील आणि सत्कृत्ये करतील. तो त्यांना पृथ्वीतलावर त्याचप्रमाणे खलीफा (आपला नायब) बनवील ज्याप्रमाणे त्यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या लोकांना बनविलेले आहे."
(२४:५५)

थोडक्यात अल्लाहचा हा सर्वसाधारण वचन देण्याचा शिरस्ता आहे की तो श्रध्दावंतांना या जगात सुखसमृध्दी देतो. तेसुध्दा या सर्वसाधारण अटींवर की तो मनुष्य अथवा राष्ट्र हे श्रध्दाशील आणि सदाचारी असणे आवश्यक आहे. दोन्ही जगाचे यश या अटीवर अवलंबून आहे. मनुष्य अशा स्थितीत मानसिक स्वास्थ्य, आदरसन्मान, प्रसिध्द्व धनसंपत्ती या जगात प्राप्त करतो आणि तो तसतसा अल्लाहकडे जास्त आकृष्ठ होतो व पारलौकिक जीवनास या नश्वर जगावर प्राधान्य देऊ लागतो. हदीसमध्ये आहे,

"जो आपल्या सर्व चिंता काळजी एका चिंतेत परिवर्तीत करतो ती चिंता म्हणजे पारलौकिक जीवनाचा ध्यास होय. मग अशा व्यक्तीच्या नश्वर जगाची काळजी अल्लाह घेतो. आणि ज्याचे मन निरनिराळ्या चिंतेमुळे भरलेले असते. तत्वज्ञानाची आणि ह्या जगाची चिंता मग अशा व्यक्तीची हत्त्या कोठे होईल याची अल्लाहला पर्वा नाही." (इब्ने माजा)

दुसऱ्या एका हदीसमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे,

"जो कोणी पारलौकिक जीवाला आपल्या या आयुष्याचे ध्येय मानतो. अल्लाह त्याचे कार्य सिध्दीला नेतो आणि त्याचे मन उदार बनवितो आणि हे जग त्याच्यापुढे मग लोटांगण घेऊ लागते." (इब्ने माजा)

याच तत्त्वावर राष्ट्र जीवनात कल्याण प्राप्त होते. स्वातंत्र्य, धनसंपत्ती, आदरसन्मान, आंतरराष्ट्रीय पत इ. प्राप्त होते जर ते राष्ट्र श्रध्दाशील राष्ट्र असेल. एकीकडे श्रध्दावंत आणि सदाचारी लोक आणि दुसरीकडे एक सशक्त संस्थात्मक समुदाय अल्लाह आणि प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या आज्ञांकित असलेला. ही अट सर्व राष्ट्रांना एक सारखी लागू होते असे म्हणणे चुकीचे आहे. कोणी द्रोही राष्ट्रसुध्दा सत्ताप्रप्तीच्या उच्च शिखरावर आरूढ असेल, परंतु त्यासाठी मुस्लिम (श्रध्दावंताला) सूट देता येत नाही. त्यांच्यासाठी एकमेव मार्ग सत्ताप्राप्तीचा आहे तो म्हणजे इस्लामचा मार्ग आहे. हा अल्लाहला समर्पित होण्याचा मार्ग आहे. सरळमार्ग जो सत्याची साक्ष देण्याकडे नेतो. हा फरक यासाठी आहे की मुस्लिम राष्ट्राचे (आज्ञाधारक राष्ट्र) म्हणजेच इस्लामी राष्ट्राचा उदय आणि अस्तासाठी इतरांसारखा नियम अल्लाहने निश्चित केलेला नाही. इतरांसाठी त्यांनी जर काही नैतिक गुणांना आत्मसात करून त्या द्वारे भौतिक प्रगतीच्या उच्च शिखरावर पोहचणे शक्य आहे. परंतु मुस्लिमांसाठी मात्र असे नाही. ते अल्लाहच्या धर्मचे ध्वजवाहक आहेत आणि सत्याची साक्ष इतरांसमोर देण्यासाठी बाध्य आहेत. इतर कोणतेच राष्ट्र या भूमिकेत असत नाही. परिस्थितीतील हा फरक नंतर कर्तव्य आणि जबाबदारीतसुध्दा फरक निर्माण करतो. त्यांच्या कर्तव्य आणि जबाबदारीतील फरकामुळे स्वभावत: त्यांच्यासाठी वेगळे विधी नियम लागू होतात. जर इतर राष्ट्र सत्य मार्गापासून दूर गेले तर त्यांचा हा अपराध इतका गंभीर आणि यातनादायक समजला जात नाही जितका की हाच अपराध एका मुस्लिम (श्रध्दाशील) राष्ट्राकडून घडला जातो. म्हणून अल्लाहची आज्ञाधारकता न स्वीकारता इतर राष्ट्रांना प्रगती आणि समृध्दी प्राप्त होत जाते तर या शॉर्टकटसाठी मुस्लिमांना परवानगी दिली जात नाही. आज्ञाधारक राष्ट्राला जर अल्लाहचा मोबदला मिळाला नाही, तर त्याने त्याची कदर केली नाही हे सिध्द होते आणि ते राष्ट्र अल्लाहच्या कोपला सामोरे जाते. याबद्दलचे कुरआनमध्ये अनेक ऐतिहासिक पुरावे उपलब्ध आहेत.

हे सत्य आहे की मुस्लिम (आज्ञाधारक) राष्ट्र या जगात सत्ता आणि वैभव प्राप्त करते जेव्हा ते आपल्या निर्माणकर्त्याचे पूर्ण अधिन होतात. त्याची आज्ञाधारकता स्वीकारून सदाचारी बनतात. हे ऐतिहासिक सत्य आजपासून

पंधराशे वर्षांपूर्वीचे आहे. मुस्लिमांनी खऱ्या मुस्लिमांसारखी वागणूक ठेवली तेव्हा त्यांना राजसत्ता आणि वैभव संपन्नता प्राप्त झाली होती जी आज अमेरिकासुध्दा उपभोगू शकत नाही. जेव्हा मुस्लिम 'आज्ञारक राष्ट्र'च्या स्थितीपासून दूर जाऊन एक सर्वसामान्य राष्ट्र बनून राहिले तेव्हा त्यांना या खास हक्कापासून अल्लाहने वंचित ठेवले. आता तर त्यांची स्थिती नगण्य झाली आहे. मुस्लिमांच्या सद्यस्थितीचे द्योतक आहे की त्यांचा तो ''सुवर्ण काळ'' ते स्वत: सुधारल्याशिवाय पुन्हा प्राप्त होणार नाही. ग्रंथधारकांबाबत अल्लाहने घेतलेला निर्णय कुरआनमध्ये सुरक्षित आहे.

''हे *ग्रंथधारकांनो, तुम्ही कदापि कोणत्याच मुलाधारावर नाही जोपर्यंत तौरात व इंजील आणि त्या इतर ग्रंथावर तुम्ही दृढ राहात नाही. जे तुमच्याकडे तुमच्या पालनकर्त्याकडून अवतरित केले गेले आहेत.''* (५:६८)

वरील कुरआनोक्ती मुस्लिम (आज्ञाधारक) राष्ट्राच्या भविष्याकडे निर्देश करत आहे. जर ते कुरआनबरहुकूम धर्म प्रस्थापना करण्यात अयशस्वी झाले तर ते सरळ आणि सत्य मार्गावर नाहीत. हे वरील दिव्योक्ती सिध्द करत आहे. आणि ते त्या आदर सन्मानास, वैभवसंपन्नतेस आणि राज्यसत्तेसाठी पात्र ठरूच शकत नाहीत.

मुस्लिमांचे भविष्य हे त्यांच्या वर्तमानापासून वेगळे तेव्हाच होऊ शकते जेव्हा ते त्यांच्या भूतकाळात प्रवेस करतील. त्यांच्यावर अल्लाहच्या कृपाप्रसादाचा वर्षाव तेव्हाच होणार जेव्हा त्यांच्या जीवनात अल्लाहचा धर्म प्रभावशाली बनेल. जेव्हा त्यांच्या मशिदीतील धर्म आणि त्यांच्या शासनव्यवस्थेचा धर्म एक असेल. जेव्हा मुस्लिमांची ही उत्कट इच्छा बनेल तेव्हाच अल्लाह त्यांची इच्छापूर्ती करेल.

येथे अल्लाहच्या दुसऱ्या आदेशावर विचार करणे उचित ठरेल. त्यात म्हटले आहे की राष्ट्रीय स्वातंत्र्य, आदर आणि वैभवसंपन्नता हे सर्व राष्ट्रासाठी आहे. त्यांचा मुस्लिमांवर वर्षाव होणार नाही. याच कारणामुळे अल्लाहचे इष्टवचन हे लोक समुदायासाठी (राष्ट्र) आहे व्यक्तीसाठी वैयक्तिक नव्हे. जर मुस्लिम अशा प्रकारचा लोक समुदाय (राष्ट्र) आहे की जो अल्लाह आणि प्रेषित मुहम्मद (स.) यांना अभिप्रेत आहे. म्हणजे तो लोक समुदाय (राष्ट्र) श्रध्दाशील, सदाचारी आणि सत्याची साक्ष देणारा आहे तर असा मुस्लिम (आज्ञाधारक) लोकसमुदाय-(राष्ट्र) आदरसन्मान आणि वैभव संपन्नतेला पात्र आहे. जर ते असे नसतील तर ते इस्लामच्या ऐहिक सुखसमृध्दीला पात्र ठरणार नाहीत. मग संख्येत ते कितीही मोठे असोत. काहींच्या धर्मनिष्ठेमुळे मुस्लिम लोकसमुदायास काही एक फायदा होणार नाही. चांगले आणि वाईट, आळसी आणि कार्यशील अशा सर्वांनाचा ही कडुफळ चाखावी लागतील.

शक्य आहे की धर्मनिष्ठ आणि सदाचारी लोकांना व्यक्तीश: सांसारिक फायदे प्राप्त होत राहतील जरी ते दुष्कृत्यें सामुदायिकरित्या करीत राहिलेत. परंतु काहींच्या धर्मनिष्ठेने आणि सदाचारामुळे लोकसमुदायाचा फायदा न होता लोकसमुदायाच्या सामुदायिक दुष्कृत्यांमुळे संपूर्ण समुदाय (राष्ट्र) लयास जाईल.

गैरसमजुती आणि त्यांचे निराकरण

या जगातील फायद्याविषयी वेगळा संदर्भ घेऊन गैरसमजुती निर्माण होतात. कारण अशा लोकांना नेहमीच कोणत्याही गोष्टींबाबत खोलवर जाऊन विचार करण्याची सवय नसते. कारण हे लोक नास्तिक बुध्दीचे आणि संशयखोर वृत्तीचे असतात. ते सांगू शकतात की असा अनुभव व्यवहारात सापडत नाही. अनेकानेक असे प्रसंग दाखवितात की एक खरा मुस्लिम या जगात सर्व सामान्य गरीबीचे जीवन जगतात. त्यांच्या नशीबी कायमचेच हालाखीचे जीवन आहे. परंतु जे नावाचे मुस्लिम आहेत ते मात्र या जगात चैनीचे आयुष्य जगतात, मानसन्मान आणि प्रसिध्दी त्यांच्या पायाशी लोटांगण घेत असते. काही मुस्लिम राष्ट्रे की स्वत: ला मुस्लिम म्हणणे त्यांना आवडत नाही. नावापुरते मुस्लिम म्हणणेसुध्दा अशा राष्ट्रांना नकोसे होते. ती राष्ट्रे स्वातंत्र्य पुरेपूर उपभोगत आहेत आणि सुखसमृध्दीने ओतप्रोत आहेत. परंतु असे मुस्लिम देश जे इस्लामी कायदे अमलात आणण्यासाठी प्रयत्नशील राहतात, ते इतर देशांवर अवलंबून असतात आणि खडतर स्थितीला तोंड देत राहतात. अशा स्थितीत इस्लामच्या ऐहिक लाभाबद्दलचे वचन आणि तत्वें यात सुबोधता दिसत नाही. म्हणून हे गैरसमज दूर करणे आवश्यक आहे.

वैयक्तिक कल्याणाचा प्रश्नाबाबत लोकांचा गैरसमज होतो. ज्यांना इस्लामच्या ''ऐहिक सुख'' या संकल्पनेची पूर्ण कल्पना नसते. ही संकल्पना सर्वसाधारण संकल्पनेपेक्षा अगदी वेगळी आहे. म्हणून इस्लामी ऐहिक सुखाबद्दल सर्वप्रथम जाणून घेणे आवश्यक आहे. खालील कुरआनोक्तीने खऱ्या मुस्लिमासाठीच्या ऐहिक सुखाबद्दलच्या इष्टवचनाची स्पष्ट कल्पना येते,

''आणि आम्ही जरूर संयम बाळगणाऱ्यांना त्यांचे मोबदले त्यांच्या उत्तम कर्मानुसार देऊ. जो कोणी सत्कर्म करील मग तो पुरुष असो अथवा स्त्री मात्र तो श्रध्दावंत असावा, त्याच्याकडून आम्ही जगात निर्मळ जीवन व्यतीत करवू आणि (परलोकात) अशा लोकांना त्यांचा मोबदला त्यांच्या उत्तम कृत्यानुसार प्रदान करू.''

(१६:९७)

तसेच दुसऱ्या ठिकाणी कुरआन स्पष्टोक्ती या संदर्भात आहे,

"जो कोणी माझ्या या मार्गदर्शनाचे अनुसरण करील तो भटकणारही नाही आणि दुर्भाग्यात गुरफटणारही नाही जो माझे 'जिक्र' (उपदेशपाठ) पासून तोंड फिरवील त्याच्यासाठी त्याचे जीवन अडचणीचे होईल." (२० : १२२-१२३)

वरील कुरआनोक्तीने हे स्पष्ट होते की या जगाचे कल्याण माणसाला प्राप्त होते ते त्याच्या श्रध्दाशीलतेनुसार आणि सदाचारी जीवनानुसारच आहे. हे 'सदाचारी जीवन' पूर्ण काळजीरहित आणि चिंतामुक्त असे असते. दुसऱ्या शब्दांत हे सदाचारी जीवन काही भौतिक सुख विलासात लोळत नाही. त्याच्याकडे अलिशान बंगला, आरामशीर कार, नोकरचाकर, धनसंपत्ती, खाण्यापिण्याचा आणि कपड्यालत्याचा श्रीमंती थाट नसतो. याव्यतिरिक्त त्याच्याजवळ जीवनाच्या सर्व आवश्यक गरजांची पूर्तता विपुल प्रमाणात असते आणि त्याला आत्मिक समाधान प्राप्त झालेले असते. भरमसाठ संपत्ती मनुष्याला झोपण्यासाठी झोपेच्या गोळ्या घेण्यास बाध्य करते. आणि असा मनुष्य नेहमी चिंताग्रस्त असतो. अशा माणसाचे मन अनेक दडपणाखाली, भीतीपोटी दबलेले असते. त्याला मानसिक स्वास्थ्य अजिबात नसते. त्याचे जीवन तीव्र दु:ख, वेदना आणि व्यथेनं भरलेले असते. अशी ही धनसंपत्ती समृध्दीच्या स्त्रोत नसून दयनीय अवस्थेचे लक्षण आहे. जेव्हा मनुष्य अल्लाहला विसरून जातो आणि पारलौकिक जीवनाचासुद्धा त्याला विसर पडतो तेव्हा ह्या प्रकारची धनसंपत्ती त्याला मिळू लागते. भ्रष्टाचारातून, धोकेबाजी करून तो संपत्ती गोळा करतो आणि धडपडणाऱ्या किड्यापेक्षा जास्त गरीब बनतो आणि भिकारीपेक्षा जास्त दरिद्री बनून राहतो. या उलट श्रध्दाशील अल्लाहचा आज्ञाधारक आणि सदाचारी माणसाला त्याच्या जीवनावश्यक वस्तूंचा पुरेपूर पुरवठासुध्दा आत्मिक समाधान मिळवून देते. कुरआनोक्ती आहे,

"असलेच लोक आहेत ते ज्यांनी (या पैगंबराचे आवाहन) मानले आहे आणि त्यांच्या हृदयांना अल्लाहच्या स्मरणाने समाधान प्राप्त होते जाणून असा! अल्लाहचे स्मरणच ती गोष्ट आहे ज्याने हृदयाला समाधान लाभत असते. मग ज्या लोकांनी सत्य आवाहनास मानले आणि सत्कर्मे केली, ते सुदैवी आहेत आणि त्यांच्यासाठी चांगला शेवट आहे." (१३:२८-२९)

जर एखाद्याचे हृदय अल्लाहच्या स्मरणाने रिकामे नसेल तर तो धर्मनिष्ठ असतो. आणि त्याला धर्मनिष्ठता प्राप्त होते. अशा साठीच अल्लाहने स्पष्ट केले आहे की अशा श्रध्दावंताची काळजी मी स्वत: उचलतो. कुरआनोक्ती आहे,

"जो कोणी अल्लाहच्या कोपाला भिऊन काम करील, अल्लाह त्याच्यासाठी अडचणीतून निघण्याचा एखादा मार्ग निर्माण करून देईल आणि त्याला अशा मार्गाने

उपजीविका देईल जी त्याच्या कल्पनेतदेखील नसेल. जो अल्लाहवर भिस्त ठेवील त्याच्यासाठी तो पुरेसा आहे. अल्लाह आपले कार्य सिध्द करूनच राहतो. अल्लाहने प्रत्येक वस्तूसाठी एक प्रमाण निश्चित करून ठेवले आहे.'' (६५:२-३)

समाजाच्या अथवा राष्ट्राच्या सामुदायिक कल्याणाचा विचार केला असता साधरणात: मुस्लिम देश इस्लामपासून दूर असतील आणि तरीदेखील स्वतंत्र आणि सत्ताधीश असण्याचा दावा करतात तर त्यांचा हा दावा खोटा आहे. त्यांनी राष्ट्र कल्याणाचा आणि सुखसमृध्दीचा, स्वातंत्र्याचा मुखवटा घातला आहे. खरेतर अशी राष्ट्रे सत्ताधीश नाहीत की स्वतंत्रसुध्दा नाहीत. त्यांच्यातील बहुतेक अमेरिकेच्या तालावरच नाचणारी आहेत.

परंतु काही मुस्लिम राष्ट्रे जी इस्लामी तत्त्वानुसार चालतात परंतु ती कमजोर आणि इतरांवर अवलंबून आहेत तीसुध्दा इस्लामी राष्ट्र नाहीत. यांच्यापैकी कोणत्याच राष्ट्राजवळ ही हिंमत नाही की राष्ट्राच्या सामाजिक क्षेत्रात, राजकीय क्षेत्रात इस्लामी तत्त्वांचा अंगिकार करावा. ते काही तत्त्वांचा अंगिकार सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात करतात. इस्लाम अंशत: पालन हे श्रध्दाशीलतेचे आणि आज्ञाधारकतेचे लक्षण मूळीच नाही. हे अपूर्ण श्रध्देचे आणि विश्वासाचे लक्षण आहे. इस्लामी व्यवस्थेला अंशत: लागू करण्याऱ्यांसाठी अल्लाहचे वचन मुळीच नाही. महासत्तेचे (अमेरिका) ते सर्व पिट्टू आहेत. त्यांचे हे वर्तन त्यांना खरे स्वातंत्र्य आणि सत्ता प्राप्त होऊ देणार नाहीत. इस्लामी व्यवस्था पूर्णत: अंगिकारून राष्ट्रजीवनाच्या आचरणात आणल्यानंतरच हे शक्य आहे की अल्लाहच्या देणग्या आणि अल्लाहचा मोबदला त्यांना प्राप्त होईल. म्हणूनच अल्लाह खबरदार करून बजावून आदेश देत आहे,

''आणि माझ्याशी केलेल्या वचन कराराची तुम्ही पूर्तता करा. तुमच्याशी केलेल्या कराराची मी पूर्तता करीन आणि फक्त माझेच भय बाळगा.'' (२:४०)

—समाप्त—